मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

युगवाणी

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९८६



श्रीपाद महादेव माटे
जन्मशताब्दी विशेषांक

अनुक्रमणिका

आगामी अंक



लेख / लेख / लेख / लेख / लेख

ललित लेख / ललित लेख / ललित /

कथा / कथा / कथा / कथा / कथा /

कविता / कविता / कविता / कविता /

अनुक्रमणिका

जुलै / ऑगस्ट / सप्टेंबर १९८६
वर्ष बेचाळीसावे / अंक ४.५.६

[महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाकडून अंशतः अनुदान प्राप्त]

युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

मुख्य संपादक आशा सावदेकर
संपादक श्रीपाद भालचंद्र जोशी
कार्यकारी संपादक केशव जोशी
संपादक मंडळ :
वि. स. जोग, मधुकर वाकोडे, श्रीकान्त तिडके, शा. आ. स्वान, प्रकाश खरात
अक्षर मुद्रण : नारायण मुद्रणालय □ प्रतिरूप मुद्रण : मधुकर आर्ट्स्

अनुक्रम • • •

मुखपृष्ठ : हेमंत मानमोडे, नागपूर

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस वि. सा. संघ, सीताबर्डी, नागपूर १२

■ संपर्क : संपादक युगवाणी, वि. सा. संघ, झाशी राणी चौक, नागपूर १२ / दूरभाष : २३९२९.

सं|पा|द|की|य|

'युगवाणी' जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९८६ चा हा अंक श्री. म. माटे जन्मशताब्दी विशेषांक म्हणून सादर करायचा हा मनोदय. पण अनेक अपरिहार्य अडचणींमुळे अक्षम्य विलंब झाला. श्री. म. माटे यांचा जन्म भाद्रपद १८८६ चा ! माटे जन्मशताब्दी अंक काढताना श्री. म. माटे यांच्या कार्याचे पुनर्मूल्यन व्हावे अशी अपेक्षा होती. त्याबरोबरच आजच्या दलित वाङ्मयाशी कुठे नाते जुळते का याचा शोध घेण्याचीही प्रेरणा होती. 'गंगाधर पानतावणे' यांच्या लेखातून माटे-आंबेडकर विचार संघर्षावर पडलेल्या प्रकाशातून नव्या चर्चेच्या नव्या वाटा उजळतील, अस्सल खडकाळ जीवनातला निरागस रा‍कटपणा आणि त्यातील दुःखाची जाणीव ह्या विशेषाबरोबरच त्यांच्या कथेने कथेच्या मंत्रतंत्राची भिरकावलेली कैची कथेवरील लेखांमधून दृष्टीस पडेल. एवढेच नाही तर माटे यांच्या कन्या सौ. सुधा यांचा विशेष लेख आणि म. श्री. दीक्षित यांच्या आठवणी व्यक्तित्वावर प्रकाश टाकतील, डॉ. मालशे यांचा लेख माटेकार्याचे समतोल परिशीलन करेल.

युगवाणीचे एकेकाळचे संपादक पु. य. देशपांडे, यांना तत्त्वचिंतक, कादंबरीकार तसेच माणूस म्हणून पाहण्याचा प्रयत्न या अंकात आहे. कवी उ. रा. गिरी आणि चित्रकार धनंजय नाकाडे यांच्या वैशिष्टयांचे दर्शनही घडावे. आणि हीच या दिवंगत साहित्यिकांना श्रद्धांजली ठरावी.

मराठी समीक्षेत मोलाची भर घालणारे स. शि. भावे, कलावंत मन आणि सामाजिक जाणीवेसाठी तडफडणारे मन दोन्ही जपणाऱ्या मुमताज रहिमतपुरे यांचे आकस्मिक निधन ह्या साहित्यक्षेत्रातील सुन्न करणाऱ्या घटना !

'युगवाणी'च्या ह्या अंकासाठी शांता शेळके यांनी लेखाच्या पुनर्मुद्रणासाठी परवानगी दिली, श्री. म. माटे यांचे चिरंजीव मधुकरराव यांनी तत्परतेने फोटो पाठविला, म. श्री. दीक्षित यांनी 'युगवाणी'वरील स्नेहामुळे माटे यांचे हस्ताक्षर उपलब्ध करून दिले, श्री. धनंजय नाकाडे यांच्या कुटुंबियांनी त्यांच्या

अनुक्रमणिका

चित्रांचे फोटो देऊन उपकृत केले. ह्या सर्वांच्या ऋणाचा उल्लेख केल्याशिवाय समाधान वाटणार नाही.

'युगवाणी'चा हा नव्या संपादनकाळातील दुसरा अंक. 'युगवाणी' जुन्यातील नवे शोधण्याचा प्रयत्न करते आणि नव्याचे स्वागत करते. जुन्या काळातल्या महत्त्वपूर्ण गोष्टी नव्या पिढीपर्यंत पोचणे हे 'युगवाणी'चे कर्तव्य आहे तर नव्या पाऊलखुणांना आपल्यात सामावून घेणे हा 'युगवाणी'चा आनंद आहे.

केवळ वाचकांना माहिती देत त्यांना 'पांडित्य' सांगणे हा 'युगवाणी'चा उद्देश नाही. केवळ समीक्षा हा जसा 'युगवाणी'चा दृष्टिकोन नाही तसेच केवळ ललित वाङ्मय वा त्यासंबंधी माहिती हीही 'युगवाणी'ची वलस्थाने नाहीत म्हणूनच रूढ अर्थाने दिवाळी अंक काढणे हे 'युगवाणी'च्या कक्षेत येत नाही. कारण 'युगवाणी'ला व्यावहारिक दृष्टिकोन नाही आणि धंदेवाईक तर नाहीच नाही. 'युगवाणी' विशेषांकाला महत्त्व देते. आर्थिक वळ, व्यवस्थापन, वाङ्मय-क्षेत्रातील बहुविधांशी जवळीक ह्याच गोष्टी नियतकालिकाला तारू शकत नाहीत. मानधनाची चिंता न करणारे प्रथितयश साहित्यसेवक, चांगले लिहू पाहाण्याची धडपड करणारे नवे साहित्यपथिक अशा गोष्टींच्या आधारावर, भक्कम साहित्यप्रेम आणि चोखंदळ दृष्टी अशा पायाभरणीवर नियतकालिके चालतात यावर 'युगवाणी'चा विश्वास आहे.

म्हणूनच मार्गातल्या अडचणींवर मात करीत 'युगवाणी' असाच प्रवास करण्याचा भरवसा बाळगून आहे. जसे साहित्य मनात होते तसे मिळवणे, ठराविक काळात मिळवणे आणि मिळणे, तसेच इतरांचे वेळेवर साह्य मिळणे ह्याही गोष्टी दुर्मिळ असतात खऱ्या, तरीही नसतात असे मात्र नाही. म्हणून उशीराने का असेना, पण नवी घडी घालू बघणाऱ्या दृष्टीला 'आपण आपल्याला आकार देणे कठीण नाही.' असा साक्षात्कार घडू शकतो यावर 'युगवाणी'चा विश्वास आहे, आणि हेच तर आपले पाथेय आहे !

आशा सावदेकर

कै. श्रीपाद महादेव माटे (१८८६–१९८७) यांना जाऊन आता पंचवीस वर्षे झाली. आजकाल त्यांची विशेष आठवण निघते ती 'उपेक्षितांचे अंतरंग' खोलणारे ग्रामीण वा दलित कथेचे आंघाडीचे शिल्पकार म्हणून. माटयांची लिहिण्याबोलण्याची शैलीही खास त्यांचीच होती. तिला एक मराठमोळी मिजास होती. त्यांचे बोलणे ऐकताना आणि लिहिणे वाचताना वाटते की ते स्वतःच्या मिठ्ठास वाणी–लेखणीची लज्जत चाखताहेत, शिक्षक म्हणून त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांवर जे व्यापक सामाजिक संस्कार केले, त्याचाही उल्लेख त्यांच्या माजी विद्यार्थ्यांकडून आदराने होतो. १९१७ पासून पुढे दोन तपे त्यांनी अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात चांगलाच रस घेतला. पुण्यात मोरोबादादांच्या वाड्यात ते इंग्रजीचा वर्ग चालवीत. त्याला खूप विद्यार्थी जात. त्यात मिळणारा पैसा त्यांनी अस्पृश्यांसाठी सात शाळा चालविण्यासाठी खर्च केला. त्यांच्या या कार्याचा गौरव पां. ना. राजभोज आणि कृष्णराव गांगुर्डे यांच्यासारखे पूर्वास्पृश्य पुढारीही करीत. माटयांनी अस्पृश्यता-निवारणाचे कार्य केले, तो काळ तुलनेने जुना होता. सनातनी पुणेकरांनी 'महार माटे' म्हणून त्यांची कुत्सितपणे हेटाळणीच केली. पण एखाद्या श्रीवत्सलांछनासारखी ही शिवी माटे दिमाखाने मिरवीत. आज काळ इतका बदलला आहे की त्या शिवीची ओवी व्हावी.

कै. माटे यांनी अस्पृश्योद्धाराचे जे प्रत्यक्ष कार्य केले ते आजच्या पिढीला फारसे ज्ञात नाही; तद्वतच त्या कार्याची भूमिका विस्तृतपणे मांडणारा त्यांचा ग्रंथराज (Magnum Opus) 'अस्पृष्टांचा प्रश्न' हा सुद्धा विस्मृतीत गेल्यासारखाच झाला आहे. १९३३ साली श्री. शं. रा. दाते यांनी प्रसिद्ध केलेल्या ह्या सहाशे पृष्ठांच्या ग्रंथाची आपण ओळख करून घेणार आहो.

या ग्रंथराजाच्या नावात 'अस्पृश्य' या नेहमीच्या शब्दाऐवजी 'अस्पृष्ट' हा शब्द का योजला आहे, याचे प्रथमदर्शनीच कोणालाही कुतूहल वाटावे. म. गांधी अस्पृश्यांना 'हरिजन' म्हणून संबोधू लागले नि तो शब्द खूपच चलनी झाला. वीर सावरकरांनी १९२४ पासून स्थानबद्धतेच्या काळात अस्पृश्यतानिवारणासाठी खूपच प्रचार केला, तेव्हा त्यांनी 'पूर्वास्पृश्य' हा शब्द रुळविण्याचा कटाक्षाने प्रयत्न केला. अस्पृश्यता कधीकाळी होती, आता जणू ती पार गेली, हे त्या शब्दांतून सावरकरांसारख्या हाडाच्या प्रचारकाला सुचवावयाचे होते. माटयांनी 'अस्पृश्य' शब्द टाकून 'अस्पृष्ट' हा कमी रूढ शब्द स्वीकारला यामागे त्यांची विशिष्ट भूमिका होती. 'अस्पृश्य' शब्दाचा सरळ अर्थ 'स्पर्श करण्यास अयोग्य' हा आहे. त्या शब्दातला हीनार्थ माटयांना पुसून टाकावयाचा होता. तेव्हा एक प्रकारे शास्त्रीय परिभाषेचे तत्त्व ध्यानात घेऊन 'अस्पृष्ट' हा शब्द त्यांनी हेतुतःच योजला होता.

महाराष्ट्रात अस्पृश्यांच्या प्रश्नाला मुखर केले ते महात्मा फुल्यांनी. त्यांनी आपल्या विविध प्रकारच्या प्रचारपुस्तिकांतून या प्रश्नाला धसधशीतपणे तोंड फोडलेच, शिवाय तुकाराम तात्या पडवळ यांचा 'जातिभेद विवेकसार' हा ग्रंथ (१८६५) प्रसिद्ध करण्याचे धाडस दाखविले. शास्त्राधारे अस्पृश्यता निवारणाचे मंडण करणारे 'स्पर्शास्पर्श' (१९११) हे पुस्तक पं. श्री. दा. सातवळेकरांनी रचले आहे. त्याचे खंडण करणारा काशिनाथशास्त्री लेल्यांचा ग्रंथ एका वर्षातच प्रसिद्ध झाला होता. 'किर्लोस्कर' मासिकातून वीर सावरकर, महादेवशास्त्री जोशी, वा. का. किर्लोस्कर यांचे लेखन यांचे एतद्विषयक लेखन या शतकाच्या तिशी–चाळिशीत धडाक्याने येत होते. 'अस्पृश्य-विचार' या नावाचे एक छोटेखानी पुस्तक खुद्द माटयांनीही प्रसिद्ध केलेले होते. श्रीधरशास्त्री पाठककृत 'अस्पृश्यतेचा शास्त्रार्थ', विठ्ठल रामजी शिंदेकृत 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' आणि माटे यांचा प्रस्तुत ग्रंथराज १९३३ च्या सुमारास पुढे आला. अस्पृश्येतरांनी केलेल्या लेखनात प्रा. माटयांचा ग्रंथराज अनेक दृष्टींनी उल्लेखनीय ठरावा.

माटयांच्या 'अस्पृष्टांच्या प्रश्ना'ला मी ग्रंथराज म्हणत आहे कारण एकतर सकृद्दर्शनीच डोळयात भरावा असा तो प्रचंड आहे. याची एकूण ६०८ पृष्ठे असून पहिल्या साडे चारशे पृष्ठात अस्पृश्यतेच्या समस्येची सांगोपांग चर्चा आहे; तर पुढील दीडशे पृष्ठात अस्पृश्यतानिवारणातील अनुभवांचे कथन आणि सटीप विवेचन आहे. असे या ग्रंथात तात्त्विक आणि प्रचीतीचे असे उभयविध बोलणे आहे. समर्थांच्या रचनेत 'दासबोधा'चे जे स्थान तेच खरोखर माटयांच्या पुस्तकात या ग्रंथराजाचे स्थान आहे.

सिद्धांत आणि व्यवहार या दोन्ही अंगावर या ग्रंथात सारखाच प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे, हा त्या ग्रंथाचा आणखी मोठा विशेष आहे. शिवाय माटयांच्या दृष्टीचा पल्ला केवळ अस्पृश्य समाजापुरता सीमित नाही, सध्या बहुचर्चित असणारे भटक्या जमातींचे प्रश्नही त्यात येऊन गेलेले आहेत. मात्र ग्रंथाचा गाभा अस्पृश्यतेची आणि तिच्या सोडवणुकीविषयीचे विवेचन हाच आहे. या ग्रंथात मध्येच 'अस्पृष्टाच्या डायरीतील पाने' सारखे स्वयंकल्पित पण वास्तववादी लेखनही आले आहे. त्यामुळे, अर्थातच, ग्रंथाच्या शास्त्रीयतेला गालबोट लागल्यासारखे असले, तरी प्रत्ययकारितेत ते उणे नसल्याने फार खटकत नाही. ग्रंथाचा मुख्य भाग सर्वेक्षणांची फलिते, आकडेवारीची कोष्टके, प्रश्नावल्यांची उत्तरे वगैरेतून गोळा झालेली माहिती आणि तीमधून निष्कर्षित होणारे सिद्धांत हाच आहे.

माटयांची स्वतंत्र विचारसरणी हाही गुण या ग्रंथाला एक वेगळे परिमाण मिळवून देतो. माटे हे एरवी पुष्कळसे सावरकर मतानुयायी आहेत. पण ते अस्पृश्यता निवारणाच्या बाबतीत अतिटोकाची

माट्यांचा 'अस्पृश्यांचा प्रश्न
हा ग्रंथराज समाजशास्त्रीय
असला तरी त्यात
'स्वानुभूत वासाचे दान'
ठायीठायी आहे.
पर्यंकपांडित्याचे किंवा
विद्यापीठीय पठडीचे
बंदिस्त स्वरूप
त्याला प्राप्त झालेले नाही.
ग्रंथाच्या परिणामकारकतेचे
आणखी एक कारण म्हणजे
प्रा. माट्यांची कसदार शैली.

स० गं० मालशे

एका उपेक्षित ग्रंथराजाचे अंतरंग

भूमिका स्वीकारीत नाहीत. प्रतिपाद्याचे मंडण करताना त्यांचे धोरण मध्यमक्रमी, समन्वयी आणि आर्जवी स्वरूपाचे आहे. मंदिर प्रवेशाच्या संदर्भात तर माटयांची भूमिका सावरकरांहून भिन्न आहे. अस्पृश्यांसह सर्व जमातींना खुले असणाऱ्या पतितपावन मंदिरासारखा सावरकरांचा उपक्रम माटयांनी विशेष स्वागतार्ह मानलेला नाही. नामनिर्देशन करताना माटयांनी म्हटले आहे अशा मंदिरात बाकीचे त्रैवर्णिक येणार नाहीत, फक्त अस्पृश्यच येतील. सावरकरांच्या दुर्दम्य व्यक्तिमत्त्वामुळे काही काळ त्या चळवळीने जोर केला असला, तरी पण माटयांच्या म्हणण्यातला तथ्यांश नाकारणे कठीण ! माटयांची भूमिका प्रचारकापेक्षा समाजशास्त्रज्ञाची आहे. ते म्हणतात की, सामाजिक संकेतात 'बरोबर' व 'चूक' या परिभाषेपेक्षा 'प्रस्तुत' व 'अप्रस्तुत', 'लागू' व 'गैरलागू' ही परिभाषाच अधिक उचित ठरते.

भारतात अस्पृश्यतानिवारणाची समस्या एकाएकी कशी चर्चेच्या रिंगणात आली, याविषयीचे प्रा. माटे यांचे निदान अचूक आहे. हिंदी नेते राज्यशासनात आपणास अधिकाधिक सहभाग मिळावा, या मागणीसाठी चळवळ करीत होते. पहिल्या महायुद्धात हिंदी सैनिकांनी ब्रिटिशांच्या बाजूने लढून मर्दुमकी गाजविली होती. त्या निमित्तानेही या मागणीच्या चळवळीला बळ प्राप्त झाले होते. १९१८ च्या संधीस या चळवळीचा परिपाक म्हणून मॉंटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणांचा पहिला हप्ता पदरात पडणार, अशी हवा निर्माण झाली होती. सुधारणेच्या या पहिल्या हप्त्याच्या घोषणेमागील राजनैतिक परिस्थितीची कार्यकारण–भावात्मक चतुर्विध अंगे प्रा. माटयांनी दिली आहेत, ती अशी –

(१) ब्रिटिश सरकारचे 'फोडा आणि झोडा' हे एकंदरीत कुटिल धोरण.

(२) हिंदू आणि मुसलमान यांमधील वैकी.

(३) अस्पृश्य–वर्गाला सवर्णांविषयी वाटणारा अविश्वास.

(४) सवर्णांतील सुशिक्षित वर्गात उदय पावलेली स्वराज्यसंपादनाची आकांक्षा.

या चतुर्विध अंगांतून सूचित होणारा हितसंबंधाचा तेढेमेढेपणा लक्षात घेऊन मॉंट–फर्ड–सुधारणांमध्ये लोकशाही तत्त्वानुसारच जातवार प्रतिनिधित्व बहाल केले जाणार होते. जातवार प्रतिनिधित्व द्यायचे, तर त्या त्या जातीचे संख्याबळ निश्चित व्हायला हवे. त्यातून मुस्लिम आणि अस्पृश्य यांची नेमकी संख्या किती आहे, हा प्रश्न उपस्थित झाला. ही संख्या ठरविताना 'मुस्लिम' या संज्ञेबाबत वाद नव्हता. पण 'अस्पृश्यां'बाबत 'व्याख्यास्याम:'पासून प्रारंभ होणे भागच होते. तेव्हा लगोलग व्याख्येची समस्या दत्त म्हणून पुढे उभी राहिली–साहजिकच अव्याप्ति–अतिव्याप्तीचा घोळ बराच झाला; कारण भारतासारख्या खंडप्राय देशातील प्रांताप्रांतांत अस्पृश्यतेसंबंधीची वस्तुस्थिती परस्परभिन्न होती. पंजाबचेच उदाहरण घ्या. पंजाबात आर्यसमाजी, महमदी, आणि शीख या पंथाचा प्रभाव विशेष होता. तेव्हा अन्य प्रांतांच्या तुलनेने तेथे शिवाशिवीचा निर्बंध पुष्कळच सौम्य होता. रा. ब. चौधरींसारखी मंडळी अशा गोष्टींवर भर देत, तर उलट विटाळ बाह्यत: मानला नाही, तरी अस्पृश्यतेची आतली भावना मुळीच नष्ट होत नाही, असे डॉ. आंबेडकर ठामपणे मांडीत. मतमतांतरांच्या या गलबल्यातून मार्ग काढून अस्पृश्यतेची एक कामचलाऊ व्याख्या गृहीत धरण्यात आली. या व्याख्येच्या दोन कसोटया ठरविण्यात आल्या होत्या : (१) प्रत्यक्ष स्पर्शाने वा अंतरावरून विटाळ मानणे; (२) ब्राह्मणाला हातचे पाणी न चालणे. या कसोटयांप्रमाणे भंगीकाम करणारे, डुकरे पाळणारे, गोमांस खाणारे यांना ब्राह्मण लोक शिवत नाहीत, म्हणून त्यांना 'अस्पृश्य' समजावे, असे ठरले. परंतु पुढे व्याख्येची अव्याप्ती हळूहळू उघड झाली आणि शेवटी 'ज्यांच्या स्पर्शाने वा अंतरावरूनही विटाळ होतो, ते अस्पृश्य होत' असा व्याख्येचा निर्णय झाला (पृ. १५). पण पूर्वी दावा सांगितला जात होता, तो या व्याख्येनुसार अवाच्या सवा ठरला. अस्पृश्यांची संख्या दाव्याहून खूप कमी ठरली. त्या काळी अंदाजे ती एक कोटी चव्वेचाळीस लक्ष भरली.

सवर्णांतील सुशिक्षित वर्ग राजकीयदृष्टचा जागृत होऊन चळवळी करीत होता; पण नव्या राजकीय हक्कांच्या जातवार प्रतिनिधित्वामुळे त्याला एक मोठी धास्ती वाटू लागली : या प्रतिनिधित्वामुळे आपल्या स्वराज्याच्या आकांक्षांना खो तर बसणार नाही ? राजकीय चळवळीच्या मुख्य प्रवाहाशी फटकून राहून अस्पृश्य जमात ब्रिटिश सरकारशी संगनमत तर करणार नाही ? उलट अस्पृश्य समाजालाही आपल्या हक्कांची जाणीव झाली होती. शासनात आपल्या जातीचे प्रतिनिधी गेल्याशिवाय आपले खरे कल्याण होऊ शकणार नाही, अशी त्या वर्गाची बालंबाल खात्री पटत चालली होती. असे हितसंबंधांचे चित्र काहीसे तेढेमेढे बनले होते. यातूनच सुशिक्षित वर्गाला अस्पृश्यतानिवारणाची निकड विशेषत्वाने भासू लागली. प्रा. माटयांची ही कारणमीमांसा एकदम वस्तुनिष्ठ आहे, ही गोष्ट राजकीय इतिहासात रस असलेल्या कोणाही जाणकारास मान्यच करावे लागेल.

अस्पृश्यतेचे मूळ आणि कूळ शोधण्याचाही बराच नेटका प्रपंच प्रा. माटे यांना साधला आहे. अस्पृश्यतेचे मूळ रक्तशुद्धीच्या आणि आनुवंशिकतेच्या कल्पनेत आहे, हे त्यांच्या प्रतिपादनाचे सार आहे. आर्य भारतात आले नि त्यांनी आदि-द्रविडांकडे हलकी कामे सोपविली. अशा लोकांच्या वसत्याही अलग झाल्या. हे विभक्तीकरण एवढ्यावरच थांबले नाही. उच्चनीचत्वाची भावना प्रादुर्भूत होऊन वाढीस लागली आणि वंशश्रेष्ठत्वाची पिढान्‌पिढ्या जपणूक करण्याचा लोभही दृढ होत गेला (पृ. १५६–५८).

‘ अस्पृश्यतेचे मूळ रक्तशुद्धीच्या आणि आनुवंशिकतेच्या कल्पनेत आहे हे त्यांच्या प्रतिपादनाचे सार आहे.’

वंशभिन्नत्वाची जाणीव आणि उच्चनीचत्वाची जाणीव या उभय जाणिवा भिन्न राखल्या जाव्या; असे प्रा. माटे यांना मनोमन वाटते. त्याच्या मते, या दोन अगदी स्वतंत्र गोष्टी असून वंश-शुद्धीची जपणूक त्यांना फारशी अन्याय्य वाटत नाही; उच्चनीचतेची भावना, काही झाले तरी अन्याय्य होय, असे ते ठामपणे मानतात. आपल्या मताच्या समर्थनार्थ माटे यांनी कित्येक उदाहरणे सांगितली आहेत : अँग्लो–इंडियन लोक नेटिव ख्रिश्चनांहून स्वतःस वेगळे मानतात, पारशी लोकांची जाणीव तर भलतीच तीव्र आहे, मुसलमानांत आपणांस वाटतो तसा सवगोलंकार नाही, त्यांच्यातही बेटीबंद जमाती आहेत, महानुभाव, जैन, बौद्ध, लिंगायत हे वैदिकेतर पंथही वंशशुद्धी जपणूक करतात. अमेरिकेत नवी वसाहत करणाऱ्या इंग्रजांनी रक्तशुद्धीच्या म्हणजे वंशशुद्धीच्याही नावाखाली काही वेगळे केलेले नाही. तेव्हा जे अगदी सुधारणेच्या शिखरावर असलेल्या लोकांत चालू आहे, तेच हिंदू त्रैवर्णिकांनी केलेले आहे. पण असे हे समर्थन करीत असताना वंशशुद्धीच्या जपणुकीतूनच उच्चनीचतेची भावना मूळ धरून बळावत जाते, हे स्वतःच सांगितलेले सूत्र माटे विसरतात. खरे तर, वंशशुद्धी आणि उच्चनीचता या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. इतरांच्या नाकात सर्दी म्हणून माझ्या नाकात सर्दी, असे म्हणून माणुसकीशी विसंगत अशा गोष्टींचे समर्थन होण्यासारखे नाही. मात्र वंशशुद्धीच्या जपणुकीतून उच्चनीचतेची भावना बळावली आणि अस्पृश्यतेसारखा घोर अन्याय सुरू झाला, याची खंत माटयांना वाटत नाही, असे नाही. त्यातून अस्पृश्य ठरविलेल्या समाजावर ‘विपत्तीचे आभाळ ’च कोसळले, असे ते म्हणतात.

लोकशाहीच्या तत्त्वानुसार जो जो म्हणून मानव आहे, त्याला त्याला स्वतःचे मूल्य आहे, हा मुद्दा विशद करताना माटयांनी एकूण मानवी विकासक्रमाचे पुढील टप्पे मानले आहेत (अ) भटकी

पशुपालन वृत्ती (आ) नदीकाठची कृषिवृत्ती (इ) मानवसमुदायाच्या संरक्षणार्थ निर्माण झालेली राजसत्ता आणि सरंजामशाही (ई) राजसत्ता आणि उच्चनीचतेला आव्हान देणारी लोकशाही.

लोकशाहीच्या परिणतावस्थेत प्रत्येक व्यक्तीच्या माणुसकीला मोल येते. सामान्य माणसातही राष्ट्राभिमानाची भावना प्रादुर्भूत होते. राजाच नव्हे; तर रंकही म्हणू लागतो की, 'हा देश माझा आहे!' मात्र हे तो केव्हा म्हणतो? — माणुसकीची किंमत कायम असली तर! भारतीय समाजव्यवस्थेत अस्पृश्यांची माणुसकीच गुदमरून गेली आहे, असे माटे म्हणतात.

आनुवंशिकतेच्या संकल्पनेत माटयांना तथ्य वाटते. तीत सामर्थ्य असेल, तर ती टिकवून धरावी असे काहीशा ओशाळगतीनेच ते मांडतात. मात्र या संकल्पनेपायी इतर समाजांची प्रगती रोखणे चूक आहे, हे ते निक्षून बजावतात. निकृष्टत्वाचा शिक्का बसलेल्या जमातींतूनही काही कर्तबगार पुरुष निघालेले आहेत, हे खुद्द माटयांनीच दाखवून दिलेले आहे (पृ. २६१–६२). शास्त्रांतून जे आपद्धर्म म्हणून सांगितले आहेत, तदनुसार प्रवास, युद्ध, यात्रा इ. प्रसंगी अस्पृश्यता मानली जात नसे, ही गोष्टही माटयांनी निदर्शनास आणलेली आहे. आणि तरीसुद्धा आनुवंशिकतेच्या 'हरळीचे मूळ' त्यांच्या मनात घर करून राहिले आहे, याचा अचंबाच वाटतो.

प्रा. माटयांनी कर्मसिद्धांत किंवा पूर्वजन्म आणि पूर्वसुकृत या संकल्पनांचा यथायोग्य समाचार घेतलेला आहे. या संकल्पनांतून दुःखी माणसाच्या मनावर समाधानाचा फुंकर घातला जात असला; तरी त्यांच्या आधारे केले जाणारे अस्पृश्यतेचे समर्थन निखालस खोटे असून ते डोळे मिटून मान्य करण्याइतके अस्पृश्य आता भोळसट राहिले नाहीत असा रास्त इशाराही माटयांनी दिलेला आहे. अस्पृश्यतेच्या बुडाशी कसलेही दैवी संचित नसून ती एक मनुष्यकृत अमानुष रूढी आहे, हे त्यांनी आवर्जून स्पष्ट केले आहे.

पूर्वीच्या गावगाडयात अस्पृश्यातील महार–चांभार जमातींना स्थान होते, महारांना तर विशेषच स्थान होते, हे गावगाडयाची रचना नि बलुतेदारीची पद्धती उलगडून त्यांनी उत्तम प्रकारे दाखविले आहे. हा उलगडा करताना त्यांची ऐतिहासिक दृष्टी सतत जागृत आहे. गावगाडयात शेतकरी हा बळीराजा होता; तो धान्याचा उत्पादक म्हणून केंद्रवर्ती होता. त्याच्या बरोबरच महाराची कामे आणि हक्क यांना महत्त्व होते. चालीरीतींचे पुरावे कसून तपासून माटयांनी काही निष्कर्ष काढले आहेत. उदा. विवाह प्रसंगी महाराचा नवरा घोडयावरून, चांभाराचा बैलावरून तर मांगाचा हल्यावरून (रेडयावरून) मिरवीत असत. या तपशीलावरून त्या त्या जातींचे श्रेणीसंबंध माटयांनी विशद केले आहेत. बुरडाचा धंदा घायपातीचा तर मांगाचा केकताडाचा; तेव्हा या दोन्ही जमाती दीर्घ काळ 'वन्य' असाव्यात, असे अनुमान त्यांनी मांडले आहे. या जमाती निरक्षर असल्याने जुन्या कागदपत्रातून स्वाक्षऱ्यांऐवजी निशाण्या नोंदवीत असत. महाराची काठी, चांभाराचा इंगा, तर मांगाची दोरी अशा त्या निशाण्या होत्या. यावरून हुजुरांच्या पागेत महार, आरमारात चांभार आणि मांग यांची कामे असत, असा अंदाज त्यांनी बांधला आहे. त्यांनी सादर केलेले काही ऐतिहासिक तपशील उद्बोधक आहेत.

(अ) बेदरच्या बादशहाच्या राजवटीतील नागनाथ–देवकाईची घटना.

(आ) किल्ला उभा राहीना, म्हणून महार बळी दिल्याचा शिवकालीन उल्लेख.

(इ) विवाहविषयक कज्जांच्या निकालांतून महारांचे व्यक्त होणारे हक्क.

(ई) महारांच्या लष्करातील अस्तित्वाचे रोखठोक मिळणारे दाखले : पेशव्यांच्या चव्वेचाळीस महार पथकदारांची यादी.

व्यासंगाच्या दृष्टीने स्पर्शास्पर्शासंबंधी आणि आपद्धर्मासंबंधी जी शास्त्रवचने प्रा. माटयांनी सादर केली आहेत. ती लक्षणीय आहेत (१६७–८२). पण त्याहीपेक्षा मराठी संतवाङ्मयातील वचनाः

मागून वचने सादर करून व त्यांचा अन्वयार्थ लावून 'पारमार्थिक लोकशाहीचे' जे सूत्र त्यांनी शोधून काढले, ते मराठीत रूढ झालेले आहे. मराठी संतांच्या कार्याविषयी त्यांची भूमिका परमादराची असूनही ती आंधळी नाही. अस्पृश्य संतांच्या अभंगवाणीत भक्तीचा जिवंत उमाळा कसा आहे, हे त्यांनी उत्कटपणे दाखवून दिले आहे; पण त्याही पुढे जाऊन देवदर्शनापासून वंचित झाल्याचे वा स्वतःच्या अस्पृश्यतेचे या अस्पृश्य संतांना भानच नव्हते, असे म्हणणे कसे भ्रामक आहे, हेही त्यांनी उत्तम रीतीने उघड केले आहे. पुरावे म्हणून चोखा, सोयरा, कर्मा इ. संतांची विनतोड, वचने उद्धृत केलेली आहेत. हे सारे सांगूनही सध्याच्या अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीला स्पष्ट पाठिंबा देणारा किंवा सहभोजन वा मंदिरप्रवेश यांसारख्या आधुनिक सुधारणांचे समर्थन करणारा घसघशीत पुरावा त्यांच्या वचनांतून काढून दाखविता येणार नाही. आपापला कुळधर्म पाळावा, यातिकूळ शुद्ध राखावे, असेच हे संत परोपरीने सांगताना दिसतात; असे माटेचांनी निःसंदिग्धपणे स्पष्ट केले आहे. सारांश, समाजव्यवस्थेवर बंडखोरपणे आघात करण्यास उद्युक्त करणारा आधुनिकपणा या संतांना चिकटविता येणार नाही, असे माटेचांचे सांगणे आहे (पृ. १८९–९१ व पृ. २२०-२३). आजच्या लोकशाहीच्या कल्पनांनुसार अस्पृश्यता–निवारणाचे समर्थन होण्याजोगे आहे आणि ते अवश्यमेव करावे; पण हीच गोष्ट हीन जातींतील संतांनाही अभिप्रेत होती, असा आभास निर्माण करू नये अशी या बाबतीतली माटेचांची भूमिका आहे आणि ती डोळस तशीच रास्त म्हणावी लागेल.

'तत्कालीन स्वराज्याच्या चळवळीची अडवणूक होऊ नये याची माट्यांना आंतरिक तळमळ आहे.'

आपल्या सर्व विचारमंथनाचे नवनीत म्हणून आजच्या लोकशाहीच्या युगमानाला साजेसा समानसंधीचा आपला लाडका सिद्धांत माटेचांनी प्रस्तुत ग्रंथात अगदी पालुपदासारखा मांडला आहे. हा सिद्धांत म्हणजे **मनबुद्धीची बीजभूत सामर्थ्ये विकसित होण्यास व विकसित झालेल्या सामर्थ्यांच्या वापरास सर्वांस सरसहा परवानगी असणे.** या सिद्धांतानुसार स्पृश्यांच्या शाळा, पाणवठे इ. चा अस्पृश्यांस उपयोग करू देणे आणि देवालयप्रवेश करून देणे, हे सुधारकांचे निकडीचे कर्तव्य आहे; असे त्यांनी सुचविले आहे. (पृ. २६८).

आपल्या या ग्रंथात अहवाल, पाहण्या, जनगणनेची इतिवृत्ते, विविध आकडेवारी इ. साधनांचा एवढ्या मोठ्या प्रमाणात माटेचांनी उपयोग केलेला आहे की प्रस्तुत ग्रंथ हा अस्पृश्यतेच्या प्रश्नाचा ज्ञानकोशच म्हणता येईल. या खाणीत कालमानानुसार पोषक नि पूरक भर टाकावी लागेल, हे खरे, पण ही गोष्ट कोणत्याही कोशाला लागू असतेच. माहिती खचून दिलेली असली, तरी चिंतनाने काढलेले निष्कर्ष माटे यांचे स्वतःचे आहेत. रिसले, ब्लंट, मार्टिन, मेलोनी, अब्दुल माजीद, सेजविक् इत्यादी मंडळींनी तयार केलेली सांख्यिकी कोष्टके तसेच एन्थोवन, थर्स्टन, अँडरसन, नेल्सन, व्हिटने, भट्टाचार्य, वि. का. राजवाडे, रानडे, गांधी, आंबेडकर, बुअर, महालक्ष्मीवाला यांनी केलेल्या वा करविलेल्या पाहणीचे आणि मतांचे आधार अवश्य तेथे दिलेले आहेत. गोलमेज परिषदेच्या निमित्ताने जे विपुल साहित्य पुढे आलेले होते, ते त्यांनी लगामी लावले आहे. शिवाय स्वतःही प्रश्नपत्रिका पाठवून बलुतेदारांची माहिती परिश्रमपूर्वक मिळविली. हे सारे साहित्य खरोखर अनमोल आहे यात शंकाच नाही.

हिंदू समाजात मूळच्या चार वर्णांतून ज्या चार हजार जाती पैदा झाल्या, त्याची माटेकृत कारणमीमांसा बरीच रेखीव नि काटेकोर आहे. धंदा, प्रदेश, पंथ, संकर, शाखा, वंश, स्थलांतर अशा

आठदहा प्रकारच्या कारणांच्या व्यापारव्यवहारातून जाती पडलेल्या आहेत, असे अभ्यासकांचे मत माटयांनी नोंदविले आहे (पृ. १२६). कनिष्ठ जातींची मीमांसा करीत असताना महार, मांग, ढोर, भंगी आदी छत्तीस प्रमुख अस्पृश्य जमातींची माहिती देऊन ते थांबलेले नाहीत, मागे म्हटल्याप्रमाणे त्यांची दृष्टी भटक्या आणि वन्य जमातींकडेही पोहोचली आहे. अशा २४ वन्य जमातींची त्यांनी गणती केलेली आहे. जात, उपजात, चालीरीती, कुलपरंपरा, सण, विवाह, जन्मोत्सव, अंत्यविधी, गोंदण्याच्या तऱ्हा, संप्रदाय, म्हणी यासंबंधीची मोलाची माहिती प्रश्नपत्रिका पाठवून माटयांनी मिळविली. केवळ महाराष्ट्रातच त्यांना महारांच्या ५३ पोटजाती आढळून आल्या. अहमदनगरच्या महारांमध्ये साडेबारा पोटजाती आहेत. 'गोपाळ' ही अर्धजमात समजली जाते! खानदेशातील मांग विवाहित मृतांना जाळतात, तर अविवाहितांना पुरतात. ढोरांमध्ये सवाष्ण आणि विधवा यांच्या मर्तिकांत भेद केला जातो. प्रथम वराचे विधवेशी लग्न होणार असेल, तर त्याचे आधी रुईशी लग्न लावतात. उच्चवर्णीय व्यक्तीने नीचवर्णीय व्यक्तीचे काम केल्यासही जातिभेद घडून येतात. चेवळी म्हणून उपजाती चांभारात आहे. त्या जातीचे लोक महारांचे जोडे शिवतात आणि मांस खातात, म्हणून कनिष्ठ मानले जातात. चोखा मेळा-पंथीय महार ब्राह्मणांकरवी लग्ने लावतात. ढोरांप्रमाणे त्यांच्यामध्येही विधवेशी प्रथमवराचा विवाह होण्यापूर्वी त्याचे रुईशी लग्न लावतात. ढोरांपैकी 'सिध' या पोटजातीत विधवा ही धाकटया दिराशी लग्न करते. प्रांतो-प्रांती आढळणारे चालीरीतींतील फरक माटयांनी तपशीलाने दिलेले आहेत. समाजशास्त्रीय अभ्यासकांना हा अमोल खजिनाच वाटावा.

समाजसुधारणेच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्यांचे न्या. रानडे यांनी चार वर्ग मानले होते; (१) शास्त्रातून अनुकूल अर्थ काढणारे; (२) शास्त्रांविषयी अनादर न बाळगता बुद्धिप्रामाण्यावर भर असणारे; (३) इष्ट वाटणारी सुधारणा कायद्याने लादू पाहणारे; (४) समाजाला नालायक ठरवून तर्कबुद्धीला अनुसरून तुसडेपणाने आचरण ठेवणारे एकांडे शिलेदार. रानडयांच्या चार वर्गांत आणखी एका पाचव्या वर्गाची भर माटे घालू इच्छितात. तो वर्ग म्हणजे सर्व साधनभेद सामावून घेणारा तसेच शास्त्र, बुद्धी, कायदा यांची बूज राखणारा समन्वयी वर्ग. माटयांचा स्वतःचा कल समन्वयी वर्गाकडेच आहे. आचार्य अत्रे माटयांचे वर्णन 'सनातनी सुधारक' असेच करीत असत.

माटयांचा 'अस्पृष्टांचा प्रश्न' हा ग्रंथराज समाजशास्त्रीय असला, तरी त्यात 'स्वानुभूत वासाचे दान' ठायी ठायी आहे. पर्यंकपांडित्याचे किंवा विद्यापीठीय पठडीचे बंदिस्त स्वरूप त्याला प्राप्त झालेले नाही. ग्रंथाच्या परिणामकारकतेचे आणखी एक कारण म्हणजे प्रा. माटयांची कसदार शैली. तिची मार्मिक सहजता पानोपानी जाणवते. अन्य सुधारकांची एकांडया शिलेदारांशी त्यांनी जी तुलना केली आहे, ती अशी आहे : "अर्थात् फटकून निवालेले व शेणमार होऊन कदाचित् प्राणास मुकलेले जे आत्मत्यागी त्यांची किंमत कशानेही होणार नाही. सुधारणेची वरात सुखाने पुढे सरावी, म्हणून प्रत्येक वळणावर फुटणारे हे नारळ होत; ते फुटल्याने इडापिडा टळते आणि सुधारणेचा छबिना वाजत गाजत जाऊन वरभरणी करतो. पण अभिप्रेत सुधारणा समाजाच्या पचनी पाडण्याचे कष्ट सुद्धा कमी नाहीत. आत्मत्यागी एकदाच मरतो आणि हा चिकट सुधारक रोज तसूतसूंनी मरत असतो" (पृ. २७२). हिंदू समाजाच्या जडण-घडणीसंबंधींचे माटयांचे एक विधान चित्रमयी आणि अल्पाक्षरी, मनात रुतून बसते. "हिंदू समाज म्हणजे अनुलोम पद्धतीची तिरस्कारबुद्धी व प्रतिलोम पद्धतीची आदरबुद्धी यांवर रचलेल्या जातींची एक उतरंड आहे" (पृ. ७१-७२). जागृत झालेल्या खालच्या वर्गाच्या आकांक्षा सर्वच देशात वाढल्या हे सांगतांना ते म्हणतात, "कोरभर भाकरी, पाण्याचे गाडगे, घोंगडीचे पटकूर, कमरेची लंगोटी, डोईला चिंधी, डाव्या हातात खुळखुळयाची काठी, मानेत लवचिकपणा, उजव्या हातात मुजुरा आणि तोंडात 'व्हय दादा!' एवढाच सरंजाम माणुसकीस पुरेनासा झाला" (पृ. २४१). अशा बोलक्या शब्दांत भारतीय अस्पृश्यतेची

तात्त्विक समस्या आणि ती सोडविण्याचे झालेले प्रयत्न यांची बरीच अधिकृत माहिती या ग्रंथात उपलब्ध होते.

या ग्रंथातील माटयांच्या विवेचनाला आणखीही एक व्यापक पदर आहे. पहिली गोष्ट म्हणजे तत्कालीन स्वराज्याच्या चळवळीची अडवणूक होऊ नये, याची माटयांना आंतरिक तळमळ आहे. हिंदू समाजांतर्गत एका महत्त्वाच्या घटकाला त्रैवर्णिक अवमानित जिणे जगायला लावतात आणि त्याचा लाभ ख्रिस्ती आणि महमदी पंथाचे प्रचारक उठवितात, याचीही त्यांना खंत आहे. 'अस्पृष्टाच्या डायरीतील पाने' हा या ग्रंथातील भाग या दृष्टीने अंतर्मुख करणारा आहे. 'पाणी' या प्रकरणात घडविलेल्या सवर्णांच्या संकुचित वृत्तीच्या चित्रणालाही लालित्याची डूब आहे. माटयांच्या कित्येक कथांचे मूलस्रोत या ग्रंथात दिसतील.

बारकाव्याने बोलायचे तर प्रस्तुत ग्रंथ समाजशास्त्रीय माहितीचे भांडार असला; तरी त्याची मांडणी आणि लेखन काटेकोर शास्त्रीय पद्धतीचे नाही. शिवाय प्रा. माटयांच्या सुधारणावादी वृत्तीला अंगभूत मर्यादाही आहेत. त्यांनी केलेले वंशशुद्धीचे समर्थन कालबाह्यच ठरावे. तरीसुद्धा व्यासंगाचा चौरसपणा, अनुभवनिष्ठतेची जोड, मध्यमक्रमी कळकळीचा युक्तिवाद आणि मराठमोळी लवचिक शैली या गुणाविशेषांनी नटलेल्या पण सध्या निष्कारण उपेक्षित ठरलेल्या या ग्रंथराजाचे अंतरंग खचितच चित्तवेधक आहे.

३ 'मनाली' कॉलेजस्ट्रीट
आगर बाजार, मुंबई

अनुक्रमणिका

म राठीतील एक विचारवंत, कर्ते आणि शैलीदार साहित्यिक प्रा. श्रीपाद महादेव तथा बापूसाहेब माटे यांच्या निधनाला येत्या २५ डिसेंबरला २९ वर्षे पूर्ण होतील. २५ डिसेंबर १९५७ रोजी दुपारी बापूसाहेब पुणे येथील आपल्या नातुबागेतील घरकुलात कर्करोगाने मृत्यू पावले. त्यांचा उंचापुरा, दणकट देह वर्ष–दीड वर्ष पोखरला जात होता नि त्यांना यातना देत होता. वेदना कमी व्हाव्यात म्हणून ते शेवटी शेवटी गळयाला कसला तरी लेप देत व फार बोलवत नसल्यामुळे आल्यागेल्याशी काहीशा घोगऱ्या आवाजात बेतानेच बोलत व स्वस्थ पडून राहत. मृत्यू दिसू लागताच 'त्यांनी आम्ही जातो आमुच्या गावा, आमुचा रामराम घ्यावा' असा फलक भिंतीला लावून ठेवल्याचे आठवते. दुपारी अंत झाल्यावर त्यांची मोठी अंत्ययात्रा निघाली होती व तीत त्यांच्याकडून दुखावले गेलेले, किंबहुना थोडे अपमानित झालेले विठ्ठलराव घाटेही सामील झाले होते.

कै. बापूसाहेब यांची आता जन्मशताब्दी आल्यामुळे त्यांच्या निकट सहवासातील आठ–नऊ वर्षांचा काळ डोळयांपुढे येतो नि त्यांच्याविषयी काय नि किती सांगावं असं होऊन जातं. १९४६ साली पुण्याला त्यांचा षष्ठ्यब्दिपूर्ती समारंभ झाला. त्याप्रसंगी 'माटे : व्यक्ती आणि वाङ्मय' नामक एक गौरवग्रंथ प्रकाशित झाला होता. गं. दे. खानोलकरांनी 'अर्वाचीन मराठी वाङ्मय-सेवकां'च्या षष्ठम खंडात त्यांचं व्यक्तित्व, वाङ्मय नि कर्तृत्व यासंबंधी दीर्घ टिपण दिलेलं आहे व त्या टिपणाला माटेवाङ्मय आणि माटेविषयक लेखनाची एक जंत्रीही जोडली आहे. त्यांच्या 'माणुसकीचा गहिंवर' आणणाऱ्या कथेसंबंधी नि वैचारिक, सामाजिक आशयाने वजन प्राप्त झालेल्या दर्जेदार ललित लेखासंबंधी कितीतरी लेखकांना पुनःपुन्हा लिहावसं वाटत असतं. माटे वाङ्मयाची एकूण गुणदोषपूर्ण चर्चा, त्यांचे शैक्षणिक, सामाजिक व साहित्यविषयक चळवळीतील कार्य यासंबंधी जन्मशताब्दीनिमित्त बरंच काही लिहिलं जाणार हे गृहित धरून मी प्रस्तुत लेखात फक्त त्यांचे व्यक्तिविशेष कथन करण्याचे योजिले आहे.

तिशीचाळीशीतल्या आजच्या पिढीला माटे कसे दिसत, वागत हे सांगितलं तर पुष्कळ उद्बोधन होण्यासारखं आहे. माटयांचा जन्म विदर्भातला असला तरी पिंड सातारी होता आणि कर्मभूमी पुणे शहर होतं. उंचीपुरी दणकट देहयष्टी, भरघोस, मिशाळ नाकेला रुबाबदार चेहरा, पायात बूटमोजे, अंगात ब्राह्मणी थाटाचे पातळ धोतर नि बंद गळयाचा पिवळसर किंवा पांढरा शुभ्र कोट, डोक्यावर काळी उंच टोपी आणि टापटाप करणारी ऐटदार चाल–अशी त्यांची नित्यपरिचित बाह्यकृती होती. स्वच्छतेचे, टापटीपीचे, वक्तशीरपणाचे ते भोक्ते होते.

चहा आणि सुपारीशिवाय बापूसाहेबांना कसलंही व्यसन नव्हतं. चहा मात्र गरम हवा असे व तो अर्धा अर्धा कप चार वेळा तरी ते घेत. जेवणखाण त्यांना चवीचवीचं वेळेवर लागे. सुदैवाने त्यांना धर्मपत्नी गोऱ्यापान व करारी लाभल्या होत्या. चार यत्ता जेमतेम त्यांचं शिक्षण झालं असेल–नसेल. पण बापूसाहेबांच्या संगतीने त्या अतिशय व्यवहारदक्ष व सावध बनलेल्या होत्या. नवरा रसिक चवीचवीने खाणारा असला की बायको सामान्यत: सुग्रण होतेच. लक्ष्मीबाई माटे स्वैपाक अर्थातच फक्कड करीत. १९४७ ते ५६ या काळात लेखकू या नात्याने माटयांकडे मला प्राय: रोजच जावं लागे. साहित्यप्रेम, हिंदुत्वनिष्ठा आणि सावरकरभक्ती हे तीन गुण जमल्यामुळे आम्हा उभयतातील संबंध उत्तरोत्तर कौटुंबिक जिव्हाळयाचे होत गेले.

समाजकार्यापायी बापूसाहेबांना आपलं घर विकायला लागल्यावर ते गोपाळ गायन समाज गल्लीतील मेहेंदळयांच्या घरात भाडयाने राहू लागले होते. त्यांचं बहुतांश, अस्सल, जिवंत, शैलीदार, आशयसंपन्न लेखन झालं ते याच घरात. आपल्या कथा आणि ललित–वैचारिक लेखांची पुस्तकं बऱ्यापैकी खपतात अशी खात्री पटताच ४७–४८ पासून ते स्वत:च आपली पुस्तकं प्रकाशित करून विकू लागले. त्यामुळे त्यांच्या हाती चांगला पैसा येऊ लागला. आपल्या अनुपस्थितीत घरी

पुस्तकांसाठी गिऱ्हाईक आलं की ते विन्मुख जाऊ नये म्हणून त्यांनी आपल्या अर्धांगिनीला विक्री-बाबतचं एक कोष्टक करून दिलं होतं. १९४९ च्या सुमारास नातूबागेत बापूसाहेबांनी आपलं स्वकष्टार्जित धनाचं असं एक छोटं घरकुल उभारलं. ते घरकुल नि त्याभोवतीची फुलझाडं, फळझाडं आल्यागेल्याला दाखवताना त्यांना मोठा अभिमान नि आनंद वाटत असे. गप्पा मारतामारता मला एकदा म्हणाले, "आज सत्तेच्या घरात सुखाने लोळतो आहे ना याचं कारण मी माझी खपाऊ पुस्तकं स्वतः प्रकाशित केली म्हणून नाहीतर प्रकाशकांनी मला मरेपर्यंत भाड्याच्या घरात ठेवलं असतं." असा हा महत्त्वाकांक्षी, जिद्दी, कष्टाळू नि तितकाच मायाळू माणूस होता. उपेक्षितांचं अंतरंग ओळखणारा नि माणुसकीचा गहिंवर आणणारा.

नेटका प्रपंच करून स्वार्थ-परमार्थ कसा जोडावा हे बापूसाहेबांकडून शिकण्यासारखं होतं. त्यांनी आपलं कुटुंब चौकोनी राखण्याचा जाणीवपूर्वक यत्न केला होता. 'तशी मला चार-पाच मुलं झाली, पण देवदयेने जगली, मोठी झाली दोनच. आमची मैना आणि मधु,' असं एकदा मला सहज ऐकवून गेले. स्वातंत्र्यपूर्व काळात जन्म मास्तरकीत नि दहाएक वर्षं प्राध्यापकीत गेल्यामुळे

म. श्री. दीक्षित



बापूसाहेब माटे : व्यक्तिविशेष

अनुक्रमणिका

त्यांचं उत्पन्न मर्यादित असे. पन्नाशीपर्यंतच्या त्यांच्या लेखन-संपादनाचं स्वरूप हे पैका देणारं नव्हतंच. मिळाली फक्त प्रतिष्ठा. पण प्रपंच नेटका करायचा तर प्रतिष्ठा पुरत नाही. त्यासाठी अंथरुण पाहून पाय पसरावे लागतात. म्हणून माटे मास्तर आप्तस्वकीयांपासून एकूण अलिप्त राहत. 'नातेवाईक म्हणजे गरिवाच्या घरातल्या लागलेल्या घुशी' असं एकदा मजजवळ जळजळीत बोलून गेले. हाडाचे समाजशिक्षक असल्यामुळे ते आपल्या मर्जीतल्या विद्यार्थ्यांना किंवा माझ्यासारख्या चाहत्याला प्रापंचिक धडे मोठ्या ममत्वाने देत. माझ्या लग्नाचा विषय निघाला तेव्हा म्हणाले, 'तुला साहित्य परिषदेत जन्म काढायचा असेल तर नोकरीवाल्या मुलीशीच लग्न कर. जुळवलंस तर अधिक उत्तम.' पण प्रत्येकाची लग्नगाठ परमेश्वर बांधत असतो. याचा मला अनुभव यायचा होता नि त्याप्रमाणे १९५२ च्या फेब्रुवारीत एका गरीब, संसारदक्ष मुलीशी माझं साधेपणानं लग्न झालं. माझा गरिबीचा संसार पाह्यला माटे पतिपत्नी नंतरच्या काळात तीनचारदा तरी येऊन गेले नि मी गरिबीत स्वाभिमानाने नेटका प्रपंच करतो आहे हे पाहून त्यांना खूप समाधान झालं.

स्वच्छतेवर आणि वक्तशीरपणावर माटोंचा विलक्षण कटाक्ष. त्यांच्या एकूण वर्तनात योजनाबद्धता असे. एकदा भाबडा चाहता फार वेळ बोलत राहिला की त्याला ते लगेच झापत असत. 'थोडक्यात पुष्कळ काही सांगता येतं शास्त्रीबोवा' असं एकदा माझ्यादेखत एका विद्वानाला त्यांनी सुनावलं. मोठ्या आवाजात बोलणाऱ्या एका साहित्यिकास 'मला अजून चांगलं ऐकू येतं' असं खडसावण्यास ते कचरले नाहीत. दिलेला शब्द कुणी पाळला नाही किंवा सभेची वगैरे वेळ सांभाळली नाही की ते बेचैन होत. साहित्य परिषदेचे एक पदाधिकारी सभांना अधून-मधून उशिरा येत. त्यांना तशी जाणीव देण्यासाठी बापूसाहेब मग एक युक्ती योजू लागले. सभेला येताना ते मुळी त्या पदाधिकाऱ्याच्या घरीच डोकावून मग परिषदेचा रस्ता धरत. परिषदेचे एक चिटणीस कै. गं. भा. निरंतर सिगरेटस् फार ओढत. पण बापूसाहेब येताहेत असं दिसलं की सिगरेट तावडतोब विझवून चुरगाळून टाकत. पण त्यांचं अतिरिक्त धूम्रपान नि ही युक्ती बापूसाहेबांच्या लक्षात आली होती. ते एकदा अचानक परिषदेच्या मागल्या दाराने आले नि धूम्रपानात दंग झालेल्या निरंतरांना मिस्किलपणे म्हणाले, 'विझवू नका. ओढा पुरती. पण खरं सांगू निरंतर, कमी ओढत चला. तुम्हाला प्राप्ती किती नि परवडतं कसं इतक्या ओढायला ? पाहा, विचार करा.' निरंतर त्यावेळी विलक्षण ओशाळले. सभा वेळेवर सुरू करायची नि वेळेवर संपवायची असा त्यांचा खाक्या असे. आपली साडेदहा-अकराची जेवणाची वेळ झाली की सभा दुसऱ्यावर सोपवून ते वेलाशक घरी जात.

बापूसाहेबांच्या घरची लिहिण्याची बैठक म्हणजे स्वच्छ चादर घातलेलं पातळसर अंथरुण. भिंतीला लावलेल्या तक्क्याला टेकून ते त्या अंथरुणावर पाय पसरून बसत व मला किंवा वि. ना. देवधरांसारख्या अन्य लेखकाला झपाझप मजकूर सांगत. मजकूर सांगताना कधी दाराशी असलेल्या हाताच्या खुर्चीवर बसून सांगत, तर कधी खोलीत येरझारा घालत सांगत. लेखक येण्यापूर्वी त्यांच्या मनात सर्व कल्पना, मुद्दे साकारलेले असत. कधीकधी स्मरणार्थ कागदाच्या चिटोऱ्यावर ते मुद्दे लिहून ठेवीत. बोडकी अक्षरं त्यांना आवडत नसत. मला अधून-मधून डोस पाजत—'गड्या, तू झपझप, सुवाच्य लिहितोस. शुद्धही असतं ते बऱ्यापैकी. पण बोडकं लिहित जाऊ नकोस बुवा. रेघा मारत जा.' पण त्यांचा हा उपदेश मला कधीही अमलात आणता आला नाही. मी सावध, दाद देणारा, चुकलंमाकलं तर सुचवणारा, प्रामाणिक लेखक आहे अशी त्यांची खात्री पटल्यामुळे माझं बोडकं लेखन ते आनंदानं खपवून घ्यायला लागले. 'अक्षरांवर रेघा मारण्याने लेखनाचा वेग मंदावतो' हे माझं म्हणणं बहुधा त्यांना पटलं असावं.

दिवाळी अंकांचा हंगाम आला की अनेक नियतकालिकांकडून कथा किंवा लेख पाठविण्यासंबंधी मागणीपत्रं येत. सगळ्यांची मागणी ते वेळच्यावेळी पुरवत. काही नवोढे परगावचे संपादक मोबदला वेळेवर पाठवत नसत. दोघेतिघे बुडवणारे निघाले. अशा संपादकांकडून मागणी आली की बेरकी

बापूसाहेब त्यांना चक्क व्हीपीने लेख पाठवत. लेख लिहून तो वाचून दाखवल्यावर कधीकधी मला मिस्किलपणे जाणीव देत 'अरे, ते वाक्य तू गाळलंस, माझ्या शब्दाऐवजी तू तुझा घुसवलास.' त्यांच्या या स्मरणशक्तीचं मला आश्चर्य वाटे.

बापूसाहेब मनाचे फार हळवे होते. भावनाप्रधान विचारवंत असं मी त्यांचं वर्णन करेन. एकादी कथा, व्यक्तिचित्र किंवा संतचरित्रातील करुण प्रसंग सांगताना कधीकधी ते इतके भावनावश होत की रुमालाने डोळे पुसत मला म्हणत 'आता थांब जरा. सांगवत नाही पुढचं.' ज्ञानेश्वर समाधीचा प्रसंग सांगताना ते अक्षरशः स्फुंदत होते, ज्ञानेश्वरांची अकाली समाधी, तुकारामाचे निर्वाण, गडकऱ्यांचा अकाली मृत्यू हे प्रसंग कथन करताना त्यांचं हृदय उन्मळून येई, तर रामदास, शिवरामपंत, अच्युतराव, सावरकर यांच्यासंबंधी सांगताना त्यांची छाती अभिमानाने भरून येई. मग त्या अवस्थेत पुरुषार्थी लेखन कसं तरारून येई. 'पश्चिमेचा वारा' नामक एक कादंबरी त्यांनी आयुष्य सरतासरता लिहिली. तिचं बरचसं लेखन माझ्याहातून झालं. ही कादंबरी विस्कळीत, अकलात्मक असून तिच्यातला काही भाग आत्मकथासदृश आहे. तिचं निवेदन करत असताना ते मधूनच गंभीर होत व त्यांचे डोळे पाणावत.

बापूसाहेब माटे ध्येयवादी, राष्ट्रीय मनोवृत्तीचे, पुरुषार्थाची कास धरणारे भावना-प्रधान पण विचारवंत लेखक होते. त्यांच्या ललित लेखनाला करुणेचं एक अस्तर होतं. रंजल्या-गांजलेल्यांचे तसेच स्त्रियांचे ते मोठे कैवारी होते. विविध क्षेत्रात नावलौकिकास चढणाऱ्या आपल्या विद्यार्थी-विद्यार्थिनींबद्दल ते नेहमी अभिमाने बोलत. 'हे विद्यार्थी म्हणजेच माझं खरं-खुरं धन आहे' अशी त्यांची भावना होती. चारित्र्य, शील, पुरुषार्थ, ज्ञानोपासना, समाजसेवा या गुणांचं संकीर्तन करण्यात त्यांनी आपली लेखणी-वाणी राबवली. देशाची फाळणी, हिंदू अबलांवरील अत्याचार, हिंदूंच्या कत्तली या वार्ता वाचून त्यांच्या चित्ताचा विलक्षण क्षोभ होई. हिंसकांच्या पुढे नमणाऱ्या गांधी-नेहरूंवर त्यामुळे ते कडक टीकालेख लिहीत. या टीकेपायी त्यांना उत्तरायुष्यात जबर किंमत मोजावी लागली. गांधी-हत्येनंतर पुण्यात ब्राह्मणविरोधी जे तंग, तप्त वातावरण निर्माण झालं होतं त्या काळात ते जिवाच्या भीतीने विलक्षण घाबरून, हादरून गेले होते. हत्येच्या दुसरे-तिसरे दिवशी 'देशबांधवांनो, मला क्षमा करा.' असं एक पत्रक त्यांनी काढलं. काही ठळक गांधीभक्तांकडे ते वाटण्याची कामगिरी त्यांनी मजवर सोपवली पण मी फक्त परिषदेसमोर राहणारे आचार्य भागवत, नानासाहेब गोरे अशा जवळपासच्या दोनचार व्यक्तींकडे ते टाकलं व बाकी प्रती रात्रीच्या अंधारात लाकडी पुलावरून नदीत फेकून दिल्या.

साहित्य परिषदेसाठी चिपळूणकर सभागृह, ग्रंथालय, वाङ्मयेतिहास अशा मोठ्या योजना बापूसाहेबांनी हाती घेतल्या होत्या व त्या वेगाने पूर्ण करण्यासाठी ते जिवाचा आटापिटा करीत होते. या योजनांसाठी निधी गोळा करण्याकरिता मला सोबतीला घेऊन त्यांनी १९४९ साली खानदेशचा यशस्वी दौरा केला. अमळनेरला प्रि. दामले यांचेकडे आमचा मुक्काम पडला होता. दौऱ्यावर होते तरी रोजच्या लेखनात खंड नव्हता. सकाळी तास-दीड तास आमचं लेखन चालायचं. एके दिवशी 'टाइम्स'चा अंक चाळतात तो नेहरू आणि लेडी माउंटबॅटन ओरिसाच्या किनारी समुद्रस्नान करीत आहेत असं छायाचित्र. ते पाहून मला अस्वस्थ चित्ताने म्हणाले, 'चला आज या खमंग विषयावरच खरमरीत लेख लिहून 'प्रभात'ला पाठवू.' लेखाचा आशय 'भारताच्या पंतप्रधानाला असं वर्तन शोभत नाही' असा होता. पण लेख प्रसिद्ध होताच पुण्यात भडका उडाला व नेहरूंचं चारित्र्यहनन झाल्याचा प्रचार होऊन त्यांच्याविरुद्ध उघड व गुप्त शत्रूंच्या हालचाली सुरू झाल्या. ४९ च्या पुणे साहित्य संमेलनात त्यांच्याविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणला गेला पण बापूसाहेबांनी ठराव चर्चेला येण्यापूर्वीच कार्याध्यक्षपदाचा राजीनामा देऊन वैतागाने परिषदेच्या कार्यातून अंग काढून घेतले.

पुढे परिस्थिती निवळल्यावर ५२ साली ते पुन्हा अविरोधपणे कार्याध्यक्ष झाले. 'मोठमोठ्या कामांचे डोंगर उपसायला माटे हवेत, पण त्यांनी आपली हिंदुत्ववादी विचारसरणी बाजूला ठेवावी' असं एकूण त्यावेळचं परिषदेतलं वातावरण होतं. वास्तविक माटयांनी आपली हिंदुत्ववादी मतं परिषदेच्या कारभारात कधीही आणली नाहीत. उलट ते निखळ साहित्यनिष्ठेच्या दृष्टिकोनातून, सर्वांना सांभाळून कार्य करीत असत.

वाङ्मयेतिहास योजना प्रकरणी बापूसाहेबांना जो विरोध झाला तो मुख्यतः तात्त्विक स्वरूपाचा व प्रामाणिक होता. वाङ्मयेतिहाची संकल्पना नि तिची खंडशः मांडणी–कार्यवाही याबत तो विरोध होता. पण बापूसाहेबांनी सर्व विरोधकांना एका दावणीला बांधून त्यांच्याविषयी 'मत्सरग्रस्त, नाकर्ते लोक' अशी भावना घट्ट बाळगली व त्यामुळे त्यांना फार मानसिक क्लेश सोसावे लागले. लोकशाही पद्धतीने चालणाऱ्या संस्थेत सर्वच गोष्टी आपल्या मर्जीनुरूप चालत नाहीत, इतरांच्या मतांची दखल घ्यावी लागते, निदान माघारीचा पवित्रा घेऊन मूळ उद्दिष्ट साधता येते याची बापूसाहेबांना प्रस्तुत प्रकरणी पुरेशी जाणीव नव्हती. 'वाङ्मयेतिहासाची संकल्पना' (संपा. प्रा. द. दि. पुंडे) या अलीकडच्या पुस्तकात या सर्व वादाची तात्त्विक व इतर तपशीलवार माहिती दिलेली आहे, त्यामुळे हा विषय इथे संपवून बापूसाहेबांचे इतर काही विशेष मी सांगतो.

समर्थ रामदास, विष्णुशास्त्री, गडकरी, संदेशकार कोल्हटकर, तात्यासाहेब केळकर आणि सावरकर या व्यक्ती माटयांना विशेष प्रिय होत्या. या व्यक्तींसंबंधीचं त्याचं लेखन वा भाषण विशेष सुरस, प्रभावी उतरत असे. आगरकर, महर्षी कर्वे, विठ्ठल रामजी शिंदे यांच्याविषयी त्यांना असाच ओतप्रोत जिव्हाळा होता. अस्पृष्ट समाज आणि स्त्रीवर्ग हा तर त्यांच्या नित्य चिंतनाचा नि लेखनाचा विषय होता. सावरकरांचे ते अभिमानी असले तरी सावरकरांची सर्वच मते त्यांना मान्य असत असे नाही. उदा. 'गाय ही देवता नसून शुद्ध पशू आहे.' हा सावरकरांचा मतप्रसार त्यांच्या हिंदुमनाला रुचत नव्हता. हिंदूंचं नेतृत्व करू पाहणाऱ्या नेत्याने अशी एका टोकाची आग्रही मतं मांडू नयेत असं त्यांना वाटे. आणि ते थट्टेने खाजगीत म्हणत–'असं सांगायला सावरकर कशाला हवेत, नंदी–बैलाला सुद्धा ते कळतं. दोन विज्ञानवादी विचारवंतातील हा फरक लक्षात घेऊन माटे यांना काही लोक 'सनातनी सुधारक' म्हणत. सावरकरांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन त्यांना भोगवादी वाटत असे. 'या वीरपुरुषाचे इतके सत्कार होतात, हा इतके दौरे करतो, पण पत्नीला कधी बरोबर नेतील तर शपथ. तिला अष्टौप्रहर याने स्वैपाकघरात डांबून ठेवली आहे. तेच माझं पाहा. मी हिला सदैव बरोबर नेतो व नवऱ्याचं कौतुक, सत्कार पाहण्याचा तिला आनंद देतो.' त्यांचे हे मनमोकळे, खाजगीतले उद्गार मी कदापी विसरणार नाही. अर्थात असे काही मतभेद असले तरी सावरकरांच्या स्वार्थत्यागावर, प्रतिभेवर, पांडित्यावर, पौरुषावर नि थरारक वक्तृत्वावर ते इतके खूष असत नि योग्यतेच्या मानाने भारतीय जनतेने त्यांची बूज न ठेवल्याबद्दल खंतावत असत. एकदा मला तळमळून म्हणाले, 'लोकप्रियतेचा, कीर्तीचा मुकुट या वीराच्या शिरी ठेवण्यात नियतीने कमालीचा कंजूषपणा केला याचा अर्थ ती करंटीच असली पाहिजे.'

१९४८ च्या मध्यात गांधी खून खटल्याचा निकाल ज्या दिवशी लागणार होता त्या दिवशी सकाळपासून ते अस्वस्थ होते. सकाळी मला म्हणाले– 'आज दुपारी लिहायला येऊ नकोस. 'काळ' ऑफिसात जाऊन बैस व मला काही सुवार्ता असली तर सांगायला ये.' माझ्या मनाजोगतीच ही आज्ञा असल्याने मी दुपारी एकदीड वाजताच 'काळ'मध्ये यंत्राजवळ जाऊन बसलो. अडीचतीनच्या सुमारास यंत्रावर थडथडत निकाल आला. 'गोडसे–आपटे यांना फाशी, इतरांना जन्मठेप आणि सावरकरांची निर्दोष–निष्कलंक सुटका.' तो वाचून जणू काही आपलीच सुटका झाली अशा आनंदात मी धावतपळत जाऊन बापूसाहेबांना वार्ता ऐकवली. ती ऐकून त्यांनी सुटकेचा निःश्वास टाकला

व म्हणाले; 'बस्स. आमचा वीरशिरोमणी सुटला यात सर्व मिळालं. बाकी निकाल अपेक्षितच होता. त्याचं दुःख नाही. आता आपण चहा घेऊ, तुझं तोंडही गोड करतो.'

कै. माटे यांच्या सुग्रण धर्मपत्नी, पतीची जन्मशताब्दी उंबरठ्याजवळ येऊन ठेपली असता नुकत्याच नव्वदाव्या वर्षी पतवंडं पाहून निवर्तल्या. त्यांची कन्या प्रा. सौ. मैनाताई फडके (निवृत्त) आणि पुत्र प्रा. डॉ. म. श्री. माटे यांनी पित्याच्या पश्चात चांगला लौकिक मिळवला आहे. चिरंजीव मधूचं लग्न थाटामाटात झालेलं होतं व त्यावेळी स्वागतसमारंभात डोक्यावर पगडी घातलेले सस्मित माटे मी प्रथमच व एकदाच पाहिले. चारपाच वर्षापूर्वी त्यांचे एक अभिमानी संपादक दत्तप्रसन्न काटदरे यांनी माटे–स्मृत्यर्थ साहित्य परिषदेला पाच हजार रु. ची देणगी दिली. ग. वा. बेहेऱ्यां समवेत लोणावळा येथे काटदऱ्यांना भेटण्यासाठी आम्ही गेलो तेव्हा त्यांनी आपल्या संग्रहीचा माटेलिखित एक खाजगी, अंतःकरण कालवणारा मजकूर आम्हाला दिला. हा मजकूर म्हणजे मृत्यूपूर्वी त्यांनी दत्तप्रसन्नांना लिहिलेलं एक पत्र होतं व त्यासोबत एक अभंगवजा दीर्घ कविता होती. ही कविता वाचताना माझे डोळे भरून येत होते व बापूसाहेबांच्या थोरवीचे पैलू मनात भरत होते.

जगाचा निरोप घेण्यापूर्वी लिहिलेल्या या कवितेत त्यांनी ज्ञाना; नामा, तुका, एका, दासा प्रभृती संतमंडळींना भक्तिभावाने वंदन केलं होतं आणि शेवटी आपल्या धर्मपत्नीचे गुण आवडीने गाऊन तिचाही कष्टाने निरोप घेतला होता. माटे १९२१–२२ साली कवितालेखन करून साहित्य प्रांतात उतरले होते. 'उठ अहल्ये प्रभात झाली' ही त्यांची भूपाळी अभिनव काव्यमालेच्या तिसऱ्या खंडात समाविष्ट आहे. आयुष्याच्या अखेरीस त्यांनी जगाचा निरोप घेतला तोही कवितेच्या माध्यमातून. बापूसाहेब भावनाप्रधान, उतावीळ, काहीसे फटकळ होते व आपली मतं सांगण्याची त्यांना फार घाई होई. त्यामुळे त्यांना शत्रूही निर्माण होत. या जगात निर्दोष, पूर्णपुरुष असा कोण असतो ? माटे यांचे हे दोष गृहित धरूनही साहित्यक्षेत्रातले ते एक थोर, कर्ते पुरुष होऊन गेले हे कुणीही मान्य करील. बापूसाहेबांच्या माघारी माथा लववून नमस्कार करावा असा मला तरी दत्तोवामनांखेरीज अन्य आधारवड आढळला नाही. उभयतांचा निकट सहवास मला लाभला हे मी माझे सद्भाग्य समजतो. ■

अनुक्रमणिका

ती. बापू अर्थात् कै. श्री. म. माटे यांची जन्म शताब्दी साजरी होत आहे. म्हणून स्वाभाविकपणेच मला खूप आनंद वाटला. सन १९५७ साली ते गेले त्याला किती तरी वर्षे झाली, तथापि त्यांच्यावरचे लोकांचे प्रेम अजूनही बाकी आहे, विद्यार्थ्यांच्या पाठ्यपुस्तकांतून त्यांचे लेखन पुन:पुन्हा स्वीकारले जाते ह्या गोष्टी म्हणजे त्यांना मिळालेले, आणि तेही समाजाकडून, मरणोत्तर सन्मानचक्र आहे असे मला वाटते. ह्या प्रसंगी त्यांची जी 'अक्षर'— पूजा होत आहे; त्यात माझे हे नम्रतापूर्वक वाहिलेले तुळशीपत्र वाचकांनी गोड मानून घ्यावे.

माझ्यासारख्या वयाच्या ४२ वर्षांपर्यंत त्यांच्या घरी, छत्रछायेत विकसित झालेल्या माणसाने आठवणी लिहायच्या म्हणजे स्मृतिचित्रांची इतकी गर्दी चित्तात उसळली की, मला काय लिहावे व काय नाही असा संभ्रमच झाला ! त्यांतूनच वाट काढून खालील ओळी लिहीत आहे.

ती. बापूंची कन्या असण्याचे भाग्य मला लाभलेच पण त्याच बरोबर पितृत्व आणि गुरुत्व अशा त्यांच्या व्यक्तित्वाच्या दोन्ही अंगांचा मला भरपूर लाभ मिळाला. ते माझे गुरुही होते. कन्या आणि विद्यार्थी अशा दोन्ही दृष्टींनी मला त्यांच्या जीवनाकडे पाहाता आलेले आहे. आमचे घर म्हणजे एक विद्यापीठच होते. सतत चर्चा, काव्य-शास्त्र-विनोद चालत असे आणि बापूंच्या सामाजिक कार्यांमुळे ते एक विठ्ठलमंदिरही होते ! सतत दीन जनांपासून अत्यंत श्रेष्ठ विद्वानांपर्यंत सर्व प्रकारचे लोक आमच्या येथे सतत येत असत. आणि कित्येकदा बापूंना जेवायलाही फुरसत होत नसे !

त्यांच्या आत्मचरित्रात त्यांनी लहानपणीच्या दारिद्र्यासंबंधी पुष्कळ लिहिले आहे. ह्यातून आणि महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांचा परिणाम त्यांच्या मूळच्या सहृदयतेवर झाला आणि आपल्या समाजातल्या अस्पृष्टांकडे त्यांचे लक्ष गेले. सरकारी नोकरी करणार नाही अशी त्यांची प्रतिज्ञा होतीच पण खाजगी शिक्षकाची नोकरी वा तत्संबंधी अन्य उद्योग करून सुद्धा त्यांना झुळझुळीतपणे रहाता आले असते; पण त्यांनी निम्नमध्यमवर्गाचे जीवन स्वीकारले आणि अन्य प्राप्ती अस्पृश्योद्धारासाठी अर्पण केली. त्यासाठी अत्यंत साधी राहणी, पैशाची सतत ओढाताण हे सर्व सोसले. कुटुंबातही नातेवाईक, आप्तेष्टांकडून उपहास सोसला. अन्य लोकांनी त्यांना 'महार माटे' अशी 'शिवी' दिली तीही सोसली ! बुद्धिपूर्वक एकादे काम स्वीकारले म्हणजे कितीही अडचणी आल्या अथवा विरोध झाला तरी ते तडीला न्यायचे असा पुरुषार्थ त्यांच्या ठिकाणी प्रकर्षाने होता. ह्या कामातले त्यांचे कष्ट; पोटतिडीक मी सुरुवातीपासून पाहिली आहे. आमच्या येथे येणाऱ्या शेकडो उपेक्षितांना त्यांच्याबद्दल अतिशय प्रेमादर वाटायचा आणि तो त्यांच्या 'मास्तर !' ह्या एकाच शब्दांतून थबथबलेला जाणवायचा. ह्यासंबंधी एकच आठवण सांगते.

सन १९३० साली आमच्या मधूचा (आता डॉ. म. श्री. माटे, डेक्कन कॉलेज) जन्म झाला. त्यानंतर श्री. बाबूराव वायदंडे हे आमच्या येथे त्यांच्या पद्धतीचा बाळंतविडा घेऊन आले होते. तो देतांना त्यांच्या डोळ्यांतून 'मास्तरना मुलगा झाला !' ह्यामुळे झालेला आनंद अक्षरशः ओसंडत होता !

: सौ. सुधा फडके

तुळशीपत्र

अनुक्रमणिका

अन्यायग्रस्त लोकांच्यासाठी करुणा आणि अन्याय करणाऱ्यांची अतिशय चीड त्यांना होती. एकदा मी त्यांना माझ्या एका मैत्रिणीने सांगितलेली तिच्या बहिणीची दुःखकथा सांगितली; सासरच्या माणसांनी तिला अतिशय छळले आणि शेवटी जिन्यावरून ढकलून दिले व शेवटी त्यांतच तिचा अंत झाला... हे सर्व ऐकता ऐकता त्यांचे डोळे रागाने लाल झाले आणि अतिशय त्वेषाने ते मला म्हणाले, 'पण हे सर्व तिच्या वडिलांनी, भावांनी, नातेवाईकांनी कसे दुबळेपणाने पाहिले? ते काय माशा मारीत होते ? त्यांनी तिला अशा दुष्ट लोकांच्यात राहूच का दिले ? . . .' स्त्री आजही उपेक्षितच आहे, आमच्या लहानपणी तर फारच होती; बापूंची भावना वर दिलीच आहे !

त्यांच्या स्वाभिमानीपणासंबंधी अनेकांनी लिहिले आहे. मला आठवते की, एकदा त्यांचे मित्र कै. काशीनाथपंत खानविलकर यांच्या बरोबर एक साखर–कारखाना पहायला गेले होते. तिथली व्यवस्था, शिस्त व नव्या गोष्टी त्यांना आवडल्या असे त्यांनी बोलून दाखविले. त्यानंतर तेथील उद्योगपतींनी असे सुचविले की, प्रशस्तीपर असा लेख लिहावा. त्यावर त्यांनी ताडकन् सांगितले की, मला जे योग्य वाटेल तेच मी लिहीन, तमच्या म्हणण्याप्रमाणे नाही !

दुसरे, म. गांधींनी अस्पृश्योद्धाराची चळवळ हाती घ्यायची असे ठरविल्यावर त्यांचे एक भक्त आणि बापूंचे जुने स्नेही 'तुम्ही आमच्या ह्या कामात या, तुमचा बहुमान होईल, खूप कार्यकर्ते मिळतील !' असे आग्रहाने म्हणाले; त्यावर त्यांनी सांगितले, 'म. गांधी म्हणतील त्याला मान तुकविणे माझ्याने होणार नाही. मी आधीच स्वतंत्रपणे चळवळ केलेली आहे !'

–त्यांच्या वृत्तीमध्ये एक प्रकारचा उग्रपणा, झुंजारपणा होता. कॉलिजातली मुले त्यांना 'हिंडेनबुर्ग' (पहिल्या महायुद्धातले जर्मन सेनापती) म्हणत असत. जन्मभर त्यांच्या ह्या स्वभावांचा प्रत्यय सर्वांना येत असेच पण शेवटी त्यांना कर्क–रोगाने ग्रासले तेव्हांही त्यांच्या धीर–गंभीर, झुंजारपणाचा प्रत्यय आम्हा कुटुंबियांना वरचेवर येत असे. पुनः जेव्हा कर्करोगाने जागा बदलून ठाण मांडले तेव्हा आम्ही सर्वजण त्यांच्या भोवती बसलो होतो. ते म्हणाले 'हे बरे झाले तरी दुसरीकडे होते. होता होता यकृताला झाले म्हणजे ('the matter ends !')' ते अगदी स्थिरपणे हे सांगत होते आणि आम्ही असहायपणे ऐकत होतो !

त्यांच्या गंभीरपणाला, रागीटपणाला व शिस्तीला बरेच जण भीत. आम्ही मुलेही भीत होतो पण सिंहाची मुले त्याला जेवढी भीत असतील तेवढेच ! कारण त्यांच्या ठिकाणी फार चांगली विनोदबुद्धी होती ह्याचा आम्हाला साध्या साध्या गोष्टींतूनही, रोजच्या रोज प्रत्यय येत असे.

एकदा मी त्यांना विचारले की, बापू, राग– आणि रागिणी ह्यात काय फरक ?– आमच्या आईचा स्वभाव अतिशय रागीट आणि बापूंचा तिच्या मानाने फारच विचारी व शांत. तेव्हा जवळच काहीतरी काम करीत असलेल्या आईकडे पाहून अत्यंत मिस्किलपणाने ते म्हणाले, 'मला जी येते ती रागिणी आणि तुझ्या आईला येतो तो राग !'

असेच एकदा दोन अगदी अनोळखी गृहस्थ पत्ता शोधून आमच्याकडे आले आणि अत्यंत नम्रतापूर्वक म्हणाले, 'आपला मुलगा लग्नाचा आहे असे कळले म्हणून आलो आहो ! आमची मुलगी सुस्वरूप, गुणी आहे ! तेव्हा...' मध्येच बापू म्हणाले, 'मुलगा आहे पण तो लहान आहे !' ते म्हणाले की, 'आम्हाला घाई नाही, पण मुलगी पाहून ठेवायला काय हरकत आहे ?' बापूंनी हाक मारली 'मधू ! बाहेर ये पाहू !' ७–८ वर्षाचा मधू चड्डी सावरीत, हातात मोडकी मोटार घेऊन बाहेर आला ! बापू म्हणाले, 'हा मुलगा ! देताय् का ह्याला मुलगी ?'

प्रसंग वसंत व्याख्यान मालेसंबंधी होता असे वाटते. आधी कोणीतरी गंभीरपणे बोलून गेले होते. मग बापू बोलायला उठले आणि त्यांनी दोन पूर्वीच्या आठवणी सांगितल्या; (१) नवे नवे वक्ते मालेत व्याख्यान द्यायला येत. टेबलावर दोन्ही बाजूला दोन शामदाने लावलेली होती. त्यांतील एकाकडे बघून एक वक्ता बोलत होता. पुणेरी श्रोते म्हणजे काय हे सांगायला नकोच !

वक्त्याचा घाबरटपणा त्यांनी लगेच ओळखला होता. इतक्यात ज्याकडे तो पाहून बोलत होता ते शामदाम विझले. त्याबरोबर दोन चार श्रोते मोठ्याने म्हणाले 'आता ते त्या दुसऱ्या शामदानाकडे पाहून बोलणार!' बिचारा वक्ता खालीच बसला!

दुसरी आठवण अशी की, विख्यात इतिहासाचार्य वि. का. राजवाडे अध्यक्षस्थानी होते आणि प्रो. भानु बोलत होते. बोलताना त्यांनी सन अमुक अमुक मध्ये असे झाले असे म्हटले आणि लगेच पुढे म्हणाले, 'आता आपले विसूभाऊ अध्यक्ष आहेत तेव्हा शके सांगायला हवेतच! आता म्हणजे शके, शके... शकेऽऽ (बापूंनी अगदी साभिनय शकेऽऽ असे म्हणून पुढे सांगितले की,) राजवाड्यांनी त्यांचा हिशेबच होईना असे पाहून त्यांचा (भानूचा) कोट मागून ओढला आणि म्हणाले 'ते आतां पुढच्या जन्मी!'– त्या सभेत एवढी हसण्याची लाट उसळली की, तिची आणखी दोन आवर्तने झाली!

त्यावेळी घारपुरे-रुग्णालयात बापूंचे ऑपरेशन झालेले होते. कर्करोगाच्या उपचारानंतर आलेल्या विलक्षण अशक्तपणातच हे आणखीच संकट आले होते. पहावत नव्हते इतके ते क्षीण झाले होते. आदली रात्रच फार कठीण गेली होती. डॉ. घारपुरे ह्यांनी उचकी थांबविण्याचे औषधी रात्री बारा वाजता देऊन आम्हा सर्वांना जरा धीरच दिला होता. उचकी थांबली होती. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी श्री. शं. गो. साठे प्रकृती पहायला आले होते. तेव्हा महाराष्ट्रापासून मुंबई हिरावून घेण्यात आली म्हणून 'मुंबईसह महाराष्ट्रा'ची चळवळ जोरात होती; मी बापूंच्या पायगतीच बसले होते. समोर आणखी एक-दोन जण बसलेले होते. मुंबई गेल्याचीच चर्चा चालली होती. बापू डोळे मिटून स्वस्थ पडले होते ते मध्येच म्हणाले, 'गडकऱ्यांच्या नाटकांतल्या सारखे झाले! गाढवावर बसलेला दारुड्या आणायला सांगितले होते तो मिळाला नाही म्हणून नुसते गाढवच आणले!' त्याही स्थितीत त्यांना हे सुचले!

असेच एकदा गुरुवर्य डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे आणि त्यांच्या पत्नी सौ. द्वारकाताई बापू ग्वाल्हेरला त्यांच्या भावाकडे (श्री. दातार यांजकडे) उतरले होते. तेथील वृत्त विचारण्यासाठी आमच्या येथे आले. बापूंनी द्वारकाताईंना सांगितले 'तुमची बहीण स्वयंपाक फार चांगला करते असे मी दातारांना सांगितले!'– त्यावर पु. ग. चेष्टेने पत्नीकडे पाहून म्हणाले 'म्हणजे तुझी कीर्ती ग्वाल्हेरपर्यंत गेली!' तात्काल बापूंनी प्रत्युत्तर दिले 'मध्ये कोणालाही सांगितले नाही!'

सतत चित्तात कसले तरी चिंतन चालू असल्याने, काहीसे वयाने आणि काहीसे स्वभावानेही ते अतिशय विसराळू होते, त्यामुळे सारख्या गंमती होत. बाहेरून आले की, 'आपला तो हा' भेटला होता असे म्हणून तो काय म्हणाला हे ते सांगू लागत; पण तो हा नेमका कोण त्याचे नाव मुळीच आठवायचे नाही!

न्. म. वि. त असताना सरांना शिकून गेलेल्या मुलाकडून लग्नाचे आमंत्रण यायचे. एकदा ते लग्नाला गेले, पण मुलाच्या घरी गेले. तेथे गडी माणसे आणि दोन-चार तांबड्या बायका पाहून आश्चर्य पावले आणि विचारू लागले 'ते हे' लग्न आजच आहेना?– त्या लोकांनी हसून सांगितले, आजच आहे पण ते मुलीच्या घरी आहे! इथे कसे असेल!

बहुधा पहिली गर्दी ओसरल्यावर लग्नाला जात. एकदा कै. गो. वि. तुळपुळ्यांच्या मुलीचे लग्न होते तिकडे गेले. नवरा मुलगा त्रिंबक गोडवोले, तो मुंडावळ्या इ. सोडून पुरुष मंडळीत येऊन बसला होता. त्याला म्हणाले, 'काय त्रिंबक! तू इकडे कोणीकडे!' त्याला वाटले मास्तर आपली चेष्टाच करीत आहेत म्हणून तो जरासा लाजला! पण गोपाळराव तुळपुळे बापूंना म्हणाले 'अहो असे काय करता! हेच आमचे जावई नाहीत का!'

आमच्या घरी फारच पुस्तके होती. नित्य आवक चालूच असे. जावकही होती पण त्यामानाने कमी; पण ह्यातून कितीतरी पुस्तके अदृश्यच होत असत. 'तो हा' पुनः कधी तोंडच दाखवायचा नाही! बापूंना कोणते तरी पुस्तक हवे असले की, लावायला कधी वेळच नसल्याने तिसऱ्या वर्गाचा रेल्वेच्या डब्याप्रमाणे वाटेल तशी पुस्तके

पडलेली असत. त्या ग्रंथसंभारांत शिरले की, कोणते पुस्तक हवे त्याचे नावच ते विसरून जायचे ! कधी कधी हवे ते पुस्तक सापडले की, दुसरेच पुस्तक ते वाचू लागत आणि पुन: शेल्फात ठेवतांना सांपडलेले पुस्तकही त्याच गळाठयात ठेवून पुन: अगदी 'मोकळे' बाहेर यायचे !

बारीक बारीक वस्तू फार विसरायचे ! महत्त्वाच्या गोष्टी मात्र २५–३० वर्षापूर्वीच्याही आठवायच्या ! एक दिवस त्यांचा चश्माच सापडेना. काय करावे ! चश्मा सांपडत नाही म्हणून आम्ही घरातली सर्वजण चश्मा शोधू लागलो. कोठेही नव्हता. शेवटी निराश होऊन ते झाडांना पाणी घालायला गेले. तेवढयात आमची अक्का कोठून तरी बाहेरून परत आली आणि अंगणातच सर्वांचे सचिंत चेहेरे पाहून म्हणाली 'काय झाले हो ?' झाडांना पाणी घालता घालता बापू म्हणाले 'काय करावे ! चश्मा हरवला आहे !' तिने त्यांच्याकडे वर पाहून म्हटले 'काका ! हा काय चश्मा तुमच्या डोळयालाच तर आहे !' असो.

प्रपंचातील अडचणी, संकटे इ. ना. खंबीरपणे तोंड देत देत त्यांनी सामाजिक कामही केले, खूप लिहिले. त्यांचा लेख आला की, पहिला वाचक मी असायची ! माझे त्यांनी पुत्रवत् कौतुक केले. तसा प्रत्यक्ष उल्लेख नाही पण त्यांच्या 'पाश्चात्य पुरुष श्रेष्ठ' ह्या पुस्तकातली चरित्रे त्यांनी माझ्यासाठी लिहिली होती. पुढे मधूला सांगितलेल्या गोष्टीही त्यांनी त्याच्यासाठी लिहिल्या.

ह्या सर्व गडबडीत आमच्या आईकडे त्यांना तसे विशेष लक्ष देता आले नाही. तिच्या आवडी-निवडीकडे वा तिला किती काम करावे लागते, कुटुंबाच्या एकत्रपणाच्या कल्पनांमुळे तिला किती त्रास सहन करावा लागला इकडे त्यांचे मुळीच लक्ष नसे. तिने कधीही मला अमुक हवे असे म्हटले नाही, गरिबीचा संसार अतिशय नेटकेपणाने केला, सर्व अडचणींना, संकटांना बापूंच्या बरोबरीने तोंड दिले त्यामुळेच त्यांना इतके काम करता आले. त्यांचे दुसरे घर १९४९ साली बांधले. त्या आधीच ते निवृत्त झाले होते. तेव्हापासून त्यांना तिच्या गृह-कर्तृत्वाचे स्वच्छता, टापटीप, तिचे सौंदर्य ह्या सर्वांचे अतिशय कौतुक वाटू लागले ! आपल्यापेक्षा १० वर्षांनी ती लहान आहे, तेव्हा तिचे कसे होईल अशी काळजी त्यांना शेवटपर्यंत वाटत होती. स्त्री मासिकामध्ये त्यांनी सौ. लक्ष्मीबाई माटे ह्या नावाने एक लेख लिहून तिचे जाहीर कौतुक कृतज्ञतेने केले !

आपण आता जाणार अशी प्रतीती त्यांना झाली होती. त्यावेळी दोन कविता त्यांनी वसंत मासिकाकडे पाठविल्या होत्या. त्यात त्यांचे चौघे स्वर्गस्थ बंधू आणि 'मुलांसाठी एकभुक्त' रहाणाऱ्या आईचे स्मरणतर होतेच, पण आमच्या आईला उद्देशून पुढील ओळी होत्या :

'प्रिये आतां चाललो अनंतांत
तुझी शेवटची भासते हीच भेट ।
नको आतां दारांत उभी राहू
परतण्याची मी वाट नको पाहू ।'

शेवटी समाजातल्या स्त्रीशूद्रादीपासून अस्पृष्टापर्यंतच्या 'उपेक्षितांचे अंतरंग' जाणून वारंवार माणुसकीने गहिवरणाऱ्या माझ्या गुरुतुल्य पित्याचे पुण्यस्मरण करून हे तुळशीपत्र वाहते. ■

श्री पाद महादेव माटे हे हाडाचे शिक्षक होते. लोकप्रशिक्षणाचे व्रीद त्यांनी आपल्या आयुष्यभर स्वीकारले होते. यासाठी त्यांनी आपली लेखणी व वाणी खर्ची घातली. समाजाच्या उपेक्षित भागावर लक्ष केंद्रित करून या उपेक्षितांच्या वेदनांना त्यांनी आपल्या लेखणीने बोलके केले. थोर समाजशास्त्रज्ञ, इतिहासाचे गाढे अभ्यासक, आदर्श शिक्षक, तळमळीचे अस्पृश्योद्धारक अशा विविध पैलूंनी त्यांचे व्यक्तिमत्व समृद्ध झाले असले तरी कथाकार माटे म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा पैलू हा तितकाच लक्षणीय आहे.

वैचारिक लेखन करणाऱ्या माटयांनी जीवनाच्या मध्यावर कथालेखनाला सुरुवात केली. श्री. म. माटे यांचा पिंडच मुळी समाजसेवकाचा असल्यामुळे 'कथाकार माटे' यांचा विचार करीत असता त्यांच्यातील समाजसेवक त्यांच्यातील कथाकारावर मात करून जातो असेच म्हणावे लागेल. 'उपेक्षितांचे अंतरंग' हा त्यांचा गाजलेला कथासंग्रह. या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत माटे म्हणतात की, यातील सर्वांनाच 'गोष्ट' हे नाव शोभण्यासारखे आहे असे नाही. पण गोष्ट हे नाव शोभले नाही तरी त्या सर्वांतून उपेक्षितांचे अंतरंग व्यक्त झाले आहे, असे मला वाटते. श्री. म. माटे यांचे हे विधान त्यांच्या कथांचा विचार करण्यास पुरेसे बोलके आहे. प्रस्तुत कथासंग्रहाच्या नावाप्रमाणेच त्यातील कथा उपेक्षितांच्या वेदना वाचकासंमोर घेऊन प्रविष्ट होतात. 'वन्सीधर, तू आता कुठे रे जाशील ?' ही त्यांची या संग्रहातील पहिलीच कथा कातकऱ्याच्या नायकाची भावनात्मक उन्नती किती साधली आहे याचा प्रत्यय आणून देते. 'हास्याचा शोध' या कथेत मुंबईनगरीतल्या कंगाल व श्रीमंत यांच्यातली विषमतेची दरी किती खोलवर गेली आहे हे पाहून लेखकाचे हास्य कसे लोप पावते व एका हिरमुसल्या कंगालाच्या हातावर पै टिकवताच त्याच्या तोंडावर जे हास्य पसरते त्या हास्याचं मोल लेखकाला किती वाटतं याचा आविष्कार त्यांनी घडवला आहे. या कथासंग्रहातली आणखी एक उल्लेखनीय कथा म्हणजे 'सावित्री मुक्यानेच मेली' ही. कथेतल्या सावित्रीचे हे दुःख वाचकांच्या काळजाला हात घालून जाते. अस्पृश्याप्रमाणेच या समाजात स्त्री देखील तितकीच उपेक्षित राहिली आहे. अशा या उपेक्षित स्त्रीच्या दुःखाचे अनेक पदर त्यांनी आपल्या कथेत उलगडून दाखवले आहे. 'श्रीनिवासरावांची गोड निराशा' या कथेतील श्रीनिवासराव हेलकरीबाईंच्या कष्टप्रद जीवनाची कहाणी ऐकून व्याकूळ होतात. अशा लोकांना होता होईल तेवढी मदत आपल्या कडून करावी, असे त्यांना वाटते. यातील कंगालाच्या दुःखाने व्याकूळ होणारे श्रीनिवासरावांचे मन म्हणजे प्रत्यक्षात श्री. म. माटे यांचेच मन असते.

समाजातील अस्पृश्य व स्त्री या उपेक्षित घटकांबरोबरच यांच्या लेखणीने समाजातील अंधश्रद्धेचीही दखल घेतलेली दिसते. प्रस्तुत संग्रहातील 'नायनाक आणि देवकाई यांची काळझोप' ही कथा यादृष्टीने पुरेशी बोलकी आहे. पुलाचे काम पूर्ण होत नाही, ते खचून जाते, तेव्हा पुलासाठी नरबळी द्यावा असा बादशहाला दृष्टान्त होतो. या नरबळीसाठी अर्थातच अन्नाच्या तुकड्याला मोताद झालेली माणसं वेठीस धरण्यात येतात. पैशाच्या लोभाने आपल्या पोटच्या गोळ्याचा बळी देण्यास हे भुकेले शेवटी तयार होतात हे दारुण सत्य प्रस्तुत कथेतून लेखकाने मांडले आहे. प्रस्तुत कथासंग्रहाच्या शीर्षकाला अनुसरूनच त्यातील कथा ह्या खरोखरीच 'उपेक्षितांचे अंतरंग' असे उघडे करून जातात.

'भावनांची मांडवी' हा असाच त्यांचा आणखी दुसरा कथासंग्रह. श्री. म. माटे यांच्या निधनानंतर हा संग्रह प्रकाशित झाला असल्याने त्यांच्या प्रस्तावनेशिवायच हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला आहे. 'उपेक्षितांचे अंतरंग' या त्यांच्या कथासंग्रहाप्रमाणेच 'भावनांची मांडवी' या कथासंग्रहातही उपेक्षितांविषयीची त्यांची पोटतिडिक वाचकांच्या प्रत्ययाला येते. यातील पहिलीच कथा 'केवळ वंजारी म्हणून'—वंजारी जमातीची व्यथा वाचकांसमोर येते. काबाडकष्ट करून पोटाची खळगी भरणाऱ्या प्रामाणिक वंजारी बाईवर 'पुतळ्याची माळ' चोरल्याचा आरोप येतो. बाईला व तिच्या माणसाला पोलीस कोठडीत बंद करून ठेवण्यात येते. पण खरा चोर मिळताच या

वंजारीबाईच्या प्रामाणिकपणाची सत्यता सर्वांना पटते. 'पूर्वीच्या काळी आम्ही लमाणाचा धंदा करीत असू पण आता आम्ही भिकारी झालोत आम्ही चोर ठरलो, कुणीही फाटकी माणसं आम्हाला धक्के देऊन चोरटे म्हणून तुरुंगात पाठवतात' हे त्या वंजारणीचे शब्द त्यांच्या आयुष्याची आमच्या समाजाने केलेली परवड प्रत्ययास आणून देतात.

'भुकेलेली भुते' या कथेत समाजाकडून नागवलेल्या व पोट भरण्याचे सर्व मार्ग बंद झालेल्या लोकांचे जीवनदर्शन वाचकांना घडते. रात्री-बेरात्री पेटत्या पलित्यांच्या उजेडात भुताखेतासारखी पोटासाठी राबणारी माणसे आपली जीवनकहाणी पोलीस हवालदारांना ऐकवितात, तेव्हा पाषाणाचे काळीज असणारे त्यांच्या या करुणकहाणीने विरघळतात. त्यांच्या 'कृतज्ञता आणि कॅलेंडर' या कथेतला रिक्षेवाला असाच नाडला गेलेला असतो. रिक्षा ओढणे म्हणजे 'माणसाला पशू बनवणे' म्हणून असे रिक्षे बंद करण्याचा आदेश सरकार काढते. परंतु ज्यांचे पोट केवळ रिक्षावरच आहे त्यांना दुसरा धंदा मात्र सरकार देत नाही. श्री. म. माटे यांनी आपल्या कथांतून अशा कितीतरी सामाजिक समस्यांना वाचा फोडलेली दिसते.

समाजाकडून नाडलेल्यांची दखल तर लेखकाने आपल्या कथांतून घेतली आहेच, शिवाय घरा-घरातून ज्यांची कुचंबणा होते अशा व्यक्तीही त्यांच्या लेखणीचा विषय झालेल्या आहेत. 'दुर्दैवाचा ससेमिरा' या कथेतली दुर्गी ही आईविना पोरकी पोर, सावत्र आईचा जाच व वडिलांचे दुर्लक्ष अशा कोंडीत सापडलो असते. शेवटी एका मरतमढयाशी तिची लग्नाची गाठ वडील घालून देतात. पण थोडयाच काळात वैधव्य घेऊन सावत्र आईच्या जाचाखाली 'दळभद्री, कपाळकरंटी' अशी विशेषणे लेऊन आपल्या आयुष्याचा काळ तिला कंठावा लागतो. 'केवळ नानांच्यासाठी' या कथेत सुद्धा हीच व्यथा प्रगट झाली आहे. वडिलांना मरतेवेळी दिलेले वचन पाळण्याकरिता या कथेतली बनी सावत्र आईच्या संसाराच्या जबाबदाऱ्यांसाठी स्वतःच्या आयुष्याचा होम करते. तिच्या भावनांची दखल मात्र घेतली जात नाही. उलट लग्न न झालेली थोराड बनी समाजाच्या उपेक्षेचा विषय बनते. समाजाने दुर्लक्षिलेल्या अशा कितीतरी सामाजिक घटकांची दखल श्री. म. माटे यांनी आपल्या कथांमध्ये घेतलेली दिसते.

समाजाच्या उपेक्षित घटकांबरोबरच काही ऐतिहासिक व्यक्ती देखील त्यांच्या कथांचा विषय

: सुनंदा देशपांडे

श्री. म. माटे यांच्या
कथावाङ्मयातील
वैशिष्ट्यांचा
आजच्या पिढीच्या
तरुण मनाने
घेतलेला
रसिक शोध

कथाकार माटे

अनुक्रमणिका

झालेल्या आहे. 'स्त्रियश्चरित्रम्' या कथेत स्वीडन देशाच्या राजाची मुलगी कथाविषय झाली आहे. 'दुर्दैवी प्रेयसी'चा कथेत आराबेरा स्टुअर्ट या तरुण स्त्रीची दुर्दैवी प्रेमकथा ते सांगतात. तर 'नवरदेव हात हालवित परत आले' या कथेत राजकारणाकडे लक्ष देऊन लग्न ठरवण्याची चाल आपल्याप्रमाणेच युरोपमध्येही कशी होती हे वाचकांच्या निदर्शनास आणून देतात.

ऐतिहासिक व्यक्ती हा त्यांच्या काही कथांचा विषय झाल्या असल्या तरी सुरवातीलाच म्हटल्याप्रमाणे श्री. म. माटे हे हाडाचे शिक्षक होते. त्यामुळे समाजाचे अंतःकरण ढवळून काम त्यांच्या कथांनी समर्थपणे केलेले दिसते. त्यांच्या कथा प्रसिद्ध होत असता 'माझ्या गोष्टींना वास्तवाची म्हणजे सत्याची भूमिका आहे.' असे ते घोषित करत. त्यांच्या गोष्टीतील वस्तूचा कल सामाजिकतेकडे आहे हे विधान स्पष्ट करावयास हवे.

त्यांच्या कथेतली पात्रे प्रत्यक्ष जीवनात कधीतरी त्यांना भेटलेली असत. सतीच्या शस्त्रांतील सई त्यांच्या आळीतल्या एका लहानशा चौकात उभी राहूनच गरजली होती. 'हास्याच्या शोधा'तील लिफ्टमन त्यांनी मुंबईस पाहिला होता, सावित्रीची कथा वासुदेव बळवंताच्या एका मित्राच्या करुणास्पद चरित्रातून उचलली आहे 'श्री निवासरावांच्या गोड निराशे'तील हेलकरणीची हकीगत त्यांच्या जीवनात प्रत्यक्ष घडलेली आहे.

या कथा असल्यामुळे व त्यांत अनेक ठिकाणी घरगुतीपणा असल्यामुळे त्यांची भाषा त्यांच्या निबंध वाङ्मयापेक्षा निराळी आहे. त्यातही ब्राह्मण, मराठे, कुणबी, महार, मांग, कातकरी, स्त्री-पुरुष अशी अनेक प्रकारची माणसे आलेली असल्याने वास्तवरूप प्रतीत व्हावे म्हणून नागर व ग्रामीण अशा दोन्ही भाषांचा संकर केला आहे. असा खुलासा 'उपेक्षितांचे अंतरंग' या आपल्या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत ते करतात.

कथा या वाङ्मयप्रकाराकडे श्री. म. माटे कसे वळलेत याचीही हकीकत त्यांनी यात्र प्रस्तावनेत सांगितली आहे. कथावाङ्मयाकडे वळण्यापूर्वी श्री. म. माटे यांनी निबंधरूप व विवेचनात्मक भरपूर लेखन केले होते. लघुकथांना शोभतील अशी बारीक-बारीक वृत्ते त्यांच्यापाशी पुष्कळ असत व ती ते विद्यार्थ्यांशी बोलताना त्यांच्या पद्धतीने सांगतही. ते कथन ऐकल्यावर त्यांच्या दोन विद्यार्थ्यांनी 'तुम्ही लघुकथा लिहाच' म्हणून त्यांच्याकडे हट्ट धरला. आणि वि. श्री. मोडक व श्री. रा. ना. नातू यांच्या आग्रहास्तव त्यांनी कथा लिहायला सुरुवात केली. म्हणूनच 'अशा प्रकारचे वाङ्मय लिहिण्याचा हा माझा पहिलाच यत्न आहे' असा कबुलीजबाब ते आपल्या कथासंग्रहाच्या प्रस्तावनेत देऊन टाकतात. माझा स्वाभाविक कल अशा लेखनाकडे नसल्यामुळे माझ्या हातून लेखनाच्या कामी भारी दिरंगाई होत असे, पण या मित्रद्वयांच्या चिकाटीमुळे हे लिहून झाले असे म्हणून कथालेखनाचे सर्व श्रेय ते आपल्या मित्रद्वयाला देतात.

तत्कालीन कथालेखकांच्या तुलनेत श्री. म. माटे यांच्या कथांचा विचार करीत असता ही सगळी पार्श्वभूमी लक्षात घ्यावी लागते. आज आपण त्यांच्या या कथा वाचू लागलो म्हणजे 'कथा' या दृष्टीनी त्या बऱ्याचशा प्राथमिक स्वरूपाच्या वाटू लागतात. कारण लघुकथेचे तंत्र आज बरेच विकसित झाले आहे. घटना, प्रसंग याहीपेक्षा आज मनोविष्काराकडे तिचा जास्त कल आहे, म्हणूनच आजच्या विकसित कथेच्या तुलनेत श्री. म. माटेंच्या कथा बाळबोध वाटणे स्वाभाविक आहे. पण त्यांच्या कथांबाबत एवढेच म्हणणे पुरेसे होणार नाही. तर या कथालेखनामागे त्यांची जी भूमिका होती ती लक्षात घेतली म्हणजे त्यांच्या कथेचे मोल आजही वाचकांना वाटते. त्यांनी मनोरंजनासाठी कथा लिहिल्याच नाहीत. कथेतून त्यांना सामाजिक उद्बोधन करायचे होते. त्यांच्या प्रत्येक कथतून उपेक्षितांसाठी तळमळणारं त्यांचं प्रांजळ अंतरंग प्रतिबिंबित झालेलं दिसतं. त्यांच्या जन्मशताब्दि निमित्त कथाकार माटे यांचं हे स्मरण. ■

३९, टिळकनगर नागपूर-१०,

श्रीपाद महादेव माटे ह्यांनी १९१७ ते १९३७ या कालखंडात स्वत:ला अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात गुंतवून घेतले होते. या कार्यात शरीरकष्ट खूप होतात, आर्थिक झीजही सोसावी लागते आणि मुख्य म्हणजे ज्या उद्दिष्टांनी आपण अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात प्रवेश केला, त्या कार्यात आपली उपयुक्तता आता संपुष्टात आली आहे, एवढेच नाही तर अस्पृश्यनेत्यात आपल्या कार्याविषयी शंका आहेत, भरीस भर म्हणून म. गांधी यांनी अस्पृश्यते निवारणाच्या संदर्भात आत्यंतिक मते प्रतिपादिण्यास आरंभ केला आहे, या व अशा कारणांनी माटे मास्तरांनी स्वेच्छेने अस्पृश्यतानिवारणाच्या कार्यातून निवृत्ती पत्करली (माझे जीवितविषयक तत्त्वज्ञान : श्री. म. माटे, माटे : व्यक्ती व वाङ्मय पृ. २०) एखाद्या कार्यात आपली उपयुक्तता संपलेली आहे, ही जाणीवच मोठेपणाची निदर्शक आहे. त्यातील प्रंजलता अनुपमेय आहे. पण माटे मास्तरांनी एवढे निराश होऊन या कार्यातून का निवृत्त व्हावे आणि पुन: प्रापंचिक व अर्थार्जनाच्या कार्यात रत व्हावे? खरं तर मनस्वी व ध्येयवादी माणसे कोणत्याही स्थितीत माघार घेत नाहीत. आणि अस्पृश्यतेसारख्या जटील, अवघड व आव्हानास्पद अशा कार्यापासून माटयांसारख्या थोर समाजचिंतकाने दूर जावे ही बाब मनाला पटत नाही. पण वास्तवही स्वीकारण्याशिवाय गत्यंतर नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जीवनात प्रवेशण्यापूर्वीच माटयांनी अस्पृश्यता निवारणाच्या कार्यात भाग घेतला होता. अस्पृश्य समाजातील गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बंदसोडे, गणेश आडकूजी गवई, कालीचरण नंदागवळी यासारख्या समाजसुधारकांनीही आपल्या शक्तीनिशी अस्पृश्यांच्या जागृतीच्या चळवळी उभ्या केल्या होत्या. माटे यांच्या मनात अस्पृश्यांच्या दुरवस्थेमुळे अनुकंपा निर्माण झाली आणि संवदेनाक्षम माटयांनी अस्पृश्यांच्या वस्तीत जायला आरंभ केला. ते स्वत:च म्हणतात की, बहिष्कृत समाजात मिसळल्यामुळे आपल्याला एक सामाजिक दृष्टी प्राप्त झाली. प्रारंभी अस्पृश्यांना मंदिरप्रवेश व त्यातूनच त्यांच्यासाठी स्वतंत्र मंदिराची कल्पनाही त्यांच्या मनात उभी राहिली. त्यांच्यासाठी शाळा स्थापन करणे; अस्पृश्यांच्या वस्त्या झाडणे, अस्पृश्यांच्या मुलांना आंघोळी घालणे, या उपक्रमात त्यांनी विशेष रस घेतला. आणि आयुष्याची काही वर्षे त्यांनी यात वेचली. अस्पृश्योद्धार त्याच मार्गांनी होईल अशी त्यांची धारणा होती. मात्र रोटी–बेटी व्यवहार आणि सहभोजन हे उपक्रम त्यांना मान्य नव्हते. हे अवघड जागचे दुखणे आहे ह्याची त्यांना कल्पना होती. कोणते उपक्रम हाती घेतले तर इतर हिंदू समाज दुखावणार नाही याची पूर्ण जाणीव माटयांना होती. अस्पृश्य चळवळीसाठी आपण पंधरा हजार रुपये खर्च केले व याबाबतीत आपल्या धर्मपत्नीने कोणतीही कुरकूर केली नाही ह्याचे त्यांना विलक्षण समाधान होते. त्याहीपेक्षा अस्पृश्यचळवळीत राहूनही आपल्या शुद्धत्वाची; पत्नीने कधी तक्रार केली नाही ह्याचा अभिमान होता. "१९१७ सालापासून जेव्हा आमच्या घरी मांग, महार, चांभार, ढोर या अस्पृश्य जातीचे लोक सारखे येऊ लागले तेव्हा लक्ष्मीबाई प्रथम थोडयाशा बिचकायच्या. पण या चळवळीत पडून सुद्धा मी आचार–विचाराने व आहार–विहाराने शुद्ध रहातो, आणि आपल्या गरीब बांधवांना

: गंगाधर पानतावणे

आंबेडकर–माटे विचारसंघर्ष

शहाणे करून माणुसकीत आणण्याचा यत्न करतो हे जेव्हा त्यांनी ओळखले तेव्हा त्यांनी आपली हरकत परत घेतली. मात्र माझी बैठकीची जागा आणि अभ्यासाची जागा एवढ्याच ठिकाणी ह्या लोकांचा प्रवेश व्हावा असा दंडक त्यांनी घालून टाकला. मीही तो खुषीने मान्य केला" (चित्रपट : श्री. म. माटे, पृ. २७८–७९). अस्पृश्यांविषयीचा भूतदयावादी दृष्टिकोण माटयांच्या ठिकाणी कसा होता, ह्याचे स्वच्छ प्रतिबिंब वरील आत्मनिवेदनात प्रगट झाले आहे. तसेच अस्पृश्यतानिवारणाच्या कार्यात, कौटुंबिक घटक किती महत्त्वाचा असतो हे त्यातून स्पष्ट झाले आहे. शुद्धाशुद्धतेच्या कल्पना मनात वा अंतर्मनात कशा स्थिर झालेल्या असतात आणि मग त्याला अनुकूल वा प्रतिकूल अशा लहानसहान बाबीही आपल्या कार्याच्या समर्थनार्थ कशा उपयुक्त ठरतात ह्याचे प्रत्यंतर वरील विवेचनातून येते ते वेगळेच. घरात अस्पृश्यांच्या प्रवेशाच्या मर्यादांना स्वखुषीने स्वीकारणारे माटे मास्तर तडजोडवादी होते हे दिसून येईल.

खरे तर माटे मास्तरांचा पिंड क्रांतिकारकाचा नव्हता. समाजाच्या आमूलाग्र परिवर्तनाचे स्वप्न त्यांनी कधी पाहिले नव्हते. ज्या काही सुधारणा व्हावयाच्या असतील त्या हिंदू समाजांतर्गत व्हाव्यात आणि त्याही हिंदू समाजाची अकारण मने न दुखावता असे त्यांचे धोरण होते. अस्पृश्यांविषयीचा कळवळा त्यांच्या ठिकाणी असला तरी, व्यवसाय, प्रपंच, आणि साहित्य–व्यवहार याकडे त्यांचे दुर्लक्ष नव्हते. त्या चळवळीत वावरताना मात्र त्यांना 'महारडे–माटे', 'महार माटे' अशी सवर्णांच्याकडून विशेषणे लावली जात. त्यांना त्याचे दुःख वाटत नसे. पण एका वस्तुस्थितीचा निर्देश करावयाचा झाल्यास अस्पृश्यातील चर्मकार व मातंग या वर्गासंबंधीची आस्था त्यांना विशेष होती. पुण्यात, ह्याच वर्गासाठी त्यांनी जास्त शाळा काढल्या होत्या; चर्मकार व मातंग परिषदा भरविल्या होत्या. पां. ना. राजभोज ह्या चर्मकार वर्गातील आणि के. के. सकट ह्या मांग समाजातील तरुणांना त्यांनी जवळ घेतले होते. त्यांना ते मार्गदर्शन करीत. संकटाना तर ते अस्पृश्यता निवारक मंडळाच्या वतीने मासिक वेतनही देत. महार समाज पुढारलेला आहे असे ते म्हणत. महार समाजाविषयी त्यांनी मनोदय व्यक्त केला, "अर्थात इतर कोणी येऊन आपल्याला काही सांगावे व मी तुमच्या वऱ्यासाठी खटपट करितो आहे, व अशा रीतीने आपण म्हणजे कोणी काळजी वहावयास योग्य असे हीन लोक व हे म्हणजे कोणी काळजी वाहाण्याची मानसिक ऐपत असलेले लोक असा भाव त्यांच्या मनात उत्पन्न व्हावा हे स्वाभाविक होते. आमचे आम्ही पाहू. असे वागा आणि तसे वागा असे आम्हाला सांगणारे तुम्ही कोण ? असे टाफरून बोलण्याची त्यांच्यातील अर्धवट सुशिक्षितातसुद्धा प्रवृत्ती होती व तीच हळुहळू त्यांच्याद्वारा त्यांच्या समाजात फैलावत होती." (चित्रपट : श्री. म. माटे पृ. २६९).महार समाज अहंकारग्रस्त झाला आहे अशीच तक्रार माटयांना करावयाची आहे. परंतु सबंध समाजासंबंधाने किंवा शिक्षितांसंबंधाने असे विधान करणे केव्हाही धोक्याचेच होते. माटयांना, स्वाभिमानी होऊ पाहाणाऱ्या आणि विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शिकवणुकीने स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव व्यक्त करू पाहाणाऱ्या महार समाजासंबंधाने येथे तक्रार करावयाची आहे. महार समाज आपल्या शब्दांना झेलत नाही, आपल्याला प्रतिसाद देत नाही असा आक्षेप ते एकीकडे व्यक्त करीत असावेत आणि दुसरीकडे अप्रत्यक्षपणे महार समाजाचा आपल्या कार्याने फायदाच होत आहे ह्याचा आनंद व्यक्त करीत होते. या संदर्भात माटे स्पष्टपणे प्रतिपादतात की, ज्यांना आमची कार्यपद्धती पसंत होती तेथेच आम्ही कार्य करीत होतो. एवढेच नाही तर आमच्या कार्यपद्धतीविषयी आमचा आग्रह होता आणि हा आग्रह समाजविचार आणि धर्मविचार यांच्या अभ्यासातून झाला होता (चित्रपट : माटे, पृ. २७०). ह्याचा अर्थ हाच की, अस्पृश्यातील कोणत्या जमातीत आपण कार्य करावे, त्यांचे प्रश्न सोडवावे, त्यांना साहाय्यीभूत व्हावे हे त्यांनी निश्चित केले होते. तरीही सवर्णीय मात्र त्यांना 'महार माटे' म्हणत याचे आश्चर्य वाटते.

माटे मास्तर जातवार सभांचे पुरस्कर्ते होते. पण ही जातवार सभा केवळ चर्मकार व मातंग ह्या समाजांपुरतीच त्यांनी मर्यादित केली होती. ते म्हणत, अस्पृश्यातील प्रत्येक जातीत मतभेद

आहेत, त्यांच्यात ऐक्य नाही. म्हणून स्वतंत्रपणे वेगवेगळ्या जातींच्या सभातून मला 'नव्या काळा'चा संदेश पोचवायचा आहे. महार समाज त्यांच्या कक्षेत येत नसला तरी निदान चर्मकार व मातंगबंधुंच्या सभा तरी एकत्रित घ्यायला काही हरकत नव्हती. पण ते माटे मास्तरांच्या तत्त्वज्ञानात बसत नव्हते. दुसरे असे की, त्यामागची कारणमीमांसा तरी कितीशी बरोबर होती ? अस्पृश्यातील प्रत्येक जातीत सद्बंध नव्हते, मतभेद होते (हिंदूतील इतर जातीत ऐक्य व सहभाग आहे असे गृहित धरायचे का ?) तर मग माटयांनी त्यांच्यात एकात्मता कशी निर्माण होईल त्या ऐवजी जातवार सभा घेऊन काय साधले ? त्यातून समाजासमाजात दरी अधिक रुंदावणे यापलिकडे काहीही निष्पन्न होणे शक्य नव्हते. परंतु माटयांचे त्यासंबंधीचे तर्कशास्त्र वेगळेच आहे. ते म्हणतात, "पण सरसकट अस्पृश्यांची सभा भरविली असती तर या जमा झालेल्या लोकातले दहावीस लोकसुद्धा त्या सभेला आले नसते. चांभार ढोरांची स्वतंत्र परिषद आम्ही भरविली म्हणून डॉ. आंबेडकर हे माझ्यावर थोडेसे रागावले सुद्धा" (चित्रपट : माटे, पृ. ३०४). त्या त्या समाजातल्या गर्दीसाठी, जातवार सभा घेणाऱ्या माटयांवर आंबेडकर रागावणार नाहीत तर काय त्यांची प्रशंसा करणार ? समग्र अस्पृश्यांच्या उत्थानाचा विचार करणारा माणूस विलगतावादी धोरणाचा पुरस्कार करणार तरी कसा ? परंतु माटयांना अशा सभा कालोचित व दिशादर्शक वाटत होत्या. प्रत्यक्षात ह्या जातवार सभांनी अस्पृश्यांतील जातीजातीत कलह, ताण व अविश्वास निर्माण करण्यास हातभार लावला असल्यास नवल नाही.

हे लक्षात घेता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व श्रीपाद महादेव माटे यांच्यात संघर्ष निर्माण होणे अटळ होते. हा संघर्ष तात्त्विक आहे म्हणून तो अतिशय महत्त्वाचा आहे. आंबेडकर–माटे ठिणगी पहिल्यांदा पडली ती १९२७ च्या महाडच्या चवदार तळयाच्या सत्याग्रहाच्या संदर्भात. महाडच्या परिषदेस आलेले महार लोक महाडातील वीरेश्वराचे मंदिरात जाऊन देवाचे दर्शन घेऊन देऊळ बाटविणार आहेत, अशी अफवा पसरविण्यात आली तेव्हा देवळाचे संरक्षणास चला अशी स्पृश्य मंडळींनी दवंडी दिली आणि स्पृश्यलोक शस्त्रसामुग्रीसह मंदिराच्या आवारात जमा झाले. आणि त्यांनी अस्पृश्यांवर बेसुमार हल्ला चढविला. त्यात अनेकांना जबर मार बसला. काही अत्यवस्थ झाले. कार्यकर्त्यांची भर रस्त्यात विटंबना करण्यात आली. एका अस्पृश्य स्त्रीस मारहाणही झाली. माटेमास्तरांनी महाड प्रकरणावर काही वृत्तपत्रातून वृत्तांत लिहिताना, आणि पुण्यात एक जाहीर व्याख्यान देताना वस्तुस्थितीचा विपर्यास करून असे प्रतिपादन केले की, अस्पृश्यांचा वीरेश्वराच्या देवळात जाण्याचा उद्देश होता आणि म्हणून स्पृश्य लोकांनी त्यांना मारहाण केली. याप्रसंगी त्यांनी आणखी दोन मुद्यावर भर दिला तो असा की, मारामारीशी ब्राह्मण जातीचा काहीही संबंध नव्हता तसेच अस्पृश्य स्त्रीस मारहाण झाली नाही. वस्तुस्थिती अशी होती की, मारामारी होण्यापूर्वी डॉ. आंबेडकरांना, एक डॉक्टर व एक पोलीस अधिकारी या दोघांनी तुम्ही देवळात जाणार आहात का असे विचारले होते. त्यावेळी डॉ. आंबेडकरांनी त्यांना स्पष्ट सांगितले की, फक्त महाड म्युनिसिपल सार्वजनिक पाणोठयासंबंधाने केलेल्या ठरावाची अंमलबजावणी आम्ही केली आहे. देवालयात जाण्याचा आमचा विचार नाही. (पोतनीस व राजभोज यांचे पत्र : ज्ञानप्रकाश दि. ८–५–२७ : खैरमोडे–आंबेडकर चरित्र खं. ३ पृ. ३९).

खुद्द डॉ. बाबासाहेबांनी, माटेकथित महाडवृत्तांत कसा चुकीचा आहे याचा परामर्श घेतला आहे. ते म्हणतात, "आम्हास इतकेच सांगावेसे वाटते की, शेटजी–भटजींनी मारामारीत भाग घेतला नाही असे जे माटे व दाते यांनी जाहीर केले आहे, ते साफ खोटे आहे. जी गोष्ट आम्ही स्वतः डोळयांनी पाहिली तिच्या खरेपणाविरुद्ध कोणी काहीही सांगितले तरी त्याबाबतीतील आमचे मत कधीही बदलणार नाही. ब्राह्मणांनी मारामारीत भाग घेतला होता. इतकेच नव्हे तर या बाबतीचे सारे खलबत एका ब्राह्मण वकिलाच्या घरी झाले हे आम्ही पुरतेपणी जाणून आहोत" (बहिष्कृत भारत : २० मे १९२७). माटयांनी

एका अस्पृश्य स्त्रीस मारहाण झाली नाही असे जे म्हटले होते तेही कसे चुकीचे आहे व असत्य आहे, याचे स्पष्टीकरणही डॉ. आंबेडकरांनी केले आहे. माटयांनी स्पष्टीकरणार्थ असे व्यक्त केले होते की, आपण त्या अस्पृश्य स्त्रीच्या नातेवाईकांजवळ चौकशी केली आणि ह्या चौकशीतून असे निष्पन्न झाले आहे की, तिची बेअब्रू केल्याची घटना खोटी आहे. बाबासाहेबांनी खुद्द त्या स्त्रीच्या पतीचे पत्रच ब. भा. त प्रकाशित करून सत्यावर प्रकाश टाकला आहे. त्यावर मतप्रदर्शन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, "सुशिक्षित म्हणविणाऱ्या माटयांसारख्या मास्तर गृहस्थानी असत्य गोष्टी चारचौघात बिनदिक्कत सत्य म्हणून मांडाव्यात ह्यासारखे निंद्यवर्तन दुसरे कोणते असू शकेल असे आम्हाला वाटत नाही. माटयांच्या विरुद्ध आलेला हा पुरावा खोटा असल्यास तो खोडून टाकण्यास त्यांनी पुढें यावयास पाहिजे होते पण तसे न करता माटे मूग गिळून बसले आहेत." (बहिष्कृत भारत : १ जुलै १९२७). डॉ. आंबेडकरांचे हे आव्हान माटयांनी कधी स्वीकारले नाही.

माटे हिंदू महासभेचे बरीच वर्षे कार्यकर्ते होते. त्यांचा हिंदुत्वावर अढळ विश्वास होता. अस्पृश्यता निवारक मंडळाची स्थापना करून अस्पृश्यताविषयक प्रश्नांचा गुंता सोडविण्याचाही त्यांनी निर्धार केला होता. या मंडळात चौतीस सदस्य होते. ते विविध जातीजमातीतील होते. या चौतीसात दोन मातंग आणि एक चर्मकार या व्यक्तींचा समावेश होता. अस्पृश्यातील हे दोनच प्रतिनिधी. अस्पृश्यता निवारणासाठी रोटी–बेटी व्यवहार आवश्यक भाग आहे असे माटयांना व अस्पृश्यता निवारक मंडळाला कधीच वाटले नाही. माटे म्हणतात की, रोटी–बेटीव्यवहाराचा प्रश्न स्पृश्यात अप्रिय असल्यामुळे व त्यामुळे आपल्यावर रोष उद्भवण्याचा संभव असल्यामुळे तो आपण स्वीकारला नाही. आणि या प्रश्नात न गुंतल्यामुळे आपण स्पृश्यवर्गाचा राग ओढवून घेतला नाही याचे समाधानही माटयांनी व्यक्त केले आहे (चित्रपट: पृ. २९७). अस्पृश्यता निवारणाची चळवळ तर करायची पण स्पृश्य हिंदू समाजाला अजिबात दुखवायचे नाही असे त्यांचे धोरण होते. त्यामुळेच रोटी–बेटी व्यवहाराच्या प्रश्नासंबंधीची त्यांची भूमिका सावध होती. समाजातील प्रक्षोभ निर्माण करणाऱ्या प्रश्नांना माटे हात लावायला तयार नव्हते. ती चौकट मोडण्याची त्यांची अजिबात तयारी नव्हती. विटाळापुरतीच त्यांची भूमिका आग्रही होती. ही सावधता व धोरण लक्षात घेऊन डॉ. बाबासाहेबांनी माटयांना सवाल केला, "का माटयांनी कोणा अस्पृश्याबरोबर रोटी व्यवहार करून दाखविला आहे की, बेटी व्यवहार करून दाखविला आहे ? माटयांनी केले आहे तरी काय ? हे एकदा स्पष्ट झाले असते म्हणजे त्यांच्याबद्दल शंकाकुशंका घेण्यास तरी कोणास कारण उरले नसते ?" (बहिष्कृत भारत : १ जुलै १९२७) डॉ. आंबेडकरांनी एका समाजचिंतकाला दिलेले हे आव्हान होते. परंतु माटे आपल्या भूमिकेपासून ढळले नाहीत. हिंदू समाजाच्या आमूलाग्र परिवर्तनाच्या, पर्यायाने हिंदू समाजाच्या एकात्मतेच्या विचारांच्या ह्या क्रांतिकारी मार्गापासून माटे खूप दूर होते.

श्री. म. माटे ह्यांनी पुण्यात 'चातुर्वर्ण्य' या विषयावर दिलेल्या व्याख्यानाच्या संबंधाने डॉ. आंबेडकरांनी बहिष्कृत भारताच्या १ फेब्रु. १९२९ च्या अंकात एक स्फुट लिहिले होते. माटयांच्या प्रतिपादनावर त्यांचा आक्षेप होता. माटे उपरोक्त व्याख्यानात म्हणाले की, इंग्रजी राज्यापेक्षा पेशवाईत अस्पृश्यांना जास्त सवलती होत्या. माटयांनी स्वतः हे मत मांडले असले तरी आधारभूत माहिती आपल्याला एका अस्पृश्य पुढाऱ्याने दिली असे त्यांनी स्पष्ट केले. दुसऱ्याच्या नावावर एखादी माहिती ढकलण्याची शिकस्त माटयांनी का केली ? असा आधार घेण्यामागे काही हेतू होता का ? डॉ. बाबासाहेबांनी माटयांच्या प्रतिपादनावर युक्तिवाद करीत म्हटले की, पेशवाईत, इंग्रजी राजवटीपेक्षा अस्पृश्यांना अधिक सवलती होत्या असे घटकाभर मानले तरी अस्पृश्यांची स्थिती पेशवाईत उत्तम होती असे कसे म्हणता येईल ? इतिहासाला डावलून कोण-

तीही बाब सिद्ध करता येत नाही, हेच खरे! वस्तुस्थितीचा निर्देश करताना ते म्हणतात, "काय त्या काळी अस्पृश्यांना तळी विहिरी वगैरे सार्वजनिक ठिकाणी बंदी नव्हती? की नोकऱ्यांच्या ठिकाणी त्यांना अस्पृश्यता आड येत नसे? की विद्यार्जन करून वाटेल तो दर्जा प्राप्त करून घेण्याची त्यांना मोकळीक होती? होते तरी काय?... पेशवाईत अस्पृश्यांच्या गळयात मटकी बांधण्यात येत असत हे म्हणजे एक सत्यशोधकी थोतांड असे पेशवाईछाप ब्राह्मणांना वाटते. पण प्रभूसारख्या पुढारलेल्या जातीचाही छळ करण्यास ज्यांनी मागेपुढे पाहिले नाही व मराठयांना शूद्रत्वाच्या कोटीत ढकलण्यास ज्यांनी जंगजंग पछाडले त्याच पेशव्यांनी प्रभू मराठेही ज्यांना तुच्छ लेखतात त्या अस्पृश्यांच्या गळयात मडकी बांधावी हे त्यांच्या कृतीशी सर्वथा सुसंगत आहे." (बहिष्कृत भारत १ : फेब्रु. १९२९). पेशवाईत अस्पृश्य सुखी होते असे म्हणणे हा बौद्धिक विलास होय. इतिहास तशी ग्वाही देत आहे. पेशवाईत अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी कोणी प्रयत्न केले नाहीत की, अस्पृश्यांना विशेष सवलती दिल्या नाहीत. उलट इंग्रज राजवटीत आंशिक का होईना प्रयत्न झाले आहेत. पण हे प्रयत्न म्हणजे इंग्रजांनी अस्पृश्यांवर केलेले उपकार नव्हेत असेही बाबासाहेब रोखठोक मतप्रतिपादन करतात. ऐतिहासिक सत्याचा विपर्यास करून आणि केवळ एखाद्या अस्पृश्य पुढाऱ्याचा हवाला देऊन पेशवाईचे समर्थन करणे म्हणजे ब्राह्मण्याचेच समर्थन करणे होय, अशीही त्यांनी टीका केली. एवढेच नाही तर माटे मास्तरांनी हा शोध एखाद्या भटाने लिहिलेल्या कादंबरीमय पेशवाई वाचून लावला असावा असे उपरोधिकपणे म्हटले आहे.

माटयांच्या सान्निध्यातील सकटादी अस्पृश्य मंडळी कशी परवश आहेत ह्यावर डॉ. आंबेडकरांनी वेळोवेळी प्रकाश टाकला आहे. सकट नेहमीच महार जातीवर आगपाखड करीत असत. पुण्यातील 'भाला'च्या २-५-२७ च्या अंकात सकटांनी तक्रार केली ती अशी की, महार, मांगावर अन्याय करतात, कमी लेखतात. बाबासाहेबांनी त्यावर लगेच उत्तर दिले की, महार लोक जर अन्याय करीत असतील तर त्यांना ठिकाणावर आणण्याचा प्रयत्न सकटांनी करावा. ह्या कामी आपण सर्वतोपरी सहकार्य देऊ असेही अभिवचन दिले. महारांना वठणीवर आणत असतानाच आणखी एका बाबीचा निर्देश त्यांनी केला आणि तो फार महत्त्वाचा आहे. ते म्हणाले की, सार्वजनिक पाणवठे अस्पृश्यांना खुले करण्याच्या कामी सकट विरोध कां करीत आहेत? एकीकडे महारांकडून समानतेची अपेक्षा करायची आणि त्याचवेळी ब्राह्मणवर्गाकडून मात्र समानतेची अपेक्षा करू नये हा प्रकार परवशतेचा आहे. माटे मास्तरांच्या सावलीत वाढलेल्या सकटांनी आपल्या मानवी हक्काचा विचार न करता पोपटपंची करावी याचा संताप डॉ. बाबासाहेबांनी व्यक्त केला आहे. ते म्हणतात. "ब्राह्मणाने पाळला-पोसलेला कोणताही अस्पृश्य जातीतील माणूस अस्पृश्यांचे पुढारीपण घेण्यास नालायकच ठरेल असे आमचे प्रामाणिक मत आहे." (बहिष्कृत भारत : २० मे १९२७).

श्री. म. माटे ह्यांच्या संबंधाने मांडलेले डॉ. आंबेडकरांचे विचार जसे परखड, स्पष्ट व आडपडदा न ठेवणारे आहेत, तसेच मास्तरांनी आंबेडकरांविषयी मांडलेले विचारही स्पष्ट व आडपडदा न ठेवणारे आहेत. कर्ममेळयासंबंधी विचार मांडतांना माटयांनी त्याला आंबेडकरांचा पूर्वावतार संबोधिले आहे. या दोन पुरुषातील साधर्म्य खरं तर कल्पनाविलास ठरावा. देवाची लाज ज्या कारणासाठी कर्ममेळयाने काढली ती बाब शेवटी शरणागतीचीच होती. कारण पुढे त्याने पश्चात्ताप व्यक्त करून ईश्वराने आपला उद्धार करावा अशी करुणा भाकली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संघर्षाची, विद्रोहाची तुलना कर्ममेळयाशी करणे खूपच ताणल्यासारखे होईल. असे असले तरी, माटयांचे, 'अस्पृष्टांचे भीमपुरुष डॉ. आंबेडकर', आणि 'अस्पृष्टांचा आधारस्तंभ कोसळला' ह्या दोन लेखाची दखल घेणे जरूरीचे आहे. पहिला धर्मांतर केल्यानंतरचा तर दुसरा त्यांच्या निर्वाणानंतरचा आहे. दोन्हीतील कालावधी फार थोडा आहे. या दोन्ही लेखात, डॉ. बाबासाहेबांचे कर्तृत्व, श्रेष्ठत्व, क्रांतिकारकत्व

मान्य केले आहे. परंतु काही ठिकाणी 'जर–तर'ची भाषाही वापरली आहे. ते एके ठिकाणी म्हणतात की, ते स्पृश्य समाजात जन्मले असते तर त्यांना पुढारीपण आणि लोकप्रियता मोठ्या प्रमाणात लाभली असती. अस्पृश्य समाजात जन्मल्यामुळे त्यांना डोळस अनुयायीवर्ग उभा करणे कठीण गेले. (विचारमंथन : माटे, पृ. १५७) कोणत्या जातीत कोणी जन्माला यावे हे कसे ठरविता येणार ? आणि एखाद्या श्रेष्ठ जातीत जन्माला यणे म्हणजे कर्तृत्वसंपन्न होणे किंवा लायक ठरणे हे समीकरण तरी कसे मांडता येणार ? पण हे गणित माटयांनी कशासाठी मांडावे ? त्यातून सूप्त असा जाती श्रेष्ठत्वाचा अहंकारच दृगोचर होतो असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. लोकप्रियता व पुढारीपण मिळविण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी स्पृश्य जातीत जन्मायला हवे होते हे तर्कशास्त्रही बुद्धी गुंग करून टाकणारे आहे. डोळस अनुयायां-संबंधीचा मुद्दाही असाच ठिसूळ आहे. डॉ. आंबेडकरांना अस्पृश्य समाजात डोळस अनुयायीवर्ग तयार करणे अवघड कार्य होते हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. पण ज्ञानवंचित–साधनवंचित वर्गाला विचारप्रवृत्त करून त्याला डोळस बनविणे हे कार्य, स्पृश्य वर्गात डोळस अनुयायीवर्ग मिळतो ह्या प्रमापेक्षा, फार मोठे आहे.

डॉ. आंबेडकरांसंबंधी एक आक्षेप नोंदवताना माटे म्हणतात की, अनेक स्पृश्यांनी, अस्पृश्यांच्या-साठी अंग मोडून काम केले, अहर्निश राबले, परंतु डॉ. आंबेडकरांनी या गोष्टीचा गौरवपर उल्लेख कधीही केला नाही. त्यांची कारणमीमांसा देताना "जे कोणी आपले नव्हेत, त्यांनी आपल्यासाठी कामे करावीत आणि आपल्याला उपकृत करावे याचा एक सूक्ष्म अवमान खऱ्या कर्तबगार आणि बुद्धिमान माणसाला खासच वाटतो." (विचार मंथन : पृ. १५८). माटे मास्तरांचा गौरवपर उल्लेख आंबेडकरांनी केला नाही हे खरे आहे. ह्याचा अर्थ हा नव्हे की, त्यांनी कोणाही सवर्णाचा गौरवपर उल्लेख केला नाही, त्यांनी आपल्या कार्यात सामावून घेतले नाही की त्यांच्यावर जबाबदारी सोपवून त्यांची प्रशंसा केली नाही. येथे काहींचा निर्देश करणे जरूरीचे आहे. दे. वि. नाईक ब्राह्मण होते आणि समाज समता संघाच्या 'समता' ह्या मुखपत्राचे त्यांना संपादकपद दिले होते. 'जनता' ह्या पत्राचेही ते काही काळ संपादक होते. भा. र. कद्रेकर मराठा समाजातील होते व त्यांनाही पुढे 'जनता'चे संपादक नियुक्त केले गेले. अॅड्. कवळी, सुरबा टिपणीस, चित्रे, प्रधान, चिटणीस ह्या सवर्ण समाजातील व्यक्तींच्या कार्याचा अनेकदा गौरवपर उल्लेख आंबेडकरांनी केला आहे. चिटणीसांच्या संबंधीची, त्यांच्या अनेक पुस्तकातील प्रस्तावनेत केलेली नोंद, त्यांना लिहिलेली पत्रे काय दर्शवितात ? रावसाहेब बोले ह्यांच्या कार्याविषयी त्यांना केवढे ममत्व होते ! गाडगे महाराजांविषयीचा त्यांचा आदरभाव कसा नाकारता येईल ? सयाजी महाराज, छत्रपती शाहू महाराजांच्या व्यक्तिगत सहकार्याचा आणि अस्पृश्यताविषयक कार्याचा त्यांनी ऋणनिर्देश कशासाठी केला ? म. फुल्यांना त्यांनी अकारणच गुरुपद दिले काय ? आणि आपला एक ग्रंथ त्यांनी, त्यांस कशासाठी अर्पण केला ? त्यातील मजकूर काय सांगतो ? बाळ गंगाधर टिळक ह्यांचे पुत्र श्रीधरपंत यांच्या मृत्युनंतर त्यांनी लिहिलेला लेख विसरून कसे चालेल ? सामाजिक कार्यातील श्रीधरपंतांची धडाडी, बुद्धिमत्ता, निश्चय, जोम, कर्तबगारी यांची उपरोक्त लेखात प्रशंसा तर केलीच पण ते अधिक काळ जगले असते तर महाराष्ट्रातील अस्पृश्यता निरस्त करण्याचे कार्य त्यांनी निःसंशय-पणे तडीस नेले असते, अशी भावनाही त्यांनी व्यक्त केली आहे. श्रीधरपंतांच्या मृत्यूने त्यांना अतिशय दुःख झाले होते. ते म्हणाले, "लोकमान्य-ही पदवी जर टिळक घराण्यापैकी कोणा एकास साजली असती तर ती श्रीधरपंतासच होय." (दुनिया २ जून १९२८–खैरमोडे–आंबेडकर चरित्र खं. ३ मधून) तेव्हा माटे मास्तर आंबेडकरां विषयी निराधार मतप्रतिपादन करीत आहेत असे म्हटले पाहिजे.

धर्मांतर ही बाब माटे मास्तरांना हवालदिल करणारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचे धर्मांतर त्यांना आक्षेपार्ह वाटते. हिंदू समाज मोठ्या प्रमाणावर प्रायश्चित्त घेत आहे, असे

असतानाही आंबेडकरांनी त्याकडे दुर्लक्ष केले, असे त्यांना वाटत होते. मद्रासमधील अस्पृश्यांचे पुढारी एम. सी. राजा धर्मांतरविरोधी होते. त्यांनी त्या संदर्भात आपली भूमिका मांडताना, आम्ही हिंदू धर्माच्या पोटातच राहू. आणि तेथे राहूनच झगडा करू व आपले हक्क मिळवू असे म्हटले होते. माटेयांनी ह्या मताचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. मात्र आंबेडकरांच्या धर्मांतराला त्यांनी, पंडित रमाबाई व ना. वा. टिळक यांच्याप्रमाणेच 'घाईचा निर्णय' असे म्हटले आहे. १९३५ ला धर्मांतराची घोषणा व त्यानंतर १९५६ ला बुद्ध धर्माचा स्वीकार, एवढा मोठा कालावधी असतानाही घाईचा निर्णय कसा? १९३५ पूर्वी व त्यानंतरही बाबासाहेबांनी अस्पृश्यांच्या अस्तित्वाची त्यांना समतेने वागवावे अशी आणि हिंदू समाजरचनेत मूलभूत बदल घडण्याची निकड प्रतिपादिली होती. आपण धर्मांतर करण्यास उत्सुक नाही असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते. माटे मास्तरांना ह्याची जाणीव नसावी असे कसे म्हणावे? बाबासाहेब म्हणाले होते, "आम्ही धर्मांतर करण्यास आज तरी तयार नाही. कारण उन्मत्त लोकांची खोड मोडून हिंदू समाजात बहिष्कृत वर्गाचे माणुसकीचे हक्क प्रस्थापित करण्याची अद्यापि आम्हास धमक आहे. हिंदू समाजाचा मुर्दाडपणा घालविण्यास यश येईल अशी आम्हास अद्यापि आशा आहे." (बहिष्कृत भारत : १५ मार्च १९२८). धर्मांतराच्या घोषणेपूर्वी सात वर्षे बाबासाहेबांनी मांडलेले हे विचार होते. त्यानंतर अस्पृश्यांना मानवी प्रतिष्ठा लाभावी म्हणून त्यांनी सत्याग्रह, अधिवेशने, निवेदने, व्याख्याने, विचारप्रकटन याद्वारे हिंदू माणसाच्या बदलाची अपेक्षा केली. पण त्याला कितीसा प्रतिसाद मिळाला? केवढे परिवर्तन हिंदू समाजात झाले? हिंदू असूनही आपणास हीन वागविले जाते, किडया- मुंग्यांइतकीही प्रतिष्ठा आपल्या समाजास नाही, आपल्या प्रयत्नांचा हिंदू समाजावर काही परिणाम होत नाही हे त्यांनी सातत्याने अनुभवले. आणि शेवटी आत्मसन्मान देणाऱ्या, समान तत्त्वाचा पुरस्कार करणाऱ्या, धर्माचा त्यांनी शोध घेतला. धर्मांतराचा विचार अत्यंत गांभीर्यपूर्वक आणि ऐहिक विचार करूनच बाबासाहेबांनी मांडला, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. माटे म्हणतात तशी 'घाई' नव्हती. धर्मांतर ही कल्पनाच माटेयांना सहन होत नाही. त्यामुळे पुढे धर्मांतरितांच्या कृतीला त्यांनी अंधानुकरण म्हटले. हिंदुत्वनिष्ठ मनाला धर्मांतर हा विषय अप्रिय असणारच. आंबेडकर आणि त्यांच्या अनुयायांनी हिंदू धर्मातच राहावे असा आग्रह माटेयांचा होता. पण हा आग्रह केवळ शाब्दिक होता. अस्पृश्यातील एका मोठ्या वर्गाने धर्मांतर न करण्यासाठी हिंदू समाजाने बदलायला हवे होते. हा प्रश्न मन्वंतराचा होता. पण तसे न घडविता केवळ धर्मांतरासंबंधी तक्रार करण्यावरच माटे आणि त्यांच्यासारख्या चिंतकांचा भर दिसतो. अशा प्रकारच्या वक्तव्याला उद्देशून आंबेडकरांनी विचार व्यक्त केले, "कसेही असो पण ज्या स्पृश्य हिंदूंनी अस्पृश्य लोकांना आपलेपणाने, कधीही वागविले नाही त्या स्पृश्य हिंदूंना अस्पृश्यांबद्दल एकाएकी इतका पान्हा फुटावा हे एक मोठे आश्चर्यच आहे. आम्ही एका रक्तामासाचे असे जर तुम्ही म्हणत असाल तर ज्या आज अगणित वर्षे आम्ही तुमच्यात राहिलो त्या अवधीत तुम्ही स्पृश्य हिंदूंनी आमच्यासाठी काय केले? ... पण गोष्टी ज्या निव्वळ लोकमतावर अवलंबून आहेत, ज्या घडवून आणण्यास कायदा नको अशा कोणत्या गोष्टी तुम्ही केल्या आहेत? हिंदू धर्माची देवळे खुली केली की, शाळा मोकळ्या केल्यात? का सार्वजनिक पाणवठे खुले केले? ... या गोष्टी तुमच्या मनावरच्या होत्या व त्या करणे न करणे सर्वस्वी तुमच्या हातात होते. पण त्यापैकी एक तरी गोष्ट तुम्ही केली आहे काय? इतकेच नव्हे तर, त्या घडवून आणण्यास लोकमत वळविण्याचा अल्पस्वल्पसा प्रयत्न देखील केला नाही." (बहिष्कृत भारत १६ नोव्हें. १९२८). इतक्या जळजळीतपणे बाबासाहेबांनी आपल्या मनातील शल्य मांडले आहे. तरीही आंबेडकरांनी धर्मांतरासाठी घाई केली किंवा ते करायला नको होते ही विचारसरणी 'काही करा पण हिंदूत रहा, फुटून जाऊ नका' अशा प्रकारची आहे. यानंतर अस्पृश्यांसाठी स्वतंत्र देवळाची कल्पना मांडण्यात आली होती.

पण ती व्यवहार्य तर नव्हतीच पण विभक्तवादाला खतपाणी घालणारीच होती. १९३० च्या सुमारास नासिकच्या मंदिर प्रवेशाच्या चळवळीच्या वेळी, सावरकरांनी स्पृश्यांना उद्देशून एक अनावृत पत्र लिहिले होते व त्यात अस्पृश्यांना मंदिर प्रवेश करू द्यावा अशी विनंती केली होती पण त्याचा काही उपयोग झाला नाही, हे सर्वविदित आहे. लोकमत तयार करण्यासाठी स्वत: सावरकर नासिकला गेले नाहीत हेही तितकेच सत्य आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केले. बुद्ध धर्माचा स्वीकार केला. हिंदू समाज अपरिवर्तनशील हे पुन: एकदा जाहीर झाले. हे सारे माटे ह्यांच्या मनाविरुद्ध झाले असे म्हणावे लागेल. 'धर्मांतर' या बाबीसंबंधी जसा त्यांनी विचार केला, तसेच धर्मांतरानंतरही दोन मुद्दे त्यांनी मांडले. आंबेडकरांच्या बरोबर त्यांच्या अनुयायांनी केलेले धर्मांतर हे अंधानुकरण होते. अस्पृश्यांनी केलेले धर्मांतर हे अंधानुकरण होते. अस्पृश्यांनी केलेले धर्मांतर, बुद्ध धर्म पटला म्हणून नव्हते तर आंबेडकरांच्या इच्छेला मान देण्यासाठी होते. आणि त्यामुळे डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांचे मोठे नुकसान केले आहे. एकंदर अस्पृश्य समाजात वेदिलीच निर्माण केली आहे. आणि दुसरा मुद्दा होता, "डॉ. आंबेडकर व त्यांचे काही अनुयायी जरी थोडेसे दूर सरकल्यासारखे वाटत असले तरी स्वातंत्र्यवीर सावरकरांनी म्हटल्याप्रमाणे ते अजूनही हिंदुधर्माच्या कक्षेतच वागत आहेत असे आत्मीयतेने मानीत राहावे" (विचारमंथन– पृ. १६९).

अत्यंत विचारांनी बाबासाहेबांनी बुद्ध धर्माच्या स्वीकाराची घोषणा केली होती आणि धर्मांतरापूर्वी किती तरी वर्षे आपल्या अनुयायांसमोर धर्मांतराची, बुद्ध व बुद्ध तत्त्वज्ञानाची मांडणी केली होती. एकप्रकारे त्यांची मानसिक तयारीच त्यांनी केली होती. 'मुक्ती कोन पथे' किंवा त्यावेळच्या जनतेतील लेख, पाहिले की, बाबासाहेब अस्पृश्य समाजाला धर्मांतराची गरज प्रतिपादून त्यांची बौद्धिक तयारी करीत होते. असेच म्हटले पाहिजे. तेव्हा मी बुद्ध धर्म स्वीकारतो म्हणून तुम्हीही तसे करा असा हुकूमशहाचा आदेश त्यांनी दिला नव्हता हे कोणीही मान्य करील. बाबासाहेबांनी निवडलेला धर्म कल्याणकारी आहे कारण बाबासाहेब आपल्या समाजाला अकल्याणाकडे नेणे अशक्य आहे अशी त्यांची खात्री होती. तेव्हा, त्यांच्या इच्छेला मान देणे असे म्हणण्यापेक्षा त्यांना पटलेल्या खात्रीतून हा धर्मस्वीकार होता. बाबासाहेबांच्या नंतरही अनेक दीक्षासमारंभ झाले, पूर्वास्पृश्यातून आज फार मोठा भिक्षुवर्ग तयार झाला, नागपूरच्या दीक्षाभूमीवर आज लक्षावधी बौद्ध येतात, बुद्ध तत्त्वज्ञानासंबंधी विपुल असे लेखन या वर्गातून होत आहे, मोठ्या प्रमाणात बौद्ध परिषदा आयोजिल्या जातात. तेव्हा हे अंधानुकरण किंवा स्वत:चे नुकसान करणारे किंवा अस्पृश्यात वेदिली निर्माण करणारे होते असे म्हणता येईल का ? बाबासाहेबांच्या धर्मांतराच्या विचारापूर्वीच जळगाव–जामोद भागातील पाच हजार अस्पृश्यांनी आम्ही हिंदू धर्म सोडणार आहोत व धर्मांतर करणार आहोत अशी जाहीर नोटीस दिली होती, तो प्रकारही आंबेडकरांच्या इच्छेला मान देणाराच मानावा का ? आणि समजा, असे मानले की, आंबेडकरांच्या इच्छेला मान देण्यासाठी, माटे म्हणतात त्याप्रमाणे, अस्पृश्यांनी बुद्ध धर्माचा स्वीकार केला असेल तर त्यात चूक कोणाची ? अस्पृश्यांची, आंबेडकरांची की हिंदू धर्मीयांची ? अस्पृश्य समाज, ज्याने आपल्याला सन्मानाची हक्काची भाषा दिली, अस्मिता आणि स्वत्व दिले, विचारजागृत केले, दास्यातून स्वातंत्र्याचा मार्ग दर्शविला– आणि माटेच म्हणतात त्याप्रमाणे 'हिंदू समाज श्रेणीत नसलेल्या समत्वाचा पुरस्कार करणाऱ्या बुद्ध धर्माचा आश्रय घेतला' (विचारमंथन : पृ. १६६) अशा द्रष्ट्या, कारुणिक, क्रांतिकारी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मान देणार नाही तर काय !

आता दुसरा मुद्दा आहे तो बुद्ध धर्माचा स्वीकार करूनही आंबेडकर हिंदू धर्माच्या कक्षेतच वावरत आहे हा. माटे ांनाही हेच म्हणावयाचे आहे, पण त्यांनी हवाला दिला आहे तो सावरकरांचा. एकीकडे धर्मांतर हे राष्ट्रांतर म्हणायचे आणि बुद्ध धर्माचा स्वीकार करताच, बुद्ध धर्म हा

हिंदू धर्माचा एक भाग आहे असे म्हणावयाचे ह्यातील कसरत विलोभनीय आहे. तत्वज्ञान, साहित्य, शिल्प यातील वेगळेपण व स्वतंत्रपण साऱ्या जगाने मान्य केले असतानाही हिंदू धर्माचाच, बुद्ध धर्म हा भाग कसा ? माटे ह्यांनीच, ह्यापूर्वी उल्लेखिल्याप्रमाणे हिंदूसमाजश्रेणीत नसलेली समता बुद्ध धर्मात आहे. दशावतारात बुद्धाला समाविष्ट करूनही, राम, कृष्णाप्रमाणे हिंदूधर्मीय बुद्धाचे मंदिर उभारून त्याची उपासना करतात असे कोठेही नाही. बुद्ध धर्म अन्यापेक्षा अधिक जगात गेला. भारताबाहेरील बौद्धांना आपण विचारले की, तुम्ही हिंदू आहात का तर त्याचे उत्तर निश्चितच नकारार्थी मिळेल. भारतातील अस्पृश्य बौद्ध झाले आणि त्यांनी पारंपरिक कामे नाकारली, रूढी नाकारल्या तेव्हा महाराष्ट्रातील अनेक भागात त्यांच्यावर हिंदूंनी बहिष्कार घालण्याची काय गरज होती ? बौद्ध हे हिंदूच आहेत तर मग त्यांचे संस्कार, उपासनापद्धती, प्रार्थना, प्रार्थनास्थळे हिंदूंच्यापेक्षा भिन्न व वेगळी का ? अशा अनेक बाबतीत दोन्ही धर्म आणि धर्मीय व्यवहारातील भिन्नता दर्शविता येईल. तरीही हट्टाग्रहाने बुद्धधर्म हा हिंदूधर्माचाच भाग आहे, डॉ. आंबेडकरांनी बुद्ध धर्म स्वीकारूनही ते हिंदू धर्माच्या कक्षेतच आहेत असे कोणी म्हणाले तर त्यांचे समाधान करणे केवळ अशक्य आहे.

माटे हे अस्पृश्योद्धारक नव्हेतच ह्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आक्षेपात बरेचसे सत्य होते हे माटयांची वेळोवेळी व्यक्त झालेली भूमिका आणि कार्य करण्याची पद्धती यावरून लक्षात येते. त्यांच्या प्रारंभीच्या काळातील त्यांची मनःपूर्वकता नाकारता येणार नाही. आपल्या मर्यादांसह अस्पृश्यातील काही वर्गात त्यांनी जे कार्य केले ते नाकारता येणार नाही. विशेषतः १९३७ नंतर म्हणजे अस्पृश्यता–निवारणाच्या कार्यातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी अस्पृश्य–जीवनासंबंधाने जे वाङ्मय निर्माण केले ते निःसंशयपणे मराठी साहित्यात अक्षर ठरले आहे. असे असले तरी बाबासाहेबांनी माटयांच्या प्रेरणांवरच मूळातून आक्षेप घेतल्यामुळे माटे काहीसे निराश झालेले दिसतात. १९३७ नंतर तर ते पुनः अस्पृश्यता-निवारणाच्या कार्याकडे अजिबात वळलेले नाहीत. मात्र ते बरेचसे दुखावलेले दिसतात. त्याची छाया डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या कार्यासंबंधी त्यांनी केलेल्या विवेचनात प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष दिसते. त्यांची काही विधानेच त्यांची ग्वाही देतील. १. म. गांधी यांनी या (अस्पृश्य) समाजासाठी जेवढी श्रमंती केली तेवढी डॉ. आंबेडकर यांनी केली नाही. (विचारमंथन : पृ. १७५). २. आजवरच्या थोर सुधारकांचे प्रयत्न डॉक्टरसाहेबांनी वाया घालविले (धर्मांतर केल्याने) यांचे खरोखर वाईट वाटते. (याचे कारण कोणत्याही सुधारकाने धर्मांतर केले नाही.) (विचारमंथन : पृ. १६८). ३. (डॉ. आंबेडकर) ते मनात म्हणालेही असतील की, हिंदू धर्मातील ब्राह्मणापेक्षा या भिक्षुंची (बौद्ध) योग्यता थोडीसुद्धा जास्त नाही. (विचारमंथन : पृ. १६४). ४. Blood is thicker than water ही म्हण या जातिनिविष्ट समाजात खरी ठरली आणि आंबेडकर यांच्या अनुयायात अखिल महार जातच सामील झाली. (विचारमंथन : पृ. १७७).

आंबेडकर–माटे ह्यांच्या परस्परविचारांच्या संदर्भात प्रस्तुत लेखात प्रपंच केला आहे. परस्परांच्या भूमिका आणि विचारमंथन यांच्या आधारे काही बाबी स्पष्ट करण्याचा हा प्रयत्न आहे. त्यातून तत्कालीन सामाजिक प्रश्न, त्याकडे पाहाण्याची दृष्टी व ते सोडविण्याची पद्धती यावर प्रकाश पडतो. ■

अनुक्रमणिका

कथा या वाङ्मयप्रकाराशी माझी ओळख जशी उशीरा झाली तशीच श्री. म. माटे यांची कथा उशीराच माझ्या वाचनात आली. पठडीतले शीर्षक नसलेली त्यांची 'बन्सीधरा, तू आता कुठे रे जाशील ?' ही कथा वाचली आणि ही कथाही पठडीतली नसल्याचे जाणवले. कथा मनात घर करते म्हणजे काय याची अनुभूती 'बन्सीधरा'च्या वाचनाने पहिल्यांदा आली. तो एक विलक्षण अनुभव होता. माटे यांच्या कथेने असा अनुभव देऊनही त्यांच्या कथाविश्वाशी मी बराच काळ अपरिचित होतो. पुढे नवकथाकारांच्या कथेशी ओळख झाल्यानंतरही माटे यांच्या कथेची आठवण मिटली गेली नव्हती. कथाप्रकाराने, नजरेत भरावी अशी वाटचाल केल्यानंतरच्या काळात, मागील वळणावरील माटे यांच्या कथेकडे मी वळून पाहिले आणि त्याच विलक्षण जिवंत अनुभवाचा प्रत्यय आला.

विविध प्रवाहांच्या खळखळाटात हरवून न जाता आपले अस्तित्व कायम राखण्याचे सामर्थ्य माटे यांच्या कथेला प्राप्त झाले ते केवळ भाषा वा शैलीमुळे नव्हे तर त्यांच्या कथादृष्टीमुळे ते शक्य झाले, असे मला वाटते. समकालीन कथाकारांच्या कथादृष्टीपेक्षा माटे यांची कथादृष्टी भिन्न होती. त्यांची कथासृष्टीही पठडीतले लेखन वाचणाऱ्यांसाठी अनोखी होती. समकालीन कथाकारांहून वेगळधा कथादृष्टीचा आढळ माटे यांच्यात होतो याचे मूळ त्यांच्या जीवनदृष्टीत आहे. त्यांचे कथालेखन चार घटका करमणूक व्हावी यासाठी वा स्वांत:सुखाय झालेले नाही. उपेक्षितांविषयीच्या कळकळीतून कथारूप मिळालेले ते अनुभवांचे जिवंत बोल आहेत आणि म्हणूनच त्याचे मोल आहे. उपेक्षितांच्या अंतरंगाचे दर्शन घडविणाऱ्या माटे यांचे व्यक्तित्व, विचार यांची छाप त्यांच्या कथांवर पडलेली आढळते. ते जीवनात जसे आहेत अगदी तसेच साहित्यात आहेत. त्यांच्या कथालेखनामागील प्रयोजन लक्षात घेतले म्हणजे या अभिन्नत्वाची ओळख पटते.

अशी ओळख पटली म्हणजे मग त्यांच्या कथेतील बन्सीधर आपल्याही मनात व्याकूळ प्रश्न निर्माण करतो, सावित्री मुक्यानेच मेल्याने आपण

श्री. म. माटे यांची कथा

: सुनील शिनखेडे

विविध प्रवाहांच्या
खळखळाटात हरवून
न जाता
आपले अस्तित्व
कायम राखण्याचे
सामर्थ्य
माटे यांच्या कथेला
प्राप्त झाले
ते केवळ
भाषा वा शैलीमुळे
नव्हे तर
त्यांच्या कथादृष्टीमुळे
ते शक्य झाले

अस्वस्थ होतो, 'आमी चोर न्हाई, आमी मर्द रामवंशी हाओ' हे कृष्णाकाठच्या रामवशाचे रांगडे बोल विचार करायला लावतात, अस्पृष्ट पिऱ्याच्या मुलीच्या प्रश्नाने पिऱ्याप्रमाणेच आपणही अनुत्तरित होतो. मराठी वाङ्मयात कधीही न आलेली ही माणसे माटे यांनी आपल्या कथांतून सजीव, साकार केली. त्यांची सुखदुःखे, व्यथा, आशा-आकांक्षा, चालीरीती माटे यांनी अगदी जवळून पाहिल्या होत्या. असीम सहानुभूतीतून त्यांनी या उपेक्षितांच्या व्यथावेदनांना बोलके केले. धगधगीत वास्तवाची पार्श्वभूमी, चपखल शब्दयोजना, सुडौल भाषावैभव आणि विलक्षण परिणामकारकता या साऱ्यांच्या मिलापाने माटे यांच्या कथांना आगळे परिमाण लाभले आहे.

माटे यांचा मूळ पिंड वैचारिक निबंधकाराचा. असे असताना वयाच्या साठाव्या वर्षी त्यांनी कथालेखनाला प्रारंभ केला आणि त्या क्षेत्रात ते यशस्वी झाले. उपेक्षित समाजाविषयीचे चिंतन हाच त्यांच्या कथालेखनाचा गाभा आहे. "स्वतःच्या समाजाच्या चिंतनाने जे उद्भवेल ते त्या समाजाचे ज्ञान, त्याच्या आर्थिक चिंतनाने उत्पन्न होईल ते त्या समाजाचे अर्थशास्त्र आणि त्या समाजात जे जे कुणी लोक आहेत त्यांच्या बुद्धीचे, वासनांचे आणि भावनांचे खेळ ज्या वाङ्मयात दिसतील ते त्यांचे वाङ्मय होय," असे माटे म्हणत. अशा वाङ्मयाच्या निर्मितीसाठी प्रतिभावंतांनी आपला मोहरा घसघशीतपणे स्वकीयांकडे वळविला पाहिजे असे माटे यांना वाटे. शेतकरी-कामकरी यांच्या दैनंदिन जीवनातील छोट्या-छोट्या घटनांकडेही आपल्याशा म्हणून पाहिले तर वाङ्मयाला जिवंतपणा येईल असे म्हणणाऱ्या माट्यांनी त्याच प्रेरणेतून कथानिर्मिती केली.

माटे यांच्या कथांचा बारकाईने अभ्यास करता; आजच्या दलित साहित्याची बीजे माटे यांच्या कथांमध्ये आढळतात असे म्हटले तर वावगे ठरू नये. दलित साहित्य हा शब्दप्रयोग तेव्हा रूढ नव्हता एवढेच. कुठलाही अभिनिवेश न बाळगता; सामाजिकतेचे भान सदोदित राखून लेखन करणारे माटे हे मराठी वाङ्मयाच्या क्षेत्रातील एक अमोल व दुर्मिळ रत्न होते. ■

■

" ज्याला आपण 'विद्वत्ता, विद्वत्ता' असे नाव देतो ते ज्ञान मुख्यतः संग्रहरूपच असते. विद्वान मनुष्यही अगदी नवीन असे फारच थोडे बोलतो. आधी होऊन गेलेल्या लोकांनी जे परंपरेने आणून पोहोचविलेले असेल ते त्याने ठाऊक करून घेतलेले असते इतकेच. आधीच्या लोकांनी संपादिलेल्या ज्ञानाचा प्रसार ज्या समाजात फारसा झालेला नसतो ते समाज मागासलेले राहतात; व त्यांतील ज्या थोड्यांनी ते हस्तगत केलेले असते ते विद्वान्पणाचे वैभव भोगीत राहतात. युरोपीय समाजात संचित ज्ञानाचा प्रसार एवढा आहे की, काही लोकोत्तर ज्ञानाची पैदास केल्याखेरीज तेथे विद्वान ठरता येत नाही. त्याच्या अभावी आपल्याकडील विद्वान केवळ अल्पसंतुष्ट बनतो व नव्या नव्या ज्ञानाचा हव्यास तो सोडून देतो. याचा परिणाम म्हणजे समाजही रेंगाळत चालतो. अशाप्रकारे विद्वान व समाज एकमेकास अपकारक बनतात. हे जर चुकवावयास हवे असेल तर एकंदर समाजाच्या व विशेषतः शिक्षित समाजाच्या ज्ञानाची कमान उंच व्हावयास हवी."

—श्री. म. माटे

(सांगली, अध्यक्षीय भाषण, साहित्य संमेलन १९४३)

अनुक्रमणिका

| क | वि | ता |

गजघंटेच्या छायेतील पोपटाची पिल्ले

मलोन

तुमच्या वाचेतील, भाषेतील काळीज अंगार
मजला कळतो...
जाणिवेच्या धरातलावर मी हे लावतो,
होरपळतो, जळतो....
अलीकडे नकाराच्या महापूराने तोडले आहे
या द्वीपकल्पावरले दळणवळण
तरीही माणसामाणसात असतोच ना
सहकंपाचा अदृश्य ईथर चिरंतन
त्यातून माझ्या संज्ञेला बसतात तुमच्या
हृदयस्थ भूकंपाचे तीव्रोत्कट हादरे
खोल पायातून खचताना दिसतात
ही अश्मयुगीन हेमाडपंती घडणीची नगरे
सुप्त ज्वालामुखी जागो, भूकंप होवो,
हिमाचल वितळून पॅसिफीक वर येवो
बदलतील ही भविष्याचे आक्षांश–रेखांश,
या भूगोलावरी भू-जलाची वाटणी नीट होवो
लाव्हा रसाच्या लोंढयात पण
वाहून नऽ जावोत गजघंटेच्या छायेतली
कोवळी पोपटाची पिल्ले
कुरुक्षेत्रावर व्यासाच्या प्रतिभा बळाने
काव्याच्या ओंजळीत ज्यांना जपले
तेवढया किलविल पालवी पुरती असो
रेडक्रॉस एवढी स्वस्तिकाकार शस्त्रसंधी....
नाहीतर आदमचा आत्मा
अश्वत्थामा होऊन आजन्म मागत फिरेल
दारोदार तेल चिंधी....

एकाकी वाटांचा सहवास

उघडी असू दे सगळी दारे
सुजनांच्या अंत:करणासारखी
लाघवी लाडीक झुळूक येऊन
चित्रातला पंछी पंख फडफडेल
पुरासारखे घोंघावत घुसून
वादळ छप्पर घेऊन उडेल
मोकळया दिशांना सामोरे जाण्याइतका
छातीत पुरेसा श्वास असू दे...

पारदर्शक असू दे नजरेची कांच
अंतरिक्षातील हवेसारखी
गर्द उन्हाच्या सूर्यफूल वनात
कान कापून देताना व्हॅन गॉफ भेटेल
जीवनेच्छेचा दुर्दम्य वणवा
आयुष्य फलकावरती जर्द पिवळा पेटेल
अनर्थांतला अर्थ जाणवण्याइतका
एकाकी वाटांचा सहवास असू दे...

मोकळी असू दे आंतली पोकळी.
मूर्ती न लाभलेल्या गाभाऱ्यासारखी
जन्मसांगाती वेदनेहून गाढ नि संथ
चिरंतन काळोख आत जमेल
अवकाशातील नि:शब्दातून अनाहत आश्वासक
ॐकार घुमेल
अनादि नाद आत ऐकू येण्याइतका
स्वत:वर पुरेसा विश्वास असू दे....

उन्हास स्वप्नांचा ध्यास असू दे
मनास जगावेगळे भास असू दे
ध्रुवावीण अवघा प्रवास असू दे...

बोधकथा

चाकोरीने नीट गाडी ओढणाऱ्या
बैलांच्या शहाण्या समंजस डोळ्यांनी,
वरून नेमून दिलेल्या वाटेने
निमूट सरळ चालत राहावे
वळणावरून पुढे जात, न पाहता
वळून मागे खळखळ न करता
ओझे ओढीत
नागमोडी रेषा मुताची काढीत
चाबकाच्या वास्तव फटकाऱ्यासारखे निर्मम
अतिवास्तव ऊन सहन करून
पुढे आणि पुढे चालत राहावे....

फुटलेच जर का वाटेला फाटे भाग्यरेषेऐसे
तर विप्रश्न होऊन
हवाली करावेत पाय एका वाटेच्या शून्यसंभव
पायपिटीसाठी...
फिरून दुसरीकडे पाहू नये
चाकोरी सोडून जाऊ नये
म्हणून वरून असतेच कासऱ्याला सक्त खेच
वेसणीतून हाडात खोलवर 'कळ'णारी
हीच आपली वाट म्हणून चालत राहावे....
वाटेनेच आपली अशी निवड केल्यावर
इच्छेचे स्वातंत्र्य हिरावले गेल्यावर
आयुष्यात उगवते नक्षत्र सहजसमजेचे,
बलांना गोठ्याची वाट पाठ असते तसे.

दिवस साजरे करावेत

काही तरी हलके फुलके बोलत राहावे
आतली पडझड दडविण्यासाठी
खळखळून हसावे दिसू नऽ देता अवघडलेले
जळ पापणीकाठी....
कुशल आहे सारे म्हणत जावे
काहीच न घडताना मनासारखे
येणारे दिवस हसून साजरे करावेत
महिना अखेर येणाऱ्या सणासारखे...

रात्र

एकनाथ कुवडे

ती येऊन येते,
माझ्या स्वप्नाचे ओझे
तिचे पाऊल काळोखाचे
तरी रुणझुण पदरव वाजे.
तिच्या येण्याचा वास,
साऱ्या घरात कोंडून
काळोखरक्ताचाच सदा
माझ्या कवितेत असा सांडून.

नींद

आदिमध्यअन्ताचा ठिकाणा नसलेला
एक असंबद्ध प्रवास...
पुढच्या वाटा मागच्यासारख्याच अदृश्य
आणि मेंदूत लागलेला एक वणवा.
समोरही पसरून, होरपळून टाकणारा !
गदगदणारी झाडे न् निराधार पाखरे
अस्फुटसे चीत्कार न् ईडीपस आरोळी
मी शोधतोय माझ्या कवितांची वही,
हे सारेच, कवितेत नोंदून ठेवण्यासाठी.

फाग

सुखदेव ढाणके

पळसभारला
चिनटला फाग
राग अनुराग
वसंताचा.

मोहरून आली
यौवन डहाळ
सुगंधाची कळ
वारियात.

अंग अंग झाले
सरभैर होरी
कलंडता उरी
रंगमेघ.

अनुक्रमणिका

झाडांच्या कविता

प्रा. ज्योती लांजेवार

: १ :

झाडं खरोखर झाडंच असतात का ?
मातीशी कुठलेच....त्यांचे नाते नसते का !
ज्या मातीत रुजतात मुळं
तिचेही काही गुणधर्म असतात.
कालांतराने माती बदलत नाही
झाडंच का बदलताना दिसतात ?

: २ :

झाडांनी आपल्या रोपांना
तळहातावरच्या फोडासारखे
जपायला हवे होते....
आधाराला आलेल्या वेलीचे
'वेलीपण' सांभाळायला हवे होते.
परंतु....स्वत: झाडानेच
स्वत:चे 'झाडपण' हरवले असता
वेलीचे काय....अन् रोपांचे काय !

: ३ :

आपली सावली....
आपल्यातच घेऊन जगणाऱ्या
झाडांचे हे शहर आहे
पानझडीत झडणारा 'पाचोळा'
कुणाच्यांही पावलांचा स्पर्श होऊ नये
इतका अस्पृश्य....
अजाण कळ्यांना कुस्करताना पाहून
मनोमन वेडावणाऱ्या
झाडांचे हे शहर आहे.

: ४ :

इथं झाडं विक्रीला असतात
एकमेकांचे भाव
आपसातच ठरवत असतात
वेळ आली तर....
सावलीस येणाऱ्या पांथस्थाचाही
ते सहजासहजी लिलाव करतात.

: ५ :

झाडांनाही धर्म आहे,
जात आहे....कूळ आहे.
स्वत:ला उच्च समजणारे
काही झाडं
अंगावर काटे घेऊन
आजही संस्कृती जोपासत आहेत.

: ६ :

झाडं एकमेकांचे वैरी नसतात
असे म्हणू नये कोणी
झाडांसारखे वैर
कोणालाही वागवता येत नाही
अन्....स्वार्थासाठी
कोणाकडे वोट दाखविता येत नाही.
कारण...आपले जीवन फुलावे म्हणून
पसरतात हात पाय
अंतरंगातले पाणी हलू देत नाहीत
एकदाचा वृक्ष वठला की
आपल्या सावलीत
कोणतेच झाड वाढू देत नाहीत.
फार काय तर....
आधारासाठी आलेल्या वेलीचा
सर्रास करतात कडेलोट

: ७ :

झाडे बेईमान असतात.
नांगरलेल्या धरित्रीलाही
भेगाळत जातात
तिला न्हाती धुती करण्यासाठी
पाऊस पाडण्याचे वचन देतात....
अन्....पुढे विसरून जातात.

: ८ :

झाडं बदलतील....या आशेवर
वेलींनी बांधू नये स्वत:ला
झाडं झाडंच असतात....
झाडंच राहतात.

: ९ :

झाडं अस्वस्थ होत नाहीत
कोणत्याच उसास्यांच्या
सांत्वनासाठी हलत नाहीत
ते स्थिर....स्थितप्रज्ञासारखे
कित्येक किंकाळया...आक्रोश
चुडयांचा सडा....कुंकवाचा टिळा
झाड होते सांव भोळा....
वुडाशेजारच्या दगडाला
शेंदूर फासलेला पाहून
आदराने मान देते झुकतात झाडं....

: १० :

झाड....असेच आजारी एक....
भिंतीवरचे पोपडे उडालेली काया
जख्खं म्हातारं....वयोवृद्ध....
पोटाचा घेर सांभाळीत
दाढी–मिशा कुरवाळीत
उपदेशकाची भूमिका स्वीकारीत....
पुराणकथा पोशीत....
वार्षिक पौर्णिमा साधून
हळदकुंकू वाहून घेते....
सातजन्माची शपथ देऊन
अंतरीचे धागे लपेटून घेत
आयुष्याची गुंतागुंत करून ठेवते...
वेलींना आश्वासन देऊन
ओघळया श्रद्धा वाढविते....एक झाड.

: ११ :

झाड....तसे शहाणे असते
पक्षांना शहाणपण सांगण्याइतपत
परिपक्व असते
परंतु....सरडयाला लाजवणारे
'सरडेपण' पाहून
वेलीचे भान हरपते....

■

एक आत्मनिष्ठ काव्य

कु. प्रतिमा ना. दिवाणजी

गणित काळकामाचे अन् वेगाचे
माझ्या बाबतीत वेटे
काळकाम वेगाचे घडयाळच थवकले
हलवले धक्के मारले काटे फिरवले
ते तसूभरही पुढं नाही सरकले
ह्या इथं हॉस्पिटलच्या बेडवर
पडल्या पडल्या करतेय विचार वेळेवर
तोच दारावर आली टकटक
बाहेरचा आवाज म्हणे
"येऊ का आत बेधडक"
मनात म्हटलं मी आहे आपल्या कामात
नो नो हा तर प्रेस्टिजचा प्रश्न झाला
मग नसलेला चष्मा सावरला
घसा जरा खाकरून घेतला
सॉरी मला सध्या वेळ नाही
कामापुढं मरायची फुरसत नाही
तुम्ही नंतर या केव्हा तरी
"ठीक आहे, येईन कालांतरी"
पावलांचा आवाज दूर गेला
कालांतरी ! काळजाचा एक ठोका चुकला
हळूच दार केलं किलकिलं
दाराबाहेर उमटली होती
काळाची काळी पावलं
त्यांना सध्या बाहेरच ठेवायचं आहे
उरलेल्या जीवनाचा उपभोग घ्यायचा आहे.
मनात धरून उभारी,
पाहिलं पुनः त्या घडयाळाकडं
अरेच्या चालू झालंय
म्हणतंय तुझ्याही जीवनात
आता रमावंसं वाटतंय.

■

एक आत्मकथन

उल्हास मनोहर

: १ :

एखादा फकीर दान देऊन जातो.
आणि
उतरणीवर गावाची जमीन बदलते
हे,
सारं कसं हरवु या क्षणाला
देणाऱ्यांच्या दु:खाशी
मी सहभागी होऊ शकत नाही
प्रत्येक भेटणाराच चेहरा
दगा देणाऱ्याच्या गर्दीचा साक्ष होतो
इथे,
रात्र अशी चालून येते वैऱ्यासारखी
भटकतानाही हे बेमालुम रस्ते माझे होतात
कालपर्यंतचा प्रवास
त्यांनी ठरवलेला संकेतासारखा.
आज त्यांनी दिलेल्या शब्दांचे
ओंजळीभर दाणे पाण्यावर ठेवून जात आहे
तू निघून गेलीस
शब्दांचे वलय होऊन–मात्र–
हा आरसाच तुझ्या चेहऱ्याच मला शाप
मी दुर्दैवी नाही
ईश्वराचे संकेतच असे भेटले की,
जन्म देणाऱ्याचे हात तुझ्यापर्यंत होते–पण–
सरणावर ठेवणाऱ्याचे हात
मला भेटले नाहीत
अन्
काही चुकांचे संदर्भ सोबत घेऊन
तू निघून गेलीस

: २ :

कसं सांगु तुला
इथला प्रत्येकच चेहरा दगा देणाऱ्यांचा
यादीतला ठरला
वादळांनी घेरलेल्या महायुद्धातील करुणापात्रे,
आता जवळ नाहीत.
काल युद्ध खेळीलीस
अन् पराभव करून गेलीस
हा कुठला समुद्र होता की
जो कधी आतुन पेटुन उठलाच नाही
कुठवर सोसु हे तुझ्यापर्यंत येऊन सांगावयाचे
माणस असतात वेईमान होतात.
म्हणून आयुष्य सरणावर
लुटून घ्यावयाचे नसते.
तू डोळ्यात आसवांची लक्तरे असलेली
चांदणे नक्षत्रे ठेवून गेलीस
हा बदनाम बाप असा भेटला
हुंदक्यात रात्र अशी पेटते की,
पुन्हा–पुन्हा–
तुझ्या सरणावर अमृतवेल होऊन जावेसे वाटते
पण या सरणावरची माती इतकी साधी की,
भेटायला आल्यावर गेटवर थाबावं
तशी स्मशानांची दारे आपोआप बंद होतात
अन्
कवितेत रात्र जागते
डोळयांच्या पापणीत आठवणींचा
नजर भर प्रदेश पेटतो
कसं सांगू या अलम् दुनियेला.

: ३ :

समोर येणारा प्रत्येक हात
गुंता ठेऊनच जातो.
काल
तुझ्या आठवणीत हरवतांना
आता सरणावर दया देणाऱ्यांची नावे
उमटू लागली आहेत.

दोन कविता : " अनोळखीच्या "

: १ :

कुण्या गावात
सावल्यांचे हरवलेले प्रदेश शोधावे
तसे म्हणे, ही जमात
या गावातून त्या गावात आली
एक चिमणी कावळयाला सांगू लागली.
हा प्रदेश असा कसा ?
इथे माणसांना गोळयांनीच मारतात
माझा प्रदेश बरा बाई ! चिमणी म्हणाली,
माणसं माणसांना मारतात.

: २ :

कावळा उडून गेल्यानंतरची गोष्ट
त्या दिवशी
शाळेतून परतणाऱ्या मुलाचा गोळीबारात मृत्यु
त्या दिवशीच्या त्याचा शेवटच्या जन्मदिवस.
चिमणीच्या चोचीतल्या घरट्याचा काड्या
त्याचा सरणावर
कावळ्या रंग काळा अस्पृश्य. म्हणून त्याचा
अंत्ययात्रेत सहभागी नाही.
म्हणून एक नवा संकेत
पिंडदानाचा दिवशी ते म्हणे,
तेरवीला बकरा कापतात.

सावली

काळोख चिरत जाणारी एक सावली
त्यादिवशी
अचानक दगा देऊन निघून गेली
हुंदक्याच्या रात्र पारीत
सावल्यांना जन्म देतांना
हात आभाळाला कवटाळून झोके घेतांना
दिसत नव्हते आभाळाचे ओझेपण
ढगांना दिशा नसते–पण माहीत असते
ॠतुचे ओलेपण
सावल्यांचे एक बरे असते
अंधार पेटत असतो उन्ह सलत असते
एकटेपणात जळत असते
अशावेळेस एकटेपणात खूप रडून घ्यावे.
हुंदक्याचे वेगळेपण काही औरच असते.
आभाळमातीला स्वतःहून कधीच
बदनाम करीत नसते.
खूप हसणाऱ्या चेहऱ्यावरही
आत एक दुःख सलत असते
ॠतुचे स्पर्श बदलतांना
मातीला डोहाळे लागतात
गर्भार माती हलकी होत जाते.
लेकुरवाळीसारखी
अशावेळेस माळरानावर
एक सावली चिता पेटवीत
निघून जाते.

अस्तित्व

कु. प्रतिमा वा. दिवागजी

फुलणाऱ्या फुलाला कधी पडलाय
प्रश्न स्वतःच्या अस्तित्वाचा ?
वाहणारं पाणी भ्रमलंय कधी स्वतःच्या हेतूवर
किलबिलणाऱ्या पक्षाला
पडलंय कधी कोडं
आपण का गातो ते ?
साऱ्या चराचर सृष्टीला
हेतू आहे जगण्यामागे
पण फक्त एक जीव
एक जीव असा आहे
जो जगतो विना उद्दिष्टांचा
ज्याच्या अस्तित्वाची ना जाणीव
ना हर्ष खेद कुणाला
त्याची किंमत फक्त मला
कारण तो वेकार वेताल जीव
खरंच गळ्याशप्पत माझा आहे.
...माझा...

ढग छद्मी हसून गेल्यावर

प्रकाश खरात

चिंब भिजलेल्या प्रत्येकानं सांगितलेली
आभाळाची गोष्ट
म्हणे त्याच्या पोटी माया आहे.
ते दयाघन संततधार वर्षले;
तेव्हा आमचा निर्मितीचा प्रदेश
सुजलाम् सुफलाम् झाला.
ढग छद्मी हसून गेल्यावर
आभाळ नि त्याच्या ऐकीव आर्द्रतेविषयी
साशंकच राहिलो.
तगमगत्या भुईवरील
माझे अव्याहत मरण
आभाळ विरक्त डोळ्यांनी पहातंय....

जोगवा
किरण तांबे

: ऐन उमेदीत उध्वस्तल्या स्वप्नाच्या
ओल्या पापण्यांशी भिडवलं मी हासत
वेदना–व्याकुळ जिवाचं भिक्षापात्र,
झाली घालमेल काही क्षणाची मात्र
नि:संग पुरताच झालो मी स्वत: तेव्हा,
रितेपणाचा नाही स्वीकारला मी जोगवा
आणि भटकलो वस्ती–वस्ती अन् रानोमाळी
उललो, उमजलो उरलो मी स्वत:त तरी
आता आनंद–व्याकुळ जिवाचं भिक्षापात्र
घेऊन मागतोय् मी आनंदमय जोगवा !

जेलरांचे सर्वस्वी थोटे हात
प्रकाश खरात

कोण विकट हसलंय ! नि संवेदना हिरसतेय
कदान्नाच्या मोवदल्यात ठेवलेयत
ओलीस श्वासनि:श्वास
होवो मृत्युस्पर्श ! झळाळून निघेन
नि जेलरांचे सर्वस्वी थोटे हात
अथवा अधू दृष्टी
पोहचणार नाहीय्
शहर हृदयांतल्या जलाशयापर्यंत
जिथे माझे डौलदार हंस पोहतायत.

गुलाब
सिद्धार्थ मेश्राम

गुलाबाची एकेक पाकळी
चंद्रकिरण होऊन
अलगदपणे तो उमलवत राहिला

...आत पिवळ्याधम्म परागांच्या
माणसासाठींच्या वंदना सुरू होत्या
नि रक्तरंगी पाकळ्यांचे
निखारे झालेले होते !

■

पोरका
संजय सहदेव चवरे

नको चंद्र आता नको तारका
खुळा मी कधीचा मघासारखा

बरे हेच माझे असे राहणे...
हवा ना कुणाचा फुका दोडका

कुणाचा नको हात या उशाला....
बरा हात माझा मला मोडका

बेईमान सारे मला येथले...
वस्तीत त्यांच्या मी एक बोडका

मायबाप येथे कुणाला म्हणू ?
तयांनीच केले मला पोरका.

तुम्ही
शांताराम टेळकीकर

आम्हाला माहीत आहेत
तुमची खास वैशिष्टये
ज्यामुळे तुम्हाला बहाल केली गेलीय्
ही मोक्याची खुर्ची–

धूर्त चाल खेळण्याची आदत,
माणसं फोडण्याची मतलबी पद्धत,
आणि प्रत्येकाचं तोंड गप्प करण्याची
वेगवेगळी रीत

तुम्हाला हवी असते हमी
विरोधात चकार शब्द न बोलण्याची
अन् गप्प राहून सगळं सहन करण्याची–
तुमच्या कार्यरत मेन्दूतून निघाले
एकतर्फी युक्तिवाद
आमच्या सहनशीलतेचा अंत पाहतात
आणि गलेलठ्ठ मिळकतीच्या गुबगुबीत खुर्चीत
ईळभर बसून बसून तुमच्यातली
चरबी वाढत जाते–

■

माटे - विचारमौक्तिके

"नवे राजकारण असले काय, नवे अर्थवाद असले काय, किंवा नवीन वाङ्मये असली काय, आमच्या सर्व विचारवंतांचा मोहरा अगदी घसघशीतपणे स्वकीयांकडे वळला पाहिजे. परकीय देशात जे जे झाले आहे त्याची कलमे इकडे बांधावयाचे काम निश्चयानेच बंद झाले पाहिजे. परक्या लोकांकडे सारखी दृष्टी लावून बसणे आणि तेथून केलेली उसनवारी ही आमचीच आहे भासविणे यांतील मानहानी सुद्धा नाहीशी झालेली आहे; आणि तीही एक कलेचाच भाग आहे अशी बतावणी सुरू आहे. या कामात कोणी कसब दाखवीत नाही असे मला मुळीच म्हणावयाचे नाही. उत्तम बुद्धिमान आणि प्रतिभाशाली लेखकही हा हातचाळा कधीकधी करून पाहत आहेत.

परंतु ही त्यांच्यावर आलेली आपत्ती कशी चुकविता येईल याचा विचार केला तर त्याला एकच उत्तर आहे. ते हे की, त्यांनी आपल्याच समाजाचे अवलोकन करावे आणि ते सहानुभूतीने करावे; त्यांनी आपल्याच समाजाचा अभ्यास करावा आणि तो ममत्व बुद्धीने करावा; त्यांनी आपल्या समाजात मिसळावे आणि ते एकोप्याने मिसळावे. दूरस्थाची, प्रतिष्ठितपणाची, उंचपणाची, तिऱ्हाईत-बुद्धी त्यांनी अगदी विसरून जावी; तरच त्यांना एकोपा उत्पन्न करिता येईल, त्यांना अभ्यासही करिता येईल आणि त्यांचे अवलोकनही यथातथ्य होईल."

—श्री. म. माटे

(सांगली साहित्य संमेलन : अध्यक्षीय भाषण)

"ज्ञान प्रसाराचे नवे साधन जो चित्रपट त्याचाही विपरीत उपयोग होत आहे. वास्तविक पाहता चित्रपट संस्था ही आधुनिक शास्त्रांनी उत्पन्न केलेली एक अद्भुत संस्था आहे आणि अज्ञानविध्वंसनाला, सद्भावनांच्या विकसनाला आणि मनाचे सामर्थ्यपुंज परिपुष्ट करण्याला या साधनाचा विलक्षण उपयोग होण्यासारखा आहे. जनमनाच्या विकसनाची आणि या राष्ट्राच्या खऱ्याखऱ्या अभ्युदयाची काळजी वाहणारी शासन संस्था जर या ठिकाणी असती तर रशियातल्याप्रमाणे या सामग्रीच्या बळावर आतापर्यंत पर्वत उल्लंघिता आले असते. परंतु ज्ञानप्रसाराला, या साधनांचा उपयोग होण्याच्या ऐवजी, पश्चिमेकडील काही असंस्कृत लोकांच्या वाकुल्या खुलवून दाखविणे आणि पुष्कळवेळा एतद्देशीयांनी बनविलेला शृंगारसमाचार दाखविणे याच्यापलीकडे ही 'करमणूक' फारशी जातच नाही."

—श्री. म. माटे

(सांगली साहित्य संमेलन : अध्यक्षीय भाषण.)

"—खरोखर आमची मैत्रीची मर्यादा किती संकुचित असते ! आपलाच पोषाख, आपलीच रीतभात, आपलीच विद्या, आपल्याच करमणुकी, आपलेच रागलोभ यांच्या पलीकडे आपल्याला जातांच येत नाहीं ! ही सर्व मागें टाकून आपल्याच आकांक्षा इतर कोठें सांपडतात कीं नाहीं हे आपण पाहिलें आहे काय ? आपल्याच वासना आणि ईर्ष्या इतर कोठे आपण शोधल्या आहेत काय ? आपलींच ध्येयें आपल्या बाह्य परिवेषाच्या पलीकडे आपल्याला आढळतील असें आपण उमगतों काय ? आणि एकच माणुसकी आपल्याप्रमाणें इतरत्र कोठें सांपडेल असें तरी आपल्याला कधीं वाटतें काय ?..." —कशाचा संसार !..उपेक्षितांचें अंतरंग पृ. ८८.

त्या वेळीं आम्ही ज्यूनियर बी. ए. च्या वर्गांत होतों. सासवडला आमची ट्रिप जाणार होती. प्रा. वाटवे व प्रा. माटे या आमच्या उभयतां गुरुजनांनींहि ट्रिपच्या या उल्लासांत भाग घेण्याचें मोठ्या आनंदानें मान्य केलें होतें. ऐनवेळीं कांहीं अपरिहार्य कारणानें प्रा. वाटवे हे आमच्याबरोबर येऊं शकले नाहींत. आमचा भारी विरस झाला. परंतु वाटवे नसले तरी बापूसाहेब माटे सोबत येत आहेत या कल्पनेनें आमच्या विसरलेल्या मनाला आम्ही सांवरलें व सारेजण मोठ्या उत्साहानें, खेळीमेळीनें व गमतीनें सासवडला गेलों.

तेथें ज्या देवळांत आम्ही उतरलों, तें विस्तीर्ण, शीतळ आणि विलक्षण निवान्त असें एक स्थळ होतें. जेवणानंतर देवळापुढील पटांगणाच्या काळ्याभोर दगडांनीं बांधून काढलेल्या थंडगार जमिनीवर आम्हीं सारेजण जेव्हां एकत्र बसलों तेव्हां कांहीं अननुभूत भावनांनीं मन अगदीं भरून आलें. मित्रमैत्रिणींची कोमल जवळीक, भोंवतालची नयनरम्य वनश्री, वातावरणांत भरलेला सुगंधी थंडावा—आणि जवळ आमचे आवडते प्राध्यापक कधीं नव्हे इतक्या निकट सान्निध्यात आमच्याबरोबर गप्पागोष्टी करण्यासाठीं लाभलेले ! मग काय विचारावें ? पण पुढें हळुहळू गप्पांवरहि एकप्रकारची आळसलेली छाया पडूं लागली आणि मनावर कांहीं गूढ तन्द्री चढत चालली.

—अशांतच प्रा. माट्यानीं त्या वेळीं 'झंकार'मध्यें नुकताच प्रसिद्ध झालेला आपला "बन्सीघर ! तूं आतां कुठें रे जाशील ?" हा लेख वाचावयाला एका विद्यार्थ्याला सांगितलें.

सुरुवातीला मी जरा आळसानें, विमनस्कतेनेंच तो लेख ऐकत होतें. प्रारंभींचें कातकऱ्यांच्या तळाचें वर्णन—"त्यांच्या झोंपड्या, पांचपचवीस कोंबडीं, गाईम्हशी व कालवडी, चोपलेलीं, लांबोळीं पांचसहा कुत्रीं—" या साऱ्या तपशिलांत मला फारशी मौजहि वाटेना कीं त्याचें रहस्यहि ध्यानांत येईना. नेहमीं गोष्टी वाचताना सुबक, नाजुक, रेखीव, संयमित, आकर्षक अशा तऱ्हेच्या 'तंत्रशुद्ध' प्रारंभास चटावलेल्या माझ्या मनाला हें विस्कळित व सकृद्दर्शनीं अर्थशून्य भासणारें वर्णन भारी कंटाळवाणें वाटलें. किंचित् नाखुषीनेंच मीं ऐकत राहिलें—

ग . त . . का . . ळी . . न

'गतकालीन' ह्या सदरात ४० वर्षांपूर्वी माटे–षष्टयब्दिपूर्ती निमित्ताने निघालेल्या गौरवग्रंथातील श्री. म. माटे यांच्या विद्यार्थिनी शांता शेळके यांचा लेख त्यांच्याच परवानगीने पुनर्मुद्रित करीत आहोत.

—आणि मग, कसा कोण जाणें, अचानक त्या वाचनाला, त्या कथेला विलक्षण रंग भरला. बंछीं नावाच्या एका रूपसुन्दर परंतु मलिन, दीनवाण्या भासणाऱ्या बालकानें गोष्टींत अवचित प्रवेश केला. गुडघाभर पाण्यांतून गमतीने पावलें टाकीत असतांच एकदम पृष्ठभागाखालून जाणाऱ्या वेगवान् प्रवाहांत सांपडावें आणि धारेलाईलागून तीव्ररोवर ओढलें जावें तद्वत् त्या गोड, कोवळ्या, अनाथ बन्सीनें आमचीं मनें अकस्मात् वेधून, खेंचून घेतलीं. आम्ही सरसावून बसलों व उत्कंठेनें ऐकूं लागलों. विलक्षण दैवयोगामुळें आईबापांपोरक्या झालेल्या बन्सीच्या मनोवेदनेशीं आम्ही समरसून गेलों ! कातकऱ्यांच्या घरीं दिवस काढणाऱ्या पांढरपेशा 'बंछी'च्या मनांत 'आइ देवकी दाइ यशोदा तिला चिकटतो हा वेडा' या कानफाटधानें गाइलेल्या ओळी ऐकून जी अबोध व आर्त कालवाकालव निर्माण झाली तिची वेदना बन्सीबरोबर आम्हींहि अनुभविली. एके रात्रीं बन्सीं जेव्हां गुपचूप कातकरीतळ सोडून आपल्या मायबापांच्या शोधार्थ अफाट जगांत निघाला तेव्हां आमचीं हृदयेंहि भयानें व उत्कंठेने धडधडत त्याच्या पाठोपाठ गेलीं ! बन्सीच्या मनाची सारी उत्सुकता, त्यांच्या चिमुकल्या हृदयांतले हर्षखेदाचे कल्लोळ, त्याच्या चित्तानें भोगलेल्या दारुण-निराशा हें सारें आम्ही पर्याकुल वृत्तीनें पाहिलें ! आणि अखेर शेवटीं खऱ्या व मानीव अशा उभयहि मातापित्यांना मुकलेला, सर्वार्थानें पोरका झालेला बन्सी सायंकाळच्या वेळीं विषण्ण मनानें एकटाच नदीतीरावर बसून राहिला तेव्हां आमचीं मनेंही तेथें जाऊन पोंचलीं—गोष्ट संपली. अखेरचें वाक्य होते, 'पोरका-पोरका' बन्सी ओढयाच्या कांठीं बसला आहे. एक लांबोळें चोपलेलें रोडकें कुत्रें त्याच्या शेजारीं दोन पाय पुढें पसरून दीनवाणेपणानें त्याच्या तोंडाकडे पहात बसलें आहे. माझ्या गोड बन्सीधर ! तूं आतां कुठें रे जाशील ?

—त्या प्रश्नांतला जिव्हाळा थेट हृदयाला जाऊन भिडला आणि माझ्या डोळ्यांत अचानक पाणी उभें राहिलें ! ती गोष्ट ऐकल्यानंतर एरव्हींच्या वाङ्मयापेक्षां एकदम कांहीं तरी निराळें—अजिबात निराळें ऐकल्यासारखें मला वाटलें. इतरत्र आपण वाचतों त्यापेक्षां हें सारें अजिबात वेगळें—पण अधिक सत्यपूर्ण, अधिक आशयपूर्ण आणि सर्वस्वी जिवंत असें कांहीं तरी आहे याची मला जाणीव झाली. वाचतां वाचतां मन थरथरून जावें. पोटांत चमत्कारिक कालवाकालव व्हावी आणि डोळे पाण्यानें भरून यावेत असा अनुभव मराठी वाङ्मयांत वाचनांत मला फार क्वचित् आला होता. शब्दा-शब्दावरोबर मनाचा ठाव घेणारे लेखक मराठींत आहेत, नाहीं असें नाहीं; पण ते फार थोडे आहेत. प्रा. माटे हे अशा लेखकांतलेच एक आहेत याची त्या दिवशीं प्रथमच मला साक्ष पटली.

कांही दिवसांनीं 'उपेक्षितांचें अंतरंग' हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर मीं तें जेव्हां सबंध वाचून काढलें तेव्हांहि लेखकाच्या थोरवीची हीच जाणीव अधिक स्पष्टत्वानें माझ्या मनावर ठसली. नेहमीं

गतकालीन वाङ्मय
व भाषेचे दर्शन :

उपेक्षितांचे अंतरंग

[सौजन्य : माटे : व्यक्ती आणि वाङ्मय
संपादक – माटे सत्कार समिती, पुणे]

: शान्ता ज. शेळके

शहरांतलें नेटकें, आटोपशीर व मार्दवयुक्त जीवन जगणाराला गर्द अरण्यांतल्या भव्य व उग्र वनश्रीचें दर्शन झाल्यावर जें कांहीं वाटेल तेंच इतर मराठी ललितवाङ्मयाच्या वाचनानंतर या पुस्तकाकडे वळल्यावर वाटतें. 'उपेक्षितांचें अंतरंग' हें पुस्तक नेहमींच्या ठराविक चाकोरीबाहेरचें आहे. मराठी लघुकथांच्या नेहमींच्या तंत्राची कसोटी त्याला लावून भागावयाचें नाहीं पण असें असूनहि इतर तंत्रशुद्ध कथांहून या पुस्तकांतील कथा अधिक चविष्ठ, अधिक वेधक, अधिक परिणामकारक वाटतात याचें कारण त्या सत्यसृष्टीवर, जीवनाच्या खऱ्या अनुभूतीवर आधारलेल्या आहेत, निव्वळ कल्पना-तरंगावर उभारलेली ही स्वप्नसृष्टि नव्हे ! आपल्या सभोंवतीं वावरणाऱ्या परंतु आपल्या दैनंदिन जीवनकक्षेबाहेर पडणाऱ्या व त्यामुळेंच कदाचित् आपल्या उपेक्षेस पात्र झालेल्या अशा व्यक्तींच्या जीवनांतलीं सुखदुःखें, भावभावना, हर्षामर्ष इथें चित्रित केले आहेत; आणि हीं चित्रें विलक्षण अर्थपूर्ण झालीं आहेत याचें कारण त्यांच्याकडे बघणारा जो कथालेखक त्याची दृष्टि तीक्ष्ण, बुद्धि विचिकित्सक, भावना रसिक आणि हृदय सहानुभूतीनें कांठोकांठ भरलेलें आहे.

विशाल जीवनानुभव नसल्यामुळें म्हणा अगर प्रत्यक्ष दीनदरिद्री बहुजनसमाजांत जाऊन मिसळण्याची इच्छा नसल्यामुळें म्हणा आपणांकडे 'जानपद वाङ्मय' म्हणून जें वाङ्मय निर्माण झालें त्यांत मनाला चीड आणण्याइतका कृत्रिमपणा भरलेला आहे. या विधानास कांहीं अपवाद आहेत, नाहीं असें नाहीं; पण सामान्यतः मी म्हणतें तेंच खरें ! जी अनुभूति कधीं आली नाहीं, जें जीवन कधीं पाहिलें नाहीं अगर जीं दृश्यें कधीं स्वप्नांत देखिलीं नाहींत त्यांचें केवळ 'फॅशन' म्हणून वर्णन करण्याच्या नादानें आपल्याकडे बरेंच जानपद गद्य व पद्य वाङ्मय लिहिलें गेलें ! यामुळें शेताच्या बांधावर अगर मोटवणावर प्रणयालाप करणारीं खेडवळ युवकयुवतींचीं जोडपीं वाङ्मयांत पदोपदीं आढळूं लागलीं. जणूं प्रणय हा एकच रस त्यांच्या जीवनांत अक्षय्य पिंगा घालीत असतो. जानपदांच्या प्रणयाचें भेदक दृश्य पहायचे असेल तर उपेक्षितांच्या अंतरंगांतील 'कशाचा संसार !' ही करुण कथा वाचावी. लेखक म्हणतो, "प्रेमी माणूस आपल्याला नाहीं म्हणून पुष्कळ लोक खिन्न असतात, पण प्रेमी माणूस असून प्रेम करावयासच वेळ नाहीं अशी सहस्रावधि लोकांची स्थिति झालेली असते." आणि पोटापाठीमागें लागल्यामुळें बायकोच्या प्रेमळ सहवासालाही वंचित होणारा या कथेचा कथानायक म्हणतो, "कशाचा संसार ! कधीं एका जागीं खुशालीनं वसायला सांपडतंय का गोडीनं बोलायला सांपडतंय ?...सांचीपारनं सडकेनं येतांना तुमचीं बायामानसं अन् बापई फिरायला निघालेलीं दिसतात, ती खुषीनं गोष्टी करत्यास, हवा खात्यात, तवा माझ्या मनांत येतं की आमचं जिनं बगा काय गातीच्या मोलाचं ! देवा, चण्डाळा ! असं का क्येलंस ?"

दीन, दरिद्री, असंस्कृत पण भलाईनें जगणाऱ्या जानपदांच्या जीवनांतला 'प्रणय' हा असा असतो ! हा 'प्रणय' आमच्या 'जानपद' वाङ्मयांत कधींच रंगवला गेला नाहीं ! 'लई, वाईच, मायंदाळ, कसंनुसं' असे चार-दोन फालतू व मामुली खेळवळ शब्द घालावयाचे आणि कथा-कविता लिहून वाचकांपुढें 'जानपदवाङ्मय' ठेवल्याचे भाबडें समाधान मानावयाचे ही हास्यास्पद पण तितकीच संतापजनक प्रथा मात्र पुष्कळ लेखकांनीं अगदीं हिरिरीनें चालवली होती. ब्राह्मणेतर जातींत जन्मलेल्या आणि बरेच दिवस खेड्यांत घालवलेल्या माझ्या मनाला हें सारें वाङ्मय वाचून कांहींतरी चुकल्या चुकल्यासारखें वाटे. खेड्यांत माझी मनोवृत्ति जें निसर्गसौंदर्य पाहते, जो रस चाखते, जी अनुभूति घेऊन सुखावते तिचा आढळ या तथाकथित 'जानपद' वाङ्मयांत मला कुठेंच होत नसे. वाहत्या नदीच्या खळखळणाऱ्या थंड पाण्यांत आणि भांड्याभोंवती फडकें लावून तयार

केलेल्या 'थंड' पाण्यांत जो फरक वाटतो तोच खऱ्याखुऱ्या खेडवळ जीवनांत आणि मराठी वाङ्मयांत दिसून येणाऱ्या त्यांच्या प्रतिबिम्बांत आढळून येई. आणि मग वाटे, हे लेखक स्वतःची व वाचकांची दुहेरी वंचना करीत आहेत, एक तर जें जीवन त्यांच्या संपूर्ण परिचयाचें आहे तिकडे दुर्लक्ष करून त्या जीवनास हे लोक अन्याय करीत आहेत आणि दुसरें म्हणजे जें जीवन त्यांनीं अजिबात उपभोगलें नाहीं त्याचीं कृत्रिम, अनुकरणात्मक चित्रें रंगवून त्या जीवनासहि ते भयंकर अन्याय करीत आहेत. त्यामुळें त्यांच्या वाङ्मयांत धड सुसंस्कृत नागर जीवनाचो अभिजात ऐटहि दिसत नाहीं वा खडकाळ ग्रामीण जीवनांतला निरागस राकटपणाही पाहावयास मिळत नाहीं—

—अशा विविध विचारांनी खिन्न झालेल्या माझ्या मनाला 'उपेक्षितांचें अंतरंग' वाचतांना अननुभूत समाधान लाभलें. खास आपल्या वातावरणांत जाऊन हिंडूनफिरून आल्याचा आनंद वाटला, 'जें इतरत्र आढळत नाहीं तें येथें आहे,' असे वाटून भूकेला जीव तृप्त झाला. ग्रामीण जीवनाची इतकीं पूर्ण, इतकीं रेखीव आणि इतकीं जिवन्त चित्रें मराठी वाङ्मयांत अन्यत्र अगदी क्वचितच आढळतील. महार, कातकरी, रामोशी, मांग, शाण्णव कुळीचे मराठे–खरोखर मूठभर पांढरपेशा 'वाऱ्याब्राम्हनां'चा वर्ग सोडला तर महाराष्ट्रभर जो बहुजनसमाज पसरला आहे तो या महारमांगांचा, कातकरी–मराठ्यांचा, भिल्ल रामोशांचांच आहे. परंतु मराठी वाङ्मयानें आजवर या विस्तीर्ण समाजाची दखल घेतली नाहीं. प्रस्तुत पुस्तकांत मात्र या उपेक्षित समाजांतलेच नायक व नायिका घेऊन त्यांच्या भोंवतीं कथासूत्र गुंफलें आहे. आणि या नायकनायिकांचीं स्वभावचित्रें बघतां सुंदर कॉलेजकुमारी अगर क्रिकेट खेळणारा कॉलेजकुमार यापेक्षां कथेंतील वर्ण्यविषय व्हायला याची लायकी लेशभरहि कमी नाहीं असें दिसून येतें ! स्नेह, प्रेम, द्वेष, क्रोध, महत्त्वाकांक्षा विनोद-बुद्धि असे मानवी जीवनाला आणि वाङ्मयालाहि लज्जत आणणारे हे सर्व गुण आपणां पांढरपेशां इतक्याच प्रकर्षानें यांच्या जवळहि आहेत. आणि परिसाच्या स्पर्शानें लोखंडाच्या तुकड्याचें उज्ज्वल सुवर्ण व्हावें तद्वत् लेखकाच्या प्रतिभावन्त लेखणीचा स्पर्श होतांच या दीन, दरिद्री, अज्ञानी व भाबड्या माणसांच्या स्वभावचित्रांत अपूर्व रंग भरला आणि त्यात अतीव आकर्षकता निर्माण झाली.

या आकर्षकतेचें दुसरे एक कारण म्हणजे या व्यक्तीविषयी लेखकास वाटणारी अपार सहानुभूति! ही सहानुभूति जानपद लोकांत असणाऱ्या भलेपणामुळें व माणुसकीमुळेंच वाटूं शकते हें उघड आहे. खेड्यांतील लोकांचा बाह्य मलिनपणा सोडायला तर लेखकाच्याच भाषेंत सांगायचें म्हणजे–"त्याच्या मळकट पैरणीच्या आड स्वच्छ अन्तःकरणाची भलाई नांदते आणि डोक्यास गुंडाळलेल्या त्यांच्या भोंगळ मुंडाशाखालीं समंजस बुद्धीची ऋजुता वागत असते." याच भलाईनें व ऋजुतेने लेखकाचे मन या हीनदीन वर्गाकडे वेधलें गेले आणि त्यानें त्या वर्गाचीं चित्रें सहानुभूतिपूर्ण कलात्मकतेनें रेखाटून आपणांपुढें ठेवलीं.

या चित्रांपैकी 'कृष्णाकांठचा रामवंशी' 'तारळखोऱ्यातील पिऱ्या' व 'सतीचें शस्त्र' यांमधील सती यांची चित्रें विलक्षण भेदक व आकर्षक वठलीं आहेत. शूर, बळकट, जातिवन्त, जितका क्रूर तितका प्रेमळ असा रामोशांचा नाईक सत्या आपणांस अगदी मोहून टाकतो. जात दरोडेखोराची असली तरी सत्या हा शब्दाचा सच्चा आहे, खाल्ल्या मिठाला जागणारा आहे, पांढरपेशांचा भित्रा लाचारपणा व दुर्बलतेंतूनच उद्भवणारा क्षुद्र हलकटपणा त्यांच्या जवळ औषधालाहि सांपडायचा नाहीं. तो बलिष्ठांचा शत्रू पण दुर्बलांचा, निरपराध्यांचा त्राता व रक्षणकर्ता आहे. दूधभात जेवूं घालणाऱ्या नावित्रीबाईला त्यानें आपली 'बहीन' मानली, भुकेनें कळजलेल्या गरिबगुरिबांसाठीं

त्यानें बाजार मोकळे केले आणि शाळेंतल्या लहान पोरांना वत्सलतेनें मिठाई चारली. यल्लयासारखे इमानी अनुयायी त्याला लाभले होते आणि मनगटांतल्या अजिंक्य सामर्थ्याच्या जोरावर तो निर्धास्त होता. पण–खुद्द त्याच्या प्रेयसीनेंच अखेर त्याच्याशीं बेइमानी केली आणि हा सच्चा वीर पोलिसांच्या हातीं गवसला ! त्याची अखेरची कैफियत ऐकण्याजोगी आहे. जातीचा रामोशी असला तरी त्याचीसुद्धां एक विशिष्ट कुलपरंपरा आहे व तिचा त्याला अभिमानहि आहे. तो पोलिसांना म्हणतो, "साहेब !' चोर कोन ? आम्ही प्रभु रामचंद्राचे चाकर हावो. आमचा तुंगभद्रंकडं राजा हाय. पण आमाला अशी दशा आली. आमी कुनाचा इस्वासघात केलाय् का ? कुनाला गरिबाला नाडलंय् कां ? आमाला जवळ करतील त्यांच्या जिवासाठीं आमी जीव देऊं. आमी मर्द रामवंशी आहोत... कंधीं ना कंदी काळ फिरेल आन् आमाला बरं दिस येत्याल !"

–हें त्याचें भाषण ऐकून कुणाचें मन द्रवणार नाहीं ? सत्याप्रमाणेंच पिऱ्या मांगहि दरोडे घालणारा परंतु अत्यंत प्रामाणिक; ईश्वरनिष्ठ व हाडाचा सच्चा माणूस आहे. अंगात मुसमुसणारी रग आणि अशिक्षितपणामुळें असलेली बऱ्यावाइटाबद्दलची अविवेकिता यांच्या मिलाफानें तो दरोडे-खोर, पुण्ड बनला तरी त्याचे हृदय खऱ्या मर्दाचें आहे. खंडोबाबद्दल त्याला वाटणारी भक्ति अमर्याद होती. त्याची बायको जेव्हां पोलिसांच्या भीतीमुळें त्याला खंडोबाच्या जत्रेला जाण्याच्या विचारापासून परावृत्त करूं बघते तेव्हां तो गहिंवरून बोलतो, "तूं अशी बोलतियास चंद्राबाई ? तूं अशी कशी बोलतियास ?...वर्सातून एकदां खंडुचं दर्सान् घडतंया त्यवडं बी सोडलं तर चोरी-दरुडयापलिकडं काय रायलं ?" या भावडया परंतु शूर गुण्डाचा फायदा दुबळया पांढरपेशांनी घेतला व त्याला हुलीवर घालून चोरीदरोडयास प्रवृत्त केलें. अखेर शेवटीं पिऱ्या मांग जेव्हां तळतळून आपली कैफियत देतो तेव्हां डोळयास पाणी येतें ! पिऱ्या म्हणतो, "–तालेवारांनी सांगितलं म्हूनशान् क्येलं. पन् त्येंचा जरीचा मंदिल त्येंच्या टकुरीला राह्यला, त्येंची कंटी त्येंच्या गळयांत ऱ्हाइली अन् माझ्या हातापायात ह्ये बेडया आल्या बगा–" पिऱ्यापेक्षां पिऱ्याला हुलीवर घालणारे 'तालेवार' अधिक गुन्हेगार नव्हेत काय ?

पतीच्या मरणानंतर त्याचा जोडा जपून ठेवणारी, व त्याच्या जोरावर दुष्टांपासून व हलकटां-पासून आपलें पावित्र्य सांभाळणारी सई, माथ्यावरच्या ओझ्याप्रमाणें गरिबीचे ओझेंहि हंसतमुखानें तोलून धरणारी दरिद्री पण समाधानी वृत्तीची हेलकरीण कोयना, अत्यंत सभ्य व प्रेमळ असा तबा महार, दारिद्र्यामुळेंच चर्येवर हास्याची रेषाहि उमटवूं न देणारा स्थितप्रज्ञ लिफ्टमन्, पदोपदीं अपमान, अवहेलना व उपेक्षा सोसूनहि सौजन्याच्या सद्‌सद्विवेकबुद्धीच्या साऱ्या सीमा सांभाळणारा 'अस्पृष्ट' पिऱ्या, धनलोभानें पोटची पोरें बुरुजांत घालणारा पण ऐनवेळी वात्सल्यप्रेमानें काळीज फुटून मेलेला बहिरनाक–ही सारीं व्यक्तिचित्रें आपापल्यापरी अत्यंत रेखीव वठलीं आहेत. आपण पांढरपेशे लोक अत्यंत मिळमिळीत झालों आहोंत. आपले हर्षखेद, कामक्रोध सारेच जणूं विझल्या-सारखे, सौम्य असे असतात. कधी आपण उत्कटतेनें प्रेम करणार नाहीं की कधीं उत्कटतेनें कुणाचा द्वेष करणार नाहीं. आपले भाव सौम्य आणि त्यांच्या आविष्काराची आपली पद्धति त्याहून सौम्य व नेमस्त ! त्यामुळें या जानपदांच्या जीवनांतले झंझावातासारखे जोरकस भावनाविष्कार बघून आपणांस भय वाटतें. येथें पिऱ्या आणि त्याची पत्नी चंद्राबाई हे उजाड माळावर निळया आभा-ळाच्या चांदण्याखाली परस्परसहवासांत दिवस व रात्री घालवतात; आपणांस सत्यानें पत्नीपदावर न चढविता केवळ 'कडू रकेली' म्हणून ठेवलें या अपमानाच्या जाणिवेनें बेहोष होऊन वेडावलेली

रकमी पोलिसांना फितूर होते व सत्याचें वाटोळें करते; अगर बहिरनाक महार पैशासाठी पोटचीं पोरें बळी द्यायला तयार होतो—ही वृत्तींची तीव्रता आपली नव्हे, ती जानपदांचीच आहे. आपणांस ती अतिरंजित वाटली तरी खरोखरी ती वास्तवच आहे आणि या वास्तवतेमुळेंच वरील स्वभावचित्रें अत्यंत उत्कट व आकर्षक वठलीं आहेत.

आतांपर्यंतच्या एकंदर विवेचनावरून 'उपेक्षितांच्या अंतरंगां'त केवळ ग्रामीण जीवनाचींच चित्रें रंगवलीं आहेत असा जर कुणी समज करून घेईल तर तो मात्र खरा ठरणार नाहीं! तसें म्हटलें तर या पुस्तकांत अगदीं ग्रामीण जीवनावर आधारलेल्या अशा कथा फार तर सहासात—म्हणजे एकंदर कथासंख्येच्या निम्म्यानेंच आहेत. उरलेल्या कथांतून जीवनाच्या भिन्नभिन्न परिसरांतील व्यक्ति घेऊन त्यांच्याभोंवतीं कथासूत्र गुंफलें आहे. या व्यक्ती परस्परांपासून अतिशयच भिन्न क्षेत्रांत वावरणाऱ्या व भिन्न अभिरुचींच्या अशा आहेत. येथें ब्राह्मणेतर वर्गांतल्या मोलकरणी—सई शेजारी कृष्णाकांठच्या नेमनिष्ठ ब्राह्मण घराण्यांतली मर्यादशील सून सावित्री दिसून येईल. धुंद, बळकट व बेदरकार अशा सत्याविऱ्यांसारख्या दरोडेखोराशेजारीच विठ्ठलाचा नामघोष करून इंद्रायणीच्या वाळवंटांत बेहोष होऊन नाचणारा तो सुविख्यात देहूचा वाणी आढळेल अगर आईबापांच्या वत्सल मायेला मुकलेल्या वन्सीजवळच खुद्द आईबापांनींच पैशाच्या लोभानें बुरुजांत पुरलेलीं नाथनाक-देवकाईसारखीं अजाण, निष्पाप अर्भकेंहि दिसून येतील! कुठें महार तबाची मंजुळा तर कुठें ब्राह्मण प्रभाकराची सावित्री! कुठें दरोडेखोर सत्याविऱ्या तर कुठें भगवद्भक्त संत तुकाराम! कुठें पुरंदरचा नामा तर कुठें मुंबईच्या दवाखान्यांतला लिफ्टमन्! परंतु इतर बाबतींत या लोकांत कितीहि फरक असला तरी एका बाबतींत मात्र त्या सर्वांत साम्य आहे. ते सारेजण 'उपेक्षित' आहेत वंचित आहेत—दैवानें म्हणा, समाजानें म्हणा, परिस्थितीनें म्हणा अगर खुद्द जिवींच्या जिवलगांनीं म्हणाऱ्या अभाग्यांची उपेक्षा केली आहे, दारुण वंचना केली आहे. या एकाच साम्यानें त्या साऱ्यांतून एक सूत्र ओंवलेलें आहे. त्यांच्या भिन्नभिन्न जीवनांतून उपेक्षेचा एकच एक खिन्नकरुण सूर सारखा चाललेला आहे आणि म्हणूनच लेखकानें त्या साऱ्यांना एकत्र गोंवून टाकून त्यांच्या उपेक्षेचें, त्यांच्या मनोवेदनांचें त्यांच्या दुर्दैवाचें भेदक चित्र वाचकांपुढें उभें केलें आहे. यामुळेंच सर्व पुस्तकासहि एक प्रकारची संगति व सूत्रबद्धता लाभली आहे.

या कथांचा परामर्श घेतांना एक विचार मात्र मनांत चमकून जातो. या सर्व व्यक्तींकडे लेखकांचें लक्ष आधीं वळलें कसें? मुंबईचा लिफ्टमन् आम्ही बघतों, समाजाच्या भरचौकांतून अब्रू सांभाळीत जाणारी विधवा पतिव्रता सई आम्हींहि पाहिलेली असते, पुरंदरचा नामा अगर मंडईतली हेलकरीण कोयनाबाई आम्हांलाहि पावलोपावलीं भेटत असतात. पण आमचें लक्ष तिकडें कसें वेधत नाहीं? आणि या विशिष्ट लेखकालाच तिकडे पहायचें कसें सुचलें?

या प्रश्नाचें उत्तर पुस्तकांतच एका ठिकाणीं लेखकानें देऊन टाकलें आहे. हास्याचा शोध या लेखांत लेखक म्हणतो, "मला अशीं चमत्कारिक खोड लागली आहे कीं इतरांच्या संगतींत वर मान करून चाललों असतांना तो जो आंधळा एकतारीवाला फुटपाथवर बसलेला असेल त्याच्याकडेच लक्ष जावयाचें! शेकडों हजारों श्रीमंत, देखणीं, नटलेलीं—सजलेलीं माणसें भोंवतालीं चाललीं असतां माझी दृष्टि चोरून त्या अंधाकडे जाते. त्यानें तें रेंकत म्हटलेलें 'तुका म्हणे' ऐकलें म्हणजे मनाची कालवाकालव होते व तुकारामाचें म्हणणें काय आहे तें ऐकावयाची कुणाची तयारी नाहीं हें पाहून वाईट वाटतें" लेखकाच्या मनाची विशिष्ट ठेवण ही अशी असल्यामुळें सर्वसाधारण मराठी

ललितलेखकांच्या कलावंत लेखणीनें अनाकर्षक म्हणून दूर लोटलेले विषय लेखकानें निवडले व आपल्या सहृदय प्रतिभेनें त्यावर 'वाङ्मया 'चें सुंदर लेणें चढवलें ! या पुस्तकांतल्या नायकनायिका या दैवानें, समाजानें परिस्थितीनें उपेक्षिलेल्या, वंचविलेल्या आहेंत असें मीं वर म्हटलें. त्या विधानात किंचित् उणीव राहिली आहे. दैव, समाज अगर परिस्थिति यांबरोबरच आमच्या ललितलेखकांनीहि या बाह्यत: मलिन, अमंगळ, दीनवाण्या, अज्ञानीं अशा दिसणाऱ्या माणसांची उपेक्षा केली आहे. वस्तुत: आमच्या ललितवाङ्मयांत हल्लीं जो विशिष्ट वर्ग वर्णनविषय झालेला आहे. तो समाजात संख्येने फार थोडा आहे. या सधन, विलासी आणि आपल्याच भावभावनांचें चोज पुरवणाऱ्या मूठभर वर्गाबाहेर दारिद्र्य, अज्ञान आणि भोळेपणा यांनी वेढलेला जो विस्तृत बहुजनसमाज आहे त्यालाच खरें म्हटलें तर ललितलेखकांनीं अधिक प्रामुख्यानें आपला वर्णनविषय बनवावयास पाहिजे; शहराची सीमा सोडून आपण बाहेर पडलों कीं पदोपदीं हेच दीन लोक आपणांस भेटतात. परंतु आपलें दुर्दैव असें कीं स्वत:च्या पांढरपेशेपणाला यांच्या संगतीने मलिनता येईल की काय भीतीनें आम्ही जीवनांत आणि वाङ्मयांतहि या लोकांना स्वत:पासून फार दूर ठेवलें आणि कुठल्या तरी आभासमय काल्पनिक सृष्टीचें वर्णन करण्यांतच आम्ही रंगून गेलों. यामुळें कृत्रिम तें आम्हांस वास्तव वाटूं लागले आणि जें खरेंखुरें, वास्तव त्याचा मात्र अर्थ कळेनासा झाला !

या पुस्तकांत या उपेक्षितांचे जीवन लेखकानें सहानुभूतिपूर्ण कलात्मकतेनें रेखाटलें आहे. यांतील कांहीं चित्रे आपणांस किंचित् अद्‌भुत वाटतील, कांही आलेखनांचा अर्थहि आपणास कळणार नाही. पण तसें झाल्यास तो दोष आपलाच आहे, लेखकाचा नव्हे ! या पुस्तकांतलीं सारीं स्वभावचित्रें, साऱ्या घटना, वास्तवावर आधारलेल्या आहेत, "या गोष्टींना वास्तवाची भूमिका आहे." असें लेखकानें प्रस्तावनेंत म्हटलें आहे आणि सत्य हें कधीं कधीं कल्पनेपेक्षां अद्‌भुतरम्य असतें या न्यायानें 'तथाकथित' लघुकथांपेक्षां या कथांतल्या घटना आपणांस अधिक अद्‌भुतरम्य वैचित्र्यपूर्ण वाटतात. आपल्या संग्रहीं असलेलीं अनेक लहानसहान वृत्तें, स्मृतींत दडलेले बारीक-बारीक प्रसंग लेखकानें बाहेर काढले आणि ते सुंदर, साकार व सजीव स्वरूपांत वाचकांपुढें उभे केले ! या लेखारंभीं मीं जो उतारा दिला आहे त्यांत प्रा. माटे यांनीं मराठी ललितलेखकांना एक अतिशय मोलाची सूचना देऊन मार्गदर्शन केलें आहे असें मला वाटतें. पांढरपेशा वर्गांत जन्मलेल्या व वाढलेल्या पांढरपेशा लेखकांना आपला पोषाख धारण करणाऱ्या, आपलीं ढब, रीतभात आचरणात आणणाऱ्या, आपली शुद्ध व स्वच्छ भाषा बोलणाऱ्या सजातीय पांढरपेशांबद्दलच काय तें कुतूहल वाटतें, त्यांच्या विषयींच काय तो जिव्हाळा वाटतो आणि त्यांचेंच चित्रण कथाकविता-कादंबऱ्यांतून करावेंसें वाटतें. पण ही आकुंचित कोंडी फोडून जर मराठी लेखक बाहेर पडेल तर तेथें त्याला हवे तितकें आकर्षक जीवन रंगवावयास सांपडेल. या जीवनाचा बाह्य परिवेष दीनमलिन अमंगळ असला तरी त्याच्या आंत प्रीतीचे जिवंत झरे खळाळत आहेत, विशाल सहानुभूतीचीं सरोवरें तुडुंब भरली आहेत आणि या सर्व देखाव्यावर 'माणुसकी 'च्या चंद्राची शीतल ज्योत्स्ना अखंड प्रकाशत आहे असें स्पष्टपणें दिसून येईल. या जीवनाकडे मराठी लेखकांनीं आजवर दुर्लक्ष केलें हें त्यांचें व मराठी वाचकांचें दुर्दैव ! 'उपेक्षितांच्या अंतरंगांत' हें जीवन लेखकानें रंगविलें आहे. मूळ घटनेपुरती वास्तवाची ही उसनवारी सोडली तर पुढें मात्र चहूंकडे लेखकाचें कलात्मक व मनोज्ञ कथनकौशल्य दिसून येतें. ग्रामीण जीवनावरील कथाइतक्याच नागर जीवनावरील कथाहि सुंदर उतरल्या आहेत. या कथांत 'सावित्री मुक्यानेंच मेली' ही कथा, मला वाटतें सर्वोत्कृष्ट ठरेल. वासुदेव बळवंत फडक्यांच्या बंडांत सामील

झालेल्या व काळधापाण्यावर गेलेल्या एका ब्राह्मण तरुणाच्या नवोढा पत्नीची ही कथा अत्यंत हृदयद्रावक आहे. पद्माकराच्या निर्गमनानंतर सावित्रीने घालवलेलें नेमनिष्ठ आयुष्य, आज ना उद्यां पति परत येईल ही खात्री बाळगून तिनें चालवलेली अखंडित तपश्चर्या आणि शेवटीं ऐन मीलनाच्या घडीला प्लेगनें तिला आलेला अचानक मृत्यू—हें सारें वाचीत असतां आपले डोळे क्षणोक्षणीं ओले होतात. जन्मभर वंचित झालेली अभागी सावित्री अखेर मुक्यानेंच मेली! तिचा पति तिच्या चितेजवळ म्हणतो; "सती, ए सावित्री सती, ए माझें सावित्री सती, तूं माझी अन् मी तुझा आहें. आता नसली तरी तुझी माझी कुठं तरी गांठ पडेल...सावित्री, एक शब्द जरी माझ्याशीं बोलली असतीस तरी वीस वर्षांचं माझं दुःख गेलं असतं, सगळ्या जन्मांत तूं आणि मी एकदाहि प्रेमळपणानं बोललों नाहीं, कारण नशिबानंच आपली उपेक्षा केली!"

वंचित प्रणयाचें इतकें हृदयस्पर्शी व उत्कट चित्र मराठी वाङ्मयांत अन्यत्र सांपडणें कठीण आहे. या कथेंतला कारुण्याचा आविष्कार वंग साहित्यिक, रवींद्रनाथ ठाकूर अगर शरच्चंद्र चतर्जी यांच्या तोडीचा वाटतो. 'सावित्री मुक्यानेंच मेली' ही कथा या पुस्तकांतीलच नव्हे तर सर्व मराठी वाङ्मयातील अत्युत्कृष्ट कथांपैकीं एक आहे.

वातावरणाच्या उत्कृष्ट परिपोषासाठीं 'नायनाक आणि देवकाई यांची काळझोप' ही कथा उल्लेखनीय आहे. नरबली देण्याची कल्पनाच आधीं भयानक, त्यांतून वातावरणाचें हुबेहुब चित्रण, महार समाजाची भाषाशैली आणि अज्ञ बहुजन समाजाच्या मनोवृत्तीचें अचूक रेखन यांमुळें ही कथाही अप्रतिम वठली आहे; वरील दोन्हीं कथांतले उतारे देणे म्हणजे त्यांच्या सर्वांगीण सौंदर्याला अन्याय करण्यासारखें आहे. या सरस कथा मुळांतून संपूर्ण वाचावयास हव्यात! 'माझें मनोराज्य' व 'इंद्रायणीच्या वाळवंटांत'च येथें खुद्द लेखकाच्या मनाचे कांहीं मधुर असे विशेष पहांवयाला मिळतात. इंद्रायणीच्या वाळवंटांतील तुकयाच्या मानसिक उत्क्रांतीचें केलेलें विवेचन फारच मार्मिक व अर्थपूर्ण आहे.

प्रा. माटे हे मराठींतले एक उत्कृष्ट शैलीकार लेखक आहेत, हे आतां नव्यानें सांगण्याची आवश्यकता नाहीं. परंतु तरीदेखील या पुस्तकांतली भाषाशैली विलक्षणच हृदयंगम आहे व पुस्तकाची बरीच आकर्षकता या भाषाशैलीमुळें आली आहे हें सांगणें मात्र आवश्यक आहे. लहान लहान, जोरकस वाक्यें जानपद शब्दांचा अर्थपूर्ण व उचित उपयोग आणि रसाळ व वेधक वर्णनें हीं या भाषेचीं प्रमुख अंगें होत. भाषासौंदर्याच्या दृष्टीनें 'सावित्री मुक्यानेंच मेली' व 'नायनाक आणि देवकाई यांची काळझोप' या दोन्ही कथा अप्रतिम आहेत. वर्णनशैलीच्या दृष्टीनें सत्या—पिऱ्याची शब्दचित्रें, छोट्या बन्सीच्या मनोवेदनांचे वर्णन, खंडोबाच्या जत्रेचें वर्णन—सर्व पुस्तकांतच ठिकठिकाणी अशीं वर्णनें वैपुल्यानें पसरलीं आहेत. कांहीं वाक्यें येथें उद्धृत करण्याचा मोह अनावर होतो.

"—उच्चतर परिवेषांत, सौंदर्यसामीप्यांत, वैभवाच्या प्रसन्नतेंत थोडें तरी शिरावें ही माणसाच्या मनाची स्वाभाविक प्रवृत्ति असते."

"—झोंपड्यांत राहणारे गरीब जर तेजस्वी होतील तर ते श्रीमंतांच्या हवेल्यांपेक्षा ताठर होतील व श्रीमंत जर रगेलच राहिले तर त्यांच्या माना गरिबांच्या झोपडीपेक्षां खालीं वाकतील."

"—प्रेमळ साहचर्याचा, संगतीचा उन्हाळा असतांनासुद्धां परस्परांवर निष्ठा ठेवून माणसें कशी सुखोत्पत्ति करून घेतात हें पाहिलें म्हणजे त्यांची निष्ठा वाङ्मयांत स्थिर होण्यास जास्त लायक आहे असें वाटतें."

एका लहानशा वाक्यांतून विस्तृत अर्थ व्यक्त करण्याची लेखकाची हातोटी विलक्षण आहे, पुढील लहान पण अर्थगर्भ वाक्यें पहावींत : रसपरिपोष, अर्थवत्ता आणि संयम या सर्व कसोट्यांस तीं पूर्णतः उतरतात. 'बन्सीनें भयानें घुटका गिळला' 'संकटाच्या प्रसंगीं सर्वांचेंच दुबळेपण उघसून वर येतें 'दातृत्व हाहि एक भोगच आहे' 'बन्सीच्या चित्ताचा कांदा उन्मळून बाहेर आला.' 'चिणचिण करीत सगळा बाजार मागें–पुढें मागें. पुढें रेलत होता' 'सृष्टिव्यापार आणि मनोव्यापार एका लयींत आले' 'पद्माकर एकाद्या गुराप्रमाणें ओरडला व भुईवर कोसळला' अशीं एक ना दोन, किती वाक्यें द्यावींत ? जर्वर, कालवा, थापडवाईक, तालेवार, इत्यादि अस्सल मराठी पण अवापरामुळें आपणांस अपरिचित वाटणारे शब्द तर पुस्तकांत पदोपदीं विखुरले आहेत.

–प्रस्तावनेंत 'लघुकथेचें तंत्र आपणांस कळत नाहीं' असें लेखकानें म्हटलें आहे परंतु सखोल जीवनानुभव, जातिवंत सहृदयतां आणि अभिजात रसिकता यांना कलेचें तंत्र शिकून घ्यावें लागत नाहीं. या तीन गुणांचा मिलाफ झाला तर खरें तंत्र आपोआप त्यांतूनच विकसित होत असतें.

आणि 'उपेक्षितांचें अंतरंग' हें अशा तंत्रशुद्धतेचें उत्कृष्ट उदाहरण नाहीं काय ? ■

(लेखिकेच्या परवानगीने पुनर्मुद्रित)

अनुक्रमणिका

पु. य. देशपांडे यांचा मराठी वाङ्मयाच्या सर्वसामान्य वाचकांना मुख्यतः परिचय आहे तो एक कादंबरीकार म्हणूनच होय. आधुनिक मराठी कादंबरी वाङ्मयाच्या कक्षा देशपांड्यांनी विस्तृत केल्या, मराठी कादंबरीला सूक्ष्मतेचे व काव्यमयतेचे नवे परिमाण तसेच वैचारिकतेचेही एक परिमाण त्यांनी बहाल केले आहे, या महत्वाच्या घटनेची दखल घ्यावयास हवी. पण फडके, खांडेकर व माडखोलकर या त्यांच्या साधारणपणे समकालीन कादंबरीकारांची आवर्जून दखल घेणाऱ्या कित्येक वाङ्मयेतिहासकारांनी पु. य. देशपांड्यांची उपेक्षाच केल्याचे प्रत्ययास येते.

पु. य. देशपांडे यांच्या समग्र कादंबऱ्यांचा साकल्याने अभ्यास केल्यावर त्यांच्या लेखनाचे काही ठळक विशेष नजरेत भरतात. विविध विचारप्रणालींचा गाढा व्यासंग व अंतर्मुख वृत्ती यामुळे पु. य. देशपांडे ह्यांनी १९२७ साली लिहिलेल्या 'बंधनाच्या पलीकडे' या त्यांच्या पहिल्याच कादंबरीतून लेखकाला अभिप्रेत असणारा तात्विक आशय व त्याला अनुरूप अशी अभिव्यक्ती यांचे मनोज्ञ दर्शन घडते.

त्यांची ही पहिलीच कादंबरी तत्वचर्चाप्रधान कादंबऱ्यांच्या वर्गातील आहे मध्यमवर्गीय समाजातील परंपरागत सनातन रूढी व इंग्रजी शिक्षण आणि वाङ्मय यांच्या प्रभावामुळे अंगिकारलेले प्रगत आधुनिक विचार यामधील संघर्ष प्रस्तुत कादंबरीत परिणामकारकपणे रंगविला आहे.

या कादंबरीचे कथानक पात्रांच्या माध्यमातून व तत्वचर्चेच्या स्वरूपात परिणामकारकपणे रंगविले आहे. त्यामुळे मराठी कादंबरी वाङ्मयात वैचारिकतेचा जो प्रवाह वा. म. जोशींनी रूढ केला, डॉ. केतकरांमुळे ज्याला प्रतिष्ठा प्राप्त झाली त्याच विचारप्रवाहाला पु. य. देशपांडे यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने परिपुष्ट केले आहे असे जाणवते.

'बंधनाच्या पलीकडे' या कादंबरीत 'एका व्यक्तीच्या सुखदुःखाची कहाणी' असे वास्तवतेचे बरेचसे व्यक्तीनिष्ठ रूप आढळते. एका प्रतिष्ठित कुटुंबातील मुलगा प्रभाकर व वेश्याकन्या मैना यांच्यातील प्रेमाची ही कथा आहे. त्यांच्या प्रेमविवाहाच्या निमित्ताने काही महत्वाच्या सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह प्रस्तुत कादंबरीकाराने केला आहे. पण कथानिवेदनात आवश्यक अशी पार्श्वभूमी निर्माण करण्याऐवजी फक्त प्रभाकर व मैना यांच्या जीवनचित्रणातून, त्यांच्या मनोविश्लेपणातून हे कथानक गुंफले आहे. प्रभाकरच्या आई-वडिलांच्या वागण्या बोलण्यातून तत्कालीन समाजातील प्रचलित समजुती, चालीरीती, विचार-विकार यांचे प्रत्ययकारी चित्रण लेखकाने केले आहे.

या प्रकारे पु. य. देशपांडे यांची व्यक्तिनिष्ठ म्हणविली जाणारी कादंबरी व्यक्तीमार्फत कुटुंबाकडे व कुटुंबामार्फत समाजाकडे अप्रत्यक्ष स्वरूपात जाऊन पोचलेली दिसते.

पु. य. देशपांडे यांच्या कादंबऱ्यांमधील काव्यात्म तत्त्वचिंतन

: प्रज्ञा आपटे

अनुक्रमणिका

लेखकाचे लक्ष व्यक्तीवरच केंद्रित होण्याचे एक प्रमुख कारण म्हणजे त्या काळातील जागतिक परिस्थिती होय. नुकत्याच होऊन गेलेल्या महायुद्धामुळे मनुष्याच्या मनाला एक प्रकारची उदासीनता आली होती. त्यामुळे वाङ्मयातूनही व्यक्तीचे भव्य पराक्रम, धैर्य इत्यादींचा आविष्कार होण्याऐवजी मानवी मनातील संघर्षालाच लेखनात अधिक महत्त्व प्राप्त होऊ लागले होते. या तत्कालीन परिस्थितीचे प्रतिबिंबच प्रभाकर व मैना मनोभूमिकेतून नितळपणे न्याहाळता येते.

प्रभाकर व मैना यांची त्याकाळातील विवाह–पद्धतीविषयीची व व्यक्तिस्वातंत्र्याविषयीची अत्याधुनिक मते, त्यांचा इंग्रजी काव्याचा प्रगाढ अभ्यास आणि समाज व कुटुंब यांच्याविरुद्ध बंड करण्याची धिटाई या व्यतिरिक्त प्रस्तुत व्यक्तिरेखांच्या बाह्य स्वरूपाचे कोणतेही बारकावे लेखकाने विशेषसे रंगविलेले आढळत नाहीत. कारण ही पात्रे तत्कालीन समाजाचे मन आविष्कृत करणारी प्रतीकात्मक पात्रे आहेत.

या कादंबरीच्या कथानिवेदनासाठी लेखकाने पत्रात्मक पद्धतीचा संमिश्र उपयोग केला असल्यामुळे प्रत्येक पात्राला आपापली भूमिका स्वतंत्रपणे विशद करण्याची संधी मिळाली आहे. प्रभाकरला आपल्या पित्यासमोर विवाहविषयक जे विचार प्रत्यक्षात बोलून दाखवणे अवघड झाले असते असे अत्यंत नाजूक विषयावरील विचार त्याने पत्राच्या माध्यमातूनच वडिलांना कळवले आहेत.

'बंधनाच्या पलीकडे'मधील प्रभाकर, मैना, बाबासाहेब व आई या चारच प्रमुख व्यक्तिरेखा त्यांच्या विशिष्ट रंगरूपामुळे नव्हे तर त्यांच्या विचारपद्धतीमुळे व ध्येयवादित्वामुळे दीर्घकाळ स्मरणात राहण्यासारख्या उतरल्या आहेत. याचाच नेमका अर्थ असा होतो की लेखकाच्या वैचारिकतेमुळे ही कादंबरी लक्षवेधक झाली आहे.

प्रस्तुत कादंबरीतील भिन्न भिन्न व्यक्तिरेखांच्या माध्यमातून लेखक एका विशिष्ट समाजाचे व त्यांच्या मानसिक स्थित्यंतराचे दर्शन घडवीत असल्याचा अनुभव चिकित्सक वाचकांना येत राहतो. त्यामुळे १९२७ च्या सुमाराचे आपल्या महाराष्ट्रीय समाजातील सुशिक्षित मध्यमवर्गीय कुटुंबातील अनेक ताण व तणाव यांचे प्रत्ययकारी चित्रण 'बंधनाच्या पलीकडे' या कादंबरीत बघायला मिळते. एका परीने आपला परंपराप्रिय भारतीय समाज व नव्या – जाणिवांच्या स्वरूपात आकारास येणारे मानवाचे – व्यक्तिगत निर्णय स्वातंत्र्य यांमधील संघर्षाचे 'बंधनाच्या पलीकडे' या कादंबरीत व्यक्त झालेले स्वरूप महत्वाचे वाटते.

आत्मनिवेदन पद्धतीचा यशस्वीपणे उपयोग करून लिहिलेल्या त्यांच्या दोन कादंबऱ्या त्या काळात विशेष गाजल्या. त्यांपैकी १९३१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या– 'सुकलेले फूल' या कादंबरीत बालविधवा कृष्णा हिची रम्य आत्मकथा आहे तर १९३३ साली प्रसिद्ध झालेल्या 'सदाफुली'मधील तनूने त्यांच्या आत्मनिवेदनातून स्वतःच्या व तिमाच्या मनातील काही गूढ भावना प्रत्ययकारीपणे उलगडून दाखवल्या आहेत.

आपल्या सभोवतालच्या जगातील चाकोरीबद्ध रूढीपेक्षा वेगळी व वासनायुक्त प्रेमापेक्षा न्यारी अशी, कृष्णा आणि स्वैर भासणारा दिवाकर यांच्या दिव्य प्रेमाची आगळी कथा 'सुकलेले फूल'मध्ये आहे. या संदर्भात कृष्णा व दिवाकर यांच्या मनातील उत्कट भावनांचा संघर्ष नेमक्या व मोजक्या शब्दातून साकार झाल्यामुळेच प्रस्तुत रचनेला एक प्रकारचा बांधेसूदपणा लाभून तिला कादंबरीचे स्वरूप प्राप्त झाले आहे. लेखकाने परोक्ष पद्धतीचा वापर करून कृष्णाचे आत्मनिवेदन दिले आहे. त्यामुळे कृष्णाच्या मनातील गूढ भावनांचे पृथक्करण करणे लेखकाला सहजपणे साधता आले. तसेच कृष्णाविषयी वाचकांच्या मनात जिव्हाळा निर्माण होण्यास हे समर्थ शैलीतील आत्मनिवेदन उपकारक ठरले आहे.

कोणत्याही सांकेतिक सृष्टिवर्णनांचा किंवा इतर कृत्रिम अशा नाटकी उपायांचा आश्रय न घेता कृष्णा ही स्वतःच्या मनामध्ये अकारण उद्‌भवलेल्या उदासीनतेचा शोध घेते आहे, अशा प्रकारे वाचकांची उत्कंठा वाढवणारा कथानकाचा प्रारंभ हा सहज सुंदर वाटतो. कथावस्तूचे स्वाभाविक विकसन, व केवळ सामान्य वाचकांच्याच मनाला पटेल असा साचेबंद शेवट न करता

'सुकलेले फूल' या प्रतीकाचा अत्यंत कौशल्यपूर्ण उपयोग करून कथानकाचा साधलेला अंतिम परिणाम, अशा या कादंबरीच्या निश्चितच जमेच्या बाजू आहेत.

एकमेकांवर निर्व्याज प्रेम करणारी कृष्णा व दिवाकर कथेच्या शेवटी एकमेकांपासून आपणहूनच दूर निघून जातात. दिवाकरच्या दिव्य प्रेमाची खूण म्हणून त्याच्याकडचे एकच सुकलेले फूल तेवढे कृष्णाजवळ शिल्लक उरते. एकेकाळी आपणावर देखील कोणी प्रेम केले होते याची ती रम्य स्मृती तिचे वैराण आयुष्याला कशी सुगंधित करून जाते त्याचे हे अत्यंत रमणीय चित्रण आहे.

'बंधनाच्या पलीकडे' या त्यांच्या पहिल्या कादंबरीत रूढ नीतीविरुद्ध बंड करणाऱ्यांचे समर्थन होते. पण 'सुकलेले फूल' मध्ये व्यक्तीच्या मनातील भावनांचे मनोविश्लेषणात्मक चित्रण त्यांनी केले. वास्तविक पाहता 'बंधनाच्या पलीकडे'मध्ये आलेले प्रीतिविषयक बंडखोर विचार इथेही लेखकाने गृहीत धरले आहेत. मात्र प्रभाकर हा मैनाच्या कुलशीलाचा विचार न करता तिच्याशी केवळ प्रेमाखातर विवाहबद्ध होतो. तर 'सुकलेले फूल'ची नायिका बाल-विधवा कृष्णा ही आईवडिलांना मान्य असणाऱ्या मुलाशी म्हणजे केशवशी विवाह करण्याच्या नुसत्या कल्पनेने आजारी पडते. असे असले तरी व्यसनी व चारित्र्यहीन दिवाकरकडे तिचे मन ओढ घेऊ लागते. मात्र, कृष्णा व दिवाकर यांच्या प्रेमाची विवाहात परिणती होत नाही. सामाजिक बंधनांना झुगारून देण्याची शक्ती मात्र कृष्णाला या प्रेमामुळेच प्राप्त झालेली दिसते.

परंपरा व रूढी यांची बंधने झुगारून देण्याचा धीटपणा जसा 'बंधनाच्या पलीकडे'मधील प्रभाकर व मैना यांच्यात होता त्याचप्रमाणे कृष्णा व दिवाकर हे देखील सामाजिक बंधनांविरुद्ध बंड उभारण्याइतके धीट आहेत. पण कृष्णा व दिवाकर यांच्या स्वभावातील बंडखोरीवर प्रकाश झोत टाकण्याचा प्रस्तुत लेखकाचा उद्देश दिसत नाही. त्यांच्या मनातील हळुवार भावनांचे दर्शन वाचकांना घडवायचे म्हणून ह्या उभयतांमधील अबोध, मधुर प्रीती लेखकाने फार सूचकतेने रंगवली आहे. आणि तात्विक चर्चेला तेथे अगदी फाटा दिला आहे. या कथेत मानवी मनाचा विचार देखील न करणारा परंपराप्रिय समाज आणि त्या कठोर समाजस्थितीशी झगडणारे कृष्णाचे संवेदनशील मन यामधील संघर्षाचे एक परिणामकारक चित्रण प्रामुख्याने आढळते.

'सदाफुली' (१९३३) मधील तनूची आत्म-कथा ही केवळ एकमार्गी व एकपदरी अशी प्रेम कथा नाही. तनू, तिमा, अशोक व सुरेश तसेच बाबासाहेब हे तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे व विचारप्रणालीचे प्रतिनिधी म्हणूनच आपणास प्रतीत होतात. बाबासाहेब व सुरेश हे दोघेही सुखवादी आहेत तर अशोक आणि तिमा या व्यक्तिरेखा कलावादाच्या पुरस्कर्त्या आहेत. एकटा तनू हा मात्र जीवनवादी दाखवला आहे. अशा प्रकारे वेगवेगळ्या स्वभावरेखांच्या विविध विचार प्रणालींमधून निर्माण होणारा संघर्ष 'सदाफुली' मध्ये बघायला मिळतो.

'सदाफुली'मध्ये तनू व तिमा यांच्यातील गूढ आकर्षणाचे स्वरूप या मानसशास्त्रीय विश्ले-षणाच्या आधारे लेखकाने सूचकतेने रंगविले आहे. लौकिक अर्थाने भावाबहिणीचे नाते असल्यामुळे तिमाविषयीचे आकर्षण तनू उघडपणे व्यक्त करू शकत नाही. त्यामुळे कधी कधी अत्यंत सूचक शब्दातून किंवा गूढ प्रतिमांच्या माध्य-मातून आपल्या मनातील भावना तो तिमाजवळ व्यक्त करतो.

'सदाफुली' ही मुख्यत: तनूची आत्मकथा अस-ल्यामुळे मुख्यत: त्याच्याच दृष्टिकोनातून कथानक व स्वभावचित्रण ही कादंबरीची अंगे विकसित झाली आहेत. तसेच आत्मपर लिखाणाचा अवलंब केल्यामुळे कादंबरीतील सुखवाद, जीवनवाद, कलावाद इत्यादी विषयींच्या चर्चा व तनूचे सखोल चिंतन यांची कथेशी एकरूप होण्यास मदतच झाली आहे.

ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, ग. त्र्यं. माडखोलकर हे पु. य. देशपांडे यांचे समकालीन लेखक, क्वचितच भव्य सामाजिक पार्श्वभूमीशी

एकरूप झाले होते. त्यांच्या लेखनातून समाजाचा ठसा जणू अस्पष्ट झाला होता. व्यक्तीचे मन विशेषत: पु. य. देशपांडे यांना अधिक आकर्षित करीत होते. 'सदाफुली'च्या विशिष्ट स्वरूपामुळे "या कृतीने गूढगुंजनात्मक नवकाव्याचे वळण घेतले." असे प्र. वा. बापट व ना. वा. गोडबोले यांनी प्रस्तुत कादंबरीचे वर्णन केले आहे.

या दोन आत्मपर कादंबऱ्यांचे लेखन होण्यापूर्वीच्या काळातील बाबा पद्मनजींची 'यमुनापर्यटन', हरिभाऊ आपटे यांची 'पण लक्षात कोण घेतो ?' वा. म. जोशी यांची 'इंदू काळे व सरला भोळे' इत्यादी कादंबऱ्यांमधून समाजप्रबोधनाची प्रेरणा स्पष्टपणे जाणवते. परंतु पु. य. देशपांडे यांच्या 'सुकलेले फूल' व 'सदाफुली' या दोन कादंबऱ्यांमध्ये अशी समाजप्रबोधनाची प्रेरणा जाणवत नाही. या लेखनामागची प्रेरणा ही विशुद्ध कलानिर्मितीच्या प्रेरणेशी अधिक जुळणारी आहे असे जाणवते.

त्या काळात कल्पनारम्य सामाजिक कादंबऱ्यांना बहर आला होता.

१९३९ साली 'विशाल जीवन' ही पु. य. देशपांडे यांची सामाजिक कादंबरी प्रसिद्ध झाली. तत्कालीन कल्पनारम्य कादंबऱ्यांच्या पार्श्वभूमीवर वास्तवाचा वेध घेणारी ही कादंबरी आहे. स्वत: पु. य. देशपांडे यांचा त्या काळातील अनेक राजकीय घटनांशी संबंध आलेला असल्यामुळे लेखकाच्या कलाकृतीतील राजकीय चित्रणाला प्रत्यक्षातील वास्तवाचे अधिष्ठान लाभल्याचे जाणवते.

महात्मा गांधींची स्वातंत्र्य चळवळ, तसेच रशियन क्रांती व समाजवादाचा प्रभाव या सर्वांचे एक झिरझिरीत आवरण 'विशाल जीवन', 'काळी राणी', व 'नवे जग' या पु. य. देशपांडे यांच्या तीन कादंबऱ्यांना लाभले आहे. 'विशाल जीवन'चा नायक दिलीप याच्या जीवनाशी तत्कालीन राजकारण अगदी एकरूप झाले आहे तर 'काळी राणी'मध्ये मात्र ते केवळ पार्श्वभूमीसारखे अवतरले आहे. 'नवे जग' या कादंबरीत मार्क्सवादासारखी राजकीय विचारधारा हिरीरीने मांडण्यासाठी विना व तरू या प्रस्तुत कादंबरीतील नायक व नायिका यांच्या व्यक्तिरेखा लेखकाने स्वत:च्या प्रतिभेतून निर्माण केल्या आहे. जगभर प्रसिद्ध झालेला तत्कालीन हिंदुस्थानातील जंगल सत्याग्रह, महायुद्धाचे आपल्या समाजावर झालेले दूरगामी परिणाम यांच्या चित्रणामुळे या तीनही कादंबऱ्यांमध्ये एकप्रकारची आशयसंपन्नता आली आहे.

आपल्या संकुचित व्यक्तिवादी चौकटीतून बाहेर पडून विशाल सामाजिक जीवनाशी समरस होणाऱ्या दिलीप देशमुख या वऱ्हाडातील एका सधन शेतकऱ्याच्या जीवनदृष्टीचे चित्रण 'विशाल जीवन'मध्ये केले आहे. दिलीपच्या जीवनातील आंतरिक उत्क्रांतीचे चित्रण म्हणजे कलावादाकडून जीवनवादाकडे वळलेल्या एका विचारवंताचे चित्रण होय. अत्यंत बुद्धिमान व्यक्तीच्या मनातील व्यक्तिनिष्ठा व समाजनिष्ठा व यांमधील आंतरिक संघर्षाचे ते एक प्रातिनिधिक चित्रण वाटते.

त्यांनी नेहमीप्रमाणेच या कादंबरीतही कथावस्तूला दुय्यम स्थान दिले आहे. मुख्यत: तत्कालीन राजकीय घटना व राजनीती व त्याविषयी दिलीपच्या मनात उमटलेले पडसाद हे सारे लेखकाने शब्दबद्ध केले आहे. सुखवादाला व प्रणयभावनेला गौण मानणारी ध्येयवेडी पात्रेच प्रामुख्याने 'विशाल जीवन'मध्येही लेखकाने प्रभावीपणे रंगविली आहेत. केवळ उथळ राजकारणाचे वरवरचे दर्शन घडविण्यातच लेखक अडकून पडल्याचे दिसत नाही.

ग. त्र्यं. माडखोलकर, पु. य. देशपांडे व काही अंशी केतकरांनी महाविदर्भाच्या पार्श्वभूमीवर आपल्या कादंबऱ्या लिहिल्या आणि मराठी कादंबरीला प्रादेशिकतेची वेगळी पार्श्वभूमी मिळवून दिली हे श्रेय पु. य. देशपांडे यांना 'विशाल जीवन' साठी अर्पण करणे योग्य होईल.

पु. य. देशपांडे यांची इतर बहुतेक पात्रे ही विकसनशील व संवेदनशील असतात. पण दिलीपच्या विचारांमध्ये जी उत्क्रांती, जो बदल होतो त्याचे पुरेसे स्पष्टीकरण लेखकाने दिलेले नाही. शेतकऱ्याचा प्रचंड जमाव त्याच्या घरासमोर येऊ लागला की तो चळवळीकडे खेचला जातो. विशाल जीवनात अशा प्रकारे प्रवेश

केल्यावर त्याला अनेक गोष्टींचे आकलन होऊ लागते. ते आकलन म्हणजे लेखकाने समर्थिलेल्या साम्यवादाच्या विविध छटा आहेत. कलेकडून जीवनाकडे वळलेली पु. य. देशपांडे यांची परिवर्तनशील दृष्टीच दिलीपच्या रूपाने व्यक्त झाली आहे. शमा ही त्याची पत्नी त्याला संसाराच्या रूढ चाकोरीत ओढण्याचा प्रयत्न करते. परंतु तो मात्र आपल्या भूमिकेवर अचल राहतो. शमाच्या भावपूर्ण व्यक्तिमत्वाची छाया पूर्ण कथेवर पडली आहे. पण हे शमेचे व्यक्तिमत्व कथेत विशेषसे खुलत नाही. "कोठे बालीश तर कोठे गंभीरपणे बुद्धिनिष्ठ, कोठे शांतनिर्भर तर कोठे उथळपणे नाटकी वडबडकरणारी अशी विसंगत खिचडी तिच्या व्यक्तिचित्रणात झाली आहे. यातून चित्रण-वस्तूवरील कलात्मक स्वामित्वाचा अभावच सूचित होतो" हे कुसुमावती देशपांडे यांचे प्रस्तुत व्यक्तिचित्रणाविषयीचे मत विचार करायला लावणारे आहे.

मात्र काही वेळा एखादे संभाषण, एखादी बैठक व मुलाखत यातून काही प्रत्यक्षातील व्यक्तींची अस्मिता पु. य. देशपांड्यांना गवसल्याचे दिसते. कारण मोहनलाल व चंद्रशेखर या राजकीय व्यक्तींचे चित्रण इतके रेखीव उतरले आहे की त्या काळातील काही नामवंत नेत्यांचे स्मरणही या व्यक्तिचित्रणातून हमखास होते. पु. य. देशपांडे यांची व्यक्तिचित्रण पद्धती, तसेच त्या त्या व्यक्तीच्या विचारांना महत्व देण्याची लकब यातून डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांची सहज–पणे आठवण होते. कारण त्यांनी समाजशास्त्राला अधिक जवळ असणाऱ्या आपल्या कादंबऱ्यांमधून विविध मनोवृत्तीची विचारप्रगल्भ पात्रे रंगविली आहेत. पु. य. देशपांड्यांनी देखील लेखनात कथानकाला दुय्यम स्थान दिले आहे. कारण व्यक्तीच्या मनोविश्लेषणावर त्यांनी सुरवातीपासून भर दिला व तेच त्यांचे वैशिष्ट्य आहे.

मनुष्यस्वभावावर भोवतालच्या परिस्थितीचा परिणाम होतो हे तत्त्व त्यांनी दिलीपच्या बदलत्या निष्ठा, त्याचा बदलत जाणारा दृष्टिकोण आणि सामाजिक व राजकीय परिस्थिती यांच्या परस्पर संबंधातून स्पष्ट केले आहे. परंतु एखाद्या तत्त्वाचे प्रतिपादन करण्यासाठी किंवा एखादा प्रश्न चर्चिण्यासाठी म्हणूनच लेखक ही कादंबरी लिहीत आहे आणि व्यक्ती व घटना किंवा व्यक्तिचित्रण व कथारचना ही पु. य. देशपांडे यांच्या दृष्टिकोनातून गौण ठरतात असे कधीकधी जाणवते. कारण दिलीपच्या मनातील बदलत्या निष्ठांचा संघर्ष व त्याच्या मनाची वेळोवेळी होणारी उलाघाल याचेच एक लांबलचक कथानक इथे आढळते. त्यात घटना फार थोड्या आहेत. दिलीपचे आवेशपूर्ण भाषण, मोहनलालजीपेक्षा प्रभावी असणारे व्यक्तिमत्व केवळ लेखकाच्या निवेदनातून समजते, परिणामकारक प्रसंगातून नव्हे.

'काळी राणी' (१९४१) चा नायक जो प्रकाश त्याच्या मनात व्यक्तिनिष्ठा स्वीकारायची की समाजनिष्ठा महत्त्वाची मानायची याविषयीची तीव्र आंदोलने निर्माण झालेली दिसतात. आणि शेवटी तो अशा निर्णयाप्रत येतो की व्यक्तीवरील अन्याय दूर करण्याचे एकमेव साधन म्हणजे साम्यवादी अर्थव्यवस्थाच होय.

महात्मा गांधींचा जयजयकार करीत जंगल सत्याग्रहासाठी निघालेल्या जनसमुदायात 'काळी राणी'चा नायक प्रकाश हा अत्यंत उत्स्फूर्तपणे सामील होतो. त्यामुळे गांधीवादाचा आणि देशभक्तीचा शिक्का प्रकाशवर मारला जातो. कायदा मोडल्याबद्दल प्रकाशला कोर्टाकडून पाचशे रुपये दंडाची व सहा महिने सक्त मजुरीची शिक्षा सुनावली जाते. अशा प्रकारे प्रकाशच्या प्रत्यक्ष जीवनात तत्कालीन राजकारण भिनले असल्यामुळे 'काळी राणी' या कादंबरीतून लेखकाची राजकारणविषयक मतेही प्रकाशच्या माध्यमातून व्यक्त झाली आहेत असे जाणवते. प्रकाशला पटलेली साम्यवादाची अपरिहार्यता ही एका परीने स्वतः लेखकाच्या विचार–प्रणालीची नेमकी दिशा दर्शविते असे लक्षात येते.

साधारणपणे मनोविश्लेषणात्मक कादंबऱ्यांची परंपरा सुरू झाल्यानंतर मनोभावना प्रकट करणाऱ्या या स्रोतात सुरवातीपासून एका गढूळ प्रवाहाचा समावेश झाला होता. फडक्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून प्रेमाचे गुलाबी वातावरण निर्माण केले तर पु. य. देशपांड्यांनी परंपरागत

नीतिविषयक कल्पनांना स्वतःच्या कादंबऱ्यांमधील वर्णनातून हलवून सोडले. रजनीच्या मनोगंडाचा शोध घेण्याचा, तसेच स्वतःच्या विधवा वहिनीचे दुःख समजून घेण्याचा व त्यावर उपाय शोधण्याचा धीट प्रयत्न यात प्रकाशने केला आहे. परंतु पु. य. देशपांडे यांची भूमिका कितीही तात्विक असली तरी नीतिविषयक त्यांची मते त्या काळात खूपच खळबळ माजविणारी ठरली होती. पु. यं. नी आपल्या कादंबरीतून जे प्रश्न चर्चेला घेतले ते मध्यमवर्गीयांच्या चिंतेचे, चिंतनाचे आणि जिव्हाळ्याचे विषय होते. मात्र तत्कालीन पांढरपेशा समाजाच्या संदर्भात त्यांची अशी उघड चर्चा वा चित्रण धक्कादायक वाटले यात संशय नाही. ज्या 'काळी राणी' कादंबरीतील काही प्रसंग–वर्णनावर टीकेची एवढी राळ उडाली होती त्या लेखनप्रकाराचे कुसुमावती देशपांडे यांनी एका वेगळ्याच दृष्टिकोनातून परीक्षण केले आहे. कथेच्या प्रवाहाच्या अनुरोधाने व त्या सर्वांचा आंतरिक आशय लक्षात घेऊन या प्रकाराविषयी विचार करू लागल्यास त्यातील वेगळेपणा जाणवतो असे त्यांना वाटते. सत्याभासाच्या सर्वप्रकारच्या सामग्रीने सुसज्ज अशा रंगभूमीवरील नाटकामध्ये व नवीनच रूढ होत चाललेल्या छायानृत्याच्या प्रकारामध्ये जो फरक आहे तसाच हा विश्लेषणाचा व वर्णनाचा एक नवा प्रकार आहे असे त्यांचे मत आहे. प्रकाश व रजनी यांच्यातील व्यक्तिविकासाची उत्कट इच्छा आणि आत्मसमर्पणाची दुर्दम्य ओढ यामधील संघर्षाचे सूक्ष्म चित्रण 'काळी राणी' मध्ये बघायला मिळते असे अ. ना. देशपांडे यांचे मत आहे हे लक्षात घ्यावेसे वाटते.

पु. य. देशपांडे हे आपल्या कादंबऱ्यांतील विविध पात्रांच्या मनोविश्लेषणात विशेष रस घेत असले तरी तेवढ्याच आत्मीयतेने ते आपल्या कादंबऱ्यातील सामाजिक व राजकीय वातावरण रंगविण्यात देखील रुची घेतात असे म्हणता येत नाही. याला अनुसरूनच 'नवे जग' (१९४१) या कादंबरीचा नायक विना व नायिका तरू यांच्या व्यक्तिगत भावभावना आणि त्या दोघांची एकमेकांविरुद्ध जाणारी राजकीय मते यांची बेमालूम सांगड लेखकाने प्रस्तुत कथानकतून रंगविली आहे.

स्वतः पु. य. देशपांडे यांना सामाजिक व राजकीय जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव असून देखील अशा जीवनाचे प्रत्ययकारी चित्रण करण्यात ते क्वचितच यशस्वी झालेले दिसतात. याचे खरे कारण असे की तत्कालीन राजकीय व सामाजिक घडामोडींचे आपल्या पात्रांच्या मनोवृत्तीवर झालेले परिणाम रंगविण्याकडे लेखकाचा विशेष कल आहे. अशा प्रकारच्या आपल्या लेखनामागची ही भूमिका त्यांनी 'भवितव्य' नावाच्या साप्ताहिकात एक लेख लिहून स्वतःच स्पष्ट केली होती. तरी देखील 'नवे जग'मध्ये विना व तरू यांची प्रतिष्ठित व सुखवस्तू घराणी, त्यांचा उभयतांचा मानी, हट्टी आणि स्वतंत्र बाण्याचा स्वभाव, तसेच त्यांचे परस्परांवरील प्रेमातून निर्माण झालेला अतीव रोष या गुंतागुंतींचे चित्रण लेखकाने बरेचसे समरसून केले आहे असे वाटते.

विना हा साम्यवादाचा प्रतिनिधी आहे तर तरू ही फॅसिझमची पुरस्कर्ती दाखवली आहे. कुठल्याही लाटेबरोबर वाहात जाणाऱ्या सामान्य माणसांचे प्रतीक आहे अरविंदा. विना व तरू या दोन व्यक्तीतील विरोधाच्या मर्यादित चित्रणाला दोन तत्त्वप्रणलींच्या संघर्षाचे काहीसे व्यापक स्वरूप या कादंबरीत लेखकाने दिले आहे.

"जगातील मानवता जागी झाली तरच खरे मानवी कल्याणप्रद जग निर्माण होण्याची आशा आहे" या 'नवे जग'मधील प्रतिपादनातून देशपांड्यांची जीवननिष्ठा व्यक्त झाली आहे. तिरू व तिमा यांच्यातील प्रेमाचे स्वरूप काहींना अवास्तव, असंभाव्य व विकृत वाटले तर काही अभ्यासकांना त्यातून प्रतीकात्मतेचे दर्शन घडले. एवढे मात्र खरे की अंतिम आणि सर्वश्रेष्ठ मानवतेचा जो संदेश त्यांनी पुढे १९४५ साली मुंबई मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून दिला त्या मानवतेचे आवाहन 'नवे जग' मधून पु. य. देशपांडे यांनी केले आहे. "कलावंतांनी कलाकृतीच्याद्वारे व्यक्तीव्यक्तीमधील जी सुप्त मानवता आहे ती प्रचंड प्रमाणात प्रज्वलित करण्याचे कार्य केले पाहिजे." हाच तो

पु. य. देशपांडे यांचा संदेश होता. राजकारण-विषयक कादंबऱ्यांमध्येदेखील मानवतेचे त्यांचे भान कायम होते ही गोष्ट लक्षणीय वाटते.

या प्रकारे पु. य. देशपांडे यांनी विशेषत: 'विशाल जीवन' व 'नवे जग' या कादंबऱ्यांच्याद्वारे मराठी भाषेतील राजकीय कादंबऱ्यांचे दालन सजविण्यास हातभार लावला आहे. तसेच 'काळी राणी' या मनोविश्लेषणावर अधिक भर देणाऱ्या कादंबरीतून जे तत्कालीन राजकारणाचे दर्शन घडते त्यामुळे त्या कादंबरीची राजकीयता दुर्लक्षित करता येण्यासारखी नाही असे म्हणावेसे वाटते.

१९२७ साली प्रसिद्ध झालेल्या 'बंधनाच्या पलीकडे' या कादंबरीतून व्यक्तिस्वातंत्र्याचा उद्घोष करणारे पु. य. 'सुकलेले फूल' व 'सदाफुली'सारख्या कादंबऱ्या लिहिताना विशुद्ध कलानिर्मितीत रंगून गेले. 'विशाल जीवन'पासून 'नवे जग'पर्यंत साम्यवादाकडे व विरोधविकास वादाकडे आकर्षित झालेले लेखकाचे मन जणू सतत कोणत्यातरी श्रेयाचा शोध घेत होते. 'नवे जग'मधून मानवतेचा संदेश देणारा हा लेखक मानव व मानवी जीवन याविषयीचे गुंतागुंतीचे कोडे सोडविण्यात जणू गुंतत गेला असल्याचे त्यांच्याच 'आहुती' व 'भेरीघोष की धर्मघोष?' या कादंबऱ्यांमधून स्पष्टपणे जाणवते.

त्यांच्या निष्ठेची अशी बदलत जाणारी रूपे ही अनेकदा समीक्षकांच्या टीकेचा विषय झाल्याचे आढळते. पु. य. देशपांडे यांनी 'मी का लिहितो?' हे स्पष्ट करताना केलेले निवेदन खूपच बोलके आहे. (युगवाणी सप्टें.–ऑक्टो. १९४६. पृ. ४४) प्रस्तुत संदर्भात ते म्हणतात—

'यथार्थ आत्माविष्काराची सीमा मला अजून गाठता आली नाही, याची मला पूर्ण जाणीव आहे.

माझे सर्व साहित्य वाईट, असुंदर व कलाशून्य आहे असा टीकाकारांनी व रसिकांनी एकमताने निर्णय दिला, तरी त्याचा मला यत्किंचितही विषाद वाटणार नाही! पण ते अयथार्थ व अप्रामाणिक आहे, असे जर कोणी म्हटले, तर मात्र माझ्या मनाला बऱ्याच वेदना होतील.

मी जे जे लिहिले, ते सर्व पूर्णपणे प्रामाणिकपणे, एवढाच माझा दावा आहे. यथार्थ आत्मदर्शनाचा व वस्तुदर्शनाचा प्रयत्न याशिवाय दुसरा कोणताही हेतू माझ्या लेखनाला प्रेरक झालेला नाही." या सुस्पष्ट निवेदनातून लेखकाच्या स्वभावातील प्रांजळपणा व परखडपणा प्रत्ययाला येतो व निष्ठेच्या बदलत जाणाऱ्या रूपाची थोडीफार कारणमीमांसा गवसली असे वाटते.

प्रस्तुत लेखकाला जेव्हा मानवतेचे तत्त्व अत्यंत महत्त्वाचे आहे असे जाणवू लागले तेव्हा १९४१ साली 'नवे जग'मध्ये त्यांनी मानवतेचा उद्घोष केला. १९४१ साली भरलेल्या मुंबई व उपनगर मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले होते की 'आजचा यंत्रयुगीन प्रलय हा निसर्गनिर्मित नसून तो पूर्णपणे मानवनिर्मित आहे. भीषण युद्धांकडे पाहून मानवजातीची घटका आता भरत आली आहे असे वाटते. या हिंसक व विध्वंसक वृत्तीचे निर्मूलन होण्यासाठी सामान्य जनांच्या मनातील मानवता सचेतन व सुजाण करायला हवी." या भाषणातून स्पष्ट होते की १९४१ पासूनच 'मानवता' हा त्यांच्या चिंतनाचा महत्त्वाचा विषय होता. त्यामुळे माणसाच्या मनातील मानवता जागृत करण्याचा प्रयत्न त्यांनी 'आहुती' व 'भेरी घोष की धर्मघोष?' या दोन कादंबऱ्यांमधून केला आहे.

लेखकाच्या अध्यात्मविषयक ओढीतून 'आहुती' ही कादंबरी १९५९ साली निर्माण झाली. १९२७ मध्ये व्यक्तिस्वातंत्र्याने भारावलेल्या या लेखकाने कालांतराने क्रमश: मार्क्सवादामध्ये व नंतर अध्यात्मात रूची घेतली. त्यांच्या श्रद्धाविषयात घडून आलेली ही क्रांती त्यांच्या प्रगमनशील वृत्तीची द्योतक आहे, असे डॉ. अ. ना. देशपांडे यांनी सप्टें. ऑक्टो. १९४६ च्या युगवाणीतील लेखात सुचविले होते, त्याची येथे आवर्जून दखल घेणे आवश्यक वाटते.

दुसऱ्या जागतिक महायुद्धात भारतातील कम्युनिस्टांनी इंग्रजांना अप्रत्यक्षपणे युद्ध सहकार्य देण्याचे धोरण स्वीकारले होते. हे धोरण पसंत न पडल्यामुळे लेखकाने कम्युनिस्ट पक्षाशी असलेले

आपले संबंध तोडले. त्यानंतर महात्मा गांधींच्या तत्त्वज्ञानाचा जो मूळ आधार अशा उपनिषदांचा व षट्दर्शनांचा अभ्यास त्यांनी सुरू केला. त्यांच्या अध्यात्मविषयक अभ्यासातून ह्या दोन कादंबऱ्यांची निर्मिती झाली असल्याचे प्रकर्षाने जाणवते.

मार्क्सवादाकडून अध्यात्माकडे त्यांच्या प्रतिभेने वळण घेतले त्यात आश्चर्यदायक वा अनपेक्षित असे काहीही नाही कारण जागतिक वाङ्मयेतिहासात असे पूर्वी देखील क्वचित घडले आहे. इलियट या इंग्रजी कवीत देखील असे परिवर्तन झाल्याचे वि. बा. ढवळे यांनी आपल्या 'साहित्याचे तत्त्वज्ञान' या ग्रंथात नमूद केले आहे. प्रथम अगदी पुरोगामी व मूर्तिभंजक असणारा हा लेखक जसजसा मार्मिक वादविवादात लक्ष घालू लागला तसतसा 'वाङ्मय आणि श्रद्धा' या प्रश्नांचा विचार त्याला सतावू लागला. त्याचे मिल्टनवरील दोन निबंध या वैचारिक अस्वस्थतेची साक्ष देतात असे ढवळे यांनी म्हटले आहे.

जेव्हा पु. य. देशपांडे यांच्या लेखनाकडे एका अभ्यासकाच्या दृष्टीने नजर टाकण्याची वेळ येते तेव्हा त्यांच्या लेखनातील एक विशेष लक्षात येतो. तो विशेष असा की त्यांनी 'ठराविकाविरुद्ध' आपले लेखन मातत्याने केले. विकसनशील व्यक्तिमत्त्वांना घडविण्यात पु. य. देशपांडे मग्न राहिले. एक प्रकारच्या ह्या ध्यासातूनच प्रस्तुत लेखकाची त्यांच्या शेवटच्या कादंबरीकडे वाटचाल सुरू झाली होती असे जाणवते. त्यांनी जन्मभर ज्या तत्त्वांचा ध्यास घेतला त्याचे फलित म्हणजे 'भेरीघोष की धर्मघोष ?' ही त्यांची ऐतिहासिक कादंबरी होय.

चक्रवर्ती राजा अशोकाचा धर्मघोषाचा इतिहासप्रसिद्ध निर्णय हाच या कादंबरीचा मध्यवर्ती विषय आहे. पु. य. देशपांड्यांनी मानवतेच्या अभ्युदयाचे आपले लाडके तत्त्व मांडण्यासाठी या ऐतिहासिक कथेचा कौशल्याने उपयोग करून घेतला आहे. जड विरुद्ध विकसनशील स्वभावाची पात्रे यांमधील संघर्ष त्यांनी या दोन कादंबऱ्यांमधून रंगविला आहे.

इ. स. १९३१ साली लिहिलेल्या 'सुकलेले फूल' या कादंबरीतून लेखकाने विशुद्ध प्रेमाच्या स्वरूपाचे दिग्दर्शन केले. पुढे 'भेरीघोष की धर्मघोष ?' मध्ये सम्राट अशोक व तिष्यरक्षिता, कुणाल व तिष्या तसेच राधागुप्त व महामाया यांच्यातील विशुद्ध प्रेमाचे नाते त्यांनी रंगविले आहे.

इतिहासप्रसिद्ध व्यक्तींचे चित्रण करताना ऐतिहासिक सत्याला धक्का लागणार नाही याची लेखकाने पुरेशी काळजी घेतली आहे. 'आहुती' व 'भेरीघोष की धर्मघोष ?' (१९७२) या दोन्ही कादंबऱ्यांमधील प्रमुखपात्रे गौतम बुद्धाच्या 'सर्वम् क्षणिकम् सर्वम् दुःखम' या क्षणवादाच्या तत्त्वज्ञानाने चांगलीच भारलेली दिसतात.

आजच्या विज्ञानयुगातील भीषण जगरहाटी मानव संहाराकडे वेगाने वाटचाल करीत असताना मानवतेच्या मूल्यासाठी झुंजणारी माणसे त्यांनी आपल्या प्रस्तुत कादंबरीमधून रंगविली आहेत.

मानवतेच्या कल्याणासाठी झुंजणारी, सर्वस्व अर्पण करणारी महान माणसे मानवजातीच्या आदरास पात्र होत असतात, मात्र अशा महात्म्यांच्या आयुष्याची परिणती बहुधा त्यांच्या नाशात झालेली दिसते. स्वतःच्या तत्त्वासाठी क्रूसावर चढलेला येशू व विषाचा पेला स्वीकारणारा सॉक्रेटीस ही मानवतेसाठी आत्मत्याग करणाऱ्या महामानवाची प्रतीके आहेत, तसेच त्यांना छळणाऱ्या समाजात अमानुषतेच्या खुणा लपलेल्या आहेत. इतिहासातील अशा घटना लेखकाला जीवनाचा गंभीरपणे विचार करायला लावतात. अशा प्रकारच्या चिंतनातून मानवी प्रवृत्तीचा शोध घेतला जातो. जीवनातील भीषण सत्यामुळे कधी कधी कलावंतांची प्रतिभा गारठून जाते पण एखादा या सत्याकडे निर्भयपणे पाहणारा कलावंत समाजाविरुद्ध बंड करून उठतो. तो द्रष्टा कलावंत ज्ञाताच्या, जडाच्या मर्यादांनी जखडलेल्या वास्तवसृष्टीच्या पलीकडे जाऊन पोचतो. याच प्रकारे पु. य. देशपांडे यांची प्रतिभा मानवी मनाचा शोध घेता घेता तत्त्वज्ञानात तल्लीन होत गेली असे जाणवते.

पु. य. देशपांड्यांनी आपल्या कादंबरीतील रूपकांमधून व प्रतीकांमधून स्वतःच्या मनातले मानवताविषयक विचार व्यक्त केले आहेत. या

दृष्टिकोनामुळे 'भेरीघोष की घर्मघोष ?' या ऐतिहासिक कथानकातून लेखकाने केवळ ऐतिहासिक वीर पुरुषांची चित्रे रंगविली नाहीत. त्यांना सम्राट अशोक, तिष्यरक्षिता, ईशानदेवी, कुणाल यांच्या चरित्रातील नैतिक प्रश्नांवर प्रकाश टाकायचा होता. जर लेखकाने या व्यक्तींच्या राजकारणाला अधिक महत्त्व दिले असते तर ही कादंबरी राजकीय ऐतिहासिक कादंबरी या सदरात गेली असती. राजा अशोकाने अहिंसा स्वीकारण्यामागचे भावनिक सत्य प्रस्तुत कादंबरीत प्रभावीपणे रंगविले आहे.

इतिहासाचा संबंध व्यक्तीच्या बाह्य जीवनाशी अधिक असतो, त्यात घटनांना प्राधान्य असते. कादंबरीत मात्र व्यक्तीच्या अंतर्बाह्य जीवनाचे दर्शन घडविले जाते म्हणून पु. य. देशपांडे यांनी राजा अशोकाच्या अंतर्बाह्य जीवनाचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न केला आहे. ठराविकाविरुद्ध बंड करणारा प्रभाकर त्यांनी आपल्या पहिल्या सामाजिक कादंबरीतून रंगवला तर ठराविकाविरुद्ध बंड करणारा अशोक राजा त्यांना इतिहासातून गवसला. मानवतेसाठी ऐश्वर्य व प्रसिद्धी या लालसेचा त्याग करणारी अशोकराजासारखी पात्रे त्यांनी रंगविली. त्या काळाचे सांस्कृतिक तसेच सामाजिक घडामोडींच्या दृष्टीने चित्रण करण्यात आले आहे. या कादंबरीत तात्विकता ही चर्चा, वादविवाद, निबंध या स्वरूपात विभक्तपणे येत नाही कारण या कादंबरीचे मुख्य प्रतिपाद्यच मुळी मानवी जीवनाच्या अंतिम अर्थाचा शोध हे आहे. 'अनामिकाची चिंतनिका' लिहिणाऱ्या लेखकाला अभिप्रेत असणारी तात्विकता व कलात्मकता कादंबरीलेखनात जणू एकरूप झाली आहे असे जाणवत राहते. शेवटच्या दोन कादंबऱ्यांमधून असे जाणवते की वास्तव चित्रणापेक्षा उदात्त चित्रणाकडे त्यांचे लक्ष केंद्रित झाले असावे. तसेच त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांमधून जाणवते की, त्यातील पात्रांच्या स्वभावचित्रणापेक्षा त्यांच्या वैचारिकतेचे दिग्दर्शन करण्यामध्येच लेखकाला विशेष स्वारस्य असावे.

समकालीन कादंबरीकारांमध्ये लोकप्रियतेच्या दृष्टीने जरी पु. य. देशपांडे मागे राहिले तरी कादंबरीचा विषय, व्यक्तिचित्रण व पार्श्वभूमी याबाबत त्यांनी कादंबरीप्रकाराला जी एक प्रकारची गती मिळवून दिली ती ऐतिहासिक दृष्टया महत्त्वाची वाटते. मराठीतील तत्वप्रधान कादंबरीचे जनक जे 'वा. म. जोशी' यांच्या कादंबरीत जेव्हा तत्त्वचर्चा उद्भवते तेव्हा ती कादंबरीच्या कला स्वरूपाला ग्रासून टाकते. पण तत्वचर्चा हाच त्यांचा महान गुण समजला जाई. कारण तेच त्यांच्या कादंबरीचे वैशिष्ट्य होते. ठिगळवजा तत्वचर्चेमुळे त्यांच्या कलाकृतीत दोष निर्माण झाल्यामुळे तोच त्यांचा महान दोषही समजला जाई. परंतु जिथे त्यांनी आत्मपर लिखाणाचा अवलंब केला तिथे कादंबरीतील चर्चा कथेशी एकरूप झालेली दिसते. पु. य. देशपांडे यांनी 'सुकलेले फूल' व 'सदाफुली' ह्या दोन कादंबऱ्यांमध्ये आत्मनिवेदनात्मक पद्धतीचा अवलंब केला आणि त्यामुळे त्यांच्या नेमक्या ह्या दोन कादंबऱ्या रूक्ष चर्चांपासून बऱ्याचशा अलिप्त राहिल्या असे दिसते. कादंबरीतील चर्चा कादंबरीला अलंकारभूत असते असे मत वा. म. जोशींनी श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या 'दुटप्पी की दुहेरी' ह्या कादंबरीचे परीक्षण करताना व्यक्त केले होते. कादंबरीतील नायक विद्वान असेल व नायिका जिज्ञासू असेल तर कादंबरीत आलेली तत्त्वचर्चा अप्रस्तुत न वाटता ती साहजिक किंवा आवश्यक वाटते असे त्यांचे मत होते. डॉ. केतकरांच्या कादंबऱ्यांमधील प्रमुख पात्रे अशीच विचार करणारी, तद्विषयक चर्चा करणारी, आत्मनिरीक्षण करणारी आहेत. अशा व्यक्तींची कथा वादविवाद व तत्वचर्चेशिवाय अवतरणार नाही. त्याचप्रमाणे पु. य. देशपांडे यांच्या कादंबऱ्यांमधून विद्वान नायक व जिज्ञासू नायिका रंगवल्या आहेत त्यांची ही प्रवृत्ती वा. म. जोशी किंवा डॉ. केतकर यांच्या कादंबऱ्यांमधील पात्रांशी बरीच जुळणारी आहेत.

आपल्या लेखनातून पु. य. देशपांडे ह्यांनी सातत्याने व्यक्त केलेला विचार म्हणजे मानवता हे जीवनमूल्य मानवी जीवनात एक सनातन महत्त्वाचे मूल्य मानले जायला हवे हा होय. अशा

प्रकारे त्यांनी आपल्या कादंबऱ्यांमधून व्यक्ती बरोबरच तिच्या अंतर्मनातील संघर्षावर चांगलाच भर दिला. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर व ग. त्र्यं. माडखोलकर या समकालीनांच्या कादंबऱ्यांशी तुलना करता आपल्या अनेक वैशिष्ट्यांनी वेगळी अशी पु. य. देशपांडे यांची कादंबरी आहे. तिच्यातून अत्यंत प्रगल्भ व्यक्तिमनांचे तात्विक, वैचारिक व भावनिक स्वरूपाचे मूलभूत प्रश्न आधुनिक जीवनाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या तरलतेने व हळुवारपणे चित्रित करण्याचा प्रयत्न प्रत्ययास येतो. एका प्रकारची बंडखोर, चिंतनशील व स्वच्छंदवादी वृत्ती त्यांच्या सर्व कादंबऱ्यांमध्ये जाणवते. तांत्रिकदृष्ट्या कथा निवेदनाचे अनेक प्रकार त्यांनी हाताळले आहेत, त्या दृष्टीने 'सुकलेले फूल' व 'सदाफुली' या कादंबऱ्या लक्षवेधक वाटतात.

विज्ञानयुगाला आत्मसंशोधनाची जोड दिली नाही तर या जगात मानवी अस्तित्वच नष्ट होईल, ही तीव्र जाणीव 'नवे जग' पासून तर 'अनामिकाची चिंतनिका' या त्यांच्या गाजलेल्या चिंतनप्रधान ग्रंथातील लेखनात व त्यानंतरच्या 'भेरीघोष की धर्मघोष?' ह्या कादंबरीपर्यंत सातत्याने व हिरीरीने मांडली गेली आहेत. अनेक मान्यवर समीक्षकांच्या अनुभवसिद्ध शब्दसुमनांचा आधार घेऊन 'उच्च दर्जाचे काव्यात्म तत्त्वचिंतन' असे पु. य. देशपांडे यांच्या कादंबरी लेखनाचे यथार्थ वर्णन करता येईल.

त्यांच्या संपन्न, मनस्वी व चिंतनशील व्यक्तित्वाचे प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात देखील स्पष्टपणे उमटल्याचे जाणवते. या समाजमनस्क साहित्यिकाने आपल्या कादंबऱ्यांमधून सनातन जीवनमूल्यांना जीवनाधार मानणारी जुनी पिढी आणि त्यांच्याकडे पाठ फिरवून ऐहिक सुखामागे धावणारी नवी पिढी यांच्यातील तणावांचे चित्रण केले आहे. लेखकाने स्वतःचा शोध स्वतःच्या साहित्यातून घेतला अशा या शोधाचा स्वाभाविक व अपरिहार्य आविष्कार म्हणजेच हे वाङ्मय होय.

पु. य. देशपांडे यांचे साहित्य आपण सलगपणे वाचले तर त्या साहित्यातून उद्भवणाऱ्या भावनांच्या व विचारांच्या आवर्तात आपण गुरफटले जातो. त्या साहित्यातून लेखकाच्या व्यक्तिमत्वाचे अनेक विलोभनीय पैलू आपणास आकर्षित करतात. कारण पुष्कळदा लेखकच स्वतःच्या कलाकृतीतून अनेक स्वरूपात डोकावत असतो. अशावेळी लेखक व त्याच्या कल्पनासृष्टीतून निर्माण झालेल्या व्यक्तिरेखा यांच्यातील विलक्षण साम्य नजरेआड होऊ शकत नाही. "मला जे काय म्हणायचे आहे, ते माझ्या लिखाणात आहे. त्यातून तुम्हाला समजेल ते घ्या" हे पु. य. देशपांडे यांचे उद्गार त्यांच्या साहित्याचा अभ्यास करताना आपणास अभ्यासाची नेमकी दिशा दर्शवतात.

मानवी जीवनाच्या वरवर परस्पर विरोधी वाटणाऱ्या विविध क्षेत्रांमध्ये लक्षणीय कामगिरी बजावणाऱ्या एका श्रेष्ठ व्यक्तिमत्वाला केवळ साहित्याच्या माध्यमातून यथाशक्ती जाणून घेण्याचा हा एक प्रामाणिक व सुजाण प्रयत्न आहे एवढेच याचे महत्त्व आहे. ■

दत्तनिवास
धरमपेठ, नागपूर.

अनुक्रमणिका

डॉ. आशा देशपांडे ह्यांना फोन केला. तेव्हा विमलाबाई माझ्यापाशी इतक्या सहजपणे आपलं अनुभवविश्व उलगडतील याची खात्री नव्हती. त्यांनी काहीच सांगितलं नाही तर आशाताईंकडूनच आठवणी गोळा करू ! असा विचार करीतच मी संध्याकाळी जेव्हा पोहचले ते थेट विमलाताईंच्या समोरच ! त्यांच्या ८३ वर्षाच्या प्रसन्न व्यक्तिमत्त्वाकडे बघून वाटले, की छे, पु. य. गेलेच नाहीत. ते तर विमलाबाईंच्या या व्यक्तिमत्वात, मनात भरून आहेत. विमलाबाईंच्या आयुष्याचा एक संपूर्ण जीवनपटच त्यांनी माझ्यापुढे उलगडून टाकला. पलंगावर पु. यं. च्या कादंबऱ्या पडल्या होत्या, नी पेन्सिलींने त्यात खुणा केलेल्या होत्या. 'पु. य. च्या कादंबऱ्यातून आता पुनः मला त्यांचे एकेक नवीन विशेष कळत आहेत.' या विमलाबाईंच्या म्हणण्यावर मी चकित झाले. कारण सामान्यपणे माणूस गेल्यानंतर त्याच्या दुःखात चूर होऊन गेलेल्यांनाच मी पाहिले होते. विमलाबाईंनी माझ्या मनातले ओळखूनच सांगितले 'लोक विचारतात तुम्हाला काहीच वाईट वाटत नाही कां ? पण त्यांना कसे सांगणार की त्यांच्या विचारांनी, कर्तृत्वानी तर ते माझ्यातच आहेत ते गेलेच नाहीत. फक्त शरीर तेवढे गेले.' केवढा हा धीरोदात्तपणा !

विमलाबाईंचे जीवन हे अतिशय समृद्ध, यशस्वी असे झाले. विमलाबाई लहान असल्यापासूनच स्वतंत्र विचाराच्या ! १२ वर्षे होस्टेलमधे राहिल्याने स्वतंत्रपणे अनुभवातून विचारसरणी तयार झाली. कॉलेजमध्ये शिकत असतानाच त्यांची ओळख पु. यं. शी झाली होती. किती जुना काळ तो ! त्या सांगतात "कॉलेजमध्ये माझे ५–६ दीर शिक्षण घेत होते. त्या सर्वांना आमचे प्रेम माहीत होते. पण कधी कुणी तक्रार केली नाही सासऱ्यांजवळ ! आणि होस्टेलच्या दोन खोल्या पु. यं. च्या ! समोर बाभळीचं झाड ! हे झाड आमच्या दोघांच्या प्रेमाचं स्वप्न !" याच बाभळीची आठवण सांगता सांगता विमलाबाईंनी तेव्हा केलेली कविता– त्यातून माझ्यापुढे तो प्रसंग उभा केला. अजूनही आवाज खणखणीत !

'इथे या बाभळीखाली हृदय होऊनी सोत्कंठ !
नयनीच्या दृष्टीभेटीत । सुखाचे कोंदले विश्व ।
स्मरणी ये रम्य तव स्थान । मधुर मोहर आंब्याचा
वसंते चुंबिले वारा । खुले साज नभी संध्येचा ।'

आणि म्हणून, 'पुणे हे आवडे मजला मृदु स्मृतीतूनी '॥

सुखाचे कोंदले विश्व

विदर्भातील
तत्त्वचिंतक, कादंबरीकार
पु. य. देशपांडे
यांच्या मृत्युनंतर
त्यांच्या पत्नी
विमलाबाई यांच्याशी
'युगवाणी 'तर्फे
सुलभा हेर्लेकर
यांनी
केलेली बातचीत.

: सुलभा हेर्लेकर

अनुक्रमणिका

विमलाबाई त्यांच्या तरुण विश्वात हरवून गेल्या होत्या. 'शेजारून कालवा वहात होता ! त्याच्या बाजूने मुलं सायकलीवरून आम्हा दोघांना बघायला यायची. पु. यं. ना विचारायची कुठे जातोस ?' 'मी मिस् कोल्हटकरला भेटायला जातोय' असे बिनदिक्कत उत्तर त्यांना मिळायचे. पण त्यांच्या ह्या प्रेमाआड कुणीच आले नाही. पु. यं. च्या वडलांनी सुद्धा अडवलं नाही. की विमला-बाईंच्या घरूनही विरोध झाला नाही. विमलाबाईंचे वडील मुळातच सुधारक होते. मुलीवर त्यांचा प्रगाढ विश्वास होता. पण विमलाबाई सांगतात की समाजाकडूनही आम्हाला कधी त्रास झाला नाही. पण कुसुमावतीबाई देशपांडे ह्या माझ्या मैत्रिणीला मात्र फारच विरोध झाला. कुसुमावतीबाईंच्या वडलांनी तर माझ्याशीही दोन वर्षे संबंध तोडून टाकला. कुसुमावतीबाई या देखण्या आणि बुद्धिवान ! ह्यामुळे त्यांच्या वडलाना I. C. S. जावई हवा होता. यावर विनोदाने विमलाबाई म्हणाल्या 'मी सुंदर नाही हे फायद्याचे ठरले ! कारण त्यामुळे आईवडलांची अपेक्षाच राहिली नाही... !!' त्या जरी हे सांगत असल्या तरी त्यांचं या वयातील तेज पाहून कुणालाही ते खरं वाटणार नाही. त्यांच्या वडलांचा साधेपणा व न्यायप्रियता त्यांनी घेतली. स्वच्छ निखळ जीवन हे संस्कारातूनच मिळतं. त्यांना हा वारसा त्यांच्या वडलांकडून मिळाला. दमोह सारख्या गावातून त्यांच्या वडलांनी त्या काळात म्हणजे १९१२ साली शिक्षणासाठी त्यांना स्वतः पुण्यात नेऊन ठेवले. मुलगी सरळमार्गी आहे हे त्यांना पटलेले होते. अपशब्द वा टोचून बोलणं हे तर कधी वडलांकडून वा पती म्हणून पु. यं. कडून त्यांनी अनुभवलं नाही. दोघांनाही शाळा कॉलेजमध्ये स्कॉलरशिप होती. विमलबाई म्हणतात, 'पु. यं. च सर्व आयुष्य हे उडचा मारत वर कळसापर्यंत गेलं ! ' अखंड वेग आणि Every time a very big jump ! त्या उडीवरून कोसळणं त्यांना माहीतच नाही !

विमलाबाई या कोकणस्थ व देशपांडे हे देशस्थ ! देशपांडयांचं घर हे पंचवीस माणसांचं सोवळं, ओवळं ! पण त्या म्हणतात 'डोळे उघडे करून पहात राहिलं, की त्याला सगळं समजतं ! सासुबाई अतिशय चांगल्या पण जातेचं मत प्रथम चांगलं नव्हतं.' पहिली, दुसरी शिकलेल्या या लोकांत, एम. ए. झालेली ही हुशार मुलगी म्हणून कुतुहलाने बघत. पण सर्वांना समजून घेतले ते विमलाबाईंनी ! बाबासाहेबांनी मदतीचा हात दिला. त्या सांगतात दोघांचं ६२ वर्षांचं जीवन सफल झालं आहे. 'Always together' आम्ही राहत असू ! कुठलंही लिखाण, कादंबरी ते प्रथम मला दाखवत ! त्यावर 'हे चांगलं झाल नाही, सैल झालं आहे !' म्हटलं की शांतपणे पुन: लिहून काढीत ! प्रत्येकाची प्रेसकॉपी मीच करायची. कादंबऱ्या, The othentic योग पातंजली योगदर्शन, सर्वच पुस्तकांच्या प्रेसकॉपी मी तयार केल्या.

जीवनाकडे बघण्याची त्यांची दृष्टी पूर्णतः भावरूप आहे. दोनवेळा जीवघेण्या आजारावर त्यांनी मात केली. त्या म्हणतात, "धन्यवाद कोटिशः तुला ग । धन्यवाद तनू तुला । देहांतर्गत व्यापाराच्या आधाराची शिला !" शरीराकडे असे त्रयस्थासारखे बघणे कितीजणांना जमेल ? १९३४ ते १९६४ पर्यंत त्या विदर्भात राहिल्या. १९३२ साली बाबा शेतकऱ्यांच्या चळवळीत उतरले. बाबासाहेब प्रेसिडेंट तर या सेक्रेटरी. सारा माफ होण्याच्या या चळवळीत बरेचदा सरकारच्या विरोधात जावे लागले. तेव्हाचे मंत्री पंजाबराव देशमुख बाबासाहेबांचे मित्र पण चळवळीतला बेफामपणा त्यांना तुरुंगात घेऊन गेला. विमलबाईंवरही जेलमधे जाण्याची वेळ आली. पण मुलगी लहान म्हणून सगळ्यांच्या सल्ल्यानुसार सेक्रेटरीपदाचा राजीनामा देऊन टाकला ! त्यामुळे तुरुंगात जाणे वाचले. पण झोकून देण्याची वृत्ती तीच कायम ! त्या म्हणतात, "सोशॅलीझम, कम्युनिझम, एकही 'इझम' बाबांनी सोडला नाही. प्रत्येक इझमच्या टोकाला जायचं, त्याची मर्यादा कळली की दुसरीकडे वळायचं. मोकळेपणानी श्वास घेता आला नाही म्हणून या इझमचा नाद सोडला."

याच सुमारास बाबांचे मित्र रावसाहेब पटवर्धन यांनी जे कृष्णमूर्तींचं पुस्तक वाचायला आणून दिलं. त्यांतील विचारांनी नवे बळ मिळाले. खळबळ झाली मनात आणि जे. कृष्णमूर्तीजवळ जाण्याची ओढ निर्माण झाली... ! पुण्याला ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवांवर तीन दिवस बाबासाहेबांची व्याख्यानं झालीत. यावर पुस्तकरूपाने तीन खंडही प्रसिद्ध झालेत. पुण्यात त्यावेळेस मोठमोठ्या लोकांनी [त्यांच्या व्याख्यानांची प्रशंसा केली. पण बाबांना वाटायचं की 'प्रसिद्धी फार लवकर डोक्यात शिरते.' तसं होऊ नये म्हणून ते बनारसला जे. कृष्णमूर्तींकडे गेले. जे. कृष्णमूर्तींना पत्रं पाठवताच विमलाबाईंना व बाबांना त्यांनी मुंबईला बोलावले. ते साल होतं १९६१ ! प्रसिद्धीचा योग जवळ आला की बाबा नवीन कामाकडे वळत ! जे. कृष्णमूर्तींच्या सहवासात वेळेचं महत्त्व त्यांना कळलं. विमलाबाई सांगतात, "जे. कृष्णमूर्ती होते म्हणून बाबांनी कधी त्यांना हात जोडले नाहीत. त्यांचा दृष्टिकोण इंटलेक्च्यूअल भूमिकेतून होता." ते म्हणत 'I am a seeker of truth not follower of anybody' आणि "जे कृष्णमूर्तींनी हे जाणले. त्यामुळे बाबा आणि ते परस्परपूरक" राहिले. नवीन विचार, नवीन वाचले की ते ब्रेकफास्टच्या टेबलावर मला समजावून सांगत ! "मी कुणीच नाही पण बहुश्रुत आहे." हे विमलाबाईंचे उद्गार किती विनयशील आहेत. एकूणच आवडीनिवडीमध्ये, साधेपणा, बौद्धिकता या सर्वच गोष्टी विमलबाईंच्या व बाबांच्या सारख्याच होत्या... कधी दागिन्यांचा हव्यास नाही, कधी सिल्क कपड्यांचा नाही. बाबासाहेबांनाही त्यांची ही साधी राहणीच आवडली. खादी कपडेच शेवटपर्यंत वापरले. वास्तविक पहाता एक स्त्री म्हणून दागदागिने, कपडे यात विमलाबाईंना रस असणे स्वाभाविक होते. पण त्यांचं या गोष्टींचा कधी मोहच पडला नाही. बाबांना स्वतः जवळ एकही पैसा ठेवीत नसत. सर्व पैसे विमलाबाईंजवळ. 'भवितव्य' हे साप्ताहिक चालायचं, तेव्हाही त्याचे सर्व अकौंटस्, पैसे विमलाबाईंनी संभाळले. कित्येक कोर्टकेसेस झाल्यात त्यावेळीही बाबा खंबीर व निर्भीड राहिले. ह्याच स्वभावामुळे लग्न करतानाही ते खंबीर होते. विमलाबाईंना एकदम त्यांचा काळ आठवला त्या म्हणाल्या, 'त्यावेळी मी कोकणस्थ आणि देशपांडे देशस्थ. पण मुलाचा स्वभाव वडिलांना माहीत असल्याने ते आड आले नाही. रावसाहेब पटवर्धन गमतीने म्हणत, की तुम्ही देशस्थांच्या घरात आलात म्हणून तुम्हाला हे प्रेम मिळालं. कोकणस्थ घरात गेला असतात तर टोचून खाल्लं असतं."

जे कृष्णमूर्तींच्या आश्रमात विमलाबाई स्वतःही काम करीत होत्या. तिथे आग्रही भूमिका नव्हती. संस्थेत कामाबरोबर चर्चाही होत. तिथे वसंताश्रमाच्या त्या मॅनेजर होत्या. याच ठिकाणी विमलाबाईंनी व बाबासाहेबांनी अखंड वाचन, लेखन केले. षड्दर्शनाचा अभ्यास कुरुंदकरशास्त्रींकडून केला. योगावरही इथेच अभ्यास व मनन केले. योगावरच्या पुस्तकाचे तर डॉ. बॅटीन बॉमर हिने भाषांतर केले. त्याच्या पाच आवृत्या निघाल्या. विमलाबाई सांगत होत्या की या ऑथेंटीक योगा-सारख्या पुस्तकाच्या पाच आवृत्या बघून मी थक्क झाले. वाटलं की जर्मन राष्ट्राला काय वेड लागलं कां ?" उपजीविकेसाठी कधी काही केलं नाही. पण या पुस्तकाने ७० ते ८० हजार रुपये दिले. १९७१ साली जेव्हा संस्थेतून आम्ही परतायचं ठरवलं. तेव्हा जे. कृष्णमूर्तींनी अडवलं. बुद्ध वाचायला लावला. त्याच्या चिंतनानेच पुढे बाबासाहेबांनी 'तथागत बुद्ध' हे पुस्तक लिहिले. बाबासाहेबांनी सुरुवातीला कादंबऱ्या लिहिल्या ! पण लवकरच ते कंटाळले. विमलाबाई विचारताच त्यांनी उत्तर दिले की 'मूल्यहीन जीवन जगायचे, आणि कादंबरीत मात्र मूल्यांचा गौरव करायचा' हे पटत नाही. म्हणूनच योगाकडे त्यांचे लक्ष गेले.

विमलाबाईंनी अनुभवातून, वाचण्यातूनच स्वतःचे जीवन घडवले. त्या म्हणतात 'माणसाच्या जीवनामध्ये असा एक चंचल प्रीतीचा काळ येतो पण सगळ्यांचेच प्रेम सफल थोडीच होते ? पण आमचे प्रेम नुसते नव्हे तर ६१ वर्षांचा जीवनप्रवास सफल झाला.' 'खुलल्या साऱ्या दिशा। सुगंध चोहीकडे' तसे त्यांचे जीवन सफल, सुपर्णीत झाले आहे. त्यांच्या मुलीने निर्मलाताईंनी

जेव्हा विनोबांच्या आश्रमात जाण्याचा निर्णय घेतला त्याही वेळेस आई म्हणून त्यांनी तिला हळवेपणानी निरोप न देता तिथे कसे वागशील याची दीक्षा दिली.

बनारसला असताना त्या म्हणतात, 'समोर १०० फुटावर गंगा वहायची. जिथे भगवान बुद्धाने स्नान केले त्या जागी १६ वर्षे या दांपत्याने बौद्धिक स्नान केले. उपनिषदात याज्ञवल्क्यावरोबर मैत्रेयीही वनवासाला निघते अशी कथा आहे. विमलाबाईंनीही तेच केले नाही कां ? जे. कृष्णमूर्तींच्या जीवनभाष्याचा सुबोध मराठीत अनुवाद केला. त्या सांगतात 'माझी व बाबांची फ्रेंच कॉमरेड्स् अशी रिलेशनशीप होती. आणि हेच नेमके जे. कृष्णमूर्तींना आवडत असे !' विमलाबाईंना भौतिक गोष्टींची ओढ नव्हती. म्हणूनच हे मानसिक वैभव प्राप्त झालं. त्या गंमतीने म्हणाल्या, 'एकदा बाबानां मी म्हटलं तुम्ही एकतरी साडी घेऊन दिलीत कां ? तर ते म्हणायचे किल्ली तर तुझ्याजवळ मग कशी घेणार ?' यातली गंमत सोडली तरी विमलाबाई व बाबासाहेबांच्या समाधानी वृत्तीचे दर्शन घडते. त्या म्हणतात 'माझ्या इतकं समृद्ध आयुष्य कुणी पाहिलं नाही, ऐकलं नाही की वाचलंही नाही.' "After all I am a cotton person" विमलाईंचे हे उद्गार ऐकले आणि त्यांच्या वैभवी व समृद्ध सळसळत्या आयुष्यापुढे साऱ्यांची जीवनं खुजी वाटू लागली. ■

अनुक्रमणिका

केशवसुतादिकांच्या प्रवाहाला मान्यता मिळूनही त्यांच्या काळात त्यापासून फटकून राहणाऱ्यांची एक समांतर परंपरा निर्माण झाली. ती संपून गेल्यावरही कितीतरी कवी या बंडखोर प्रवृत्तीपासून फटकून राहिले. त्यात 'बोवडे' यांचा समावेश होतो. त्यांच्या काव्याचे प्रस्तावनाकार अनिल म्हणतात, "केशवसुतांच्या सुधारणावादी व प्रतीतिधर्मी कवितेशी बोवडे कधीच समरस होऊ शकले नाही,...स्वत: बोवडे यांनी संस्कृत काव्याचा व साहित्यशास्त्राचा उत्तम अभ्यास केला होता. त्या परंपरेत मुरलेल्या त्यांच्या काव्याभिरुचीला केशवसुतांच्या बंडखोरीत रुचण्यासारखे काहीच नसावे हे साहजिक होते."[१]

यामुळेच आत्मपर प्रेमगीतांमध्ये जास्त काळ त्यांची प्रतिमा रमलेली दिसत नाही. 'सांगड', 'परिचय', 'अबोला', 'प्रिये खेळू खेळ', 'प्रीती', 'वचनभंग' इत्यादी कवितांमध्ये त्यांनी प्रीतीभावना साकार केल्याचे दिसते. त्यातही जीवाचे व्याकुळलेपण प्रतीत झाले आहे.

जरि असेच मानस होते
का दिलेस विश्वासाने
लोटण्यास चिरविरहात–सखे ग
का केलिस मजवर प्रीत ?

किंवा—

व्हावी दृष्टि सदृष्टि नकोशी । पहिले हे मानस होते का ?
नको परस्पर वारा पुढती । विचार हे तेव्हा होते का ?
परस्परांना हृदये देउनि । दोन मनेही केली एक
त्यांची सोलुनि साल काढणे । हे तेव्हा सुचले होते का ?

परंतु अशा दु:खी प्रेमगीतांच्या आळवणीपेक्षा शृंगारबहुळ उत्तान लावण्यांच्या निर्मितीत त्यांची प्रतिभा अधिक रमते. 'नको ग मारुस मुरके', 'आज पौर्णिमा मुखचंद्राची', 'पिवळी कवळी कळी चाफ्याची', 'सोन्याचा खंजीर उरी', 'छुम छुम छननन' इत्यादी लावण्यांमधून त्यांनी आपल्या निसर्गदत्त वृत्तीला वाट मोकळी करून दिली आहे. 'थम रजनी' या कवितेत तर या वृत्तीचा उत्कटत्वाने त्यांनी विकास केला आहे.

श्रीनिवास रामचंद्र
ऊर्फ
अण्णाजी बोवडे

जुन्या पिढीतील
एका ज्येष्ठ
वैदर्भीय कवीच्या
व्यक्तित्वाविषयी
सांगोपांग
चर्चा करणारा
लेख

: डॉ. अक्षयकुमार काळे

अनुक्रमणिका

जी जी तत्त्वे खचुनि भरली वेदवेदांतपृष्ठी
ती नारीच्या विहरति सुधासारधाराधरोष्ठी

अशी दृष्टी असणाऱ्या बोबडयांच्या काव्यात प्राचीन लावण्यांतील उत्तानतेचे दर्शन घडते. पण त्यांची कविता ग्राम्यतेकडे झुकत नाही. काही लावण्यांना तर निरुपम भावगीतांचे स्वरूप झाले आहे. विशेषतः प्रियाची आळवणी करणाऱ्या दुःखी नायिकांच्या भूमिकेत शिरून रचलेल्या लावण्या म्हणजे बोबडयांची अप्रतिम नाटयगीतेच आहेत. 'सख्यारे। किती पाहशील प्रिती' किंवा 'नयन शराचा घाव घातला', इत्यादी लावण्या याची साक्ष देतात. यात आधीची उत्तानता विरून गेली आहे व तिने व्याकुळ प्रणयिनीच्या हृदयाविष्काराचे रेखीव रूप धारण केले आहे.

निसर्गचित्रणातही बोबडे सिद्धहस्त आहेत. "कुरंगाच्या पाठीवर चपल हेमंत फिरूनी। दिगंताची शेते हसवि वर सोने उधळूनी" किंवा "सुखाने हा आनंदित शिशिर झाकूनि नयन। धुके आच्छादुनी दुलइत करी गाढ शयन" अशी शब्दचित्रे, ते काढतात. परंतु या शक्तीचा विकास त्यांनी पुढे फारसा केलेला दिसून येत नाही.

'जय जय भारतवर्ष', 'भारतवर्ष रणगान', 'सर्वदा हिंद देश हिंदुंचा', 'हरहर महादेव', 'हिंदुस्थाना !' इत्यादी कवितांमधून त्यांनी राष्ट्रीयवृत्तीचा परिचय घडविला असला, तरी प्रेमपर गीतांमधला जिव्हाळा आणि आत्मप्रत्ययाची जाणीव त्यामध्ये फारशी नाही. विशाल ध्येयदर्शित्व आणि वृत्तीगांभीर्य बोबडयांच्या प्रतिभेला फारसे मानवणारे नाही. त्यापेक्षा विनोद-विडंबनाची त्यांच्या प्रतिभेला आवड आहे. मात्र 'प्रणयी जोडपे', 'प्रणयाच्या तीन तऱ्हा', 'मस्त पत्नी प्रेम', 'हृदयेश्वर', 'अरे ! आला कवी', 'प्रीतीचा संसार' इत्यादी विनोदी कविता त्यांनी लिहिल्या असल्या, तरी अत्र्यांनी आपल्या विनोदी गीतांत साधलेले बुद्धिचातुर्य आणि कल्पनाविलास बोबडयांना फारसा साधलेला नाही.

आशयदृष्टया बोबडयांच्या कवितेला आणि प्रतिभेला अनेक पैलू असले, तरी त्यांचा विकास विकास साधण्याकडे बोबडयांचा कल नाही. म्हणून प्रेमापासून अध्यात्मापर्यंत सर्वच विषयांवर रचना करून एक शृंगारिक कविता सोडल्यास त्यांच्या कवितेत बाकीच्या पैलूंचा फारसा विकास झालेला नाही. शैलीच्या दृष्टीने बोबडयांच्या कवितेचा विचार केल्यास संस्कृत काव्याच्या परिशीलनामुळे संस्कृत काव्यसंकेतांची छाया बोबडयांच्या शृंगारकवितांवर असल्याचे दिसते. शाहिरी वाङ्मयातील, विशेषतः लावणीतील शैलीच्या खुणा जागोजाग त्यांच्या कवितांत दिसतात. शृंगारबहुल लावण्यांमध्ये प्रासादिकता प्रसन्नतेचा हात धरून सहजगत्या त्यांच्या काव्यात अवतीर्ण झाली आहे. बोबडयांची शब्दकळा राष्ट्रीय काव्याच्या संदर्भामध्ये काहीशी ओजस्वी होते; तर प्रेमपर गीतांमध्ये नाजूक आणि नादमधुरतेचा साज अंगावर चढविते.

भावनांच्या आंदोलनाला समतोलपणे हाताळणे आणि रेखीव शब्दांत क्रमाक्रमाने कल्पनाविकास साधत जाणे या काव्यकारागिरीच्या पैलूंचे दर्शन बोबडयांची प्रेमकविता वाचताना सहजी होते. ■

---

१. श्रीनिवास रामचंद्र उर्फ अण्णाजी बोबडे. जन्म : ५ नोव्हेंबर १८८९. मृत्यू : ५-१०-३४. जन्मस्थल— चंद्रपूर. प्राथमिक शिक्षण चंद्रपूर येथे. पुढील बी. ए. पर्यंतचे शिक्षण नागपूर येथे. १९२६ साली वकिलीच्या परीक्षेत उत्तीर्ण. १९३१ साली पहिल्या वर्गाच्या वकिलीची सनद काढून नागपूर येथे ज्युडिशियल कमिशनरच्या कोर्टात मरेपर्यंत वकिली.

सक्षम काव्यरचनाकाल : १९१५ ते १९२५.

काव्य : बोबडे यांची कविता, प्रकाशनवर्ष १९३७.

२. 'अनिल' आत्माराम रावजी देशपांडे, प्रस्तावना : बोबडे यांची कविता पृ. ११.

कथा

मालतीसुद्धा 'दलित महिला मुक्तिमंडळा'ची एक सदस्य होती. पण मंडळाच्या कार्यक्रमात ती नित्यनेमाने जाऊ शकत नसे. सवड मिळाली तरच एखाद् दुसऱ्या मिटिंगला अथवा कार्यक्रमाला जायची. तिला 'इन्टरेस्ट' नव्हता, असे नाही. आपण गेलो नाही... जात नाही... जायला हवं, ही मनात रुखरुख असेच. पण मुद्दाम वेळ काढून जायला फुरसत मिळेल तर ना? सगळं जिकिरीचं, धावपळीचं जीवन बनलं होतं.

सकाळी घरातलं काम, नवऱ्याची, मुलांची तयारी. ऑफिसची, आपली तयारी. संध्याकाळी उशिरापर्यंत ऑफिस–काम. कामाच्या धांदलीत इतकी व्यग्र असायची, की मागाहून डोक्यात नुसता वैताग फणफणायचा. मनातला शीण, कंटाळा रोज हुरहुरीच्या सुपाने पाखडीत भुर्रकन् उडून जाणाऱ्या सुखाच्या क्षणाला चिमटीत पकडून आयुष्य वेचण्याचा तिचा प्रयत्न चाललेला. कामाच्या घाईमुळे हात–पाय– डोळे सदा तुरतुरलेले. सकाळचा उत्साह संध्याकाळपर्यंत सरून जायचा. शरीर–मनाने फुग्यासारखी विरून जिरून घरी यायची ती. मुंबईसारख्या महानगरीत सर्वसामान्य जीवन असे यंत्रवत् व संत्रस्त न बनले तरच नवल! आयुष्याचा एकेक पळ उचलून पळणारा दिवस मालतीच्याही उरापोटी लागून रोज काही ना काही चिंता–ग्रस्तता देऊन मावळायचा. आपली, नवऱ्याबद्दलची, लेकरांची, घरची–दारची काहीना काही घरघर लागलेलीच असायची.

त्यांचे सामाजिक हक्काचे आंदोलन अखेर पेटले होते... लढाई–झगडा, दंगली, जुलूस, मिरवणुका. अटक, जेल! आणि तसेच झाले, बहुधा होत असे, तसे. इतर अनेक साथीदारांबरोबर माणिक खापर्डेसुद्धा 'अरेस्ट' झाला होता. तो काल दहाबारा दिवसानंतर सुटून आला. त्याने बायकोला घडलेल्या घटना ऐकवल्या. मंडळींनी कसा–कसा प्रतिकार दिला, झालेली कारवाई कशी पक्षपाती व अन्यायकारी आहे, त्यांचा पुढचा धाडशी कार्यक्रम कोणता,– वगैरे सांगितलं. ऐकून मालतीच्या अंगावर रोमांच उठले. आणि कितीतरी वेळ अंतःकरणात चीड–आवेशाचे झणकार उठत राहिले.

नवरा आला त्या खुषीत असेल किंवा आज मुक्तिमंडळाच्या कार्यक्रमाला परस्पर तिकडूनच जायचे मनात कुठेतरी घोटाळत असावे, म्हणून असेल, तिने ऑफिसला जातानाच मनात तीही तयारी केली. कदाचित, घरी यायला मग वेळ मिळणार नाही. म्हणून आज तिने जरीची जांभळी साडी काढली. ती माणिकला खूप आवडत असे. आधीच गोरीसुंदर मालती तिच्यात आज अधिकच उजळ नि डोळे फोड दिसू लागली.

आज शनिवार–हाफ डे!

बहुधा रोज ओढलेल्या–आकसल्या चेहऱ्याने येणाऱ्या मालतीचा आज उत्साहात उगवलेला दिवस बघून दप्तरातल्या लोकांना थोडे आश्चर्यच वाटले. तिच्याशी सहसा फालतू न बोलणारी बाबूबाबू मंडळी जरा चेवात येऊन हसू–बोलू लागली. काहीजण तिच्याजवळून जाण्याची या ना त्या निमित्ताने जाऊन बोलण्याची संधी साधू लागले. पण मग एकाएकी 'नीचे मुंडी–पीन डॉप सायलेन्स!'... फटकन् 'मूव्ह' झाली आणि सगळी मंडळी आपापल्या जागी कामाच्या पोझिशनमध्ये विराम पावली. उगाच मूड आणून कामात मग्न असल्याचे दाखवू लागली.

...बॉस आला होता ना!

मालतीच्या सेक्शनचा बॉस. तडक्या–कडक

मुलाखत

योगेन्द्र मेश्राम

अनुक्रमणिका

शिस्तीचा एक दरारेबाज माणूस. सगळा स्टाफ त्याच्या स्टॅण्डर्ड रुबाबाच्या स्टॅण्डर्ड शिस्तीमधे कसा सुतासारखा सरळ झाला होता, म्हणे! दबकून वागत होता. ऑफिसला वेळेवर येत होता आणि पाचदहा मिनिटांनी उशीराच घरी जात होता.

एवढं सारं. तरीसुद्धा स्त्रीदाक्षिण्य वगैरे भरपूर होतं म्हणे सायबाजवळ. स्टाफमधल्या तरुण सुंदर पोरी व देखण्या बायांच्या बाबतीत तो चांगलाच दिलदार–उदार–मुलायम वगैरे वगैरे...

त्याने रोजच्यासारखं मालतीला आपल्या केबीनमध्ये बोलावलं. आपल्याच तालात ती गेली–गालात स्मित वगैरेच्या एका मूडात. पण त्यामुळे नकळत तिच्याकडनं सायबाला 'लिफ्ट' मिळून गेली.

"ओह, प्लीज कम इन् मालती. आय् एम् व्हेरी ग्लॅड टू सी यू. हॅव अ सीट!" तिच्या आज विशेष उठून दिसणाऱ्या चर्चेकडे–डोळ्याकडे नजर लावून पाहत तो मोठ्या मुलायम भाषेत म्हणाला,

"मी कामाबाबत फार काही सतावत असतो, असं तर नाही ना? निदान तुम्हाला तसं वाटू नये!... खरं म्हणजे आम्ही खूष आहो तुमच्या सिन्सियर वर्क–बद्दल. तुम्हाला– म्ह–म्हणजे तुमच्या प्रमोशनचासुद्धा आम्ही विचार केलेलाय. एकदा फक्त तुमची बडया सायबांच्या समोर मुलाखत तेवढी व्हायचीय्. झाली की– झाले! लवकरच, बहुतेक पुढील हप्त्यामध्ये घडवून आणू बरं का, पण हे सिक्रेट ठेवा बरं! तुम्ही म्हणून सांगितलं." तो सिगरेट पीत धुव्व्याच्या वलयांमधून तिच्या चेहऱ्यावर नजर रोवून बोलत होता.

–आणि तो आज नाकाबाहेर तार लोंबल्याप्रमाणे वाहवत जाऊन जास्तच चेकाळत बोलतोय बघून ती मग आपली 'जुनी' होऊन म्हणाली, "सर मला बोलवलंय ना तुम्ही,... काम?"

"एस्. एस्–आय नो इट् बट्... तुमच्याबद्दलची ही खबर आयकून आनंद नाही झाला?"

तो तिनं काही बोलावं म्हणून चेहऱ्यावर प्रतिक्रिया, पाहत थांबला, क्षणभर. पण तिचा गंभीर होत गेलेला मूड बघून तो पुन्हा म्हणाला,

"तुम्ही विश्वास ठेवा, मिसेस मालती खापर्डे, यावेळी तुमचं लक फेव्हरेबल आहे. काही त्रास पडणार नाही. लवकरच... बरं, मी जातीनं बघतो ते तुमच्या प्रमोशनचं–बरं का! मग तर झालं? हं, ही घ्या. ही नवीन केस तयार ठेवा टाईप करून ...अं, तशी घाई नाही. सावकाश करा... आणि बरं का... काय म्हणत होतो... अं, बरं जाऊ दे. मग पाहू."

–ती फाईल घेऊन तडक आपल्या जागेवर जाऊन बसली. मनात पुटपुटतच... आज इतका कसा पुळका आलाय याला आपला! म्हणे प्रमोशन! मृणाल बागडदेव, शरयू सवनीस ह्या तिच्याचबरोबर लागलेल्या पोरींना प्रमोशन देऊन पुढच्या सेक्शनमध्ये ढकलणारा हाच तो बॉस होता.... आता याला काय म्हणावं! मागेही अशीच थाप मारत होता. म्हणे मुलाखत... प्रमोशन फूस दावून बतावणी करून बनवू बघतोय, बाचक्या मेला!... मालतीला खूप राग आला होता. त्याला ती चांगलं ओळखून होती. त्याचा लाळघोट चावटपणा पाहून आज ती त्याला जवाब देऊ इच्छित होती. मनात आलंही, पण सावरलं होतं. अशीच ती स्वतःला सावरून, सांभाळून वागत आली होती. सी. आर. खराब करील, एखाद्या वेळी. काय वाटेल तो हिंगाची हिरोती चार्जशीट इश्यू करील किंवा मलतोकडेच ट्रान्सफर देईल, या अशा भीतीमुळे ती निमूट राहत होती. घर संसार डोळ्यापुढे उभा राहत होता–

–जीवाचा आटापिटा करून शिरावर म्हाताऱ्या सासूसासऱ्यांसह सहा लोकांचा भार सांभाळायचा. मुंबईसारखं शहर आणि ही महागाई! शिवाय माणिकची– तो सामाजिक चळवळीत घुसल्यामुळे बेभरवसा झालेली नोकरी. सध्या तर सस्पेन्डच होऊन घरी होता. –कितीदा अटक, किती केसेस अंगावर! एक ना दोन भानगडी नेहमीच्याच... एक पाय सदा जेहलात! – उद्या काय? उद्याचे प्रश्न सोडवायचे. पोरांचे उद्याचे भविष्य घडवायचे. पुन्हा लेबर कॉलनीतलं जिणं. घाणीत वळवळणाऱ्या किड्याप्रमाणे ती माणसं. त्या प्रत्यक्ष नरकवासातून माणसाचे 'निर्वाण' उभारायचे. डोंगरमाथ्यावरील हवेशीर बंगल्यात वा देवळात दिवा लावून उजेडात उजेड पाडणं किती सोपं! इथे तळागाळात पेटलेल्या धगधगत्या जीवनाला हाती धरून वर आणायचं– काय खेळ

असतो ?... हे सारं चित्र तिला दिसायचं, आत-बाहेरची रखरख व त्यामधून चालणाऱ्या माणिकची दगदग तिच्याही मनात रुतून वसायची. त्यात हे ऑफिसरांचे पुतनामावशीचे धोरण. वेगंडी. नुसते दाखवेपण. त्याच्या आत–

ती आपल्या बॉसच्या फुसक्या बडबडीकडे म्हणूनच फुकट लक्ष देत नव्हती; वा त्याला कसला 'रिस्पॉन्स' देत नव्हती. या ना त्या कारणाने तो आतल्याआत जळफळत राहायचा. पण दाखवायचा नाही. प्रत्यक्षात कामाचा लकडा लावून तिचा 'मूड' घ्यायचा. येऊन जाऊन डिक्टेशन न् पेपरामागून पेपर्स ढिगाने टाईप करवून घ्यायचा. तो त्यासाठी कधी तिला 'डिटेन्ड'सुद्धा करीत असे.

या साऱ्या कामाच्या तगाद्यामुळे ती थकून–त्रासून जायची. डोळे फाटल्यासारखे चळचळायचे. डोकं सुन्न व्हायचं. दुखू लागायचं. कंवर–छातीत सल उठायची. आणि हलवून हलवून बोटं मुंग्या आल्यासारखी लुळी–निर्जीव पडायची. संध्याकाळी घरी मग पडला फाटा उचलण्याचं त्राण राहायचं नाही. तरी भान ठेवून तिला नाईलाजाने सगळं करावं लागायचं. सांगेल कोणास ?

काल असंच झालं. संध्याकाळी ती इतकी थकून भागून घरी गेली होती, की––तिला माणिकचा रात्रीचा खट्टू झालेला चेहरा आठवला...

रात्री झोपल्या झोपल्या बायकोजवळ तो आपल्या एकेक घटना सांगत होता. ऐकता ऐकताच तिला केव्हा झोप लागली, कळलेच नाही. त्याने एका कडावर होऊन हातानं टिवसलं–– "मालू, ए-झोपलीस ? अगं, ऐक नं...मालू–ए–ए, जरा उठ नं. हे काय बरं ! मला..."

तिने आवाज दिला नाही. ढर्रा झाली होती. चेहऱ्यावर शीण उमटला होता. तिचा मलूल–सुंदर चेहरा तो टक लावून पाहत राहिला...झोपेत उघडया पडलेल्या नितळ गोऱ्या मांडया आणि पोलक्यातून डोकवणारे टच्च् स्तनं...सुंदर !...तो उठला. बाजूलाच असलेल्या तिच्या खाटेवर बसून हळुवार होत, मधुर स्वरात किलबिलला––"मालू, एऽमालू–जरा उठशील ? अग–अग, ए–" म्हणत दंडाला धरून कुरवाळत हलवू लागला. आळवू लागला––"मालू, मालू, ए–मालू–? अग ए–च्या आयला !"

तिने किंचित हालचाल केली. तसा तिच्या कानाशी तोंड नेऊन तो धीरे, गंमतीने म्हणाला– "काय, उठतेस नं ?–की थोडा बलात्कार करून घेऊ ?...त्याच्या–आयला ! अगं, जागी हो नं ? आजकाल, बरं का, हे बलात्काराचं, सत्रंच तर... मग उठ !"

'ब–ला–त्का–र !...आई गऽऽ–' झोपेतून तिच्या पापण्या किलकिलल्या. पण बोलता आलं नाही...ओठावर घट्ट टेकलेले ओठ हळुवार हटवून प्रेमळ नकार देत ती म्हणाली, "नको ना रे, माणिक ! राजा...प्लीज...आज–आज नको वाटतं. थकलेय खूप...असू दे, प्लीज माफ कर... उद्या की नाही...हं, उद्या–" झोपेच्या भ्रान्तीतच ती बोलली. पुन्हा पापण्या जड झाल्या, घट्ट.

माणिकचा विरस झाला. मग दिवा विझवून तो 'मूक' मारत निद्रेची आराधना करू लागला.

–काम करता करता आता मालतीला माणिकचा प्रेमोत्सुक शोक–भावनेने वठलेला सकाळचा पारोसा चेहरा आठवला आणि तिला फार 'फील' होऊ लागलं...हप्त्या–पंधरवाडचा-तली त्याची 'इच्छा' आपण टाळायला नको होती. किती प्रेम करतो तो ! रात्री ते त्याला आपण द्यायला हवं होतं. त्यानं रात्री समजा, बलात्कार केला असता तरी नवऱ्याचाच होता ! ...तसा हक्काचा! प्रेमाचा म्हणून...पण तत्त्वावर जगतोय म्हणून अन्याय–अत्याचाराविरुद्ध लढू शकतो...किती चांगला आहे !...तिला आता पस्तावा वाटला. नवऱ्याविषयीच्या प्रेमाने तिचा ऊर दाटून आला...

चपराशाने केबीनकडे इशारा करत मालतीला पुकारलं. दफ्तर सुटायला आता अधिक वेळ उरला नव्हता. ती तयारीनं पेन्सिल–पॅड घेऊनच गेली. साहेबानं लांबलचक डिक्टेशन देणं सुरू केलं. ती खालच्या मानेनं घाईघाईनं घेऊ लागली...तो यावेळी बराच अडखळत होता. त्याची सिगरेट मात्र सारखी सुरू होती. तिचा सुगंधित धूर स्टायलीशपणं फेकत होता आणि त्या धुराच्या

थलयातून तो आता बिनदिक्कतपणे तिच्या सर्वांगा- वरून नजर फिरवीत होता...चेहऱ्यावर...गळ्या- खाली...छातीवर आणून स्थिर करीत होता. अडखळत मधूनच वेगळं काही बोलायसाठी करत होता. पण त्याचवेळी तिचा पूर्ववत् आकसलेला आणि करारी चेहरा बघून तो मनात विरूनही जात होता.

मालतीच्या हे त्याचं बघणं लक्षात आलं होतं, तशी ती स्वत:ला आणखीच घट्ट करीत होती. इत:पर, त्यानं काही जादा केलंच, तर त्याला एकदाचा आपण चांगला धडा द्यायचा, असंही तिच्या मनात येऊन जात होतं. पण तो...मग तो बावचळतच गेला. डोळ्यात चमक अन् शब्दात, हालचालीत एक धुंदाकर्षक पण घाबरट अशी बारीकशी थरथर...

—मग तिच्या एकदम लक्षात आलं, की आज शनिवार—हाफ डे, ऑफिस सुटून सर्व लोक निघून गेले होते. "सर, एक्स्क्यूज मी. बराच वेळ झाला. मी जाते."

"एस्, यू क्यान—वट् हं, तुमच्याबद्दल मघा मी फोन लावलाय, बरं सायबाला...बरं का ! काम होईल ! बरं...आज थोडा उशीर होईल तुम्हाला...बस, दहाएक मिन्टं. अं, एक मोस्ट अर्जन्ट राह्यलयं थोडं. प्लीज, इफ् यू डोंट माईन्ड...मिसेस मालती, आणखी...जस्ट् फॉर फ्यु मिनिट्स, प्लीज." म्हणत त्याने चटकन् बेल दावली. चपराशाला कॉफी आणायला बाहेर पाठवलं. आणि उगाच काही तरी हवं— नको ते 'डिक्टेट' करू लागला...मिनिटभर !... करता करता उभा झाला. फाईल चाळण्याच्या निमित्ताने बोलता बोलताच रॅकच्या बाजूला मालतीजवळ आला. आणि—

काही वेळाने चपराशी स्वत:च कप—केटली घेऊन दुसऱ्या माळ्यावरील त्या साहेबाच्या केबीनमध्ये आला. तेथे काहीतरी 'घापला' झाल्यासारखा त्याला दिसला...म्हणजे मालतीबाई काही तेथे दिसली नाही. पण दोनतीन फायली भिरकावून फेकल्यागत खाली उलटया—तिलटया पडल्या होत्या. फॅनच्या हवेने निर्जीव पानं फडफडत होती. आणि काय झालं काय नाही, भानावर नसल्यासारखा साहेब घामाघूम होऊन—पडलेला चेहरा घेऊन केबीनमध्ये येरझारा घालीत होता... चपराशी आलेला पाहून मग त्याला कॉफीचे भान झाले, तसाच तो उसन्या रुबाबात खुर्चीत जाऊन बसला.

त्या चपराशाला आधीपासनंच त्याचा 'साहेब' ठाऊक होता. तो आता चोरटया नजरेने व काहीशा नवलाने सायबाच्या जोडा हाणल्याप्रमाणे (चप्पल तर पडलीच असावी, ही त्याची खात्री)— झालेल्या तोंडाकडे कपात कॉफी ओतता ओतता बघत होता. त्याला गालात हसू येत होतं जे समजायचं, ते तो समजला होता...

आणि इकडे बसस्टॉपवर उतरून मालती आता वस्तीच्या रस्त्याने मनात खदखदत जात होती. तिच्या चिणगारलेल्या डोळ्यापुढे वारंवार तो साहेब दिसत होता. त्याचे वासनाधुंद—लालबुंद तोंड विजेरी फटक्याने रक्त खिचावे. त्याप्रमाणे आपण कसे पांढरेफट्ट पाडले, ही मनात सारखी येणारी आठवण तिला समाधान देत होती. आपला अभिमानही वाटत होता. एखाद्या मदमत्त 'चित्तरा'ला चित्त्याप्रमाणे फाडून खाणाऱ्या माणिकची तिला आठवण येत होती. आणि रात्री त्याला टाळल्याच्या भावनेने आता त्या साहेबा- बद्दलची राग—चीड उरात अधिकच उसळून येत होती. आणि तिच्यातले शील—तेज स्वाभिमानाने उचंबळत होते. एक नवा जोम संचरत होता. एक दृढ निर्धार...

तो साहेब काय किंवा त्याच्यासारखे दलित— अगतिक जीवावर जोर—जुलूम जबरदस्ती करणारे अन्य मत्त माजोर माणसं काय—त्यांच्यासाठी इथे— तिथे आता झगडायचं...हक्कासाठी ! इज्जत- मानानं जगायचं व जगायला सांगायचं. असल्या कुणाला डरायचं नाही !...

× × ×

मनात सारखं हेच चाललेलं. तेच ते आणि असा विचार करीतच आपल्या एका मन:स्थितीत ती विजयी मुद्रेने जात होती. तिचं चालणंसुद्धा रोजच्याहून अधिक वेगानं नि तडफदार वाटत होतं.

मालती लेबर कॉलनीत येऊन पोहचली घराच्या गल्लीकडे पाऊल वळले नाही, तोच तिला चटकन् आठवण झाली,...अरेच्चा ! आज आपल्या महिला मुक्तिमंडळाची तीन वाजता 'मुलाखत' ठरली होती. पत्रकार येणार होते, तर ! सुरुही झाली असेल. आपल्याला यायला उशीर झालाय. नसता झाला, पण....तो साहेब पुन्हा डोळ्यापुढे येऊन गेला....आणि तिची नोकरी,–कदाचित सुटणार असलेली. पण मालतीला यावेळी कशाचीच पर्वा नव्हती. ती घाईघाईने मंडळाच्या कार्यालयाकडे वळली.

या दोनतीन दिवसांपूर्वीचीच ती घटना. मुंबई परिसरातल्या एका झोपडपट्टीत एक भयंकर अमानुष असा सामूहिक बलात्कार एका विवाहित तरुणीवर घडला होता. अगदी चाकुछुऱ्यांचा. नवऱ्याला व दीराला जखमी करून....बांधून ठेवून त्यांच्या डोळ्यादेखत–

त्या प्रकरणी महिला मुक्तिमंडळाने आता धाडसी व जबाबी पवित्रा उचलला होता. स्त्रियांचा एक आगळा उपक्रम म्हणून सगळ्या लोकांचे लक्ष लागले होते. त्यांचा उद्या मोठा मोर्चा निघणार होता. त्या मोर्चासंबंधानेच आज मंडळाच्या मुलाखतीस्तव पत्रकार–परिषद भरली होती.

मालती जाऊन पोहचली, त्यावेळी कार्यालयात मुलाखत ऐन चाललेलीच होती. बहुतेक लोकप्रिय प्रस्थापित दैनिकांचे पत्रकार, अनेक लहानमोठे कार्यकर्ते, इतरही संस्था–मंडळाचे स्त्री–पुरुष सदस्य लोक असे सर्व तेथे जमलेले पत्रकार प्रश्न विचारत–नि उत्तर टिपून घेत होते–

"बरं, तुमच्या या मोर्चामागील हेतू–म्हणजे परिणामाच्या दृष्टीने नेमकं काय साधायचं आहे ?"

"स्थितिप्रिय नि सुस्त प्रस्थापितांची झोप उडावी आणि डोळे झाकून पाहणारांचे ढोंग उघडे पडावे. एकूण माणुसकीला आव्हान व आवाहन आहे आमचे."

"तुमचा एकूणच हा लढा–"

"अन्याय आणि अत्याचाराविरुद्ध."

"पण केवळ–?....अगोदर त्याचे मूळ शोधले पाहिजे, नाही का ?"

"येथील धर्म–रूढिग्रस्त प्रवृत्ती आणि सत्ताधारी वर्चस्ववाद्यांची शोषणवृत्ती पोसणारी ही समाजव्यवस्था आधी तोडमोड व्हायला पाहिजे आहे."

"ती एकदम कशी मोडता येईल, सांगा ?"

"इथल्या भल्या भल्या बेशरम प्रवृत्तीला काही शरम आली तर !... पण...तिकडे झाड वाफू दे, आम्हाला मात्र दलित जीवनाचं अस्तित्व पहिल्यांदा सिद्ध करायचंय."

"अरे व्वा !....मुळात जे आहे आणि तेजस्वी आहे म्हणता, त्याला नव्यानं सिद्ध करायची जरूरी काय ?"

"नाही, दलितांची – राजकारणाच्या खेळी खेळून न् त्यातूनच दंगली, अत्याचार घडवून अस्मिता डागाळण्याचा व त्यांना अस्तित्वहीन करून ठेवण्याचा स्थितिप्रिय लोकांचा अजूनही पद्धतशीर प्रयत्न चाललेला असतो, म्हणून."

"असं तुम्हाला वाटतं."

"तुम्हालाही वाटावं. इथेच तर ही डोळेझाक चालली आहे असं तुम्हाला नाही वाटत ? पत्रकार महाशय, हे 'फील' तुम्हा लोकांनाच पहिल्यांदा झालं पाहिजे."

"चला, हे 'फील' घ्या, आणि विषयावर या !"

"हो–हो, या–या !!"–एका बाजूने पत्रकारांचा गिल्ला, क्षणभर हासूंचा फवारा !...'होऽ होऽहोऽऽऽ–फील–फील !! '...

"हे 'फील' आजवर पुष्कळ झालं. आता सिरियस घ्यावं."–मंडळातील एक रोकड आवाज. त्याबरोबर हॉलमध्ये पुन्हा गांभीर्य.

"बरंय, तुमचं 'फील' आम्ही स्वीकारतो. आता हे सांगा, स्त्री म्हणून तिच्यावर होत असलेल्या बलात्काराची वासनाप्रवृत्ती आदिमच आहे, नाही का ? त्यात 'दलित' स्त्रीसुद्धा अपवाद नाही. तेव्हा ही 'जनरल'....म्हणजे सामान्य बाब आहे, असं का घेत नाही तुम्ही ?"

"म्हणजे–?... हो, पण ही सामान्य आणि नुसती 'बाब' नाही, तर आज समाजापुढे उभी

असलेली भयंकर मोठी समस्या आहे, असं तुम्ही का मानत नाही ? यातूनच सामान्य व विशेष यामधलं अंतर आम्हाला दिसते."

–थोड्याच वेळापूर्वी येऊन बाजूला ऐकत उभी असलेली मालती खापर्डे आता पुढे होऊन धीटपणं म्हणाली, "तुम्ही ही 'समस्या' मानत नाही, याचा अर्थ तुम्हा लोकांवर प्रत्यक्ष बरसत नाही. तुम्ही आपले काठावर कोरडे हात झाडत राहता. म्हणून बलात्कार ही तुम्हाला सामान्य आणि साधी 'बाब' वाटते.... दलित स्त्री म्हणजे कमजोर, दीन, लाचार, अबला म्हणून तिच्यावर कोणीही हात टाकण्याची हिंमत करतात. ही वस्तुस्थिती आहे. दलित स्त्रीसाठी म्हणूनच ही सामान्य नाही,–भयंकर गोष्ट आहे. हे आम्हाला दिसते. आम्ही समाजात पाहतो – अनुभवतो आहोत...आणि तुम्ही लोक आंधळे आहात! म्हणून तुम्हाला हे दिसत नाही. पाहाता येत नाही."

आता पत्रकार चपापले आणि त्या भारी पडलेल्या तरुणीकडे आश्चर्याने व कौतुकाने पाहातच राहिले...मालती आवेशात येऊन पण संयत स्वरात बोलत होती —

"दुसरं त्याचं असं आहे, की वरिष्ठ–प्रतिष्टांच्या खूप घरंदाज नि खूप मॉडर्न म्हणजे अत्याधुनिक किंवा अती फॉवरर्ड सूना–लेकोला– आपली इज्जत गूपचूप राखण्यासाठी म्हणाना– एखाद्या 'प्रिय' लांडग्याची वासना धुडकारणे, त्याचे मन मोडणे जे पाप वाटते असेल, तसे दलित स्त्रीला वाटत नाही. ती त्या वासनेला आपल्या चप्पलाखालीच तुडवते. ती आपल्या स्वत्व व अस्तित्त्व–रक्षणाबद्दल आता जागृत झाली आहे. ती कडाडून विरोध करते, म्हणूनही दलित स्त्रीवर मग जोरजुलूम, बलात्कार होतो. बहुधा सामूहिक वगैरे...."

मालती थांबली. तिचं लाजवाब व जोरदार वक्तव्य पाहून मंडळाच्या इतर पोरींमध्ये आता नवा उत्साह संचरला.

"दलित स्त्रीच्या संदर्भात त्या मदमत्त हैवानकीचं असंच झाड झालं, होऊ दिलं गेलं, तर आमचीही मर्द माणसं पेटून उठतील, अशी की– बलात्काराला बलात्कारानेच ती जवाब देऊ लागतील. आणि तेव्हा–"

मध्येच– "गंभीर– गंभीर !!" असा पत्रकारांचा आवाज.

"हे तुम्ही गंभीरच घ्यावं ! आम्हाला आता संघर्ष केल्याशिवाय–"

"होय, आता यापुढं आमचं संरक्षण आम्हालाच करायचंय. त्याचंच प्रतीक– हा मोर्चा !– हा संघर्ष... मरून वा मारून !" –मालती म्हणाली. त्यावर —

"होय, आता जीवनमरणाचा हा संघर्ष छेडलाय आम्ही !"

"आम्हाला तो करायलाच पाहिजे !"

"होय करायलाच पाहिजे !!"

"तेव्हाच वठणीवर येईल, ही माजलेली धरती—"

"अन् लेकरं सूर्याची तेव्हाच कवेत घेतील, ओथंबून प्रेमाने !"

–असे काही आवेशी स्वर कोरस म्हटल्याप्रमाणे एकामागोमाग एक उमटले. वातावरण आता एकदम गंभीर... शांत... सुन्न झाल्याप्रमाणे. सर्व पत्रकार पाहतच राहिले.

"धन्य आहात तुम्ही ! पण... पण तुम्हा स्त्रियांच्या तोंडी ही मरण्या–मारण्याची भाषा ! बापरे बाप ! तुमच्यांतसुद्धा असं काही मोठं उगवलेलंय, की— आम्हाला हे खरोखर नवं आहे. हे विशेष आहे... तुम्ही बोला, भगिनींनो, सांगा, शेवटी तुम्हाला काय सांगायचं आहे ?"

"पुष्कळच. या जगाला ओरडून सांगायचं आहे, की– कुठवर, कुठवर या स्त्रीनं आपल्या शील–सर्वस्वाचा बळी द्यायचा ? कुठपर्यंत तिनं नुसती भोगाची बाहुली बनून राहायचं ? जन्म कंठत– ?

"कुठपर्यंत तिनं हे दास्य भोगायचं ?– ती गुलाम– पुरुषाची– ! समाजाची– व्यवस्थेची ! –कुठपर्यंत राहायचं तिनं गुलाम ?

"त्यात दलित स्त्री ही तर गुलामाची गुलाम ! नरकाची खाण !— दैन्य–दु:ख–अवदशा–लाचारी... साऱ्या अधोगतीची मालकीण म्हणजे दलित स्त्री !— कुठवर तिनं असं आपल्यातल्या

तेजाला अंधारगर्भातच गोठवून– कोंडून ठेवायचं? त्याला कुजवायचं न् तडफडत मारायचं ?

"आता तिला तसं करायचं नाही. काहीही सोसायचं नाही.

"आता तिनं अगणित सूर्यबिंबांना प्रकाशाच्या गर्भात सामावलेलं आहे.

"ती आपल्या स्वत्वाची नि स्त्रीत्वाची आता स्वतःच रक्षणकर्ता आहे !

"ती तेजस्विनी आहे. शूर, बाणेदार– मानिनी आहे !

"तरच, जात, वर्ण–वर्चस्वाची, विषमता–भेदभाव–अस्पृश्यतेची दलित स्त्री वैरिणी आहे !

"आणि ती तर आजच्या आमच्या युद्ध–चळवळीच्या शक्तीमागची मूळ पावतीच आहे !

"हो हो– हो, हे एकदम– ! हो–हो, हे सगळं काही आहे, हे मान्य आहे, बावा ! पण हे सगळं जरा काव्यात झालं... उद्या प्रत्यक्षात काय ?–

पुन्हा एकदा ते सर्व पत्रकार लोक खो– खो हसले.

"कोणी कावेबाज कितीही कावकाव करोत, आमचं जीवन हेच एकप्रकारचं काव्य आहे. हे काव्य आम्ही जगतो,– तेच बोलतो आहोत, की–

"–की, आमचा उद्याचा मोर्चा लाटणी घेऊन नव्हे, हातात लाठ्या घेऊन. होय, लाठ्या घेऊन निघणार आहे !

"अन् जळते टेंभे पण... हे बदमाश रस्ते जाळायला– !

"होय, हा जुलूस निघणार आहे– गाव–पाणवठ्यापासून शहराच्या दफ्तरापर्यंत, आमच्या स्त्रीत्वाची, अब्रूची व अस्मितेची धुळवड करणारी नंग्यांची 'होळी' विझवायला !... पत्रकार महाशय, हे आपण लक्षात घ्या, की आजच्या दलित स्त्रीनं सुद्धा आता एका तेजस्वी ब्रीदाचे कूळ निर्माण केलं आहे. ती आता आग होऊनच बरसणार आहे !... तेव्हा दुनियेची तिला दाद मिळावी. माणुसकीची साद मिळावी." शेवटी मालतीने असा समारोप केला.

पत्रकार चाट पडून मालतीकडे आणि ही सगळी रोखठोक 'मुलाखत' देणाऱ्या महिला मुक्ति-मंडळाच्या त्या धाडशी पोरींकडे विस्मयाने व कौतुकाने पाहत होते... त्यांच्या गडबडून गेलेल्या मनात काही गंभीर स्वरूपाच्या अर्थसंकेतांची सरमिसळलेली वावटळ उठली होती. उद्याच्या दैनिकात येणाऱ्या ह्या आगळ्या–वेगळ्या मुला-खतीच्या विवरणाचे पेपर्स घेऊन मग पत्रकारांनी महिला मुक्तिमंडळाचा निरोप घेतला.

मुक्तिमंडळाच्या एका नव्या उत्साहाने उचं-बळलेल्या तरुण कार्यकर्त्या महिलांनी अनपेक्षित आलेल्या आणि आपले विचारपूर्ण नि अप्रूप वक्तव्य सादर करणाऱ्या मालती खापर्डेचं मोठं स्वागत केलं. आणि आपल्या ह्या दलित महिला, पोरींचा अभिनिवेश पूर्ण पण महत्त्वाचा आगळा कार्यक्रम बघून तेथे उपस्थित असलेल्या कार्यकर्त्या दलित तरुणांचा उत्साह द्विगुणित झाला.

मालतीच्या अंतःकरणातले ढग आता वितळले होते... एका अनुभवाची आग आगीच्या प्रचंड प्रवाहात आता पूर्णपणे मिसळून गेली होती. ■

नागसेननगर, नागपूर.

अनुवादकांकरिता–

वाङ्मय अनुवाद म्हणजे खरे तर संस्कृतींचेच भाषांतर.

युगवाणीतून विभिन्न संस्कृतींची ओळख अनुवादित वाङ्मयातून होणे युगवाणीस हवे आहे.

विभिन्न भाषेतील महत्त्वाच्या लेखनाचे अनुवाद मूळ लेखकाच्या परवानगी-सहित पाठवावेत. अनुवादकविषयक लिखाणही.

गुळगुळीत आर्ट पेपरवरचं ते चमकदार निमंत्रण पत्र खिशात घालून तो जेव्हा जे. जे. हॉलच्या पायऱ्या चढला तेव्हा साडेतीन वाजून गेले होते व भाषणांना नुकतीच सुरुवात झाली होती.

त्यानं उत्सुकतेनं आजुबाजूला नजर फरविली. अपेक्षेप्रमाणं निळकंठ आला नव्हताच !

त्याला विलक्षण चीड आली आपल्या मित्राबद्दल. साला ही आपल्याला 'कंपनी हवी' या सबबीखाली कुठनं कुठनं निमंत्रणं मिळवून देतो अन् प्रत्येकदा स्वत: मात्र गैरहजर राहतो. प्रॅक्टीस आहे ना ! तो कशाला– येईल हे 'उब्बार' धंदे करायला ? पण मग माणसानं–दुसऱ्याला तरी गळ घालू नये.

त्याला आठवलं, निळकंठानं आतापावेतो किती तरी मोठमोठ्या समारंभांची निमंत्रणं त्याच्याकडे पोचविली होती. निळकंठला त्याच्याबद्दल, काय वाटत होतं कोण जाणे. पण शहरातले कुठलेही प्रदर्शन असो–चित्रांचे, फुलांचे वा पुस्तकांचे; परिसंवाद असो; नाटकाच्या शुभारंभाचे प्रयोग असो वा 'आकाशवाणी 'च्या संगीत संमेलनांचे कार्यक्रम असो, निळकंठ त्याला न चुकता निमंत्रण पत्र पाठवीत असे अशा 'एंट्री फ्री' कार्यक्रमांनीच त्याचे सांस्कृतिक जीवन सजले होते. पण निळकंठ मात्र अशा सर्व कार्यक्रमांना आवर्जून गैरहजर राहत असे.

त्याला वाटलं, निळकंठ चांगला माणूस आहे.

वीस्ट ऑफ वर्डन

रमेश दा. गाडे

डॉक्टर म्हणून चांगला आहे,
माणूस म्हणून चांगला आहे,
मित्र म्हणून तर आहेच आहे.
पण याचा अर्थ त्यानं 'असा' सूड घ्यावा असा थोडाच होतो ? अनेक 'स्टँडर्ड' कार्यक्रम तर बोअरच होतात ! केवळ आपण सोशलॉजीत एम्. ए. केलंय् म्हणून हा लेकाचा आपल्याला इंटलेक्च्युअल वगैरे समजतो का काय ? त्याला फिरत्या वाचनालयातून–आणलेली टुकार मासिकं अन् मित्रांकडनं परतफेडीच्या बोलीनं आणून ठेवून घेतलेली भिकार पुस्तकं आठवली नि शरमल्यासारखं झालं.

हॉलमध्ये आवाज अन् गंध याचं अत्यंत रोमँटिक संमिश्रण झालेलं त्याला जाणवलं. कानाजवळ तोंड नेऊन केलेली लाडिक कुजबूज, कृत्रिम अन् अस्सल रेशमाची सळसळ, कोऱ्या वस्त्रांचे, वेण्यांचे, पावडरींचे अन् सेंटस्‌चे वास या साऱ्यांनी एक कृतक 'कोझिनेस' तिथं निर्माण केला होता.

त्याला स्वत:ची लाज वाटली. कमालीच्या पडशानं वारंवार नाकातनं आवाज काढणारा, खिशातनं बाहेर काढताच ट्यूबच्या सौम्य प्रकाशाला शिव्या देतोसा वाटणारा हातरुमाल बाळगणारा, क्रीज जावून कफांजवळ अन् मानेजवळ घाण झालेला शर्ट पेहेरणारा, बूट काढले तर मोज्यांचा वास मारेल अशा भीतीनं धास्तावलेला तो; त्यानं स्वत:च निरखला अन् तो अस्वस्थ झाला. पण काही वेळच. सरावानं तो समोरची भाषणं मन लावून ऐकू लागला.

'वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य' या विषयावर आयोजिलेला एका आंतरराष्ट्रीय संघटनेचा परिसंवाद होता तो. भाषणं एकाहून एक रटाळ होती. मध्ये ज्या तरुणीचं भाषण झालं ती देखणी होती अन् तिच्या भाषणापेक्षा तीच त्याला जास्त आवडली. तिनं वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याऐवजी लैंगिक स्वातंत्र्यावर बोलायला हवं असं वाटून गेलं अन् स्वत:च्या अशा विचारानंच त्याला ओशाळल्यागत झालं.

पण शेवटी एका संपादकाचं अत्यंत सुरेख भाषण त्याला ऐकायला मिळालं. इतके मुद्देसूद

विचार इतक्या सुंदर इंग्रजीत व्यक्त झालेले तो कितीतरी वर्षानंतर ऐकत होता. वक्ता अतिशय छान बोलला. स्वातंत्र्य, व्यक्तीचे स्वातंत्र्य, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य असं करीत करीत तो नेमका वृत्तपत्र स्वातंत्र्यावर आला अन् एखादा तरवेज गायक समेवर येताच होतो, तसा टाळ्यांचा कडकडाट झाला.

स्टॅंडवरून सायकल काढतांना त्याला वाटलं, निळकंठाला 'थॅंक्स' दिले पाहिजेत कधी तरी याबद्दल. तो न का येतो ना, त्याच्यामुळे स्वातंत्र्यावरचे एक सुरेख लेक्चर तर ऐकायला मिळाले होते. हेही नसे थोडके !

सावकाश पॅंडल मारीत तो घराच्या दिशेनं निघाला.

पण थोडया वेळानं त्याला पुढं जाणंच अशक्य झालं. कारण चौकात खूप गर्दी झाली होती. अपघात असावा बहुतेक.

त्यानं सावकाश सायकल बाजूला लावली, कुलूप घातलं अन् पॅंटची क्लीप सोडवत चार दोन जणांच्या खांद्यावरनं डोकावत तो वर्तुळाच्या आत बघू लागला.

अन् समोरचे दृष्य पाहताच तो हबकूनच गेला !

ट्रेलरवरच्या अवाढव्य ओझ्यामुळे व चढावामुळे बैलगाडीला जुंपलेला बैल जमिनीपासून थोडासा उंच उचलल्या गेला होता अन् त्याच्या गळ्यास करकचून फास लागला होता.

गाडीवान आपल्या पूर्ण ताकदीनिशी गाडीच्या जुवास लोंबकळला होता. इतरही काही जूं खाली आणून बैलाचे पाय टेकविण्याचा प्रयत्न करीत होते, पण ओझं फार मोठं होतं. माणसं जास्त होती पण वेळ फार कमी होता. बैल डोळे फिरवित होता, तोंडातनं फेस गाळत होता. बघ्ये गाडीवानास अवाढव्य ओझें लादल्याबद्दल शिव्या घालीत होते. बैलाचा मृत्यू जलदीने अन् निश्चितीने जवळ येत होता.

त्याचे डोळे त्या दृष्यावर खिळून राहिले अन् मग त्या गाडीवानाचा चेहरा आणि बैलाचा चेहरा त्याला सारखाच दिसू लागला. एवढ्यात त्याचं लक्ष ट्रेलरवरच्या ओझ्याकडे गेलं.

चार अवाढव्य न्युजप्रिंट रोल्स मोठ्या मजबुतीनं यावर बांधले होते ! ■

अनुक्रमणिका

रंगमंचावरील दृक्माध्यमाच्या क्षमतेविषयी विचार

श्रीहरी जोशी

रंगमंचावर आकार घेणारे नाटय विविध घटकांतून आकारास येत असते. त्या नाटयाचं प्रमुख स्वरूप विविध अंगांनी प्रगटत असतं. एक–दृक् अंग, दुसरं–श्राव्य अंग. या द्विविध माध्यमाद्वारे रंगमंचावरील नाटयाला साकारण्यास इतर दुय्यम तरीही तेवढीच महत्त्वाची अंगे असतात. त्यांची रूपे मात्र संमिश्र असतात. कधी ती दृश्यात्मक असतात तर कधी ती श्राव्य असतात. यापरतेही एकमेकांच्या बाह्यप्रगट रूपाशिवाय त्यांची प्रत्यक्ष अप्रत्यक्ष एकमेकांच्या अंतस्थ गुणानुरूप अनेक मिश्ररूप सहायक अंगे असतात. ह्या सर्वांचाच नाटयाच्या प्रत्यक्ष आकारास सहभाग होत असतो.

आज वरील दोन प्रमुख माध्यमांपैकी दृक्माध्यमाच्या सर्व क्षमतांचा इथे शोध घेण्याचा हा प्रयत्न आहे.

नाटयाविष्कारातील दृश्यात्मकतेचं मूळ शोधायचं झालं तर तो शोध नेमका कुठून सुरू करता येईल ? आपण प्रथम संहिता ह्या घटकातील दृश्यात्मकतेचा शोध करू. तसा शोध घेताघेताच आपल्याला तदनुषंगिक इतर अंगांकडेही आपोआपच वळावे लागेल. तसे करणेही अधिक सुलभ व्हावे.

संहितेतील दृश्यात्मकता प्रथम कशी जाणवते ? नाटककाराच्या अनुभवविश्वातून शब्द–माध्यमाद्वारे प्रगट होणारा नाटयानुभव हा खरं पाहिलं तर नाटयवृक्षाच्या बीजरूपाचं गर्भावस्थेतील प्रगटीकरण असतं. ह्या गर्भकोषातच त्या नाटयवृक्षाचं संपूर्ण मूळरूप आकार घेत असतं. तसं ते घेत असताना एकच घटक इथे प्रत्यक्ष नाटयघटकापेक्षा वेगवेगळी भूमिका करत असतो, त्या म्हणजे ह्या बीजरूप नाटयाविष्काराचा प्रेक्षकच त्याचा निर्माता असतो. तोच त्याच्या पात्रांच्या व्यक्तित्वात शिरून त्यांचं नेमकं आणि अवघं व्यक्तित्व शब्दांद्वारे मांडत असतो. त्यादृष्टीने त्याच्या जन्मदात्यालाच रंगमंच निर्माण करून सिद्धही करावा लागतो, आणि त्यावर नाटयही घडवावं लागतं. अशा तऱ्हेने नाटककाराच्या मनाच्या रंगमंचावरील नाटय शब्दमाध्यमाद्वारे, प्रयोग सिद्ध करणाऱ्या कलावंतांसमोर प्रगटते. हे कलावंत त्या शब्दमाध्यमातून प्रगटणारं नाटय अवलोकितांना त्या संवादातून, नाटयवस्तूंचं मांडलेलं रूप, सूक्ष्मपणे न्याहाळतात. प्रत्यक्ष संवादातून जाणवणारं दृश्यात्मक घटित ते कलावंत पाहू लागतात. म्हणजेच संहितेतील शब्दांमधून ते बाह्यरूप केवळ 'पहात' नाहीत तर त्यातील प्रत्यक्ष 'घडणं'ही पहातात. मला वाटतं, संहितेतील हे शब्दमाध्यमातील 'घडणं' पहाता येणं ही कलावंताच्या नाटयजाणिवेची जशी एक कसोटीच ठरेल, तसंच ती संहितेच्या गुणांच्या दृष्टीने दृश्यात्मकतेचीही उच्च कसोटी ठरावी. संहितेच्या ह्या शब्दमाध्यमातून प्रगटणारं 'घडणं' त्याच्या सर्व घटकांसह जेव्हा रसिक वाचक कलावंतांना प्रत्ययाला येतं त्याचवेळेस त्यातील दृश्यात्मकतेचाही प्रत्यय येत असतो. उदाहरणार्थ, एखाद्या नाटयसंहितेचं वाचन एकापेक्षा अधिक श्रोत्यांसमोर होत असताना त्या श्रवणातून श्रोत्यांच्या सामूहिक मनासमोर निश्चितपणे 'दृश्यरूप घडणं' होत असतं. संहितेची ही ध्वनिमाध्यमाद्वारे प्राथमिक दृश्यात्मकता एकदा प्रत्ययाला आली

दृक्-श्राव्य

की संपूर्ण नाटचानुभवांची सलग एकात्म दृश्यात्मकताही त्याचवेळेस पूर्णपणे प्रत्येक श्रोत्याला जाणवत असते. ही जितकी स्पष्ट व परिणामकारक होईल तितकी, किंबहुना अधिकच, प्रत्यक्ष रंगमंचावरील प्रयोगाविष्कारात ती अधिक अर्थपूर्णतेने प्रत्ययास येईल.

संहितेतील ह्या नाटचाचा एकदा प्रगट जन्म झाला की दिग्दर्शक त्याच्या पालनपोषण आणि एकूण संवर्धनासाठी त्या संहितेतील अन्य घटकांचा सूक्ष्म विचार करून त्याच्यासाठी एक निश्चित अशी 'रूप' रेखा आखतो. रंगमंचावर ही 'रूप' रेखा साकारताना तो अन्य सर्व घटकांना त्यांच्या त्यांच्या स्थानांवर स्थापनापन्न करतो. त्यांचे त्यांचे मार्गक्रमण आणि दिशा ठरवून देतो. हे सर्व ठरवताना संहितेतील नाटचानुभवाला तो त्याच्या सर्व शक्तीनुसार एक दृश्यात्म परिमाणही देत असतो. संहितेतील 'घडण्याला' तो निश्चित 'रूप' देताना पात्रांच्या दृश्यव्यक्तिमत्वाचा विचार, त्यांच्या 'घडण्याच्या'च्या दृष्टीने हालचालींचा आलेख, वेगवेगळचा आकृतिबंधातून साधली जाणारी दृश्य परिणामकारकता आणि हे सर्व जिवंतपणाचा प्रत्यय देणारं ठसठशीत 'रूप' जमलं तरच दिग्दर्शकाच्या कलागुणांचा अपरिहार्य ठसा उमटू शकतो.

दिग्दर्शकाच्या जाणिवेतील, संहितेतील दृश्यात्मकता अन्य माध्यमाद्वारे तो रचनांकित करतानाही पुन्हा एकात्म परिणामावर लक्ष ठेवून अन्य घटकातील माध्यमांच्या दृक्क्षमताही आजमावत असतो. उदाहरणार्थ, वातावरण निर्मितीसाठी वापरलेल्या पार्श्वसंगीत वा पार्श्वध्वनिसंयोजनातील ध्वनीचा दृक्परिणाम, पार्श्वध्वनिमाध्यमाद्वारे 'संकेताची' उपयुक्तता जाणून त्यांची सांगड प्रत्यक्ष दृक्परिणाम साधण्यासाठी वापरणे. 'सकाळ' झालेली आहे याचं प्रत्यक्ष रंगमंचावरील प्रकाशयोजनेद्वारे दाखविलेल्या रचनासंबंधाबरोबरच, पक्ष्यांच्या आवाजाचा (किलबिलीचा आवाज) वापर करून त्या दृश्याची परिणामकारकता अधिक ठसवली जाते. किंवा सकाळच्या विविधभारती वा अन्य जाहिरात प्रसारण केन्द्रांवरील ठराविक जाहिरातींच्या ध्वनिप्रसारणाच्या वापरामुळे वेळेचं ध्वनिमाध्यमाद्वारे प्रगटणारं परिणाम 'दृश्य' माध्यमात रूपांतरित होतं.

प्रकाशयोजनेद्वारे दृश्याच्या दृक्माध्यमाची क्षमता अधिक व्यापक आणि सूक्ष्मपणेही करता येते. कालाच्या सापेक्ष वापराचे 'दर्शन' विशिष्ट प्रकाशयोजनेच्या साह्याने रंगमाध्यमांचा वापर करून वा विशिष्ट प्रकाशकोनाचा वापर करून वा प्रकाशस्रोतांची तीव्रता कमी अधिक करून वा संमिश्र गतिमानता देऊन दर्शविता येते. रंगमंचावर एकाच वेळेस वर्तमान, भूत वा भविष्य अशा कालाची प्रत्ययकारिता प्रकाशयोजनेबरोबरच विविध स्थलांची स्तरनिविष्ठ योजना करून करता येते. नेपथ्यरचनेची सर्वच क्षमता ही प्रथमतः दृक् माध्यमातून परिणाम साधते आणि नंतर अन्य माध्यमांना पूरक ठरते. बदलत्या ऋतुमानाचा प्रत्यक्ष दृक्प्रत्यय देण्यासाठी पार्श्वनिक्षेपिकेवर (सायक्लोरामावर) विशिष्ट रंगीत प्रकाशयोजनेचा गतिमान वापर करणे वा त्यालाच पार्श्वसंगीताची जोड देऊन दृश्याची परिणामकारकता अधिक तीव्र करणे. उदाहरणार्थ, धुवाधार पावसाचं दृश्य उभं करताना विजेचं ध्वनिरूप आणि दृश्यरूप दाखवण्याने दृक्परिणामात निश्चितच विशिष्ट प्रत्ययक्षमता येते. पात्रांच्या व्यक्तिगत वा सामूहिक अभिनयाचं आविष्करण तर प्रत्यक्षच दृक्परिणाम साधणारं असतं–पण त्यापलिकडे त्यांच्या विशिष्ट हालचाली वा त्यांच्या रंगमंचावरील विविध आकृतिबंधात्मक रचना (compositions) ह्या दृश्यमूल्याचंच दर्शन घडवत असतात. विविध व्यक्तिमत्वांच्या प्रत्यक्ष घडणीत त्यांच्या आंगिक अभिनयाबरोबरच त्यांच्या वेषभूषा, रंगभूषा यांचाही दृक्परिणामामध्ये विचार होणं आवश्यक असतं त्यादृष्टीने दृक्माध्यमात रंगभूषा, वेषभूषा यांचा यथातथ्य 'दर्शना'साठी वापर करणे.

अलिकडे चित्रपटमाध्यमातील 'क्लोजअप' एक्स्पोजर रंगमंचावरही समर्थपणे विशिष्ट प्रकाशस्रोतांची तीव्रता कमीजास्त करून प्रभावीपणे परिणाम साधायला लागलेली आहे. यात प्रामुख्याने व्यक्तीचा चेहरा वा रंगमंचावरील वस्तूंचे सूक्ष्म परंतु अधिक व्यापक प्रभावीपणे दर्शन घडवून परिणामी दृक्‌माध्यमाची सूक्ष्मक्षमताही वापरात आणली जाते. याव्यतिरिक्त दोन विविध काळातील दृश्यांची एकमेकांत सरमिसळ करणे वा एका दृश्यावर दुसऱ्याचे आरोपण करणे (Vision mixing and superimposing) अशा तऱ्हेचे प्रकार प्रत्यक्ष दृश्यातील दृक्‌माध्यमाच्या वापरांचे चतुर सामर्थ्य व्यक्त करतानाहीं आढळते. रंगमंचाची चौकट सोडून पात्रांच्या हालचाली जेव्हा प्रेक्षागृहापर्यंत पोचतात वा कधी प्रेक्षकांच्याही सहभागाचीही अपेक्षा करू लागतात तेव्हा ह्या दृश्यात सामील होणाऱ्या प्रेक्षकाची प्रतिक्रियाही दृक्‌माध्यमाचा एक भाग होत असते.

मानवी जीवनातील सर्व अंगांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपरिणाम हा जेव्हा रंगमंचाच्या मर्यादित चौकटीत बंदिस्त होत जातो तेव्हा तेव्हा तो दृक्‌परिमाणाच्या मर्यादा विकसित करत असतो. ■

न्यू दिल्ली टाईम्सच्या निमित्ताने

आजची पत्रकारिता : एक चिंतन

सतीश पावडे

अनेक वादंगानंतर अखेर शासनाने 'न्यु दिल्ली टाईम्स' या वादग्रस्त चित्रपटावरील बंदी उठवली. व तो चित्रपट रीतसर प्रदर्शित झाला. राजकारण्यांचे वाभाडे काढणारा वास्तववादी चित्रपट असे बिरुद या चित्रपटाला मिळाल्यामुळे जनमानसातही अधिक कुतूहल या चित्रपटाबद्दल निर्माण झाले होते. पत्रकारिता व राजकारण या विषयावरील सिंहासन, कमला, सुखिया, मशाल, इत्यादी चित्रपटापेक्षा या चित्रपटाला निश्चितच अधिक यश मिळाले त्याचे कारण चित्रपट बंदी घातल्यामुळे चर्चेचा विषय होणे याशिवाय त्याला मिळालेले वास्तववादी असल्याचे वलय; मनाला भिडणारे संवाद, व लक्षात राहण्याजोगी चित्रपटाची मांडणी व लोकांना अपील होणारे छायाचित्रण हेही कारणीभूत आहेच.

सद्यस्थितीच्या राजकारणाला व आजच्या पत्रकारितेला केंद्रीय विषय घेऊन या दोन्ही क्षेत्रातील ज्या विविध पैलूवर ज्या प्रभावीपणे न्यू दिल्ली टाईम्सने प्रकाश टाकला तो निर्विवाद प्रशंसनीय आहे. या बाबतीत सखोल विचार करतांना अनेक प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. राजकारणातील विदारक सत्य, विसंगती, भ्रष्टाचार व पत्रकारितेचे त्याहून आश्चर्यकारक अंतरंग या सर्वांची उकल करीत 'न्यू दिल्ली टाईम्स' अधिक लोकाभिमुख झाला हे चित्रपटाचे खरे यश मानावे लागेल. कारण सुखिया, मशाल, कमला हे चित्रपट विषयाचे महत्त्व, मांडणीतील व विषयाचा गोंधळ त्याहून वरचढ झालेली व्यावहारिकता यामध्ये सापडून साफ कोसळलेच नव्हे तर निष्प्रभ ठरलेत. अर्थात चित्रपटाचे परीक्षण व तुलना हा आपला विषय नाही. न्यू दिल्ली टाईम्सच्या अनुषंगाने आज जे पत्रकारितेसंबंधीचे मूलभूत प्रश्न उपस्थित झाले आहे. त्यावर प्रकाश टाकणे महत्त्वाचे झाले आहे. एक पत्रकार म्हणून या विषयाकडे बघताना कालच्या व आजच्या पत्रकारितेत आश्चर्यकारक बदल झालेले आढळून येतील.

कालची ध्येयवादी पत्रकारिता

पत्रकारितेला महाभारतापासूनची परंपरा आहे. महाभारतातील संजय हा सर्वात पहिला वार्ताहर समजला जातो. यावरून ही परंपरा किती पुरातन आहे याची कल्पना येईल. अर्थात त्या

वेळी पत्रकारितेचा संदर्भ अतिशय मर्यादित होता. परंतु त्यामागील कार्य वार्ताहराचा उदात्त हेतू व वार्ता सांगण्याची संकल्पना लक्षात घेता वार्ताहारिता अथवा पत्रकारिता हा जीवनातील अविभाज्य अंग होते हे जाणवेल. स्वातंत्र्यपूर्व काळाचा विचार करताना गांधीजींची, चिपळूणकर, आगरकर टिळकांची, लोकहितवादींची पत्रकारिता अभ्यासली किंवा बखरीचा अभ्यास आपण या दृष्टीतून केला तर त्या काळच्या पत्रकारितेची पुरेपूर कल्पना आपणास येऊ शकेल. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी क्रांतिकारक, विचारवंत, यांच्या रांगेत वृत्तपत्रांनाही आपणाला स्थान देणे अगत्याचे ठरेल. कालच्या पत्रकारितेचा विचार करता ती पत्रकारिता ध्येयवादी पत्रकारिता होती. त्यामुळे संघर्षासाठी, अन्यायाविरुद्ध झगडण्यासाठी ते शस्त्र समजले जाई. लोकप्रक्षोभ व्यक्त करण्याचे, विचारांच्या देवाणघेवाणाचे ते प्रभावी साधन होते. त्या काळच्या वृत्तपत्रांनी स्वातंत्र्यासाठी लढण्याची प्रेरणा लोकांना दिली. ब्रिटीशांना हैराण करण्यात वृत्तपत्रांचा फार मोठा वाटा होता. म्हणून वृत्तपत्राला 'तोफे'ची उपमा उगीच दिली नाही. टिळकांनी, गांधीजींनी, आगरकर, अत्रे यांनी जीवितकार्य म्हणूनच वृत्तपत्रकारितेचे जीवन व्यतीत केले हे सर्वविदीत आहे. कालची वृत्तपत्रे हे निर्भिड, स्वतंत्र, तत्व व ध्येयवादी व विचारपत्रक या स्वरूपाचे होते. सत्तेपुढे किंवा सत्तेचे मुखपत्रम हृणून कालच्या वृत्तपत्रांनी कार्य केले नाही. नेमकी हीच तफावत कालच्या आणि आजच्या वृत्तपत्रकारितेत आहे.

ध्येयवादावर व्यवहारवादाची मात

कालच्या आणि आजच्या पत्रकारितेची तुलना करताना जी मोठी तफावत सर्वप्रथम आढळते ती हीच. आजच्या ध्येयवादी पत्रकारितेवर व्यवहारवादी, व्यवसायवादी पत्रकारितेने सरळ सरळ मात केली आहे. त्यामुळे तत्व, ध्येय वगैरेचा अंगिकार आज कालबाह्य झालेला दिसेल. काळानुसार वृत्तपत्र हा उद्योग झाला असला तरी वृत्तपत्र हा इतर उद्योगाप्रमाणे, व्यवसायाप्रमाणे, व्यवसाय अथवा उद्योग होऊ की नये हा वादविवादाचा विषय ठरेल ! कारण वृत्तपत्राचा संबंध हा जडणघडणीशी, आचारविचारांशी, स्वभाव, वाण्याशी अथवा अभिव्यक्तीचे, संघर्षाचे शस्त्र असण्याशी आहे. मग हा निव्वळ व्यवसाय असावा की नसावा हा चर्चेचा, परिसंवादाचा विषय होण्यास हरकत नाही. कारण आज तरी त्यावर परिणामकारक तोडगा निघेलच हे सांगता येणे कठीण आहे. देशातीलच नव्हे तर जगातीलही अनेक भांडवलदार उद्योगपतींनी वृत्तपत्राचा व्यवसाय उद्योग या दर्जाने सुरू केला असल्यामुळे निव्वळ उद्योगाचे स्वरूप त्याला आजही मिळाले आहेच. व्यवहाराचा विचार करता आजची पत्रकारिता तत्वनिष्ठ, ध्येयनिष्ठ राहिली नाही. अपवाद वगळता. पण हे अपवाद अगदीच नगण्य आहे.

आजची पत्रकारिता

आजच्या पत्रकारितेबद्दल विचार करताना असे आढळून येईल की अधिक जाहिरात, अधिक खप हे ध्येय व ब्रीद आजच्या वृत्तपत्राचे आहे. तसेच भांडवलदार वर्गाने हा व्यवसाय अंगिकारल्यामुळे कमी उत्पादन खर्च अधिक उत्पादन व अनुषंगाने शोषण आलेच. त्यामुळे पत्रकारिता ही मानवतेपासून दुरावली आहे. खळबळजनक, व स्वस्त दर्जाची माहिती पुरविणे, वाचकांची हीन दर्जाची वाचनरुची निर्माण करणे अनुषंगाने अधिक खप वाढविणे हे या व्यवसायाचे प्रतीक झाले आहे. राजकीय हस्तक्षेप, सत्तांतर, व्यवसाय असे दृष्टिकोन निर्माण झाल्यामुळे पत्रकारितेला नवे वळण स्वातंत्र्योत्तर काळात बघायला मिळेल. व्यावसायिक दृष्टिकोणामुळे हीन दर्जाची स्पर्धा आज वृत्तपत्राचा एक प्रमुख कार्यक्रम झालेला दिसेल. कागदाचा कोटा, व सत्ताधीशांची मर्जी, स्वतःचा राजकीय स्वार्थ इत्यादीसाठी लाळघोटूपणा अथवा लांगुलचालन करणारे वृत्तपत्र मालक आज कमी नाहीत. याशिवाय सामान्य जनतेचे दिशाहीन करून, व बुद्धीजीवी वर्गाचे वैचारिक शोषण करून आज पत्रकारिता व्यावसायिकांनी उद्योगपतींनी आपापली दुकाने थाटली आहे.

भ्रष्टाचाराचे केंद्र

भ्रष्टाचार, अन्याय हटविण्यासाठी एकेकाळी वृत्तपत्र कार्य करीत असत परंतु आज वृत्तपत्रच स्वतःच्या कर्मचाऱ्यांचे, वाचकांचे शोषक बनले आहे. मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार या पत्रकारितेतून चालतो, हे नाकारता येत नाही. बाहेरून जेवढे चांगले तेवढेच आतून प्रचंड विदारक सत्य या पत्रकारितेत दडलेली आहेत.

नवे वृत्तपत्र व्यवस्थापन

आज जगातील सर्वच वृत्तपत्रांनी नवीन तंत्र व यंत्रज्ञान स्वीकारले आहे. त्यासोबतच नवे वृत्तपत्र व्यवस्थापनाचा अगिकार ते करतात त्यामुळे वृत्तपत्राच्या उद्देशाची, ध्येयाची परिभाषा बदलत चालली आहे. चांगले वृत्तपत्र कोणते याच्या चाचण्या, निकष बदलत चालले आहे. नव्या वृत्तपत्र व्यवस्थापनामुळे हा बदल इतक्या झपाट्याने बदलत चालला आहे. त्यामुळे वैचारिक आणि लेखणी स्वातंत्र्यावर घाला घातला जातो. याचे भान आज जागरूक पत्रकारही विसरत चालले आहे. ही दुर्दैवाची बाब म्हणावी लागेल. मालकाचा व राजकीय पुढाऱ्यांचा हस्तक्षेप याच संदर्भात न्यू दिल्ली टाईम्सने शशीकपूर विरुद्ध कुलभूषण खरबंदा तसेच मुख्यमंत्री व अजयसिंग यांची कुटिल कारस्थाने अगदी पद्धतशीरपणे पण न कळत वृत्तपत्राला आपल्या स्वार्थासाठी मुख्यमंत्र्याने राबवून घेणे या सर्व बाबी नवीन वृत्तपत्र व्यवस्थापन आणि उद्योगवजा पत्रकारितेवर विशेष प्रकाश टाकणारी आहे.

न्यू दिल्ली टाईम्स : चर्चेचा प्रश्न का ?

न्यू दिल्ली टाईम्स चर्चेचा विषय का व्हावा याची कारणं वर दिलेली आहे. परंतु शोधक पत्रकारितेच्या विषयावर जे भाष्य लेखकाने पात्रांच्या तोंडातून करविले आहे ते लक्षात घेण्याजोगे आहे. " वेश्येला आपला व्यवसाय करण्यासाठी स्वतःची वस्त्रं काढावी लागतात. तर आपण दुसऱ्याची वस्त्रं काढून आपली मानसिक विकृती शांत करतो. " या संवादातून तसेच 'शोधक पत्रकारिते'त आपण इतके गुंतत जातो की घटनेचे सत्य आपल्याला कळतच नाही. या संवादातून शोधक पत्रकारितेवर विश्वास असणाऱ्या पत्रकारांची मनोव्यथाच नव्हेतर एक सत्य बाहेर आल्याचे दिसेल.

राजकीय पुढारी किती पद्धतशीरपणे वृत्तपत्रांचा वापर आपल्या स्वार्थासाठी करतात. नवे व्यवस्थापनवादी मालक राजकारण्याचे कसे अंकीत होतात. बातम्या व घटना कशा बदलविल्या जातात. सामान्य लोकांचे कसे शोषण केले जाते. सांप्रदायिक दंगलींना अधिक पेटविण्यास वृत्तपत्र कसे जबाबदार ठरतात. या सर्वांवर न्यू दिल्ली टाईम्सने प्रकाश टाकून राजकारण्यांचे व पत्रकारितेचेही वाभाडे लोकांसमोर मांडले आहे. हीच 'न्यू दिल्ली टाईम्सची' विशेष महत्त्वाची व जमेची बाजू आहे.

पत्रकारिता कशी असावी ?

स्वतंत्र्य बाण्यांचे निर्भीड, लोकांच्या अन्यायाला वाचा फोडणारे, लोकांचा एकमेव साथी, अथवा स्वच्छ प्रशासनाचा साथीदार अशी बिरुदं लावलेली वृत्तपत्रं आपणाला दिसतील. या लेखात आपण लघुवृत्तपत्राचा विचार केलेला नाही. कालच्या व आजच्या पत्रकारितेची तफावत स्पष्ट करून आजच्या पत्रकारितेचे अतरंग मी मांडले आहे. अधिक खप, अधिक चांगली सजावट कमी पैशात अधिक पानं ही चांगल्या वृत्तपत्राची कसोटी आहे काय ? हे वाचकांनीच ठरवावे ? आजची पत्रकारिता ही कशी आहे याचा उहापोह येथे केला आहे. कालच्या व आजच्या पत्रकारितेची तुलना केल्यास यातील फरकाचे टप्पे व बाबी वाचकांनाच सापडतील. त्यांनीच हे शोधावे, विचार करावा म्हणून आजची पत्रकारिता कशी असावी हे वाचकांनीच ठरवावे यासाठीच हा मुद्दा मी येथेच संपवितो.

■

उपसंपादक दै. लोकमत, औरंगाबाद

टि | प | णे

उ. रा. गिरी यांची कविता

मनोज तायडे

आयुष्याच्या अगदी संध्याकाळी आपला काव्य-संग्रह प्रकाशित करण्याचे भाग्य फिनिक्स प्रकाशनाच्या सौजन्याने उ. रा. गिरी या कवीस लाभले. मराठी कवितेच्या प्रांतामध्ये तशी ही पहिलीच घटना नाही. कवी बी यांचाही कविता-संग्रह त्यांच्या मृत्यूपूर्वी केवळ दहा वर्षे आधी म्हणजे १९३७ साली प्रकाशित झाला होता. २९ ऑगस्ट १९४७ रोजी वयाच्या ७६ व्या वर्षी बी निधन पावले. कवी बी यांच्या कविता त्यांचे पुस्तक प्रकाशित होण्यापूर्वी मासिक 'मनोरंजन'-मध्ये प्रसिद्ध झाल्या होत्या व त्यांनी अलम महाराष्ट्राला वेडे केले होते. अगदी तशाच उ. रा. गिरी यांच्या कविता युगवाणी, किर्लोस्कर, मनोहर, अभिरुची, सत्यकथा या प्रतिष्ठित नियतकालिकांत आणि नवयुग, मराठा, तरुण भारत, केसरी या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्या होत्या आणि त्यांनी महाराष्ट्राची रसिकमान्यता मिळविली होती. पण या कवितांना पुस्तकरूपाने प्रकाशित होण्यासाठी मात्र १९८३ साल उजाडावे लागले. काव्यलेखनाला सुरुवात केल्यानंतर तब्बल ३२ वर्षांनी त्यांचा 'मी एकटा निघालो' हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला. यानंतर त्यांचा 'चंद्रायणी' हा दुसरा काव्यसंग्रह पुण्याच्या समाज प्रबोधन संस्था प्रकाशनाने १९८४ साली प्रकाशित केला.

उ. रा. गिरी यांनी काव्यलेखनाला सुरुवात केली तेव्हापासून मराठी कवितेत अनेक वादळे घोंघावून गेली, विविध काव्यसंप्रदाय निर्माण झाले मर्ढेकरांच्या निराशावादावर कुसुमाग्रजांच्या क्रांतिवादाचा तोडगा निघाला. आधुनिक साहित्यातून दलित साहित्याने झेप घेतली तर नवसाहित्यातून वास्तववादी, अतिवास्तववादी साहित्याने रंगरूप, आकार घेतला. पण उ. रा. गिरी यांची कविता या प्रवाहाच्या, या स्थित्यंतराच्या आहारी न जाता आपल्या भावपूर्ण अभिव्यक्तीने आणि नैसर्गिक नादमाधुर्याने परंपरेच्या हातात हात घालत वागडत राहिली. म्हणूनच तिचे वेगळेपण प्रकर्षाने जाणवते. त्यांच्या कवितेने 'कवितापण' सोडले नाही. कवीच्याच शब्दात सांगायचे झाल्यास,

"बदलत्या फॅशन्सबरोबर चेहरे पालटले, अनेकविध काव्यसंप्रदायांचे उदयास्त पाहिले. तथापि, या एकूण गदारोळात तळापासून ढवळून निघत असतानाही कवितेने आपले कवितापण सोडले नाही. काहीशा मिस्किल तटस्थतेने ती या रणधुमाळीच्या मात्रा मोजत राहिली. प्रवादांची पर्वा न करता प्रवाहित होत राहिली." असे मराठी कवितेचे स्थित्यंतर घडले. कवीने येथे एका पातळीवर समग्र मराठी कवितेबद्दल विचार व्यक्त केले असले तरी दुसऱ्या पातळीवर हे त्यांच्या कवितेचेच आत्मकथन आहे.

उ. रा. गिरी यांची कविता—

'ये उमलत मंत्रापरि सखि स्वर्णिम सर्वोदय
प्रेमाच्या प्राचीवर समतेचा सूर्योदय'

अशी मंत्राप्रमाणे उमलत आली.

'हलकेच चांदण्याची
अलका अशी उमलते'

आणि मग—

'अमिताभ अर्थगर्भा
कविता जिवास सलते'

कविता हे असं जिवाचं सलणं आहे. म्हणूनच हे सलणं कधी 'चांदणे चैत्रातले' होते, तर कधी 'मल्हार बाधा'ही होते. या कवीची इंद्रधनूशी सलगी आहे, रजनीशी परिचय आहे, थेंबांची भाषा

याला कळली आहे, नक्षत्रांचा निरामय स्नेह लाभला आहे, म्हणूनच कवितेचा चंद्रकंस याला गाता आला. याचे नाते चंद्राशी असल्यामुळे,

'पण आहे चंद्राशी नाते
या रजनीशी माझा परिचय
म्हणून इथल्या काळोखावर
सदाच आलो मी मिळवीत जय'

असा काळोखावर विजयही मिळविता आला आहे.

उ. रा. गिरी यांची कविता नादमधुर, आणि संगीत प्रधान आहे. तांब्यांच्या कवितेप्रमाणे यांच्याही कवितेत संगीत ही केवळ बाह्य उपाधी नसून तो अंतरीचा उमाळा आहे. तिला स्वतःचा स्वर, लय आणि स्पंद ठीक सापडली आहेत. आणि शब्दांच्या रसरूप गंधयुक्त व्यंगात्म शक्तीची जाणीव तिला आहे म्हणून ही नैसर्गिक गेयता रसिकांच्या हृदयात आनंदाचे डोही आनंदतरंग उठविते. बा. भ. बोरकर म्हणतात–तांबे, मी आणि पाडगावकर ज्या वाटेने चाललो त्याच वाटेवरचे तुम्हीही. (उ. रा. गिरी) सहयात्री आहात. आमचे तुमचे निकटचे नाते कुठेतरी निश्चित आहे. तांब्यांप्रमाणेच गिरी यांची संगीताची जाण प्रगल्भ आहे. पण तांब्यांनाही ज्या संगीतप्रतिमा निर्माण करता आल्या नाहीत त्या संगीतप्रतिमा या कवीच्या काव्यात ठायीठायी भेटतात, हे एक वैशिष्टच आहे. कवीच्या मनातील भाव पूर्णत्वाने प्रतीत करून देणाऱ्या संगीत प्रतिमा त्यांनी निर्माण केल्या. पावसाळ्यातील करुण भाव पूर्णत्वाने अभिव्यक्त व्हावा म्हणून त्यांनी 'मल्हार बाधा' ही संगीत–प्रतिमा निर्माण केली.

'रेललेली गात्रगंधा किर्मिजी तंद्रीत पृथ्वी
गूढ स्वप्नासारखे आकाश आहे भारलेले
सोनस्पर्शाची क्षणांच्या होऊन मल्हार–बाधा
विश्व सारे हे सतारीसारखे झंकारलेले'

मल्हार हा राग पाऊस पडण्याअगोदर अथवा पाऊस पडत असताना छेडला जातो हे लक्षात घेतले म्हणजे या संगीत प्रतिमेचे व कवितेचे माधुर्य कळून येते. इतर अनेक कवितांतून विखुरलेल्या 'चंद्रकंस', 'आसावरी' (दिलेस तू, आसावरी), 'कोमलगांधार' (या जीवनात केव्हा), 'मारुबिहाग' (गझल), 'यमन' आणि 'मालकंस' (दोन कविता) या संगीतप्रतिमा आणि 'घायाळ पैंजण' (दोघातली कहाणी), 'पियानो' (पियानो) इत्यादी वाद्यप्रतिमांनी त्यांच्या कवितेची आस्वाद्यमानता वाढविली आहे.

उ. रा. गिरी यांच्या कवितेत निसर्ग आपले रूप ठायीठायी प्रकट करतो, निसर्गकवी म्हणून त्यांचा विचार व्हावा एवढी निसर्गकविता त्यांच्या दोन कवितासंग्रहात आली आहे. ना. धों. महानोरांप्रमाणेच निसर्ग या कवीला साद घालतो. निसर्गाच्या निरावरण सौंदर्याचे अनेक उन्मेष त्यांनी उत्सुक व रसिकदृष्टीने पाहिले आहेत. इतकेच नव्हे तर रानाच्या संवेदना त्यांनी जाणल्या आहेत पण महानोरांच्या कवितेत कवीचे मन जसे रानाशी सायुज्य साधते व रान देहधारी होऊन विभ्रम करू लागते तसा निसर्गाचा विभ्रम गिरी यांच्या कवितेत आढळत नाही, तर बालकवींप्रमाणे ते निसर्गाच्या या झिरझिरीत पडद्याआडून मानवी जीवनाचेच विलोभनीय दर्शन घडवीत आहेत असे वाटते. मानवी जीवनातील हर्षखेद, रागलोभ, मोहमदमत्सर, अनुराग या लौकिक भावनांचे सप्तरंगी मनोहारी चित्र त्यांच्या कवितेत साकारते.

'हिर्वा सलोना श्रावण
तृण लाजरे राजस
राजराणी तुझे रान
भलतेच समंजस'

अशी हिरव्या श्रावणातही तृणाच्या लाजऱ्या रूपाची चाहूल देताना अर्थवलयं व्यापक होत जातात. आणि मग श्रावणात माहेरा आलेल्या मुली, त्यांचे ते झिम्मा खेळणे, झोपाळ्यावर झोके घेणे आठवायला लागते. एक शब्दचित्र मनाच्या विशाल पटलावर साकार होते. वरची 'श्रावण' या कवितेत. किंवा

'स्वप्नांच्या सीमेवर हिरव्या वास्तव उन्मन ओले
अमृतात अभिसाराच्या हे रान पोपटी न्हाले !
करवंदी आभासासम नभ; उभि अलकेपरि धरती
शहारलेल्या आठवणींची मनात श्रावणभरती'

या 'श्रावण–भरती' कवितेमध्ये निसर्गप्रतिमांतून गिरींचे हृद्गत बोलके होते.

प्रत्येक कवीची कविता ही त्याच्या अनुभूतीची अभिव्यक्ती असते. त्याच्या अनुभूतीशी आपण सायुज्य साधू शकतो. पण अनुभूतीच्या सर्व कंगो-न्यांना आपल्या शब्दांच्या चिमटीत पकडणे अतिशय कठीण असते. एखादी तरल, भावस्पर्शी कविता आपल्याला मनोमन जाणवते पण त्या कवितेतील तरल संवेदना एकटयानेच भोगायच्या असतात. प्रत्येक कवितेची नीटशी उकल करता येतेच असे नाही. शेवटी, कविता म्हणजे तरी काय ? आलेल्या अनुभवाचे जीवनाच्या प्रचंड मुशीत खदखदणारे ते रसायनच असते. हे रसायन खदखदायला लागले की कवितेचा जन्म होतो; जीवनात जे जे घडते ते ते शब्दरूपात साकार होते. उ. रा. गिरी या कवीच्याही मनात असेच काहीतरी खदखदत होते आणि वेदना बोलकी होत होती. त्यांच्या पहिल्या कवितासंग्रहाचे नाव 'मी एकटा निघालो' हेच मुळी अर्थवाही आहे. वत्तीस वर्षे काव्यसाधना करणाऱ्या या कवीच्या पदरात आम्ही रसिक खरेच काही टाकू शकलो नाही. लाखपुरीसारख्या अकोला जिल्ह्यातील खेडेगावी या कवीचे सर्व आयुष्य गेले त्यामुळे आणि आत्यंतिक जीवनवादाचा पुरस्कार करणाऱ्या प्रचारकी थाटाच्या गदारोळात मराठी कविता हरविल्यामुळे या कवीकडे महाराष्ट्राचेच नव्हे तर विदर्भाचेही फारसे लक्ष गेले नाही त्यामुळे—

'मार्गावरून माझ्या
मी एकटा निघालो
डोळयात चंद्र जखमी
घेऊन मी निघालो'

अशी एकटेपणाची जाणीव या कवीला अभि-मंत्रित करून गेली. 'रानफूल' ही अशीच एक कविता—

'दूरदूरचे रे मी तो रानफूल
एकले व्याकूळ आपुल्यात
सांगाती उदास खडकाळ माळ
डोंगराची ओळ दूर उभी
मातला सभोती भयाण अंधार
फक्त हा आधार माझा मला'

येथे माझी कविता निसर्गाच्या पार्श्वभूमीवर उमललेलं एक रानफूल आहे, सौंदर्य आणि सुवास देण्याचं सामर्थ्य तिच्यात आहे याची जाणीव कवीला आहे पण एकलेपणाच्या जाणिवेने खिन्नता दाटून येऊन मन व्याकुळले आहे. या उदास खडकाळ डोंगराच्या आणि भयाण अंधाराच्या प्रदेशात मला माझाच आधार व्हावे लागेल जर जगायचे असेल तर.

कवीला आलेला एकटेपणाही या ढोंगी समा-जाची देण आहे. येथले हे दिखाऊ चेहरे, ते महान हास्य आणि वत्रिष्णू भाव यांच्या बंदिस्त चौकटीत हा कवी गुदमरला. ही कोंडी फोडण्यासाठी प्रसंगी लाचारी पत्करून पाहिली पण अशा 'सज्जनांच्या साच्यात' बसून त्याला ढोंग करता आले नाही.

पोटात एक ओठी दुसरेच घूर्त काही
चेहरे असे दुहेरी करता कधी न आले
....
न वाचवे तयांना गाथा कफल्लकाची
माझ्याही अक्षरांना मारता कधी न आले

येथे कवी आपल्याला समाजाची, जगाची, रसिकांची कशी उपेक्षा सहन करावी लागली परंतु ती पचवून आपले काव्य कसे जिवंत ठेवले हेही सांगतो. या कविता जिवंत ठेवण्याला काही एक कारणमीमांसा आहे. कवीचा माणसावरचा विश्वास उडालेला नाही. जरी सत्याचे गगन अजस्र काळया ढगांनी व्यापले, जरी दैन्याच्या पाशवी पंकात युगाचे रथचक्र रुतलेले आहे, जरी स्वरास्वरातून आणि परस्परांना छेदून जाणाऱ्या विसंवादी तत्त्वज्ञानाने घराघरातून गर्दी केली तरी अजून माणूस 'माणूस' आहे या उज्ज्वल तत्त्वा-वरून कवीचा विश्वास ढळला नाही.

माणूस नित 'माणूस'च होता अन् माणूस
'माणूस' राहील
प्रलयाच्या काळोखातही तो माणुसकीचा
परिचय देईल.
असोत शरीरे काळीगोरी रक्त
तयातिल लालच आहे
अजून माणूस 'माणूस' आहे !

रंगाच्या काळयागोऱ्या भेदावरून या जगात बंडाळया माजत असल्या तरी रक्ताच्या रंगाचा समान धागा एकत्र बांधून आहे हे सत्य कवीला उमगले म्हणूनच मानवतेविषयी, माणुसकीविषयी

अनुक्रमणिका

असलेली ठाम श्रद्धा त्याला जगण्याची उर्मी देते, पराभूत होऊ देत नाही. म्हणूनच

'घोटाळले नदीचे पायात मूक पाणी
डोळ्यात वाट त्याला देऊन मी निघालो'
झोपेत हासणाऱ्या चुंबून राहुलाशी
माझ्या यशोधरेला सोडून मी निघालो'

असे गौतमाच्या जातीचे हे त्याचे दुःख आहे. त्याला दुःखाची, वेदनेची, विषण्ण किनार आहे. गौतम दुःखाना नष्ट करण्याचा मार्ग शोधण्या-साठी एकटा निघाला व शेवटी तो मार्ग त्याने शोधून काढला. तसाच आशावाद कवी स्वतःच्या संदर्भात येथे व्यक्त करतो.

कवीचा हा एकाकीपणा त्याच्या प्रेमकवितां-तूनही जाणवतो. निसर्ग प्रतिमांच्या द्वारे त्यांनी स्वतःचे प्रेमभाव अभिव्यक्त केले आहे हे वर आपण पाहिलेच. पण त्यांनी प्रेमाचे, विरहाचे, स्वतःच्या एकाकीपणाचे सूक्ष्म पदरही स्वतंत्ररीत्या उलगडून दाखविले आहे.

'मी का आल्ये ?' हे कवीच्या 'ती'ला कळत नाही. ती अजून संभ्रमावस्थेतच असते.

'मी आल्ये....
कां आल्ये ? खरेच का मी आल्ये ?
आगमास या हेतू माझ्या कसला
कळत न काही मजला !'

अशी तिची अवस्था होते. कवीलाही ही अशी भलत्याच वेळी कशी आली हा प्रश्न पडतो. 'भरती न सागराला नचचंद्रही अभाळी' अशा अवेळी 'वासनेचा मृद्गंध' उधळीत तू आलीस तर या वासनेच्या आगडोंबात तुझीच आहुती पडेल असे कवी तिला निकराने सांगतो. पण सावधानतेचा हा इशारा ती धुडकावते. त्याच्या सर्वस्वाचे दान ती मागते. वासनेच्या सरी कोसळू लागतात. कामब्रह्माची समाधी लागते. तृप्तीचा मदहोशी आनंद घेतला जातो.

'दिलेस तू आणखी काही नाही
देऊ नये तेही दिलेस....
पोरी भानच नव्हते तुला'

आयुष्याची वाट वाटते तितकी सरळ नसते. अमृताच्या झऱ्यातली कधीकधी गरळ असते. ही जाणीव होत असतानाच स्वप्नावस्था भंगते, वास्तवाचे रत्नदीप विझतात, अनिरुद्ध चांदण्यांचा पाऊस थांबलेला आहे, पूर्वेस शुक्रतारा हसला आहे. प्राचीवर उषेचे पाऊल वाजलेले आहे या वास्तवाची जाणीव होताच ही स्वप्नावस्था भंगते.

'कर सैल हे गळ्यातील
करपाश रेशमाचे
ओतून गीत जा तू
ओठात अमृताचे'

या ठिकाणी कुसुमाग्रजांच्या 'स्वप्नाची समाप्ती' या कवितेची आठवण होते. पण कुसुमाग्रजांच्या या कवितेत ही भाषा कर्तव्यापोटी येते ती येथे वास्तव जगाचे भान आले म्हणून.

ती निघून जाते आणि हा बेशरम प्रियकर स्वार्थाचा हिशेब लावत बसतो. याच्या डोळी अजूनही 'कहाणी' फुलत असते.

'नाही विसरली रात्र
तुझी अजून कहाणी
माझ्या हिशेबी डोळ्यात
थोडे बेशरम पाणी'

अशी ती अवस्था असते. पण ही अवस्था फार वेळ टिकत नाही. याला एकाकी सोडून ती दूर निघून गेलेली असते. तिच्याजवळ करायचे खुलासे, अधुरेच राहिलेले असतात. या विरहाची एकाकी-पणाची जाणीव त्याला विपण्ण करते. चिरपरिचित झाडेही नवीन वळण मिळाल्याने ओळख देत नाहीत. तिच्या अस्तित्वावरच याचेही अस्तित्व अवलंबून असल्याने.

'तू माझी कविता
मी तो तुझा छंद
दोघेही वो धुंद एकमेकी'

असे परस्परावलंबी हे नाते असते. या क्षणाला त्याचे अस्तित्व जवळपास संपून गेल्यामुळे उरल्या असतात फक्त आठवणी. तो रात्र उदासपणे जागत असतो. या उदास रात्री त्याच्या ओठास जोगियाचा दंश होतो.

'आता तुझ्याविना या
सरती उदास रात्री
अद्याप जोगियाचा
ओठास दंश होतो...'

अद्यापही तुझ्या मी
दारावरून जातो
वाऱ्यावरी शुभेच्छा
वाहून मूक जातो...'


उरात सल बागवत असतानाच हा तिला शुभेच्छेचा नजराणा पाठवतो आणि स्वतः मात्र उदास, एकाकी रात्र ठेवून घेतो.

अशी उ. रा. गिरी यांची प्रेमकविता, प्रेम-कहाणी आहे. ती इतक्या संयमाने त्यांनी सांगितली आहे की कुठेही औचित्याचा भंग होत नाही की अश्लीलतेचा गंध येत नाही. प्रकाशाच्या प्रदेशाकडून अंधाराच्या पाऊल वाटेकडे ती कहाणी जाते. पूर्वीचा आनंद, उल्हास, सफलता आणि ती निघून गेल्यानंतर येणारी विफलता, विषण्णता, वेदना, निराशा, उदासीनता, खिन्नता हा कवी आपल्या संगीत–प्रतिमांद्वारे आणि निसर्ग प्रतिमांद्वारे समर्थपणे अभिव्यक्त करतो. तांब्यांच्या काव्यातील निखळ प्रेम, बालकवींची आर्तता, गोविंदाग्रजांच्या काव्यातील विरहार्तता, तर कुसुमाग्रजांच्या कवितेतील वास्तवता या विविध रंगांचे एकसमयावच्छेदेकरून मिश्रण करून साधारणीकृत पातळीवर त्याची अभिव्यक्ती करण्याचे अजब तंत्र या कवीला साधले आहे. म्हणूनच हा कवी वर्तमान कवितेच्या प्रवाहात वेगळा उठून दिसतो.

दि. ५ सप्टेंबर ८६ रोजी रात्री १० वाजता उ. रा. गिरी यांचे निधन झाले. मृत्यूपूर्वी त्यांची कविता दिवसेंदिवस नवेच तेज धारण करीत होती. प्रतिकूल परिस्थितीच्या 'पियानो'वर त्यांनी छेडलेली 'जीवनाची जयजयवंती' सुजाण रसिक कधीच विसरू शकणार नाही हा विश्वास वाटतो. ■


गजाननगर, वर्धा

श्री. म. माटे यांचे हस्ताक्षर



चित्रकार धनंजय नाकाडे

उमद्या मनाचा कलावंत



सुनील शिनखेडे

दिनरात नाना तऱ्हेच्या बातम्यांच्या गोताव-ळ्यात रमणाऱ्या मला त्या बातमीने केवढा तरी जबर धक्का दिला. अजूनही त्या बातमीवर विश्वास ठेवायला मन तयार नाही. वाटते की कधीतरी वि. सा. संघाच्या कट्ट्यावर नाकाडे भेटतील आणि ओथंबून आलेल्या आभाळाने मनसोक्त बरसावे तसे भरभरून बोलत राहतील. विचारतील की, 'काय रे पोरा, नवीन काय लिहिलेस ?' किंवा 'तुझी ती कविता मोठी मस्त होती गड्या' असे आठवणीने सांगतील. पण आता तसे होणे नाही. रंगांची मुक्त उधळण करणारा हा रंगयात्री येथले चित्रच अर्धे टाकून घाईने निघून गेला आहे.



नाकाडेंचे जीवनही त्यांच्या चित्रांप्रमाणेच विविध रंगच्छटांनी आकर्षून घेणारे असे होते. या कलावंत मनाची घडणच मोठी विलक्षण होती. हे मन माणसांमध्ये रमायचे, काव्यशास्त्र विनोदात रात्री जागवायचे, साहित्य-कलेवर गंभीर चर्चा करायचे, राजकारणात रस घ्यायचे, मनसोक्त भटकंती करायचे अन् शेतीशीही नाते जोडून असायचे. आम्हाला या लोकविलक्षण व्यक्ति-मत्त्वाचा अचंबा वाटायचा. निष्ठापूर्वक हे सारे करणाऱ्या या कलावंताने आम्हा पोरांची मने केव्हाच जिंकून घेतली होती आणि आता तर तो मनात कायमचे घर करून गेला.

ब्रह्मपुरीपासून सोळा किलोमीटरवरील गड-चिरोली जिल्ह्यातील विसोरा हे नाकाडेंचे गाव. गाव कसले, जेमतेम दोन हजार लोकवस्तीचे चिमुकलेच खेडेच. निसर्गाच्या कुशीत वसलेले. अगदी बालकवींच्या कवितेतल्यासारखे. चहूकडे हिरवीगार भातशेती, थोड्या अंतरावरून वाह-

णारी वैनगंगा, वाऱ्याच्या सुरासोबत गाणे गाणाऱ्या बाम्बूंचे वन ... आणि या पार्श्वभूमीवर गळचात गळा घालून वसलेली विसोऱ्यातील घरे. या अशा विसोऱ्यात नाकाडेंच्या चित्रांना बहर आला, ती सजीव झाली. चित्रे सजीव झाली आणि त्या चित्रांना पाय फुटले. वडसा, ब्रह्मपुरीत न थांबता त्या चित्रांनी थेट नागपूरपर्यंत मजल मारली. नागपुरात प्रदर्शन भरले तेव्हा रसिकांनी या आगळचा कलाकृतींचे कौतुक केले. मग गावोगाव प्रदर्शने होऊ लागली. दैनिके आणि नियतकालिकांच्या दिवाळी अंकांची पाने नाकाडेंच्या चित्रांनी सजू लागली. झाडीपट्टीतल्या या चित्रकाराने पाहता पाहता केवढी तरी झेप घेतली. आपला वेगळा ठसा उमटवणारी प्रभावी शैली त्यांनी निर्माण केली. 'बाम्बू पेंटिंग' हे त्याचे नाव.

बाम्बूच्या कमच्यांच्या कुंचल्यातून साकारलेल्या चित्रांनी रसिकाने स्तिमित होऊन अर्थाचा पदर धरीत सौंदर्य शोधत जावे असे नाकाडेंच्या चित्रांचे वैशिष्ट्य होते. तरल अन् चिंतनशील प्रतिमेचा सरल आविष्कार त्यांनी आपल्या चित्रांतून केला. वरवर तुटक, रफ (Rough) भासणाऱ्या त्यांच्या फटकाऱ्यांनाही कोमल भावप्रतीती देणारी लय साधायची. ती किमयाच होती.

आपण थक्क होऊन जावे असे या कलावंताजवळ आणखीही बरेच काही होते. झाडीपट्टीतील लेखक, कवी, कलावंतांविषयी नाकाडेंना अतिशय अभिमान होता. झाडीपट्टी हा त्यांच्या अभिमानाचा आणि आनंदाचाच विषय होता. कित्येकांना त्यांनी प्रोत्साहन दिले, आपुलकीने अनुभवाचे चार शब्द सांगितले आणि या सर्वाहून महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या ठिकाणी आत्मविश्वास जागविला. नवीन नवीन नट त्यांनी झाडीपट्टीतून पुढे आणले, त्या भागात नाटचवेड जोपासले, वृद्धिंगत केले. नवनव्या उपक्रमांना दाद दिली, साथ दिली. प्रतिष्ठेची खुळी कल्पना झुगारून देऊन ते रस्त्यावरील कविसंमेलने अन् पथनाटचांना केवळ हजरच राहिले नाहीत तर ते सादर करणाऱ्यांच्या पाठीशीही उभे राहिले. आपल्या चित्रांचे प्रदर्शनही त्यांनी रस्त्यावर भरविले. या साऱ्यांच्या मागे त्यांची सामाजिक आणि सांस्कृतिक कर्तव्यतेची भावना दडलेली असावी असे वाटते. त्यामुळेच झाडीपट्टीतील दुर्लक्षित पण गुणी कलावंतांची दुनियेला ओळख व्हावी यासाठी त्यांनी कुंचला बाजूला ठेवून लेखणी हाती घेतली आणि एकामागून एक लेखमाला लिहून विदर्भाच्या सांस्कृतिक नकाशात झाडीपट्टीचे स्थान अढळ करून ठेवले. एकदा या निमित्ताने हाती घेतलेल्या या लेखणीने मग श्रेष्ठ कलावंतांच्या कलाकृतींचा आस्वादक दृष्टीने वेध घेतला. हेच लेखन पुढे 'कॅनव्हास' या नावाने पुस्तकरूपाने प्रकाशित झाले.

मी ब्रह्मपुरीत असेपर्यंत नाकाडेंच्या खूपदा भेटीगाठी होत. विविध उपक्रम-कार्यक्रमांच्या निमित्ताने एकत्र येणे होई. नागपुरात आल्यावर भेटी दुर्मिळ झाल्या. ते कुंचला अन् लेखणी विसरून राजकारणात रस घेऊ लागले. कलावंताच्या जीवन–प्रवासाला हे अनोखे वळण होते. खरेच वाटायचे नाही. वाटायचे की नाकाडेंनी यात पडू नये, त्यांच्या कलावंत मनाला ते मानवणार नाही. परंतु एकदा विचारपूर्वक हाती घेतलेले ते काम त्यांनी त्याच निष्ठेने सुरू ठेवले. साहित्य–कलेवरील त्यांची भाषणे ऐकायची सवय झालेल्या कानांना राजकारणावरील त्यांचे भाष्य ऐकून प्रथम चुकल्याचुकल्यासारखे वाटे. नंतर सवय झाली आणि कलावंत, लेखक नाकाडेंच्या बरोबरीनेच एक अभ्यासू, परिश्रमी राजकीय कार्यकर्ता अशी त्यांची प्रतिमा साकार झाली. राजकीय क्षेत्रातील कार्यासाठी त्यांनी भारतीय जनता पक्षाची निवड केली याचे समाधान मोठे होते.

लोकसभेच्या निवडणुकीसाठी चिमूर मतदार संघातून भाजपतर्फे त्यांची उमेदवारी जाहीर झाली अन् कार्यकर्त्यांत केवढा जोष निर्माण झाला! सारे अगदी भिडून कामाला लागले. यशाची खात्री तर नव्हतीच पण झुंज जबर द्यायची होती. त्या दिवसांत नाकाडेंच्या पायांना तर जणू चाके लावली होती. साकोलीपासून चिमूरपर्यंतचा हा मोठा मतदारसंघ त्यांनी पालथा घातला. कित्येक सभांमधून भाषणं दिली आणि खेड्यापाड्यात भाजप पोहोचवला. निवडणुकीतील पराभवाने खचून न जाता अधिक जोमाने ते पक्षकार्याला

लागले. आणि त्यात रमलेले असतानाच नको त्या वेळी काळाने त्यांच्यावर जय मिळविला. नाकाडेंच्या या अनपेक्षित पराभवाचे दुःख प्रचंड आहे.

गेल्या वर्ष–दोन वर्षात या चित्रकाराच्या चित्रांची शैली बदलली होती. ती अध्यात्मप्रवण झाली होती. बोलतानाही कित्येकदा त्यांच्या तोंडून असे भाव उमटत की साऱ्या मोहपाशांना दूर सारून महाप्रस्थानाची तयारीच त्यांनी करून ठेवली आहे. 'मी काही आतां फार दिवसांचा सोबती नाही' असे जिवाला चटका लावणारे बोल ते अनेकांजवळ बोलले होते. पण असे असले तरी या चिरतरुण कलावंताच्या डोळयांतील ज्योतींचे तेज किंचितही कमी झाले नव्हते. त्या डोळयांना आताआतापर्यंत चित्र–नाटय कलावंतांच्या उत्थानाची स्वप्नं पडायची. ती साकार करायला अन् झालेली पहायला हे डोळे आता नाहीत. ती स्वप्नं साकारण्यासाठी त्या डोळयांची दृष्टी, मनाची उभारी आणि अजातशत्रू वृत्ती आम्हाला लाभो हीच परमेश्वराजवळ प्रार्थना, स्वप्नंपूर्तीच्या आनंदक्षणांसाठी झटणे हीच या धनंजयाला श्रद्धांजली. ■

'युगवाणी' मिळत नाही ?

युगवाणीचा अंक पोस्टाने पाठविल्यानंतर तो मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी येतात. असेच अपुऱ्या पत्त्यामुळे / पत्ता बदलल्यामुळेही बरेच अंक परत येत असतात. परिणामी बराच डाकव्यय वाया जाऊन संस्थेला भुर्दंड सोसावा लागतो. सर्व सभासदांना / वर्गणीदारांना युगवाणीचा अंक नियमित पाठविला जात आहे, याची विशेष काळजी आम्ही आमच्याकडून घेत आहोच. तुमच्याकडून कृपया पुढील सहकार्य मिळावे.

- ज्या तीन महिन्याचा अंक असतो त्यांच्या पुढील महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत तो आपल्याला मिळावा ही अपेक्षा असते. तरीही अनेकदा पोस्टाच्या दिरंगाईमुळे तो आपल्यापर्यंत पोहोचण्यास बराच वेळ लागतो. तेंव्हा त्या महिन्याच्या पंधरा तारखेपर्यंत थांबूनही आपल्याला अंक न मिळाल्यास, प्रथम तुमच्या गावच्या / विभागाच्या पोस्टात चौकशी करा–लेखी तक्रार द्या व तिची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी आम्हाला पाठवा.
- अंक शिल्लक असल्यास आपल्याला तो आवर्जून पाठविण्यात येईल.
- आपण आपला पत्ता पूर्ण व अचूक नोंदला आहे काय ? पत्त्यात झालेला बदल, कार्यालयाला त्वरित कळविण्याची आपण कृपया खबरदारी घ्यावी. शक्यतोवर घरचाच पत्ता द्यावा. संस्थेचा/ कार्यालयाचा देऊ नये.
- तुमची वर्गणी संपलेली नाही ना ? तुमचे नाव नियमित सभासदांच्या/ वर्गणीदारांच्या नोंदीत आहे याची खात्री करून घ्यावी.
- पत्ता बदलल्यामुळे परत आलेला व पुढील अंक सभासद/ वर्गणीदारांकडून कार्यालयाला नवीन पत्त्यांची रीतसर सूचना मिळेपर्यंत पुन्हा पाठविले जात नाहीत.

मनोहर म्हैसाळकर
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

खूणगाठी

सुलभा हेर्लेकर

ग्रं थि की

खूणगाठी हा ना. घ. देशपांडे यांचा अलीकडेच प्रसिद्ध झालेला संग्रह ! 'शीळ' घालीत कवितांना वळणे देत आता 'खूणगाठी 'शी ती पक्की झाली आहे. ना.घं.चा 'शीळ' ते 'खूणगाठी' हा प्रवासही मनोज्ञ आहे. पुस्तकाच्या सुरवातीलाच दीर्घ प्रस्तावना लिहून ना. घं. नी आपल्या जन्म कुंडलीपासून तो ७६ वर्षापर्यंतच्या प्रवासाचा आलेखच वाचकांना सादर केला आहे. हा आलेख वाचत असताना कवी ना. घं. जसे उलगडत जातात तसे ना. घ. एक व्यक्ती म्हणूनही आपल्या समोर उभे राहतात. कवितेचे छंद, लय, गण, यमकं यांचे प्रत्येक कवितेनुसार सुस्पष्टपणे जाणवून देणारे अंतर्गत मन—व त्यातील बारकावे इतक्या सविस्तर पणे देणारे ना. घ. जेव्हा रसिकापुढे येतात तेव्हा 'नदीकिनारी....'च्या विश्वातून आपण मावळतीच्या पिवळ्या रंगात उतरतो आणि सौंदर्याच्या तरल जाणीवेने या कवितांनी दिलेला निर्भेळ आनंद रसिकाच्या मनात भरून उरतो.

'अजून माझ्या तळहातावर
सुगंध उरले, सुगंध उरले.'

अशा ओळीतून सुगंधाचे विश्व साक्षात साकार होते.

ना. घं. ची कविता ही भावकविता आहे. त्यांची अभिव्यक्ती, साधी, सरळ व भाषा पारदर्शक. कवितेतील उत्कट प्रतिमा त्या भावस्थितीत बुडून जातात. उदा. 'छंद' या कवितेत 'या वेसावध गवतावर ही टिचकी मारत गेली अवचित पाखरा छाया, गवत हालले। किंचित विस्मित पुलकित शंकित '...यातील नादमयता, अर्थ, आणि ठेका यांची एक संमिश्र जाणीव साधली जाऊन अर्थपरिपोष झालेला आहे. अर्थाच्या अनेक गहिऱ्या छटा कित्येक कवितातून प्रतीत होतात. अनुभव घेण्याच्या भाववृत्तीतील प्रासादिकता हेही ना. घं. च्या कवितेतील एक वैशिष्टय आहे. शब्द, नाद, अर्थ यातील संबंधाचे योग्य भान असल्यामुळे निर्माण झालेल्या, 'यमुनेच्या पुलिनात, छंद, नाही जात कुठेच, गुरमळतो गारवा, अशा काही कविता या दृष्टीने बघण्यासारख्या आहेत.

एखाद्या कवितेला मूळचेच रंगरूप लाभावे आणि रंगानी तिथे एक मुक्त लकेरच घेतली असावी अशी ही तजेलदार कविता. अशा ठिकाणी कधी हिरवा रंग बेभान होऊन उधळत असतो तर कुठे समुद्राचा गहिरा निळा रंगोत्सव साजरा होत असतो. ह्या कवितेतले गाव धूसर आठवणींनी जांभळ्या टेकड्याभोवती वेढून घ्यावे तसे वाटते. म्हणूनच या रंगाच्या, शब्दांच्या लावण्याने कवीची कविता रेखीव आणि नुबक बनते. शहराच्या मातीतील रूक्षता आणि कठोरपणा ना. घं. च्या या कवितेपासून दूर राहिली आहे. त्यांच्या गावच्या ओल्सर मातीमधे केवढी ताकद आहे. हे त्यांच्या कवितेतून जागोजागी प्रत्ययाला येते. कडूनिम्बाच्या मोहराच्या वासाने गंधित झालेली माती आणि पक्ष्यांचे झुलते पंख, आणि पानांच्या दाटीतून उतरलेला सावळा प्रकाश याचे एक लोभस चित्रच ना. घं. च्या कवितेतून जिवंत होऊन येते. 'जसा तुझा हा'—या कवितेत ह्या काही ओळी बघा.

"घराघरावर, वनावनावर धुंद अनावर
धडधड धारा
गाई, गोऱ्हे आणि वासरे पळू
लागली सैरावैरा
जलकुंभावर जलराणीचा गोठ रूपेरी
कडकडलाग–ऽ जसा तुझा हा..."

या ओळीतून प्रतीत होणारा सूचक, संदिग्ध, तरल असा अनुभव सूक्ष्म जीवनाकडे खेचून नेतो. तरल आणि साध्या शब्दांच्या आड त्यांचा असा खास आशय दडून असतो. तो मूर्तस्वरूपात येताना मात्र,

'निळ्या अंधारी रंगात मुके चिंतन
चंदेरी होती चितारत रात
होते हातांत माझ्या या मृदुसावळे
पिवळे तुझे हळदीचे हात'

अशा अखंडित स्वरुपात येतो. भाववृत्तींना सजग भान आणण्याचे सामर्थ्य अशा कवितात असते. लाघवी लावण्याचे एक अमूर्त चित्रण त्यांची कविता करते तेव्हा ना. घं. च्या शैलीचे एक निराळेपण जाणवते. छंदलयीचा बारकाईने विचार करणारे जुन्या पिढीतील ना. घ. हे अजूनही तकलादू आणि उपऱ्या वास्तववादी कवितांपासून दूर आहेत. स्वतःचे असे आत्मबल जोपासूनही ना. घं. ची कविता नव्या पिढीलाही आकर्षित करते. त्यांच्या मुक्तछंदातील कविताही त्यांच्या सहजभाव शैलीमुळे अर्थपूर्ण आणि लयकारी झाल्या आहेत. ना. घं. ची कविता बरीचशी गेय स्वरुपातली आहे. पण त्यांना ठेका साधण्यासाठी शब्दांचा खेळ करावा लागलेला नाही. ' खळखळणारी घरून कळशी, आवरून हा पदर उराशी ' ह्यातील खळखळ ह्या शब्दांमुळे त्यातील 'ध्वनी पाण्याचा, कोमलसा वाटतोय आणि कळशीचे प्रतीक ही नादाला धरून आलेले !' म्हणून गेयरचनेसाठी खूप आटापिटा करणे ' हे तंत्र नसून ना. घं. ची कविता येते तीच अशी गेयतेतून ! शब्दांना न हरवता ! कारण गेय रचनेमध्ये शब्दाला महत्व कमी दिल्या जाते. ' खळखळ ' या नादसूचक शब्दामुळे वस्त्रातून–पदरातून उमटणाराही नाद आला आहेच. ह्यामुळे शब्दानी निर्माण होणारे नाद हे भावाला धरून असावे लागतात. त्याची जाण ना. घं. च्या ह्या ' खूणगाठी 'त जागोजाग दिसते.

काव्य समजून घेण्याचे आणि व्यक्त करताना त्यातील अर्थाचे किनारे निसटू न देण्याचे भान फार कमी कर्त्यांमधे असते. ना. घं. च्या कवितेत हे भान मूळातच असल्याने कित्येक ठिकाणी शब्दांच्या अर्थछटा एकाच वेळेस अनेक अर्थ संदर्भित करतात आणि चांगल्या कवितेचे हेच यश असते. अत्यंत साध्या शब्दात, अक्षर अल्पत्वाने पकडलेले कितीतरी जिवंत क्षण ना. घं. च्या कवितेत सापडतात. ' घाट ' या कवितेत.

"ओसरल्यावर पूर
गढूळ पाणी खोलात
कराडी दरडीचा, उघड्या मुळांचा
घसरल्या मातीचा काठ
नाठाळ शब्दांचा, वाकल्या वाक्यांचा
बठरल्या वाभळीचा घाट."

या ओळींनी रंगचित्रण तर साधलेच, पण एक अनुभवाचा तिरंग क्षण आणि पाण्याचे गडद खोलपण साध्या शब्दांनीच आपल्यापर्यंत पोहचते. कुठल्याही बांधीलकीशी न बांधताही ' एक जाळ भडकला तर ', ' गांधी ' या सारख्या कविता सामाजिक आशय व्यक्त करतात. मग या समाजाकडे डोळसपणे बघताना.

"रस्ताच नाही आहे फक्त ताणलेली तार
ना उजवीकडे, ना डावीकडे झुकायचं
आडवं येतं हे मागचं वचन
ना पुढे जायचं, ना मागे यायचं"

अशी उदासीही दाटून येते. अंधारात निजलेले आम्ही कसली क्रांती करणार ? या उदासीबरोबर भोवतालची परिस्थिती त्यांना अस्वस्थ करते. तिथेही त्यांच्या शब्दांचे भान कायम असतेच. ना. घं. ची शैली ही मुळातच अर्थप्रसरणाची आहे. नुसत्या शब्दांची नाही. निराशा दाटली तरी खरे कवी ना. घ. "बरसलंऽ पाणी, विसरली गाणी, अजून आहेत ढग हे काळेभोर ।" अशा ओळीतच जास्त कळतात. पुन: बरसायचे आहे ही एकमेव नितांत कल्पना त्यांच्या कवीमनाला पूरेपूर घेरून असल्यानेच ना. घं. ची कविता शुभ्र पंखांच्या बगळ्याप्रमाणे आभाळात उंच उडणारी आहे. ■

खूणगाठी
ना. घ. देशपांडे
मौज प्रकाशनगृह
खटाववाडी, गिरगाव, मुंबई–४

निमित कादंबरीचे

सुनंदा देशपांडे

प्र. ह. जोशी लिखित 'तुझी माझी प्रीत', आनंद साधलेलिखित 'आता उशीर झाला', आनंद पाटील लिखित 'कागद आणि सावली' व वंदना पोंक्षे लिखित 'दीपकळी' या चारही कादंबऱ्या प्रचलित कादंबरी प्रवाहाशी नाते सांगणाऱ्या आहेत.

: १ :

प्र. ह. जोशी यांनी लिहिलेली व रविराज प्रकाशनने प्रकाशित केलेली 'तुझी माझी प्रीत' ही कादंबरी दोन मीलनोत्सुक प्रेमिकांची कहाणी आहे. अर्थातच त्यांच्या या मीलनात अनेक अडचणींप्रमाणेच जातीची अडचण येते. गरीब, श्रीमंत जातपात यांची जोखंड झुगारून देऊन त्यापलीकडे जाणारे प्रेम हे खरे प्रेम याची प्रतीती प्रस्तुत कादंबरीत लेखकाने आणून दिली आहे.

कादंबरीचे कथानक तसे ठराविक चौकटीतले. यातला नायक मिलिंद हा शाळा मास्तरांचा मुलगा. घरची परिस्थिती बेतासबेत असलेला व जातीने ब्राह्मण, तर नायिका मीनल ही एका आर्मी ऑफिसरची एकुलती एक मुलगी. घरची श्रीमंत, दिसायला सुंदर व जातीने मराठा. नायिकेचे प्रेम संपादन करण्यासाठी नायक हरतऱ्हेच्या क्लृप्त्या करतो. आपल्या प्रेमाची परीक्षा पाहण्यासाठी ऑफीसच्या कामाची थाप देऊन मुंबईस जातो. व आपले प्रेम सिद्ध करूनच परततो. नायक-नायिकेच्या आईवडिलांकडून या आंतरजातीय विवाहास विरोध असतो. या विरोधाला तोंड देण्याची तयारी नायक दाखवतो, पण नायिका मात्र माघार घेते; आईवडिलांनी ठरवलेल्या मुलाशी लग्न करते. मंत्र्याच्या मुलाशी विवाहबद्ध होऊन व ऐषारामात राहूनही ती सुखी नसते. मोठ्या घरचे सडके वासे याचा तिला अनुभव येतो. आपण केवळ श्रीमंतीवर भाळलो याचा तिच्या आईवडिलांनाही पश्चात्ताप होतो. व शेवटी या विवाहबंधनातून स्वतःला सोडवून घेऊन मिलिंदशी ती विवाहबद्ध होते.

कादंबरीचा नायक हा या कादंबरीचा निवेदकही आहे. त्याच्या या आत्मनिवेदनातून त्याच्या प्रेमसाफल्याची ही कहाणी अनेक घटनाप्रसंगांनी फुलत जाते. तारुण्यात पदार्पणानंतरच्या प्रेमापुढे सारे जग तुच्छ वाटू लागते. हा कादंबरी-नायकाचा अनुभव साऱ्याच तरुण प्रेमीजीवांचा अनुभव आहे. त्यामुळे ही कादंबरी वाचताना प्रेमात आपलं हृदय हरवून बसलेल्या तरुण वाचकांना जणू ते आपल्या हृदयीचं गूज वाटू लागतं. कादंबरीची कहाणी ठराविक चौकटीतली असली तरी नायकाची आत्मीयता अत्यंत प्रामाणिक वाटते. त्याच्या प्रेमाचा सच्चेपणा वाचकाला भावून जातो व या मीलनोत्सुक जीवांचं मीलन झालेलं पाहून त्यालाही शेवटी हायसं वाटतं. वैयक्तिक सुखदुःखाच्या भोवऱ्यात फिरत असलेल्या या कादंबरीत वैयक्तिक कादंबरीच्या प्रचलित प्रवाहाहून वेगळे काही जाणवत नाही; असे म्हणावे लागते.

: २ :

या वैयक्तिक कादंबरीकडून आपण आनंद साठे यांच्या सामाजिक कादंबरीकडे वळल्यास त्यांच्या 'आता उशीर झाला' कादंबरीत जातीयतेची समस्या घेतलेली दिसते. स्पृश्य-अस्पृश्य यात चाललेला लढा हा तसा सनातन विषय. स्वातंत्र्यानंतर आज इतक्या वर्षांनीही या दोन वर्गात सामंजस्य निर्माण होऊ शकले नाही. त्यामुळे ही कादंबरी कालदृष्टचा त्या काळाची व आशयदृष्टचा आजच्या काळाची आहे. असे य कादंबरीच्या प्रस्तावनेत म्हटले आहे त्याचा प्रत्यय कादंबरी वाचत असताना येतो. ज्याकाळात बाबासाहेब आंबेडकरांनी स्पृश्य समाजाला 'अस्पृश्यांना जवळ करा, नाही तर आम्ही धर्मांतर करू' असा इषारा दिला त्या काळात प्रस्तुत कादंबरीचे लेखन झाले. या कादंबरीतला नायक बाळ हा जातीने ब्राह्मण, पण साने गुरुजींपासून प्रेरणा घेऊन मुंबईतल्या नोकरीला लाथ मारतो. व आपल्या जन्मगावी-गाव सुधारणेसाठी येतो. वडिलांच्या कर्मठ कर्मकांडाला न जुमानता महारांच्या ज्या समस्या होत्या, त्या आता त्याच्याही होतात. त्यांचे हे नरकातले, दारिद्रयातले जीवन सुधारावे म्हणून तो त्यांना स्वच्छतेचे धडे देतो, लिहायवाचायला शिकवतो. पण पाण्याशिवाय स्वच्छता होणार कशी ? पाण्याचा विकट प्रश्न सनातन काळापासून या समाजाच्या मानगुटीवर बसला आहे; त्यासाठी यातला नायक व्यक्तिशः सवर्णांशी लढा देतो. अस्पृश्य समाजावर होणाऱ्या अत्याचारांची दाद मागण्यासाठी शहरात पोलीसांकडे जातो पण महार म्हणून तेथेही त्याची उपेक्षा होते.

शतकानुशतके सवर्णांचे अत्याचार निमूटपणे

सहन करणारा अस्पृश्य स्पृश्यांची थुंकी झेलण्यात आपल्या जीविताची इतिकर्तव्यता मानतो. 'जुलूम करणे हा सवर्णांचा हक्क' तर 'जुलूम सहणे हे अस्पृश्यांचे कर्तव्य' असे समजण्याइतपत तो निष्क्रिय झाला आहे. त्यांच्यापुढे प्रश्न असतो तो फक्त पोटाची खळगी भरण्याचा.

प्रस्तुत कादंबरीतले 'गोंद्या' हे पात्र अस्पृश्य समाजातले. केवळ पैशाच्या लोभापायी स्वतःचा हिंदुधर्म सोडून मुस्लिम धर्मात गेलेला हा गोंद्या इतरांनीही धर्मांतर करावे म्हणून त्यांना आमीष दाखवतो. क्षणैक मोहाला बळी पडून आपण आपल्याच धर्मबांधवांचे किती अपरिमित नुकसान करीत आहोत याची त्याच्या अपरिपक्व बुद्धीकला जाणही नसते.

कादंबरीचा नायक बाळ याला हिंदू धर्मावरील या संकटाची जाणीव तीव्रपणे झाली असते. अस्पृश्यांनी धर्मांतर केले तर हिंदूधर्मांची शक्ती खच्ची होईल व मुस्लिमांची वाढेल हा धोका त्याच्या दूरदृष्टीला दिसला. 'एक माणूस म्हणून दुसऱ्या माणसाला माणसासारखे जगू द्या' एवढे सांगितल्याने भागणार नाही हे लक्षात येताच 'ज्या हिंदू धर्माच्या रक्षणाचा आव तुम्ही आणला आहे त्या धर्माच्या भल्याकरता अस्पृश्यांना जवळ करा' असे त्याने सांगितले. पण त्याचाही काही परिणाम झाला नाही.

गाव सुधारण्याचा नायकाचा निर्धार झाल्यावर त्याला पहिला संघर्ष करावा लागला तो जन्मदात्याशी. इथून सुरू झालेला संघर्ष व्यापक होत होत गावची सत्ता ज्यांच्या हातात होती अशा आबाशी सुरू झाला. बाळचा आबाशी वेळोवेळी झालेला वाद, तसेच आबाच्या विहिरीवर त्यांच्या विरोधात जाऊन पाणी भरायला महारवाडा लोटतो तो प्रसंग लेखकाच्या सिद्धहस्त लेखणीचा प्रत्यय आणून देतात. महारवाड्याच्या कंगालपणाचे चित्रण प्रत्ययकारी झाले आहे. पण इथे एक गोष्ट खटकल्यावाचून राहत नाही ती म्हणजे अस्पृश्यांची भाषा. लेखकांनी त्यांच्या संवादातून त्यांची नित्याची बोली भाषा वापरली असती तर महारवाड्याचे चित्रण अधिक वास्तव झाले असते, असे म्हणावेसे वाटते.

सामाजिक कादंबरीच्या प्रचलित प्रवाहात प्रस्तुत कादंबरीने कोणती नवी भर घातली असा प्रश्न साहजिकच तिचे मूल्यमापन करतांना निर्माण होतो. या प्रश्नाच्या संदर्भात असे म्हणता येईल की या कादंबरीचा विषय तसा सनातन आहे. विषयाचा आविष्कार लेखकाने बऱ्यापैकी साधला असला तरी परिणामकारकतेच्या दृष्टीने तो अपुरा वाटतो. कारण कोणतेही सामाजिक कार्य करण्यासाठी मनुष्यबळ तसेच आर्थिक पाठबळही असावे लागते. प्रस्तुत कादंबरीतल्या नायकाजवळ आर्थिक पाठबळ जवळ जवळ नाहीच. तसेच त्याच्याजवळ कुठलाही योजनाबद्ध कार्यक्रम नाही. शेवटी त्याला जे साधायचे आहे ते फक्त वैयक्तिक पातळीवर साधले जाते. महारवाड्यातल्या हिरीशी तो विवाहबद्ध होतो. पण प्रत्यक्ष जन्मदात्या आईचीही तिला सून म्हणून स्वीकारण्याची मनाची तयारी होत नाही. 'माणसाची माणुसकी हीच माणसाची खरी जात' हे विचार त्याच्यापुरतेच मर्यादित राहातात. म्हणूनच 'ते तुम्हाला पटणार नाही' पटवून घेतले तरी तुमची जीवने उद्ध्वस्त होतील; असे म्हणून त्याला थांबावे लागते.

: ३ :

या सामाजिक कादंबरीप्रमाणेच आनंद पाटील यांची 'कागूद आणि सावली' ही कादंबरीही प्रचलित ग्रामीण कादंबरीहून फारशी वेगळी नाही. ग्रामीण भागातल्या लोकांच्या बोलण्याच्या लकबी, त्यांच्या सवयी यांचे वास्तव दर्शन आनंद पाटील यांच्या साहित्यातून आपल्याला घडते. 'कागूद आणि सावली' या दोन लघुकादंबऱ्या वाचत असता आनंद पाटील ग्रामीण जीवनाशी किती परिचित झाले आहेत याचा प्रत्यय वाचकाला येतो.

खेड्यामध्ये किंवा लहान गावात शेतीवाडीच्या कामासाठी कोर्टकचेरीकडे नेहमीच धाव घ्यावी लागते. प्रस्तुत लघुकादंबरीत लेखकाने शित्तूर गावातल्या आबाच्या 'नागझरी'चा असाच एक किस्सा सांगितला आहे. किसन्याच्या तीन जावयापैकी बांबुडकर डायवर जावयानं 'आवंदा पेरणी करू नका' म्हणून आबाला दम भरला होता.

डेंग्रवरने सगळ्या लेकींची नावं सातबाराला लावून घेऊन 'कर्ज भागवतो, जमीन सोडा, न्हायतर तुम्ही खरेदी करा' म्हणून तिढा घातला असतो. आवाचा मुलगा बाबू हा त्यासाठीच सातारवरून गावात आला असतो. गावकीतल्या असल्या भानगडीच्या वैतागामुळेच आबाला दुखवून तो सातारला मॅट्रीकनंतरच्या शिक्षणाला चालता झाला होता. हा तिढा कसा सोडवायचा याच विवंचनेत तो होता. सगळी सोंगं करता येतील पण पैशाचं सोंग नाही हे त्याला चांगलं ठाऊक होतं. कागूद करायचा तर पैसा पाहिजे त्यासाठी गावातल्या सरपंचाकडे जाऊन लॅंड डेव्हलपमेंट ऑफिसरकडून तो कर्ज मंजूर करवून घेतो. असल्या कामांसाठी अधिकारी लोकांचे हात कसे ओले करावे लागतात याचेही चित्रण लेखक मोठ्या खुबीने करतो. अखेर कर्जाऊ रक्कम व काही उसनवारी करून नागझरीच्या शेताचा मालकी हक्काचा 'कागूद' तयार होईपर्यंतची कहाणी लेखकाने मोठ्या रोचकपणे सांगितली आहे. खेडुतांचे अनेक नमुने पाहून आनंद पाटील यांच्या ग्रामीण जीवनाच्या सूक्ष्म अवलोकनांची साक्ष आपल्याला पटते,

: ४ :

यातलीच दुसरी लघुकादंबरी 'सावली' ही घर बांधणं, नि लग्नकार्य करणं ही दोन्ही कामं हातावर पोट असणाऱ्या कष्टकऱ्यांना जोखमीचीच. प्रस्तुत लघुकादंबरीतला धोंडीबा हा या घरातला कर्ता पुरुष. मुंबईच्या गिरणीत कामगार म्हणून तो राबतो. संपाचा वणवा पेटताच गावात येतो. गावात येताच घराचं काम डोक्यावर घेतो. हाताशी पैसा नाही, चार भावांचं कुटुंब पोसायचं, त्यात संपाचा वैताग. अशातच म्हातारी आई, लहान्या मुलाच्या, दसरताच्या लग्नासाठी जीव तोडते. घर बांधणीसाठी माणिक शेठकडून घेतलेलं कर्ज, नातेवाईकांकडून घेतलेले उसने पैसे असा कर्जाचा डोंगरच धोंडिबाच्या डोक्यावर असतो. अनेक अडचणींना तोंड देत देत कसेबसे एकदाचे मातीच्या भिंतीचे कौलारू घर उभे राहते. प्रस्तुत कादंबरीतली दाजी, जाबर यांच्या सारखी संकटात धावून येणारी माणसं म्हणजे ग्रामीण जीवनातला एक दिलासा असतो. माणिकशेठकडून धोंडीबाला कर्ज मिळावं म्हणून स्वतःच्या बायकोचा चित्ताक गहाण टाकणारा जावर ग्रामीण जीवनातल्या रखरखत्या उन्हातली जणू 'सावली' म्हणायला पाहिजे. याउलट पाठचा भाऊ असूनही नामा मिलट्रीवाला मात्र या सर्व जंजाळातून हात झटकून क्षणात मोकळा होतो.

आनंद पाटील यांनी प्रस्तुत लघुकादंबऱ्यात ग्रामीण लोकांच्या जीवनाचे अनेक पदर असे. सहजगत्या उलगडून दाखवले आहेत. त्यासाठी त्यांनी खास वऱ्हाडी भाषेचा वापर केला आहे. पात्रांचे संवाद तर वऱ्हाडीत आहेच शिवाय लेखकाचे निवेदनही वऱ्हाडीतच आहे. त्यामुळे कादंबरीतल्या या पात्रांशी लेखक अगदी समरस झाल्याचे जाणवते. मात्र ही अस्सल वऱ्हाडी भाषा कधीकधी शहरी वाचकांच्या डोक्यावरूनही जाते. प्रस्तुत कादंबरीतले प्रसंग नि घटना अगदी साध्या व नित्याच्या आहेत. हातावर पोट असणाऱ्या गावकऱ्यांच्या अडीअडचणींची, त्यांच्या सोशिकतेची त्यांच्या अडचणींचा फायदा घेणाऱ्या या भागातल्या अधिकाऱ्यांच्या लाचखाऊपणाची अस्सल वऱ्हाडी भाषेत दखल घेणारी कादंबरी म्हणून प्रस्तुत कादंबरीचा उल्लेख करता येईल.

: ५ :

ग्रामीण, प्रादेशिक कादंबरीप्रमाणेच ऐतिहासिक कादंबरीप्रवाह मराठी कादंबरीक्षेत्रात लोकप्रिय झाला आहे. सौ. वंदना पोंक्षे यांची 'दीपकळी' ही अशीच एक ऐतिहासिक कादंबरी. या कादंबरीची सुरुवात श्रीमंत नानासाहेब पेशवे यांच्या कारकिर्दीने सुरू झाली आहे. प्रस्तुत कादंबरीच्या सुरुवातीचे वातावरण निजामाविरुद्ध मिळालेल्या विजयोत्सवाने भारून गेले आहे.

'दीपकळी'त घटना अत्यंत वेगाने घडत जातात. निजामाच्या पाडाव होत नाही तोच पुन्हा सदाशिवराव भाऊ मोहिमेवर जातात. पानिपतच्या युद्धात ते बेपत्ता होतात. युद्धात मराठ्यांचा पराभव होऊन कोणाचा पायपोस कोणाला राहत नाही. तशात सदाशिवरावभाऊंचे कलेवर सापडत नाही. अशावेळी त्यांच्या पत्नी पार्वतीबाई यांचेवर

अनावस्था प्रसंग गुदरतो. त्यांचं मन स्वतःला विधवा मानायला तयार नसतं, तर समाज सधवेचं जिणं जगू द्यायला तयार नसतो. अशाप्रसंगी स्वतःशी प्रामाणिक राहून अत्यंत कणखरपणे सधवेचं लेणं त्या जपतात व आयुष्याच्या अखेरी-पर्यंत पतीची वाट पाहात राहतात. प्रस्तुत कादंबरी ही या दीपकळीच्या अलोट मानसिक धैर्याची कहाणी आहे. पार्वतीबाईंचे जीवन हे खरोखरीच एखाद्या दीपज्योतीसारखे आहे. स्वतः जळून दुसऱ्यांना प्रकाश देत राहणे हेच तिचे जीवितकार्य. पेशवाईवर एकामागून एक संकटे येतात या सर्व संकटावर कळस म्हणजे सत्तेसाठी आनंदीबाई व रघुनाथदादांनी केलेला घरभेदीपणा अशा आपद्‌काळी ही दीपकळी स्वतःचे दुःख कुरवाळीत न बसता आपणाकडून होईल तेवढी बाकीच्यांना आधार देत राहाते. कादंबरीतल्या एकामागून एक घडणाऱ्या घटना लेखिकेने समर्थ-पणे बोलक्या केल्या आहेत. पानिपतच्या युद्धाचा प्रसंग, युद्धानंतर पेशव्यांचे सैन्य व लोक यांची झालेली दैना, नारायणराव पेशव्यांच्या वधाचा प्रसंग वगैरे घटना चित्रपटाप्रमाणे आपल्या डोळ्यासमोर घडत आहेत असे वाचकांना वाटावे इतक्या जिवंतपणे व प्रवाहीपणे लेखिकेने शब्दां-कित केल्या आहेत. लेखिकेचा नवोदितपणा प्रस्तुत कादंबरीत कुठेही जाणवत नाही.

ऐतिहासिक कादंबरीकाराला ऐतिहासिक कादं-बरी लिहिताना काही पथ्ये पाळावी लागतात. इतिहासातले घटना-प्रसंग जसेच्या तसे कादंबरीत मांडले तर ती कादंबरी न होता इतिहासच होईल. ऐतिहासिक घटना प्रसंगांना आपल्या प्रतिभा-सामर्थ्याने फुलवणे, त्यात कल्पनाविलासाचे विविध रंग भरून ते आकर्षक करणे पण असे काल्पनिक रंग भरत असता मूळचा इतिहास विकृत होणार नाही याचेही भान ऐतिहासिक कादंबरीकाराला असावे लागते या निकषावर 'दीपकळी' तपासून पाहिली असता असे म्हणता येईल की ऐतिहासिक सत्याला बाध न येऊ देता त्यातील घटनाप्रसंगांना लेखिकेने आपल्या कल्पनाविलासाने खुलविले आहे. निवेदनात प्रवाहीपणा असल्याने पाल्हाळिकपणा जाणवत नाही व अनेक घटनाप्रसंगांनी भरलेली कादंबरी शेवटी आटोपशीर झाली आहे. ऐतिहासिक कादंबरीप्रवाहात आणखी एका कादंबरीची भर पडली आहे असे म्हणता येईल. प्रचलित ऐतिहासिक कादंबरीच्या ठराविक चाको-रीतली एक कादंबरी म्हणूनच 'दीपकळी'चाही नामोल्लेख करता येईल.

प्रस्तुत चारही कादंबऱ्या या प्रचलित कादंबरी प्रवाहात पूर्णपणे मिसळून गेल्या आहेत. त्यामुळे त्यांचे काही वेगळे वैशिष्ट्य किंवा वेगळे स्थान मात्र सांगता यायचे नाही. ■

(१) तुझी माझी प्रीत
लेखक—प्र. ह. जोशी
रविराज प्रकाशन,
४५८/२, सदाशिवपेठ, पुणे ४११०३०
पृ. १४०, मू. २५ रु.

(२) आता उशीर झाला
लेखक—आनंद साधले
रविराज प्रकाशन
४५८/२, सदाशिवपेठ, पुणे ४११०३०
पृ. २३० मू. ३५ रु.

(३) कागद, आणि सावली
लेखक—आनंद पाटील
मौज प्रकाशनगृह
खटाववाडी, मुंबई ४०० ००४
पृ. १४७, मू. ४१ रु.

(४) दीपकळी
लेख—सौ. वंदना पोंक्षे
मू. ३० रु. पृ. २०५
रविराज प्रकाशन
४५८/२, सदाशिवपेठ, पुणे ४११०३०

'माझी छायाचित्रकला'

डॉ. श्रीकांत बाळकृष्ण दाभाडे

छायाचित्र कलेवर सुबक छापलेले व अवघ्या सात लेखातच बरेच काही सांगून जाणारे "माझी छायाचित्रकला" या देविदास बागुल यांच्या पुस्तकाचे आगमन अभिनन्दनीय आहे.

छायाचित्रकलेस, निदान भारतात तरी, जसा पाहिजे तसा, इतर कलेच्या मानाने, बरोबरीचे स्थान मिळत नाही, कदाचित् कलेसोबत येथे तंत्राचाही बराचसा भाग असल्याने हे होणे कठीण जात असेल. याबद्दल लेखणी उचलून श्री. बागुलांनी परखडपणे, छायाचित्रकला व छायाचित्रकाराची अस्मिता जागृत ठेवली, याचे कौतुक करावे तितके थोडेच आहे.

छायाचित्र हे बोलके असते. लांबी आणि रुंदी यातून ते त्रिमितीचा आभास साधते. मी तर म्हणेन, चवथ्या दिशेच्या भावनेचेही दर्शन देते, अशा माध्यमातून काम करणारी माणसे थोडीच आणि त्यांचे कौतुक करणारी माणसे तर त्यापेक्षाही कमीच आहेत, असो. कोणतेही काम करताना तीन गोष्टींची गरज पडते—आवड, माहिती, आणि उत्तेजन व संधी. ह्या पुस्तकाच्या निमित्ताने ह्या तिन्ही गोष्टी छायाचित्रकलेच्या उपासकांना कलेच्या आणखी जवळ आणतील ही खात्री आहे.

बागुलांच्या लेखांतून छायाचित्रे बघणाऱ्या प्रेक्षकांना आनंद घेण्याची एक दिशा मिळते. छायाचित्र बघणारा छाया आणि चित्र यांचे रूप पाहण्याऐवजी छायाचित्रातील माणसाचे वस्तूचे लौकिक नाते शोधीत असतो. छायाचित्रात सौंदर्य पाहण्याऐवजी माहितीपर ज्ञान मिळविण्याचा हव्यास घडतो. छायाचित्र दृष्टीस पडताच, 'छायाचित्राच्या अंतर्गत कृष्णधवल छायांचा चित्रसादृश्य खेळ पाहण्याऐवजी "हे चित्र कुणाचे ?" असा छायाचित्राच्या बाहेरचा उर्मट प्रश्न विचारतो, त्यावेळेस दर्शक विसरून जातो की "छायाचित्रात कलावंत—छायाचित्रकार प्रत्यक्षातील वस्तूंना एक नवे दर्शन घडविण्यासाठी एक नवा आकार देतो आणि हा नवा आकार देताना आपली प्रतिभा अनुसरतो."

या लेखसंग्रहात "छायाचित्राचे रूपदर्शन," "मी छायाचित्रकार कसा झालो" व "छायाचित्रकलेचे समज—गैरसमज" हे लेख कलेची माहिती करून घेणाऱ्यासाठी त्याचे कौतुक करणाऱ्यासाठी व स्वत: बघत असताना त्याच्या मागील तत्त्वज्ञान "शब्दां"च्या साच्यात टाकणाऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. बागुलांनी येथे सरल भाषेत छायाचित्रकलेबद्दलच्या बऱ्याचशा गैरसमजांना हाणून पाडले आहे. साहित्य, संगीत इत्यादी कलांप्रमाणेच छायाचित्रकलेच्या बाबतीतही कलाकाराचे त्याच्या निर्मितीत "स्व"चे कसे दान असते हे फार सुंदर रीतीने बागुलांनी मांडले आहे. वस्तुस्थितीपेक्षा एक वेगळे—आगळे दर्शन तो निर्मितीत कसा करीत असतो, त्या कलाकृतीला बघणाऱ्या प्रेक्षकांना त्रिमितीचा भास व भावनांची देवाणघेवाण करण्यास कसा भाग पाडतो हेही बागुलांनी मार्मिकपणे दाखवून दिले आहे.

ह्या व्यतिरिक्त चार लेख छायाचित्रकाराच्या अस्मितेविषयी व कला—कलावंत व उपभोक्ते यांच्या बांधिलकी व नैतिक जबाबदाऱ्यांविषयी परखड विचार व्यक्त करणारे आहेत. छायाचित्रकाराला इतर कलाकारांपेक्षा, लेखकांपेक्षा—केवळ तो यंत्राचा वापर करतो. म्हणून—कसे कमी लेखले जाते. त्याच्याच कलाकृतीचा वापर करून त्यास पुन्हा अनुल्लेखाने कसे मारले जाते हेही बागुलांनी दाखवून दिले आहे.

छायाचित्रांविषयी सांगताना व्यक्तिचित्रांच्या संदर्भात विशेषेकरून किशोरी आमोणकर, सुरेश भट, व. पु काळे आणि केसरीकार यांचा छायाचित्रकाराविषयी असणारा 'दर्प' बागुलांनी मोठ्या धिटाईने समोर आणला आहे, व्यक्तिचित्रे आणि त्याचे कॉपी—राईट, कलावंताचे हक्क आदींबाबत हे लेख सर्वच छायाचित्रकारांना 'जागे' करणारे आहेत.

या पुस्तकातील सात लेख, सातरंगी छायाचित्रकाराच्या भावनांचे जग, "शब्दां"च्या माध्यमातून वाचकांसमोर सादर करतात पुस्तकात

पाच छायाचित्रे व तशीच वरील व मूलपृष्ठावरील चित्रे पुस्तकाच्या सौंदर्यात भर घालतात. एकदा पुस्तक हातात वाचावयास घेतले की सोडवत नाही.

छायाचित्रकार व तसेच छायाचित्रकलेची आवड–जाण असणाऱ्या वाचकवर्गास, हे पुस्तक आवडेल अशी खात्री आहे.

छायाचित्र, छायाचित्रकार, छायाचित्राच्या व्यक्ती, छायाचित्र या उपयोजित कलेचा व्यवसाय करणारे व छायाचित्रकलेचा आस्वाद घेणारा प्रेक्षक किंवा "गिऱ्हाइक" या सर्वांना हे लेख नवी दृष्टी देतील ही अपेक्षा आहे. ■

'माझी छायाचित्रकला'
ले. : देवीदास बागुल
प्रकाशक : अभिजित साहित्य
१२६३/३ आनंद भुवन
जंगली महाराज पथ पुणे ४११००४ किंमत ४० रु.

प्राचीन मराठीतील 'प्रणयाख्याने व रूपकाख्याने'

प्रा. म. रा. जोशी

आजकाल अनेक मराठी अभ्यासक मोठ्या गांभीर्याने प्राचीन मराठी वाङ्मयाची दखल घेऊ लागले आहेत. डॉ शिवाजी गउळकरांचा ग्रंथ त्यापैकी एक आहे. काव्यप्रवंध, खंडकाव्य व आख्यान या वाङ्मयीन प्रकाराचा अभ्यास करताना डॉक्टर गउळकरांचे लक्ष एका वेगळ्या वाङ्मयीन प्रमेयाकडे गेले. प्राचीन मराठीतील काही आख्यानक कविता प्रवंध, खंडकाव्य व आख्यान या काव्यरूपांपैकी कोणत्या एका काव्यरूपाशी निगडीत असूनही तिच्या परंपरा मात्र वेगळ्या दिसून येतात. तेव्हा त्या सर्वांचाच अभ्यास 'प्रणयाख्यान व रूपकाख्यान' नावाच्या ग्रंथात डॉक्टरसाहेबांनी मराठी वाचकांना सादर केला. यामधील बराचसा भाग त्यांच्या 'प्राचीन मराठी आख्यानक कवितेच्या विकासाचा चिकित्सक अभ्यास' या प्रबंधातील आहे. तेव्हा प्रस्तुत ग्रंथ म्हणजे एक स्वतंत्र कृती नसून प्रवंधातील काही अंशमात्र आहे. काव्यप्रवंध, खंडकाव्य व आख्यान या तीन काव्यरूपाच्या संदर्भात पण जरा वेगळ्या पद्धतीने काही वाङ्मयीन प्रकारांचा विचार सादर करण्याचा ग्रंथकाराचा मानस दिसतो. प्राचीन मराठी वाङ्मयाकडे आजपर्यंत वाङ्मय–बाह्य दृष्टीनेच आधुनिकांनी पाहिले. प्रस्तुत ग्रंथात मात्र वाङ्मयप्रकार व काव्यरूपांना डोळ्यासमोर ठेवून प्राचीन मराठी वाङ्मयाचा परामर्श घेतलेला आहे. आजपर्यंत प्राचीन मराठीत सुमारे साडे तीनशे वाङ्मयप्रकार प्राचीनांनी हाताळलेले आहेत. परंतु त्याकडे दुर्लक्ष करून अर्वाचीन मराठी समीक्षक व वाङ्मयेतिहासकारांनी आपापले विचारच प्राचीन मराठीवर आरोपित केले. वस्तुतः साडेतीनशे–चारशे हाताळलेले वाङ्मयप्रकार व त्यामागील प्रेरणा व हेतू यांचा साक्षेप शोध प्राचीन मराठीचा अर्वाचीन मराठीशी नाते स्पष्ट करणारा आहे. त्यासाठी मान्य केलेल्या पारिभाषिक संज्ञांची चिकित्सा आवश्यक आहे. महाकाव्य व खंडकाव्य या संज्ञा खरोखर प्राचीन मराठी वाङ्मयप्रकाराशी संबंधित आहेत काय ? संस्कृत व इंग्रजी वाङ्मयातील संज्ञा घेऊन प्राचीन मराठीची समीक्षा करण्याचा प्रयत्न आक्षेपार्ह ठरल्यास नवल नाही. सुदैवाने गउळकरांना याची पूर्ण जाण आहे. त्यांनी 'विदग्ध महाकाव्या'ऐवजी 'काव्य प्रवंध' ही नवीन सुचविलेली संज्ञा कमालीची सूचक आहे. तसेच आख्यानक काव्य प्रवंधाची निर्मिती ज्या प्रेरणा व हेतूमुळे झाली त्यांचे स्वरूप स्पष्ट करून आख्यानक कवितेचा विचार काव्यप्रकाराऐवजी काव्य आशयाच्या अनुरोधाने का करावा लागतो हे सांगताना त्यांनी 'रूपकाख्यानका'च्या प्रकाराची चर्चा केली आहे. प्रणयकाव्य आणि प्रणयाख्यान असे दोन रचना प्रकार प्राचीनांनी केले. त्याचे मर्म समजण्यास त्यातील आशयही समजावून घेतला पाहिजे. दुसऱ्या प्रकरणात 'रूपकाख्यानक कवितेचा' परामर्श घेताना संस्कृतमधील 'उद्गीथ आख्यायिका', 'भागवतीय पुरंजनाख्यान' व कृष्णमिश्रांच्या 'प्रवोध चंद्रोदय' रूपककाव्य–प्रबंधाची चर्चा केली आहे. रूपकवाङ्मयाची निर्मिती ही

एक सार्वत्रिक प्रवृत्ती असून तो स्वतंत्र वाङ्मय-प्रकार मानावा असे डॉ. गउळकर आग्रहाने सांगतात. तसेच एकनाथ, तुकारामादि संतांनी मोठया प्रमाणावर दृष्टांत कथारूपक लिहिलेली आहेत. त्याच बरोबर प्राचीन मराठीत रूपकाख्यान कवितेच्या निर्मितीची जैन परंपरा कशी कुंठीत झाली हे दाखवून संत परंपरा व जैन परंपरा यामधील वाङ्मयीन प्रकारांचे अस्तित्व प्राचीन मराठी समृद्धीची जाण करून देत असते हे सर्वच लेखकांनी उत्तम प्रकारे दाखवून दिले आहे. तिसरे प्रकरण बाळक्रीडा रचनापर आहे. निवृत्ती ज्ञानदेवादिकांच्या बाळक्रीडा स्वतंत्र काव्यप्रबंध कसे हे स्पष्ट करून एकनाथ-वामनांच्या रचना लीलाख्यानपर आहेत असे डॉक्टरसाहेब सांगतात. व तेथेही आख्यान व काव्यप्रबंध ही दोन भिन्न काव्यरूपे आहेत असे प्रमेय मांडतात.

तथापि निवृत्ति-ज्ञानदेव-नामदेव-एकनाथादि संतांच्या वाङ्मयविश्वातील रचना व विठ्ठल कळपूरकर, वामन, आनंदतनय, कृष्णानंदनिमग्न, पूर्ण प्रकाशानंदनाथ, दयालनाथ, नागेश, गोपाळदास श्रीपतिदासादिकांच्या रचनांचा वाङ्मयप्रकार म्हणून परामर्श घेताना आणि संत व विदग्ध वाङ्मयीन संप्रदायाचे नेमके अनुबंध कोणते याकडे मात्र झालेले दुर्लक्ष, प्रस्तुत ग्रंथाची मोठीच उणीव आहे. काव्यप्रबंध ही नवीन पारिभाषिक संज्ञा सादर करताना प्राचीन मराठी वाङ्मयातील काही शंकास्थळांचो उकल करण्याचा प्रयत्न कितीही प्रशंसनीय असला तरी, एकनाथ विरचित रुक्मिणीस्वयंवराख्यानाला द्विसंधानकाव्य नावाने संबोधणे हा द्विसंधान काव्यप्रकाराचाही अधिक्षेप आहे. एकीकडे ते काव्यप्रबंध आहे असे समजावयाचे व दुसरीकडे 'अर्थकथा' म्हणूनही उल्लेख करावयाचा हा सर्वच प्रकार कमालीचा गोंधळ निर्माण करणारा आहे. 'अर्थकथा' ही संज्ञा एकनाथाप्रमाणे जनी जनार्दनही वापरतात. पण अर्थकथा म्हणजे द्विसंधान काव्य असे कोठेही नाही. संस्कृतवाङ्मयांतील द्विसंधान काव्य व एकनाथांचे रुक्मिणीस्वयंवर समोरासमोर ठेवले तरी द्विसंधान काव्य म्हणजे काय हे कोणाच्याही लक्षात येईल. असाच काहीसा गोंधळ वामन व आनंदतनय यांच्या रचनांविषयी झाला आहे. आनंदतनय व रघुनाथपंडित तंजावर-अरणी प्रदेशातील ग्रंथकार असून वामन पंडितांच्या रचना त्यांच्या समोर होत्या असे समजण्यास कालविपर्यासाचा दोष स्वीकारावा लागतो. शिवाय वामनपंडिताच्या रचना पाहून आनंदतनयाने 'राधाविलास' लिहिला व त्यामध्ये बिंब-प्रतिबिंब भाव आहे असे समजणे म्हणजे गृहित कल्पनेला वस्तुस्थितीचे स्थान देण्यासारखे आहे. तीच दयाळनाथविरचित राधाविलासासंबंधीही आहे. वामन, आनंदतनय, दयाळनाथ असा क्रम कशाच्या आधारावर डॉक्टर मजकूर लावतात हेच कळत नाही. बंध व प्रबंध या संज्ञा केवळ संज्ञा नसून काव्यरचना प्रकाराचे वैशिष्टय स्पष्ट करणारे आशयघन शब्दसमूह आहेत. प्राचीन मराठी काव्यसमीक्षकांनी योजलेल्या 'विदग्ध महाकाव्य' या संज्ञाऐवजी काव्यरूप किंवा काव्यप्रबंध या नवीन संज्ञेची योजना डॉक्टर मजकूरांनी केली परंतु त्याच बरोबर 'ओवी प्रबंधा'कडे मात्र त्यांनी जवळ जवळ दुर्लक्ष केले. (कदाचित त्यांच्या मूळ प्रबंधात ओवीप्रबंधाचे विवेचन असेलही). ज्ञानदेव व नरेंद्र यांच्या रचना ओवीप्रबंधरूप आहेत. स्वत: ज्ञानदेव नरेंद्रांनी ओवीप्रबंधाचा स्पष्ट उल्लेख केलाच आहे. पण त्यांना महाकाव्य अशी चुकीची संज्ञा आजचे मराठीचे स्वनामधन्य समीक्षक देतात. या ओवीप्रबंध वाङ्मयप्रकाराची चिकित्सा अभिप्रेत असतानाही ओवीप्रबंधात काव्यप्रबंधाची अवस्थांतरे आढळतात असा विचित्र निष्कर्ष डॉक्टर मजकूर कशाच्या भरवशावर काढतात हे एक गूढच आहे. आख्यानक कवितेचा एक प्रकार काव्यप्रबंध हे विचारसूत्र स्वीकारले तर काव्यप्रबंध ओवी प्रबंधाहून सर्वस्वी वेगळा ठरतो. रसविवेक, कथावस्तु, नायकत्व व्यक्तिचित्रण, वातावरण, पार्श्वभूमी, संघर्षादि घटक ओवी प्रबंधात असतात पण ज्ञानदेव नरेंद्रांचा ओवीप्रबंध उपरोक्त घटकाचे अस्तित्व दाखवूनही महाकाव्य किंवा आख्यानकपर काव्यप्रबंध प्रकाराहून सर्वस्वी वेगळा व स्वयंभू आहे. नेमक्या या महत्त्वपूर्ण प्रश्नाच्या चिकित्सेचा अभाव प्रस्तुत ग्रंथात जाणवतो हे मात्र खरे.

'रूपकनाटकांची निर्मिती प्राचीन मराठीत झाली नाही' असा अभिप्राय ग्रंथकाराने नमूद

केला. पण रूपकनाटक व रूपकआख्यानक कविता यांचे संबंध केवळ 'नाटक व आख्यानक' या दोन वाङ्मय प्रकारापुरतेच मर्यादित आहेत काय ? नाटक ही सर्वश्रेष्ठ ललितकृती म्हणून मान्य झाली असतानाही प्राचीन मराठी ग्रंथकारांनी मात्र नाटकाऐवजी आख्यानकपर कविता मोठ्या प्रमाणावर का लिहिली असा प्रश्न कोणाही विचक्षण वाचकाच्या मनात येतो. नाटक हे दृश्य काव्य तर आख्यानक कविता हे श्राव्य काव्य. परंतु नाटका या दृश्य काव्यऐवजी श्राव्य काव्याची आवड केवळ प्राचीन मराठी क्षेत्रापुरती मर्यादित नसून अर्वाचीन मराठी वाङ्मयांतही ती आढळते. किर्लोस्कर, देवल, गडकरी व खाडिलकरांच्या रूपाने संपन्न व समृद्ध मराठी नाट्यसृष्टी आकाराला आली असतानाच हरिभाऊ आपटे, वा. म. जोशी व ना. सी. फडके प्रभृतींनी कादंबरी वाङ्मयप्रकार हाताळून तो वाङ्मयप्रकार एवढा विकसित व संपन्न केला की, नाटकाला जवळजवळ- शह मिळून त्या ऐवजी कादंबरी सर्वत्र सुप्रतिष्ठित झाली. नाटक दृश्य तर कादंबरी श्राव्य पण दृश्य काव्य मागे सरले व श्राव्य काव्य पुढे सरसावले. श्राव्य काव्याची ही आवड व आस्था विलक्षण आश्चर्यकारक व चमत्कृतीपूर्ण असून एकापरीने दृश्यकाव्याची मर्यादा स्पष्ट करणारी आहे. श्राव्य काव्य हे प्रभावी व परिणामकारक असते पण प्रभावी व परिणामकारक यापेक्षा काव्याची आवड व आस्था हे खरेखुरे चैतन्यमय असतात. कितीही झाले तरी दृश्य काव्य प्रायोगिकतेच्या मर्यादेने बांधलेले असून समूहाशी निगडीत आहे व नेमकी दृश्यकाव्याची ही अंगभूतता पर्यायाने श्राव्य काव्याच्या आस्थेला व आवडीला कारणीभूत झाली. काव्य मग ते कोणत्याही वाङ्मयीन प्रकारापैकी असो, त्याचे आवाहन समष्टीपेक्षा व्यक्तीला अधिक व मोठ्या प्रमाणावर असते. म्हणजे काव्याचा खराखुरा आस्वादक कोणताही समूह नसतो तर समूहातील व्यक्ती व पृथक व्यक्तिमत्वाने नटलेली व्यक्तीच असते. आस्वाद्यमानता ही कोणत्याही काव्यरचनेती फलश्रुती असते. प्रभावी व 'परिणामकारकता' ऐवजी 'आस्वाद्यमानता' ह्या घटकाला काव्य साहित्य प्रांतात महत्त्व आहे. श्राव्यकाव्यात नेमक्या व्यक्तिगत आस्वाद्यमानतेची प्रक्रिया चालू असते. म्हणूनच नाटकाऐवजी प्राचीन मराठी वाङ्मयक्षेत्रात आख्यानक कविता, काव्य प्रबंध व ओवीप्रबंध वाङ्मयप्रकार आढळतात. श्राव्य काव्य हा केवळ दृश्यकाव्याचा पर्याय नाही तर तो संपूर्ण भारतीय भाषा वाङ्मयसृष्टीचा असामान्यत्व स्पष्ट करणारा हा महत्त्वपूर्ण पैलूही आहे. मराठी प्रमाणेच श्राव्य वाङ्मय सर्वच भाषा वाङ्मयातही आहे. तेव्हा काव्यप्रबंध, खंडकाव्य, आख्यान व ओवीप्रबंध हे केवळ मराठीचे प्रादेशिक आविष्कार नसून भारतीय वाङ्मयाचे ते मराठीतील प्रगटन आहे. दुर्दैवाने भारतीय वाङ्मयाच्या ऐवजी मराठी व बहुधा इंग्रजीप्रभावित समीक्षेचा पगडा इतर समीक्षकांप्रमाणे प्रस्तुत ग्रंथकारावरही जाणवतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे मराठी वाङ्मयाचे 'प्राचीन' व 'अर्वाचीन' असे वर्गीकरण करणे. प्राचीन मराठी संज्ञेतील 'प्राचीन', 'मध्ययुगीन' विशेषणे कालसापेक्ष म्हणून वाङ्मयबाह्य ठरतात. कोणत्याही वाङ्मयात सातत्य व बदल हे प्रवाहरूपाने दिसून येतात. तेव्हा वाङ्मयाचा एकच एक अखंड गतीशील प्रवाह असतो. तो 'प्राचीन', 'मध्ययुगीन', 'अर्वाचीन' या शब्दप्रयोगाने कसा काय आपले मूलरूप दाखवू शकतो, असे व यासारखे अनेक प्रश्न डॉ. गउळकरांच्या ग्रंथाने निर्माण होतात व नवीन नवीन प्रश्नांना चालना देण्याचे नेमके कार्य प्रस्तुत ग्रंथ करतो. त्यामुळे प्रबंधाचा मूळ विषय वाचकांसमोर आला नाही याची विचित्र हुरहुर व जो आला त्याची अर्थघनता पाहून कोणताही वाचक सुखावतो व आनंदीत होतो यात संशय नाही. ग्रंथकार व ग्रंथप्रकाशित करणारी आंध्रप्रदेश मराठी साहित्य परिषद या संस्थेला जेवढे धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. ■

प्राचीन मराठीतील
'प्रणयाख्याने व रूपकाख्याने'
लेखक : शिवाजी गउळकर
मराठी साहित्य परिषद
आंध्र प्रदेश, हैद्राबाद
मूल्य १० रु.

नाट्यचिंतन
म. वा. कुंडले

डॉ. वेलणकर यांच्या गेल्या १५ वर्षांच्या कालावधीत विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या लेखांचे हे संकलन! या छोटेखानी पुस्तकात एकूण चौदा लेख आहेत व ते नाट्याच्याच विविध अंगाशी संबंधित असल्यामुळेच लेखकाने पुस्तकाचे 'नाट्यचिंतन' असे सार्थ नामकरण केले आहे. लहानपणापासूनच श्री. वेलणकरांना नाटकांचे वेड आहे. हे वेड म्हणजे वेलणकर घराण्याकडून त्यांना मिळालेला आनुवंशिक वारसा असेही म्हटल्यास चूक ठरणार नाही. बरे हे वेड केवळ नाट्यवाचनापुरतेच मर्यादित नाही. तर नाटकात काम करणे, नाटकाचे दिग्दर्शन याही क्षेत्रात ते मुलुखगिरी करून आले आहेत. या नाट्यविश्वात विहार करताना जे काही नाट्यविषयक प्रश्न यांच्या मनात उद्भवले, ते त्यांनी वाचकांसमोर-विशेषत: नाट्यरसिकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकाच्या म्हणण्याप्रमाणे नाट्यपरीक्षकाला थोडातरी नाट्यनिर्मितीचा-सर्जनाचा अनुभव हवा, तरच तो नाट्यप्रयोगाचे यथार्थ परीक्षण करू शकेल. हाच नियम नाट्यविषयक लेखनालाही लावला तर वेलणकरांच्या लेखनाला-या चिंतनाला अनुभवाचा आधार असल्यामुळे वास्तवता व मौलिकता आली आहे.

त्यांच्या चिंतन-विषयांत बरीच विविधता आहे. परंतु त्यातील सामान्य सूत्र म्हणजे नाट्य, नाट्यलेखन, नाट्यप्रयोग हेच आहे.

'नाट्यगीत-नाट्यसंगीत', 'गायक नट' व 'किर्लोस्करांचा केशराचा मळा' हे तीन लेख नाटक व संगीत यांच्या परस्परसंबंधाचा उहापोह करणारे आहेत. त्यांच्या मते 'नाट्यसंगीत म्हणजे नाट्यगीतांचे नाट्यपूर्ण गायन'. संगीत हे नाटकाशी एकजीव झाले पाहिजे, त्यातून नाट्यपरिपोष किंवा रसोत्कर्ष साधला पाहिजे, ते उपरे वाटता कामा नये, तसेच गायक-नट हा नुसताच गायक असता कामा नये तर तो उत्तम नटही असला पाहिजे हे त्यांचे मुद्दे योग्यच आहेत. किर्लोस्कर-देवलांनी संगीत व नाट्य यांचा उत्कृष्ठ समन्वय साधला, त्यातून 'कलात्मक अद्वैत' निर्माण केले, म्हणूनच किर्लोस्कर-देवलांची-सौभद्र, शारदा, संशयकल्लोळ इ. नाटके खरी संगीत नाटके होत; परंतु कोल्हटकर-खाडिलकरांना हे साधले नाही, त्यांनी आपल्या नाटकामध्ये संगीत 'टाकले', व म्हणूनच त्यांच्या नाटकांतून संगीताचे जलसे पहायला मिळतात, एवढेच नव्हे तर 'मंदारमाला' व 'कट्यार काळजात घुसली'-सारख्या आधुनिक नाटकांतूनही संगीताची जुगलबंदी व 'आखाडे' पहायला मिळतात असा जो निष्कर्ष त्यांनी काढला तोही सामान्यत: पटण्यासारखाच आहे. तसेच बालगंधर्व, दीनानाथ, छोटा गंधर्व इत्यादि नटांना साभिनय गायनाचे शिवधनुष्य जसे पेलले तसे इतर अनेक गायक नटांना पेलले नाही हेही त्यांचे म्हणणे चूक नाही. किर्लोस्कर, देवल, कोल्हटकर, खाडिलकर यांच्या नाट्यसंगीताबद्दल अभिप्राय प्रगट करत असताना गडकऱ्यांच्या नाट्यसंगीताबद्दल किंवा संगीत नाटकांबद्दल लेखकाने मौन का बाळगले हे कळू शकले नाही.

जुनी नाटके व नाटककार यांच्या संबंधीचे या संग्रहातील आणखी दोन लेख म्हणजे 'सौभद्र-शारदा' व 'गडकऱ्यांचे नाट्यघराणे' सौभद्र व शारदा या दोन्ही नाटकांची प्रकृती सर्वस्वी भिन्न असली तरी त्यांचा रचनाबंध हा बऱ्याच प्रमाणात सारखा कसा होतो हे पात्रे, घटना व संवाद यांची उदाहरणे देऊन त्यांनी दाखवून दिले आहे व त्यातून देवलांनी किर्लोस्करांचे अनुकरण केले नसले तरी त्यांच्यावर किर्लोस्करांचा अप्रत्यक्ष प्रभाव कसा पडला होता हे ध्वनित केले आहे.

गडकरी हे किर्लोस्कर-देवल-खाडिलकर यांच्या नाट्यपरंपरेत बसत नसून कोल्हटकर हे त्यांचे नाट्यघराणे होय-कारण 'आत्माविष्कार, स्वातंत्र्य, सामाजिकता व क्लृप्ती यांनी युक्त असलेल्या' कोल्हटकरांच्या नाट्यकर्तृत्वाचे घराणे गडकऱ्यांच्या नाट्याभिरुचीशी अधिक संवादी होते' हे वेलणकरांचे मत विवाद्य ठरू शकेल. क्लृप्ती हे गडकरी व कोल्हटकर या दोघांमध्येही

निर्विवाद समान असलेले वैशिष्टय ! कोल्हटकरांची सामाजिकता व सुधारणावाद या ऐवजी पारंपारिक मूल्यांचाच आविष्कार गडकऱ्यांच्या नाटकांमधून अधिक प्रमाणात झाला आहे. तसेच Creative Imagination याला समानार्थी म्हणून 'क्लृप्ती' हा लेखकाने वापरलेला शब्दही योग्य वाटत नाही. 'नाट्यधर्मी स्वगत' या लेखात स्वगताचे जे समर्थन लेखकाने केले आहे ते योग्यच वाटते. 'नाट्यपात्रे व आडनावे' या लेखात पात्रांना आडनावे देण्याराच्या बाबतीत बहुतेक नाटककारांनी दुर्लक्ष केले आहे हे खरे असले तरी जेव्हा आडनावातून कोणतेही व्यक्तिवैशिष्टय प्रगट करावयाचे नसते तेव्हा ते देण्याची आवश्यकता काय हे मात्र लेखक पटवून देऊ शकला नाही.

भाषेच्या आहारी जाऊन आपल्या भाषावैभवाचे व कल्पकतेचे प्रदर्शन करण्यासाठी नाट्यसंहितेत हेतुपूर्वक टाकलेली 'टाळीची वाक्ये' ही कशी नाट्य विघातक ठरतात हे 'टाळीची वाक्ये' या लेखात दाखवून दिले आहे.

'चतुर्विध अभिनय व परकाया प्रवेश' या लेखात भरतमुनींच्या नाट्यशास्त्राच्या आधारे कायिक, वाचिक, आहार्य व सात्विक या चारही अभिनय प्रकारांचे सुयोग्य स्पष्टीकरण करण्यात आले आहे.

'चरित्र अभिनेता' ही नटाची एक वेगळी किंवा श्रेष्ठ जात मानण्याचे कारण काय ? प्रत्येक चांगला अभिनेता हा चरित्र अभिनेताच नव्हे काय? हा लेखकाचा प्रश्न निश्चितच मूलगामी आहे.

'गुरू...पळापळा...शिकार' व 'सं. दुष्टचक्र' ही चार नाट्य परीक्षणे असून 'प्रभाकर पणशीकर' या लेखात या श्रेष्ठ नटाच्या अभिनय कौशल्याचे–विशेषत: 'इथे ओशाळला मृत्यू' या नाटकातील औरंगजेबाच्या भूमिकेच्या आधारे मार्मिक रसग्रहण केले आहे.

प्रस्तुत पुस्तकातील पहिलाच लेख आहे 'सरकारी नाट्यस्पर्धा : एक विचार' हा. स्पर्धेत सादर करण्यात आलेल्या विविध प्रकारच्या व प्रकृतीच्या नाटकांच्या मूल्यमापनात कशा अडचणी येतात, या मूल्यमापन पद्धतीमधील उणीवा व अंतिम निकालाबाबत घेण्यात आलेले आक्षेप आरोप इत्यादींच्या संदर्भात उपस्थित होणाऱ्या अनेक मुद्यांचा परामर्ष या लेखात घेण्यात आला आहे. स्पर्धा वस्तुनिष्ठ होण्याच्या दृष्टीने लेखकाने काही उपायही सुचविले आहेत. विशेषत: एकाच नाटकाचा प्रयोग विविध संस्थांना सादर करायला लावावा, हा उपाय सकृद्दर्शनी योग्य वाटला तरी तो कितपत व्यवहार्य ठरेल हाही मुद्दा महत्त्वाचा आहे. एकच प्रयोग पाहणे प्रेक्षकांना कंटाळवाणे होणार नाही काय ही शंका त्यानेच प्रगट केली आहे. दोन-तीन संस्थांनी केलेले प्रयोग फार तर प्रेक्षक नेट धरून पाहतील. पण त्यानंतर प्रेक्षक विरहित किंवा अत्यल्पसंख्य प्रेक्षकांसमोर व प्रामुख्याने परीक्षकांसाठीच हे प्रयोग सादर करावे लागतील. आहे त्याच परिस्थितीत परीक्षणासाठी अधिक वस्तुनिष्ठ निकर्ष निर्माण करता येणार नाही काय ? नाट्यप्रयोगांचा पहिला, दुसरा असा काटेकोर क्रम लावण्याऐवजी–अ, ब, क, ड, ई– अशा श्रेणी पद्धतीचा वापर श्रेयस्कर ठरणार नाही काय याचाही तज्ज्ञांनी विचार करावा.

पुस्तकातील सगळेच लेख नाट्यसंबंधित असले तरी विषय वेगवेगळे, काही प्रासंगिक, तर काही त्रोटक आहेत. त्यामुळे या लेखांच्या वाचनातून लेखकाची समग्र नाट्यविषयक भूमिका किंवा दृष्टिकोण प्रत्ययास येत नाही. अर्थात ते पुस्तकातून अपेक्षितही नाही व त्याचे ते प्रयोजनही नाही.

परंतु या सगळ्याच लेखातून वेलणकरांच्या नाट्यविषयक सखोल अभ्यासाचा चिकित्सक व रसिक दृष्टीचा व चिंतनशीलतेचा भरपूर प्रत्यय येतो. प्रत्येक लेखात पात्रे, घटना व वाक्ये यांची उदाहरणे दिल्यामुळे त्यांचे मुद्दे वाचकांच्या मनावर चांगल्या प्रकारे बिंबतात. वेलणकरांचे हे पुस्तक नाट्याभ्यासकांना तसेच नाटके प्रयोजित करणाऱ्यांनाही निश्चितच अतिशय उद्बोधक व मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो. ■

नाट्यचिंतन
डॉ. अरुण वेलणकर
प्रकाशक–सौ. सुधा वेलणकर
मुद्रक–श्यामकांत बनहट्टी
श्रीनिवास मुद्रणालय, नागपूर
१९८५; पृष्ठसंख्या ९९
मूल्य–रु. १६/–

अनुक्रमणिका

१३ ऑगस्ट रोजी पु. भा. भावे यांचा स्मृति-दिन पुणे, मुंबई, नागपूर येथे साजरा करण्यात आला. नागपूर येथे मुंबईचे प्रा. डॉ. शशिकांत लोखंडे यांचे व्याख्यान झाले. पुणे येथे नागपूरच्या डॉ. सौ. आशा सावदेकर यांनी भावे यांच्या कादंबऱ्यांचा आढावा घेणारे भाषण केले.

□ □

कथाकार, विचारवंत व लोकशिक्षक प्रा. श्री. म. माटे यांच्या जन्मशताब्दी वर्षाला सप्टें. ८६ पासून प्रारंभ झाला. त्या दिवशी राज्यात सर्वत्र विविध कार्यक्रम–उपक्रमाचे आयोजन करून प्रा. माटे यांनी आदरांजली अर्पण करण्यात आली. नागपूर येथे प्रा. माटे यांच्या विद्यार्थिनी डॉ. सरोजिनी बाबर यांचे व्याख्यान झाले.

□ □

कविवर्य वसंत बापट यांच्या उपस्थितीने व काव्यगायनामुळे नागपुरात वि. सा. संघात साजरा झालेला कवी अनिल स्मृतिदिन वैशिष्ट्यपूर्ण ठरला. प्रा. बापट यांनी आपल्या खुमासदार शैलीत काव्यातील सौंदर्य उलगडून दाखविले व कवी अनिल यांच्या कवितांचे वाचन केले. आपल्याही काही कविता त्यांनी तालासुरात गायिल्या.

□ □

गौरव : प्रसिद्ध व ज्येष्ठ मराठी साहित्यिक श्री. विश्राम बेडेकर यांची साठाव्या अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी अविरोध निवड झाली. हे संमेलन मुंबई येथे २५ ते २७ ऑक्टो-बरपर्यंत साजरे होणार आहे.

□ □

संपूर्ण आयुष्य पत्रकारितेच्या क्षेत्रात व्यतीत केल्याबद्दल साप्ताहिक 'नवा समाज'चे संपादक श्री. अच्युतराव देशपांडे यांना पुणे येथे प्रेस क्लब तर्फे दहा हजार रुपयांचे काकासाहेब लिमये पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

□ □

१३ ऑगस्टला मुंबई येथे झालेल्या आचार्य अत्रे यांच्या ८८ व्या जयंती समारंभात प्रसिद्ध क्रीडा समीक्षक श्री. र. गो. सरदेसाई यांना गो. म. लाड यांच्या हस्ते आचार्य अत्रे स्मृती सन्मान पुरस्कार बहाल करण्यात आला.

□ □

वर्तमान वर्तमान वर्तमान वर्तमान वर्तमान वर्तमान वर्तमान

नागपूरसाठी गौरवाची बाब म्हणजे दि. २ ऑक्टोबरला गांधीजयंतीदिनी दक्षिण मध्य विभा-गीय सांस्कृतिक केंद्राचे उद्घाटन पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांच्या हस्ते नागपुरात पार पडले.

□ □

मुंबईच्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी विद्यापीठातर्फे आयोजित करण्यात आलेल्या मराठी लघुकथेवरील चर्चासत्रात म. द. हातकणंगलेकर, गो. मा. पवार, डॉ. उषा देशमुख, सरोजिनी वैद्य, वि. गो. देशपांडे, सदा कऱ्हाडे, चंद्रकांत वर्तक, स. शि. भावे, विलास सारंग, व. दि. कुळकर्णी, डॉ. सौ. आशा सावदेकर, यांनी निबंध वाचले. चर्चा-सत्रात वसंत दावतर, शंकर वैद्य, स. गं. मालशे, भीमराव कुळकर्णी, कथाकारशांताराम, रमेश तेंडुलकर इत्यादी नामवंतांचा सहभाग होता.

□ □

कलकत्ता येथील लिटररी सोसायटीतर्फे मृत्युंजयकार शिवाजी सावंत यांच्या कादंबरीला दहा हजार रु. चे रोख पारितोषिक बहाल करण्यात आले.

□ □

मृत्यू : गेल्या तीन महिन्यात साहित्य–कला विश्वातील काही आधारस्तंभ नाहीसे झाले व काही तळपते तारे निखळले. प्रसिद्ध तत्त्वचिंतक श्री. पु. य. देशपांडे, ना. ग. जोशी, मराठी रंग-भूमीवरील पहिले धुंडीराज म्हणून ओळखले जाणारे श्री. बाळकोबा गोखले, टीकाकार स. शि.

भावे कवी उ. रा. गिरी, सौ. आशा गवाणकर यांचे देहावसान झाले, तर चित्रकार श्री. धनंजय नाकाडे आणि मुस्लिम सत्यशोधक समाजाच्या प्रा. सौ मुमताज रहिमतपुरे यांचे अपघाती निधन झाले.

□ □

नुकतेच बेळगाव येथे झालेल्या सावरकर साहित्य सम्मेलनात बाळाराव सावरकर अध्यक्ष होते. २८, २९, ३० सप्टें. १९८६ रोजी बेळगाव येथे हे तिसरे सावरकर संमेलन झाले. त्यांच्या अध्यक्षीय भाषणाचा विषय 'सावरकर चरित्र उद्देश व अनुभव' हा होता.

□ □

डॉ. हेमंत वि. इनामदार यांना संशोधन प्रकल्प पूर्तीसाठी सप्टें. १९८६ पासून तीन वर्षे दरमहा दीड हजार रुपयांचे अनुदान विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजूर केले आहे.

□ □

प्रकाशन : लीला मस्तकर रेळे यांच्या 'कल्लोळ' या आत्मचरित्राचे प्रकाशन अलिकडेच पुणे येथे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या हस्त झाले.

□ □

२१ ऑगस्टला मुंबई येथे शिवाजी सावंत यांच्या 'लढत' या सहकारमहर्षी डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जीवनावरील चरित्रकहाणीचे गंगाधर गाडगीळ यांच्या हस्ते प्रकाशन.

□ □

२४ ऑगस्ट रोजी सांगली येथे कै. श्री. दा. पानवलकर यांची पहिली पुण्यतिथी श्री. विजय तेंडुलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत साजरी झाली. याचेवळी पानवलकर यांच्या 'औदुंबर' व 'सूर्य' या कथा-संग्रहांच्या दुसऱ्या आवृत्तीचे तेंडुलकर यांच्या हस्ते प्रकाशन.

□ □

नुकत्याच जाहीर झालेल्या वृत्तानुसार साहित्य संस्कृती मंडळाची गौरववृत्ती कवी ना. घ. देशपांडे आणि पंडित महादेवशास्त्री जोशी यांना प्रदान करण्यात आलेली आहे.

□ □

नुकताच निघालेला 'अनुवाद' अनियतकालिकाचा अंक जपानी कवितेच्या अनुवादाचा आहे. भगवान ठग यांचा हा उपक्रम एक चळवळ म्हणून महत्त्वाचा वाटतो. ■

या अंकातील 'वर्तमान' संकलन
श्रीकान्त नाकाडे
हनुमाननगर, नागपूर

"माझे आग्रहाचे सांगणे असे आहे की आपल्या स्वतःच्या समाजाच्या चिंतनाने जे उत्पन्न होईल ते त्या समाजाचे ज्ञान; त्याच्या आर्थिक चिंतनाने जे उद्भवेल ते त्या समाजाचे अर्थशास्त्र; त्याच्या सामाजिक बांधणीच्या चिंतनाने उत्पन्न होणारे जे ज्ञान ते त्याचे समाजशास्त्र; आणि त्या समाजात जे जे कोणी लोक आहेत त्यांच्या बुद्धीचे, वासनांचे आणि भावनांचे खेळ ज्या वाङ्मयात दिसतील ते त्याचे वाङ्मय होय."

-श्री. म. माटे

(सांगली साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून केलेल्या भाषणातून)

अनुक्रमणिका

साभार पोच

महार रेजीमेंट/ डॉ. एन. जी. कांबळे/ प्रचार प्रकाशन, कोल्हापूर [पृ. १२८] रु. ५०/-

सावकाराचा वाडा/ डॉ. मधुसूदन नगरकर/ प्रचार प्रकाशन, कोल्हापूर [पृ. ६०] रु./- १५

अफलातून/ मनोहर तल्हार/ रिता प्रकाशन, नागपूर [पृ. १३३] रु. २५/-

अज्ञात लिळा/ व. दि. कुळकर्णी- पु. च. नागपुरे/ व्हिनस प्रकाशन, पुणे [पृ. ९९] रु. १५/-

पदघुंगरु/ मोरा गुणारी/ शेखर प्रकाशन, सागर [पृ. ७१] रु. २५/-

गणगोत/ पु. ल. देशपांडे/ मौज प्रकाशन, मुंबई [पृ. २०२] रु. ४०/-

पाचोळा/ रा. रं. बोराडे/ मौज प्रकाशन, मुंबई [पृ. ११०] रु. २५/-

कविता १९६९-१९८४/ विलास सारंग मौज प्रकाशन, मुंबई [पृ. ८४] रु. ३०/-

नटसम्राट-समीक्षा/ गो. तु. पाटील/ चेतश्री प्रकाशन, अंमळनेर [पृ. २५५] रु. ५५/-

मी नरसाबाई/ मेघा किराणे/ चेतश्री प्रकाशन, अंमळनेर [पृ. ८७] रु. २०/-

हबर/ रामकली पावसकर चेतश्री प्रकाशन अंमळनेर [पृ. ६०] रु. १२/-

तयांचे काळावरती ठसे/ यदुनाथ थत्ते/ चेतश्री प्रकाशन, अंमळनेर [पृ. ७४] रु. १५/-

मरुद्गान/ वा. रा. सोनार/ चेतश्री प्रकाशन, अंमळनेर [पृ. ९६] रु. २०/-

अंगावर अंधार/ वा. रा. सोनार/ चेतश्री प्रकाशन, अंमळनेर [पृ. १३२] रु. ३०/-

अरे संसार संसार/ प्रभाकर पेंढारकर/ मौज प्रकाशन, मुंबई [पृ. १४७] रु. ३१/-

नारायणसिंह उईके/ विनायक तुमराम/ प्रॉम्ट सर्व्हिस, सांगली [पृ. ११७] रु. २५/-

अंतरा/ सुरेश कदम/ डिंपल पब्लीकेशन, वसई रोड [पृ. ६८] रु. २०/-

अमृतधारा/ बाबुलनाथ/ काळे ब्रदर्स पब्लिकेशन, पुणे [पृ. १५२] रु. २०/-

पु. भा. भावे/ समग्र वाङ्मय सूची/ शंकरराव जोशी पु भा. भावे स्मृती समिती मुंबई/ [पृ. ४०] रु. ५/-

देखिला अक्षरांचा मेळावा/ विजय पाडळकर/ स्वयंप्रभा प्रकाशन, नांदेड [पृ. १४८] रु. ४५/-

हायकू/ शिरिष पै/ पॉप्युलर प्रकाशन, मुंबई [पृ. ६८] रु. ४०/-

मर्म/ निर्मला देशपांडे पॉप्युलर प्रकाशन, मुंबई [पृ. १७५] रु. ४५/-

मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप/ गो. मा. पवार- म. द. हातकणंगलेकर पॉप्युलर प्रकाशन, मुंबई [पृ. ४४२] रु. १५०/-

वि | शे | ष   साहित्यिक / सांस्कृतिक कार्यवृत्त   वि | शे | ष

शब्दसुरांनी बहरलेली आषाढातील पहिली रात्र

शब्दसुरांनी बहरलेली आषाढाची पहिली रात्र काल रामटेकवासियांनी अनुभवली. आषाढ समारंभानिमित्त विदर्भ साहित्य संघाने रामटेक येथे 'वर्षागीते' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या पूर्वार्धात नागपूरचे सदानंद देशपांडे यांनी संगीतबद्ध केलेली वर्षागीते सादर करण्यात आली आणि उत्तरार्धात निवडक कवींचे कविसंमेलन झाले. पूर्वार्ध कार्यक्रमाच्या अध्यक्ष-स्थानी वि. सा. संघाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर होते, तर कविसंमेलनाचे अध्यक्षस्थान कविवर्य सुरेश भट यांनी भूषविले होते.

सौ. सरिता भावे, वर्षा घटवाई आणि गुणवंत घटवाई यांनी मंगेश पाडगावकर, ना. घ. देशपांडे, ग्रेस, उ. रा. गिरी यांच्या कविता उत्तम गायिल्या; राजेन्द्र भावे (व्हायोलिन), विवेक देशपांडे (हार्मोनियम) आणि प्रमोद गुजर (तबला) यांनी त्यांना सुरेख साथ दिली. वर्षा घटवाई यांनी गायिलेले पाडगावकरांचे 'हलकेच निळा घन आला' हे गीत आणि सौ. सरिता भावे यांच्या सुरात भिजलेल्या उ. रा. गिरी यांच्या 'लाडक्या श्रावणसरी' तसेच 'प्रियकरा मी विरहिणी' ही गीते रसिकांची दाद घेऊन गेलीत. गुणवंत घटवाई यांनी ग्रेस यांची 'पाऊस कधीचा पडतो' ही कविता उत्तम सादर केली. त्यांचा आवाज या कवितेच्या गायनासाठी साजेसा आहे. या कार्य-क्रमाचे निवेदन सौ. सुलभा हेर्लेकर यांनी केले.

मृदुंगधाचा दरवळ, वातावरणातील हवाहवासा ओलसरपणा आणि शब्दसुरांच्या लयीत रात्र चढत जात असतानाच कवि-संमेलनाला सुरवात झाली. नीलकांत ढोले, सौ. ज्योती लांजेवार, वसंत वाहोकर, सौ. सुलभा हेर्लेकर, भाग्यश्री कावळे, निवेदिता कर्णे, सुनील शिनखेडे, सौ. रोहिणी केळकर यांनी पावसावरील कविता सादर केल्या, साऱ्यांच्याच शब्दांतून विविध रूपांनी पाऊस बरसला. सुमारे दोन तास रसिकवर्ग शब्दांच्या या पावसात चिंब भिजला. शेवटी अध्यक्ष सुरेश भट यांनी आपल्या चार गझला तबियतीने सादर केल्या.

या कार्यक्रमानंतर कवी-कवयित्रींनी कालिदास स्मारकाला भेट दिली. तेथेही शीतल वायुलहरींच्या संगतीत कवींनी शब्द फुलविले आणि गायकांनी सूर आळविले.

प्राचार्य राम शेवाळकर यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाला वि. सा. संघाचे उपाध्यक्ष वामन तेलंग व प्रा. सुरेश द्वादशीवार, प्रा. मदन धनकर, सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर, चिटणीस बऱ्हाणपुरे हेही उपस्थित होते.

वि. सा. संघ आणि 'सप्तक'चा एक वेगळा कार्यक्रम

"मी पंडित म्हणून आपल्यापुढे आलो नसून माझ्या मनात उचंबळून येणाऱ्या ऊर्मी आपणा-समोर प्रगट करण्यासाठी आलो आहे. संगीताचे कलादालन अफाट आहे. प्रत्येक दालनातला भिन्न प्रकारचा आनंद आपल्याला प्राप्त करून देणारा एक वाटाड्या म्हणून मी येथे आलो आहे." असे विनम्र उद्गार विदर्भ साहित्य संघ आणि 'सप्तक' यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ५ जुलै रोजी धनवटे रंगमंदिरात झालेल्या 'भारतीय संगीतावर प्रात्यक्षिके-विवेचन' या आगळ्या वेगळ्या कार्यक्रमाच्या प्रारंभी कार्यक्रम सादर सादर करणारे पं. माणिकराव ठाकूरदास यांनी काढले.

या कार्यक्रमाची पूर्वपीठिका, उद्देश आणि पं. ठाकूरदास यांचा परिचय त्यांचे शिष्य श्री. जयंत चित्रे यांनी करून दिला. त्यानंतर पं. ठाकूरदास यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना सांगितले की, "इतर कलांप्रमाणेच संगीतातही परिवर्तन झालेले आहे. कारण परिवर्तनाशिवाय नावीन्याचा आनंद घेता येत नाही. पण हे परिवर्तन होत असताना कलेचा दर्जा ढासळू नये, संगीतातील प्रचलित रागांवर व राग-नियमांवर अन्याय होऊ नये, रागस्वरूपाचा दर्जा खालावू नये आणि 'रंजयति इति राग:' या न्यायाने प्राचीन ग्रंथांमधील राग ज्या संवादतत्त्वाला, ग्रहन्यासाला धरून शास्त्रशुद्ध पद्धतीने बनविले आहेत. त्याची नवीन कलाकारांनी जाणीव करून घ्यावी. ह्या उद्देशाने मी आपणासमोर आहे. संवेदना जागृत करणारं गीत, भाव शब्द यांचं चपखल मिश्रण म्हणजे अनुक्रमे गायन, नृत्य आणि लय ! हेच खरं संगीत होय !"

प्रारंभी संगीताची अशी महती सांगून पंडितजींनी आपल्या शिष्यांच्या मदतीने प्रात्यक्षिकांसह प्रचलित राग, त्यांचे प्रकार व अप्रचलित ताल यांची माहिती देण्यास प्रारंभ केला. प्रात्यक्षिकात श्री. जयंत चित्रे, कु. गीता आठलेकर आणि सौ. गीता ठाकूरदास (पंडितजींची स्नुषा) यांनी भाग घेतला. साथीला श्री. अनिल केरकर (हार्मोनियम) आणि श्री. रवींद्र नवरे (तबला) हे होते. कार्यक्रमाचे संचालन करीत होत्या सौ. देवयानी पेंडसे !

कार्यक्रमाला सुरुवात झाली झिंझोटी रागातील 'गुनिजन गाये चतरंग बनाये' ह्या चूडामणी तालातील चतरंगाने. धृवपद कालापासून हे ताल अस्तित्वात होते. पण फारसे प्रचलित झाले नाहीत. धृवपद म्हणजे काय हे सांगताना पंडितजी म्हणाले, 'धृवाने अढळ स्थान मिळवलं. त्यावरच धृवपद हा शब्द रूढ झाला. काव्यातील किंवा गीतातील ज्या पंक्तींमध्ये बदल होत नाही त्या पालुपद असणाऱ्या गीतपंक्ती म्हणजे धृवपद.' धृवपद गाणारे उत्तम बीनकार होते. नोम्तोम् गायकी बीनमधून वाजविली जायची. ह्या नोम्-तोम् आलापीतूनच श्रोत्यासमोर राग स्वरूप उभे करीत आणि मग लयकारी करीत.

काव्य, स्वर, तराण्याचे बोल व तालाचे (मृदंगाचे) बोल यांचे मिश्रण असलेला चतरंग हा गीतप्रकार हल्ली मैफिलीत गायिला जात नाही. पण तो किती महत्त्वाचा आहे हे दृष्टोत्पत्तीस आणून देण्यासाठी त्यांनी प्रथम चतरंग गाऊन घेतलं ते श्री. जयंत चित्रे यांच्या भरदार आवाजामधून. वसू तालातला "मुनि हो पथिकवा । मोरा संदेसवा ॥" हा मोठा ख्याल आणि "पियाबीन सूनी पडी शेजरिया" ही द्रुत त्रितालात चीज गाऊन त्यांनी झिंझोटी संपवला.

भारतीय संगीतातील राग पद्धतीत संवादतत्त्व अतिशय महत्त्वाचं कसं आहे त्याचबरोबर रागसमयालाही कसं प्राधान्य दिलं जातं हे समजावून देण्यासाठी श्री अंगाचा आणि पूर्वी अंगाचा असे दोन्ही रेवा रागाचे प्रकार त्यांनी अतिशय शास्त्रशुद्ध तात्त्विक माहिती देऊन समजावून सांगितले. 'देव देव महादेव' आणि 'सोऽहं बाजे डमरूनाद' ह्या बंदिशी सुरुवातीला थोडा आलाप घेऊन श्री. चित्रे ह्यांनी आपल्या कसदार आवाजात चांगल्या म्हटल्या. जयताल १३ मात्रांचा नवीन प्रकार वाटला तरी जुनाच असून अप्रचलित आहे, कु. गीता आठलेकर ह्यांनी पंचम मारवा घेतला तो प्रारंभिक आलाप, वसू तालात 'बनरा बनरीके संग' हा विलंबित ख्याल व द्रुत ख्याल त्रितालात 'वैंया भरो दिन्ही कान कुंवर' ह्या चीजेने संपविला.

"षड्ज आणि निषाद हे सूर सकाळ संध्याकाळचं अस्तित्व दर्शवतात. सकाळचा व संध्याकाळचा ऋषभ वेगळा असतो संध्याकाळचा ऋषभ जाताना मलूल होतो आणि तीव्र ऋषभाला आव्हान देतो तो कल्याण रागात !" असं सांगून पंडितजींनी नंतर यमन, कल्याण आणि यमन कल्याण ह्या रागातील भेद स्वरांच्या अल्पत्वाने-बहुत्वाने, संवादाने आणि न्यासाने कसे बदलत असतात हे समजावून सांगितले.

सौ. मृणालिनी ठाकूरदास ह्यांनी 'मोरा मन लागी रे तुम्ही संग' हा शुद्ध कल्याण रागातला विलंबित एकतालातला मोठा ख्याल आणि द्रुत तालातला 'लंगर तुरकावा' हा छोटा ख्याल आपल्या मधुर आवाजात व्यवस्थित गाऊन दाखवला तर गीता आठलेकरांनी यमनकल्याण राग आपल्या

किंचित वसवया, पण कसदार आवाजांत सादर केला. यमन राग 'मणिबंध' तालात सादर केला "जा रे जा रे भंवरा जा" ह्या मोठ्या ख्यालाने व ननदियारी ह्या छोट्या ख्यालाने. कामोद रागाचा हा मोठा ख्याल 'बनरा मोरा ब्याहन आया' व 'सगरै बने भले बन आयो' हा छोटा ख्याल गाऊन तिलककामोदात कामोदाचं अंग कसं दिसतं हे त्यांनी दाखवून दिलं.

चंद्रकौंस रागाचे दोन प्रकार– एक पिलू अंगाचा व दुसरा मालकंस अंगाचा! अनुक्रमे 'आज को जागो रैना' हा विलंबित ख्याल व ह्याचा तराणा श्री. जयंत चित्रे यांनी आपल्या मधुर आवाजात जोरकसपणे सादर केला, तर मालकंस अंगाचा तालात 'सपने हुं आये' व 'विरहन अब मैं कैसे सहू' हा एकतालातला छोटा ख्याल आकर्षक वाटला.

कौशिकबागेश्री हा जुना कौशिक ध्वनी किंवा बागेश्री कंस ह्या नावाने सध्या प्रचलित आहे. त्याची फरोदस्त तालातील बंदिश गीता आठलेकरने गाऊन दाखविली. कौशिक धानी रागात वसू तालाचा मोठा ख्याल व दक्षिणी सवारी तालातला तराणा श्री. जयंत चित्रे ह्यांनी गाऊन रात्रीच्या कार्यक्रमाची सांगता केली.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागाचा प्रारंभ रविवार दि. ६ जुलैला सकाळी ९॥ वाजता झाला.

"आज आपण उत्तरांग पद्धतीने राग पाहू या. ह्यात कोमल ऋषभाचं महत्त्व वाढतं. भैरव संपूर्ण जातीचा राग नाही, पण कलिंगडा संपूर्ण जातीचा राग आहे," असे पंडितजी म्हणाले.

सौ. मृणालिनीने 'भोर भई आये तुम सैंया' हा भैरवचा मोठा ख्याल व 'प्रभु दातारे' हा त्रितालातील छोटा ख्याल म्हणून दाखवला. कालिंगडा रागाचा वसंत तालातला विलंबित ख्याल व 'पिया बिन जिया मोरा उलझन लागे' ही चीज गीताने कारुण्यपूर्ण रीतीने सादर केली.

त्यानंतर आनंद भैरव, अहिरी कालिंगडा, कौशिक भैरव, रामकली ह्या सर्व रागांचं रागस्वरूप चिजांच्या साह्याने पंडितजींनी व्यवस्थितपणे विशद केले.

पटमंजिरी हा राग पट आणि मंजिरी ह्या रागाच्या मिश्रणाने कसा तयार होतो हे चिजा व स्वर संगीताद्वारे दाखवून मग पंडितजींनी तोडी थाटाचे राग घेतले.

शिवानंदतोडी, सुप्रिया तोडी, वैशाली तोडी, मंगलतोडी हे तोडी रागाचे प्रकार प्रत्यक्ष गीतांनी व स्वरसंगतींनी समजावून १७ मात्रेच्या सूर्यतालात मंगला तोडीचा मोठा ख्याल सादर करून 'सब गुनीसंग गावत आज अपने रंगसो' ह्या बंदिशीने त्यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

चांगला कसदार, गोड आवाज, भरपूर तयारी आणि साधेपणा ह्यामुळे ठाकूरजींच्या विद्यार्थी संचाला हे रागाचे प्रात्यक्षिक–दर्शन यशस्वी करण्याचे श्रेय द्यायलाच हवे. पंडित ठाकूरदास ह्यांची कळकळ, संगीताविषयी आस्था, शास्त्राचा भरपूर अभ्यास, जुन्या रागतालांचा संग्रह आणि लोकांची ज्ञानलालसा जागृत करण्याची जिद्द ह्यामुळे त्यांचा कार्यक्रम तानसेन व कानसेन, जाणकार व रसिक अशा सर्वांनाच आवडला.

पुणेकर महिलांची "इटुक इवली" नागपूरकर रसिकांना भावली

भाषण वा काव्यवाचनासारखे तसे अनाकर्षक कार्यक्रमही आकर्षक करण्यासाठी आगळ्या वेगळ्या पद्धतीने सादर करण्याच्या भन्नाट कल्पना प्रत्यक्षात उतरविण्यासाठी स्वतःला झोकून देण्याची जी वृत्ती पुणेकरांमध्ये नेहमीच आढळून येते, त्यात तेथील महिलाही मागे नसतात, याचा प्रत्यय नागपूरकरांना गेल्या आठवड्यात झालेल्या 'इटुक इवली' या कार्यक्रमाच्या निमित्ताने आला.

विदर्भ साहित्य संघाच्या महिला सांस्कृतिक व साहित्य समितीतर्फे आयोजित पुण्याच्या तीन भगिनींचा 'इटुक इवली' हा काव्यगायनाचा आगळावेगळा कार्यक्रम दि. १७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६–३० वाजता वि. सा. संघाच्या टिळक सभागृहात झाला.

नावातच आगळेपण

कार्यक्रमाच्या नावापासूनच कार्यक्रमातील आगळेपणाबद्दल उत्सुकता निर्माण झाल्याने नागपूर रसिकांनी हजेरी लावली होती आणि रिमझिम

झरणाऱ्या पाऊसधारा थांबल्यावर इटुक इवलीच्या काव्यमय रसयात्रेत सहभागी होण्यासाठी जमलेल्या नागपूरकर रसिकांना श्यामला वनारसे, माधवी वैद्य आणि हेमा लेले या तीन पुणेकर भगिनींनी सतत एक–दीड तास काव्यधारांमध्ये चिंब भिजवून टाकले. पुणेकर महिलांची ही 'इटुक इवली' खरोखरच नागपूरकर रसिकांना भावली, यात शंका नाही.

स्त्री-मनाची उकल

वि. सा. संघाच्या याच वास्तूत या आधीही बऱ्याच काव्यवाचनाच्या / गायनाच्या कार्यक्रमांना हजर राहण्याचे योग आले आहेत. या कार्यक्रमातून एकत्र जमलेले अनेक कवी आपआपल्या कविता वाचून / म्हणून दाखवितात. क्वचित गाऊनही दाखवितात. पण या कार्यक्रमांतून एक दोष असतो, तो हा की कवींच्या वाचनात सलगता नसते. एका कवीची कविता दुसऱ्या कवीच्या कवितेपेक्षा वेगळी असते. पण 'इटुक इवली'मध्ये हा दोष टाळण्यात आला होता. काव्यात्मक निवेदनातून या तीन भगिनींनी महाराष्ट्रातील नामवंत व श्रेष्ठ कवयत्रींच्या रचना एकत्र गुंफून स्त्री–मनाच्या वेदना–संवेदना सुख–दुःखे यांची उकल टप्प्याटप्प्याने रसिकांसमोर अगदी सहजतेने करून दाखविली, हे 'इटुक इवली'चे आगळेपण!

"इटुक इवली"ची कल्पना

'इटुक इवली'ची मूळ संकल्पना श्यामला वनारसे यांची ! आपल्या आजीच्या अमृतोत्सवाच्या–७५ व्या वाढदिवशी–निमित्ताने श्यामला वनारसे यांनी माधवी वैद्य व हेमा लेले या आपल्या मैत्रिणींच्या सहकार्याने कविता–वाचनाचा कार्यक्रम केला. बहिणाबाई चौधरी, इंदिरा संत, संजीवनी मराठे, पद्मा गोळे, पद्मा बिनीवाले, प्रभा गणोरकर, निर्मला आठल्ये या कवयत्रींच्या रचनांसोबत स्वतः श्यामलाताई आणि हेमाताई यांच्याही स्वरचित रचना या कार्यक्रमात सादर केल्या गेल्या. त्यावेळी आजीच्या जगण्यातली गाणी आणि विराणी, वेदना अन् संवेदना एका वेगळ्याच ओलाव्याने या भगिनींना जाणवल्या. आणि मग श्यामलताईंच्या मनात 'इटुक इवली'ची कल्पना आली. त्यांनी ती हेमाताई व माधवीताई या आपल्या मैत्रिणींसमोर मांडली. त्यांनाही ती कल्पना आवडली अन् मग 'इटुक इवली' प्रत्यक्षात उतरविण्यासाठी या तिघींनी स्वतःला झोकून देण्याचे ठरविले.

दोन वर्षात पुण्यात बऱ्याच ठिकाणी हा कार्यक्रम झाला. पुणेकर रसिकांनीही 'इटुक इवली'चं मोठ्या मनानं भरभरून कौतुक केले. भगिनींचा आत्मविश्वास वाढला आणि मग 'इटुक इवली'ला पुण्याबाहेर न्यायचं धाडस करण्याचं ठरलं ! अर्थात हे धाडस अंगलट येऊ नये, यासाठी आवश्यक ती सर्व तयारी करण्यासाठी या भगिनींनी अथक परिश्रम करण्यास प्रारंभ केला आणि अकोला व परवा नागपूर येथे ही 'इटुक इवली' पेश केली.

गोड आवाजाच्या विदुषी

कवितेचा भावार्थ रसिकांच्या अंतःकरणापर्यंत परिणामकारकतेने जाऊन पोचावा यासाठी कविता गाताना–वाचताना नव्हे–तबला, पेटी, स्वरमंडळ वा तत्सम वाद्यांची साथ कटाक्षाने टाळून आपल्या गोड आवाजाचा आणि अभिनयाचा योग्य वापर तिघींनी केला होता. 'गोड' आवाज ही काय चीज असू शकते, याचा प्रत्यय त्या दिवशी नागपूरकरांना आला.

या कार्यक्रमाची काही वैशिष्टये वर सांगितली आहेच, तशीच आणखीही काही सांगता येतील. पण सर्वाधिक महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे 'इटुक इवली' सादर करणाऱ्या या तीन भगिनी कला शाखेतील आचार्य (पीएच्. डी.) पदवीने विभूषित आहेत.

—तर अशा या विदुषींचा अखंडपणे एक तासाचा आगळा अन् आकर्षक असा 'इटुकला' कार्यक्रम नागपूरकरांना पाहण्याचा / ऐकण्याचा योग जुळवून आणला वि. सा. संघाच्या महिला सांस्कृतिक / साहित्य समितीच्या उत्साही संयोजिका सौ. शैल जैमिनी यांनी ! हा कार्यक्रम बघितल्यावर सर्वांच्या मनात एकच विचार आला की, असेच आगळेवेगळे कार्यक्रम यानंतरही पाहण्याचे / ऐकण्याचे प्रसंग वरचेवर त्यांनी आणावेत. ■

विदर्भ साहित्य संघ नागपूर

केन्द्रीय कार्यवृत्त दि. १ जुलै ८६ ते ३० सप्टेंबर १९८६

दि. ५ व ६ जुलै / अभिजात भारतीय संगीताबद्दल सर्व सामान्यांना माहिती मिळावी म्हणून मुंबईच्या पंडित माणिकदास ठाकूरदास आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा "प्रात्यक्षिकांसह विवेचन" हा आगळा वेगळा कार्यक्रम विदर्भ साहित्य संघाची संगीत समिती आणि सप्तक या संस्थेच्या सहकार्याने दोन दिवस सादर करण्यात आला. अभिजात शास्त्रीय संगीताचे अभ्यासक, शिक्षक व विद्यार्थी ह्यांनी दोन्ही दिवस प्रचंड साद दिली.

दि. ८ जुलै / विदर्भ साहित्य संघाच्या रामटेक शाखेचा उद्‌घाटन समारोह माजी राज्यमंत्री श्रीमान मधुकरराव किंमतकर यांच्या अध्यक्षतेखाली व संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांच्या शुभहस्ते झाला. कार्यक्रमाचे संचालन श्री. श्रीराम आष्टनकर व आभार प्रदर्शन श्री. गजानन किंमतकर यांनी केले.

ह्याला जोडून सायंकाळी प्राचार्य शेवाळकरांचे 'महाभारत' या विषयावर प्रभावी भाषण झाले. भोजनोत्तर रात्री ९ वाजता सुप्रसिद्ध कवी सुरेश भट यांच्या अध्यक्षतेखाली "वर्षागीते" या शीर्षकाखाली मान्यवर मराठी कवींचे संमेलन झाले. कार्यक्रम समाप्तीनंतर आषाढ मासातील पहिल्या रात्रीचे औचित्य साधून नागपूरला परतण्यापूर्वी मध्यरात्री भर पावसात कालिदास स्मारकाचे दर्शन घेऊन तेथे पहाटेपर्यंत "गीतांजली" वाहिली. ह्या सर्व कार्यक्रमांना विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी सर्वश्री वामन तेलंग, मनोहर म्हैसाळकर, मदन धनकर, सुरेश द्वादशीवार, योगेश बऱ्हाणपुरे उपस्थित होते.

दि. १६ जुलै / थोर इतिहास संशोधक व चतुरंग लेखक श्री. वा. सी. बेन्द्रे यांच्या दुःखद निधनानिमित्त शोकसभा घेण्यात येऊन त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. २० जुलै / महाराष्ट्रातील थोर शिक्षण तंत्रज्ञ व आचार्यकुलाचे प्रमुख कार्यकर्ते श्री. दि. हृ. उपाख्य बाळासाहेब सहस्रबुद्धे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्यांच्या सत्काराचा प्रकट समारंभ रंगमंदिरात श्री. सहस्रबुद्धे अमृत महोत्सव समिती आणि विदर्भ साहित्य संघाच्या संयुक्त सहकार्याने सादर करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान लोकसेवक मा. मधुकररावजी चौधरी ह्यांनी भूषविले होते तर प्रमुख अतिथी सर्वोदयी नेते माननीय रा. कृ. पाटील होते. ह्याप्रसंगी 'शिक्षण योगी' ह्या गौरव ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

दि. २१ जुलै / शालेय विद्यार्थ्यांकरिता विदर्भ साहित्य संघाच्या परीक्षा समितीतर्फे श्री. मधुकरराव भाकरे ह्यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी हस्ताक्षर सुधार व शुद्ध लेखन वर्ग एक आठवडा घेण्यात आला. वर्गाला प्रतिसाद चांगला होता. हस्ताक्षर वर्गाचा समारोप श्री. अ. ल. लिमये ह्यांनी केला.

दि. २७ जुलै / सकाळी ठीक ९ वाजता कार्यकारिणीची दुसरी सभा झाली माजी संघाध्यक्ष विख्यात साहित्यिक श्री. पु. य. देशपांडे यांचे निधनाची वार्ता कळताच संघाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर व सरचिटणीस श्री. मनोहर म्हैसाळकर हे त्यांच्या निवासस्थानी अंत्य दर्शनास गेले. कार्यकारिणीची

सभा सुरू असतानाच अंत्यसंस्कारास जाण्यापूर्वी त्यांचा देह काही वेळ वि. सा. संघाच्या प्रांगणात ठेवण्यात आला. कार्यकारिणीची सभा स्थगित करण्यात येऊन कार्यकारिणी सदस्य, कार्यालयीन कर्मचारी व सेवक वर्गाने त्यांना पुष्पहार अर्पित करून मूक श्रद्धांजली वाहिली.

दुपारी ठीक २–३० वाजता विदर्भ साहित्य संघाची सर्वसाधारण सभा घेण्यात आली.

दि. ३० जुलै / कै. वि. घ. देशपांडे स्मृति व्याख्यानमालेच्या अंतर्गत, संस्कृतचे गाढे अभ्यासक प्रा. धों. वि. देशपांडे (मुंबई) यांचे एक व्याख्यान गडकरी सभागृहात झाले. व्याख्यानाचा विषय "राष्ट्रीय एकात्मता" होता.

दि. १ ऑगस्ट / संघाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर ह्यांनी त्यांच्या पुणे येथील मुक्कामात मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदी अविरोध निवड झाली म्हणून विख्यात साहित्यिक श्री. विश्राम बेडेकर यांचे त्यांच्या निवासस्थानी जाऊन हार्दिक अभिनंदन केले.

कै. सौ. विजया देवपुजारी महिला एकांकिका स्पर्धा १९८६

दि. १ व २ ऑगस्ट / विदर्भ साहित्य संघातर्फे दरवर्षी घेण्यात येणाऱ्या कै. सौ. विजया देवपुजारी स्मृति महिला एकांकिका स्पर्धा यंदा दिनांक १, २ ऑगस्ट १९८६ या दिवशी धनवटे रंगमंदिरात संपन्न झाल्या. यावर्षी या स्पर्धेत नागपूरच्या ७, व हिंगणघाटची १ अशा एकूण ८ एकांकिका सादर झाल्या. यावर्षी स्पर्धेत एकांकिकांची संख्या जरी कमी असली तरी स्पर्धेतील एकांकिकांची सादरीकरणाची पातळी उच्च दर्जाची होती. ही स्पर्धा यशस्वी करण्यास सौ. कुमुद पाठक, कु. सुनीता महाजन, श्री. शशांक हेडाऊ यांनी अथक परिश्रम घेतले. स्पर्धा यशस्वी करण्यास स्पर्धा समितीच्या सर्वच सदस्यांचा हातभार लागला. या स्पर्धेत श्रीयुत प्रा. चांदेकर, सौ. शुभांगी भडभडे व सौ. अलका कुळकर्णी यांनी परीक्षक म्हणून सहकार्य दिले. दिनांक २ ऑगस्ट रोजी धनवटे रंगमंदिरात या स्पर्धेच्या पारितोषिक विजेत्यांना वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्रीयुत वामन तेलंग यांचे हस्ते पारितोषिके दिल्या गेली. यावर्षीपासून "रसिक रंजन" या संस्थेद्वारा नागपूरातील दिवंगत अभिनेत्री कै. कु. मनिषा वेळेकर हिच्या स्मृतिप्रीत्यर्थ महिला एकांकिका स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीस एक फिरते स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले. "रसिक रंजन" आणि या स्पर्धेचे सर्व दानदाते यांचे वि. सा. संघातर्फे मनःपूर्वक आभार.

निर्मितीची पारितोषिके

क्रमांक	संस्थेचे नांव	एकांकिका	पारितोषिक
प्रथम	नाट्यश्री	खुर्च्या	व्यंकटेश ब्रह्मदेव जागीरदार फिरती ढाल व वि. सा. संघ रोख पारितोषिक रु. ३०१/– व प्रशस्तीपत्रक
द्वितीय	उषःकाल कला निकेतन	मेजर आशादेवी परांजपे	उत्कर्ष कला मंदिर फिरती ढाल व वि. सा. संघ पारितोषिक रु. २०१/– रोख व प्रशस्तीपत्रक

क्रमांक	संस्थेचे नाव	एकांकिका	पारितोषिक
तृतीया	हुर्णे महिला समाज	बाकी सगळं शून्य	वि. सा. संघ व कै. यशोदाबाई मोरे संयुक्त पारितोषिक रु. १०१/- व प्रशस्तीपत्रक
उत्तेजनार्थ	रंग स्वानंद	भोंडला खेळू या	वि. स. संघातर्फे प्रशस्तीपत्रक

अभिनयाची पारितोषिके

क्रमांक	कलावंताचे नांव	भूमिका	एकांकिका	संस्था	पारितोषिक
प्रथम	गौरी खर्डेनवीस	मंत्री	खुर्च्या	नाटयश्री	वि. सा. संघातर्फे रु. ५१/- रोख, कै. मनोरमाबाई पोतदार पारि. रु. ५१/- रोख, रसिक रंजन प्रस्तुत कै. मनिषा वेळेकर स्मृति फिरते मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक
द्वितीय	मृदुला केकतपुरे		खुर्च्या	नाटयश्री	वि. सा. संघाचे रु. २५/- रोख व प्रशस्तीपत्रक

श्री. चंद्रकांत कुळकर्णी पुरस्कृत १० वर्षा खालील बालकलावंताचे कै. सुशीलाबाई कुळकर्णी स्मृति पारितोषिक रु. ५१/- रोख, कु. एकता शिंदे या कलावंतास आविष्कार संस्थेच्या चित्र एकांकिकेतील एक मुलगी भूमिकेसाठी देण्यात येत आहे.

सर्वोकृष्ट दिग्दर्शनाचे पारितोषिक रु. १०१/- रोख, वि. सा. संघ व कै. यशोदाबाई मोरे संयुक्त पारितोषिक आराधना नवांगुळ यांना खुर्च्या एकांकिकेच्या दिग्दर्शनासाठी देण्यात येत आहे.

सर्वोकृष्ट लेखनाचे पारितोषिक रु. १०१/- रोख, वृंदा घरोटे, अंजली क्षीरसागर यांना अनुक्रमे बाकी सगळं शून्य व खुर्च्या या एकांकिकेच्या लेखनासाठी देण्यात येत आहे. (विभागून दिल्या गेले)

परीक्षकांच्या शिफारशीने द्यावयाची प्रशस्तीपत्रके

१. अभिनय उत्तेजनार्थ — अपर्णा नाटेकर
२. अभिनय उत्तेजनार्थ बाल कलावंत — कु. शीतल पाटील
} एकांकिका– आशादेवी परांजपे

दि. ३ ऑगस्ट / दिवंगत साहित्यिक श्री. पु. य. देशपांडे यांच्या दुःखद निधनानिमित्त शोकसभा घेण्यात आली. सर्वश्री श्री. गो. काशीकर, मधुकर आष्टीकर, श्री. ल. काशीकर आदी वक्त्यांनी ह्याप्रसंगी आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्या.

दि. ११ ऑगस्ट / साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास व्याख्यानमालेच्या अंतर्गत सौ. प्रभावतीदेवी राजे यांचे "रामण महर्षी" या विषयावर एक व्याख्यान तात्या टोपेनगर सभागृहात झाले. फ्रेन्ड्स को–ऑप. हौसिंग सोसायटीने सभागृह निःशुल्क दिले होते. रसिकच्या सहकार्याने व श्रीमती वीणाताई हरदास यांच्या सौजन्याने हा कार्यक्रम सादर झाला.

दि. १३ ऑगस्ट / विदर्भ साहित्य संघ आणि पु. भा. भावे स्मृति समिती यांच्या संयुक्त विद्यमाने विख्यात साहित्य समीक्षक प्रा. डॉ. शशिकांत लोखंडे,(मुंबई) यांच्या प्रमुख उपस्थितीत भावे ह्यांच्या साहित्यातील काही स्वगत-कथाकथन, लेखांचा नाटयमय आविष्कार व नाटयप्रवेश सादर करण्यात आले. कलावंत होते, प्रांजल उधोजी, शुभदा पारनंदीवार, योगिनी पेंढारकर, मधुछन्दा चाफेकर, चित्रा मोडक, इंद्रायणी शिंदे, मिलींद वेडेकर, इला भाटे. याचप्रसंगी १९८५ साली अमरावती व नागपूर विद्यापीठाच्या मराठी विषयाच्या एम. ए. परीक्षेत प्रथम आलेल्यांना प्रमुख अतिथींच्या हस्ते भावे पुरस्कार देण्यात आला.

दि. १५ ऑगस्ट / स्वातंत्र्य दिनानिमित्त सकाळी सर्व स्थानिक पदाधिकारी, कर्मचारी व सेवक वर्गानी ध्वजारोहण केले. ध्वजवंदनानंतर सर्वांना मिठाई वाटण्यात आली.

दि. १६ ऑगस्ट / विदर्भ साहित्य संघाच्या महिला साहित्य व सांस्कृतिक समितीतर्फे "इटुक इंवली" या एका आगळ्या काव्यवाचनाच्या कार्यक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. सादरकर्त्या होत्या. पुण्याच्या माधवी वैद्य, हेमा लेले व श्यामला वनारसे, संगीत राहुल रानडे व श्यामला वनारसे यांचे तर संकल्पना श्यामले वनारसे यांची होती.

दि. २० ऑगस्ट / कै. इंदिरा अनंत खरे आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा १९८६–८७

वि. सा. संघातर्फे झालेल्या कै. इंदिरा अनंत खरे आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धेत यावर्षी नागपुरातील १२ शाळांमधून २१ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. नागपुरातील ख्यातनाम डॉ. सौ. कुसुम वानकर यांनी साहित्य संघाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त दिलेल्या देणगीतून त्यांच्या आईच्या स्मृति प्रीत्यर्थ दरवर्षी घेण्यात येणारी ही स्पर्धा यावर्षी दिनांक २०–८–८६ रोजी म. पां. देव स्मृति लोकांची शाळा येथे संपन्न झाली. या स्पर्धेत स्पर्धकांनी १. यंत्र मानव, २. आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये भारत मागे का ?, ३. इंग्रजी माध्यमाचे शिक्षणावर होणारे परिणाम या विषयांवर सुंदर विचार व्यक्त केले. वर्ग ८ ते १० या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी या स्पर्धेच्या अध्यक्षस्थानी लोकांच्या शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती चाफेकर होत्या. या स्पर्धेची पारितोषिके यावर्षी खालील विद्यार्थ्यांनी पटकावली.

प्रथम क्रमांक– साकेत दशपुत्रे, पं. ब. व्यास विद्यालय, नागपूर रु. १५०/– रोख
द्वितीय क्रमांक– मृणालिनी नानिवडेकर, हडस हायस्कूल, नागपूर रु. १००/– रोख
तृतीय क्रमांक– रश्मी संगीतराव, सोमलवार हायस्कूल, खामला रु ५०/– रोख
उत्तेजनार्थ प्रशस्तीपत्रक– लक्ष्मीकांत आंबेकर, सी. पी. ॲन्ड बेरार हायस्कूल, महाल.

या स्पर्धेत यावर्षी एकही अपंग विद्यार्थी स्पर्धक म्हणून नव्हता. त्यामुळे अपंग विद्यार्थ्याचे पारितोषिक रु. ५०/– कुणालाही मिळाले नाही. कार्यक्रमाचा समारोप करताना सौ. चाफेकर यांनी विद्यार्थ्यांना समयोचित उपदेश केला. सौ. गुजर व सौ. रचना धोतरकर यांनी परीक्षक म्हणून सहकार्य दिले. स्पर्धेचे संपूर्ण संचलन श्री. श्यामकांत जाहगीरदार व श्री. मनोहर ढोक यांनी परिश्रमपूर्वक केले. आभार प्रदर्शन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले. ही स्पर्धा आयोजित करण्यास बहुमोल सहकार्य दिल्याबद्दल लोकांच्या शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व इतर कर्मचारी वर्ग यांचा वि. सा. संघ आभारी आहे.

दि. २२ व २३ ऑगस्ट / कै. सत्यभामाबाई सगदेव आंतरशालेय कथाकथन स्पर्धा

विदर्भ साहित्य संघातर्फे यावर्षी झालेल्या कै. सत्यभामाबाई सगदेव आंतरशालेय कथाकथन स्पर्धेस प्रचंड प्रतिसाद मिळाला. ही स्पर्धा दिनांक २२-८-८६ रोजी वर्ग ५ ते ७ व २३-८-८६ रोजी वर्ग ८ ते १० या दोन गटांमध्ये केशवनगर माध्यमिक शाळा, रेशिमबाग येथे संपन्न झाली. "अ" गटात एकूण २३ विद्यार्थी व ब गटात एकूण ३८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. दोन्ही दिवशी केशवनगर माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. मंदाकिनी पंडित अध्यक्षस्थानी होत्या. या स्पर्धेसाठी आपल्या आईच्या स्मरणार्थ ज्यांनी देणगी दिली आहे त्या सौ. महाजन या दोन्ही दिवशी आवर्जून उपस्थित होत्या. सौ. पंडित व सौ. महाजन यांनी विद्यार्थ्यांना समयोचित उपदेश केला. स्पर्धेचे संचालन श्री. मनोहर ढोक व श्री. श्यामकांत जाहागिरदार यांनी केले. परीक्षक म्हणून सौ. वृशाली कुळकर्णी व श्री. गणेश शिरोळे यांनी सहकार्य दिले. प्रकाश एदलाबादकर यांनी आभार प्रदर्शन केले. ही स्पर्धा आयोजित करण्यास केशवनगर माध्य. शाळेच्या मुख्याध्यापिका, शिक्षकवर्ग व कर्मचारी वर्ग यांनी भरघोस सहकार्य दिले. याबद्दल वि. सा. संघ त्यांचा ऋणी आहे.

स्पर्धेचा निकाल खालील प्रमाणे—

"अ" गट

प्रथम पारितोषिक रु. ७५/-रोख तृप्ती मावळे, पं. ब. व्यास हायस्कूल, नागपूर.
द्वितीय पारितोषिक रु. ५०/-रोख रोहिणी ठेंगडी, राजेंद्र हायस्कूल, नागपूर
तृतीय पारितोषिक रु. २५/-रोख निलय निंबाळकर, हडस हायस्कूल, नागपूर
उत्तेजनार्थ प्रशस्तीपत्रक-प्रमोद ढोक, जीवन विकास विद्यालय, उमरेड

"ब" गट

प्रथम पारितोषिक रु. ७५/-रोख सोनल खर्डेनविस, म. पां. लोकांची शाळा, नागपूर
द्वितीय पारितोषिक रु. ५०/-रोख सचीन फडणविस, पं. बं. व्यास विद्यालय, नागपूर
तृतीय पारितोषिक रु. २५/-रोख रेशमा कुळकर्णी, मौन्ट कारमेल हायस्कूल, नागपूर
उत्तेजनार्थ प्रशस्तीपत्र-मृणालिनी नानिवडेकर, हडस हायस्कूल, नागपूर

दि. २९ ऑगस्ट / नरकेसरी बॅरिस्टर अभ्यंकर ह्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त नागपुरातील त्यांच्या पुतळ्याला विदर्भ साहित्य संघातर्फे पुष्पहार घालण्यात आला.

दि. ३० ऑगस्ट / न्यायमूर्ती भवानीशंकर नियोगी ह्यांनी आपल्या वयाचे शतक पूर्ण केल्याबद्दल त्यांच्या निवासस्थानी जाऊन विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर व सरचिटणीस मनोहर म्हैसाळकर ह्यांनी पुष्पहार घालून त्यांना दीर्घायुरारोग्य चिंतिले.

दि. ३१ ऑगस्ट / कै. श्री. म. माटे ह्यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालण्यात आला व दिवसभर त्यांच्या पुस्तकांचे प्रदर्शन श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयातर्फे भरविण्यात आले.

दि. ३ सप्टेंबर / विदर्भाचे विख्यात कवी उ. रा. गिरी यांच्या अकाली निधनानिमित्त शोक सभा घेण्यात आली.

दि. १२ सप्टें. / कै. दत्तो वामन पोतदार व्याख्यानमालेच्या अंतर्गत डॉ. कुमार सप्तर्षी (पुणे) ह्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. विषय होता "मिझोराम : सद्यस्थिती" विषय ज्वलंत असल्यामुळे व्याख्यानांना चांगलाच प्रतिसाद मिळाला.

दि. १३ सप्टें. / विदर्भ साहित्य संघ आणि रसिक ह्या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने कविवर्य अनिल स्मृति प्रित्यर्थ कविवर्य वसंत बापट ह्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ. शिरीष आत्माराम देशपांडे यांचेही ह्या कार्यक्रमाला विशेष सहकार्य होते.

दि. १५ सप्टेंबर / कै. नलिनीबाई जतकर आंतरशालेय चित्रकला स्पर्धा १९८६–८७

विदर्भ साहित्य संघातर्फे नागपूरच्या शालेय विद्यार्थ्यांसाठी उपरोक्त चित्रकला स्पर्धा यंदा दिनांक १५–९–८६ रोजी वि. सा. संघाच्या कला दालनात संपन्न झाली. या स्पर्धेत नागपूरातून १५ शाळांमधून ७० विद्यार्थ्यांनी भाग घेतला. ही स्पर्धा वर्ग ५ ते ७ व वर्ग ८ ते १० या दोन गटात झाली. विद्यार्थ्यांनी त्यांना दिलेल्या विषयानुसार ९० मिनिटात आपआपल्या चित्रकृती पूर्ण केल्या. स्पर्धा सुरू असताना या स्पर्धेसाठी ज्यांनी देणगी दिली आहे त्या सौ. कुसुम डोऋस व प्राचार्य डॉ. डोऋस यांनी स्पर्धेचे निरीक्षण करून संतोष व्यक्त केला. वि. सा. संघाचे अध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांनीही कला दालनास भेट दिली व मुलांचे कौतुक केले. या स्पर्धेत असलेल्या ८ पारितोषिकांपैकी ४ पारितोषिके प्राप्त केल्याबद्दल भिडे कन्या शाळेला लागोपाठ यावर्षीही कै. नलिनी जतकर स्मृति फिरती ढाल प्राप्त झाली.

सायंकाळी सर्व चित्रकृतीचे कला दालनात प्रदर्शन आयोजित केले होते. त्याला पालक व विद्यार्थीवर्ग बहुसंख्येने उपस्थित होता. वि. सा. संघाच्या परीक्षा समितीच्या संचालिका सौ. शोभाताई उवगडे यांच्या हस्ते सायंकाळी कलादालनात झालेल्या समारंभात विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. सौ. शोभा उवगडे व डॉ. विजय काकडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना समयोचित उपदेश केला. या स्पर्धेत श्रीयुत प्रकाश खरोटे, श्रीयुत डॉ. विजय काकडे व सौ. इंदुमती शेवडे यांनी परीक्षक म्हणून सहकार्य दिले.

ही स्पर्धा यशस्वी करण्यास श्री. सतीश पेंडसे, श्री. श्यामकांत जहागीरदार, श्री. देवेन्द्र लुटे, श्री. सुहास चव्हाण, श्री. प्रशांत गाढवे, यांनी उल्लेखनीय परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन श्री. प्रकाश एदलाबादकर यांनी केले.

चित्रकला स्पर्धेचा निकाल

विजेत्या शाळेस कै. नलिनी जतकर स्मृति फिरती ढाल प्राप्त झाली. यावर्षी ही ढाल भिडे गर्ल्स हायस्कूल, सीतावर्डी नागपूर–१२ या विद्यालयास प्राप्त झाली.

वैयक्तिक पारितोषिके खालीलप्रमाणे देण्यात आली.

पारितोषिक	पारितोषिकाची रक्कम	स्पर्धकाचे व शाळेचे नाव
अ गट प्रथम पारितोषिक	५१	शीतल अरविंद पारेख, पं. व. व्यास विद्यालय
अ गट द्वितीय पारितोषिक	३१	मीनल दिनकर मोहने, पं. ब. व्यास विद्यालय

पारितोषिक	पारितोषिकाची रक्कम	स्पर्धकाचे व शाळेचे नाव
अ गट उत्तेजनार्थ	२१	प्रतीक शंकरराव फुलझेले, पं. ब. व्यास विद्यालय
अ गट उत्तेजनार्थ	२१	तेजश्री गुबे, भिडे गर्ल्स हायस्कूल
ब गट प्रथम पारितोषिक	७५	कु. माधुरी गेडाम, भिडे गर्ल्स हायस्कूल
ब गट द्वितीय पारितोषिक	५१	आशुतोष उईके, सी. पी. ॲन्ड बेरार, रविनगर
ब गट उत्तेजनार्थ	३१	चेतना चौधरी, भिडे गर्ल्स हायस्कूल
ब गट उत्तेजनार्थ	३१	निलिमा उरकुडकर, भिडे गर्ल्स हायस्कूल

परीक्षक १. श्रीमती इंदुमती शेवडे, २ डॉ. विजय काकडे, ३. श्री. प्रकाश खरोटे

परीक्षा समिती

दि. २० व २१ सप्टेंबर/ प्रथम सत्रातील परीक्षा घेण्यात आल्या या सत्रात एकूण परीक्षार्थी संख्या ७०० होती. प्रवीण आणि प्राज्ञ परीक्षेत एकूण ३० परीक्षार्थी सम्मिलित झाले. निकाल अनुक्रमे ४४% व ८०% टक्के लागला. विविध परीक्षांचे निकाल दि. १५ नोव्हेंबर रोजी जाहीर करण्यात आला.

दि. २२ सप्टें. / स्त्री मुक्ती संघटनेच्या आगामी डिसेंबर मध्ये होणाऱ्या कार्यक्रमाच्या पूर्व-तयारीची बैठक वि. सा. संघाच्या सहकार्याने टिळक सभागृहात झाली.

दि. २३ सप्टें. / कै. गु. ह. देशपांडे यांचा स्मृतिदिन त्यांच्या प्रतिमेला हार घालून पाळण्यात आला.

दि. २४ व २५ सप्टें. / कै शिवदास कृष्ण वारलिंगे व्याख्यानमालेच्या अंतर्गत लोकवाङ्मयाच्या विषयात अभ्यासक डॉ. सरोजिनी बाबर यांची दोन व्याख्याने आयोजित करण्यात आली. व्याख्यानाचे विषय होते : "श्रीपाद महादेव माटे व लोकसाहित्यातील स्त्री", दोन्ही दिवस रसिकांचा प्रतिसाद उत्तम होता.

दि, २८ सप्टें. / परीक्षा समितीतर्फे संघाध्यक्ष प्राचार्य राम शेवाळकर यांच्या अध्यक्षते-खाली नागपुरातील विद्यालयीन व महाविद्यालयीन केंद्राधिकाऱ्यांची सभा घेण्यात आली या सभेच्या निमित्ताने नागपुरातील सगळ्या विद्यार्थ्यांना पत्रके पाठवून परीक्षाकेंद्र उघडण्याचे आवाहन करण्यात आले. ■

आकोट

दि. १३–७–८६ ला शाखेतर्फे साहित्यिक गप्पांचा कार्यक्रम झाला त्यात प्रा. रा गो. चवरे, श्री. पु. पिदुळे, भाऊ जेलगोटे, विजय अस्वार, आदींनी आपल्या कविता सादर केल्या.

गडचिरोली

दि. २३–७–८६ ला दुपारी ४ वाजता सदस्य कविवर्य वि. ज. मांदाडे गुरुजी यांचे निधनाबद्दल श्रद्धांजली अर्पित करण्यात आली व नंतर स्थानिक शिवाजी सार्वजनिक वाचनालयात सर्वसाधारण वार्षिक सभा पार पडली. १९८६–८७ वर्षाकरिता खालीलप्रमाणे कार्यकारिणी घोषित करण्यात आली.

अध्यक्ष– श्री. गो. ना. मुनघाटे, कार्याध्यक्ष– श्री संभाजीराव होकम, सचिव– प्रा. अरविंद बंदे, सहसचिव– श्री. वासुदेव यशवंत भूते, कोषाध्यक्ष– प्राचार्य आर. के. ठाकरे, कार्यप्रमुख– प्रमोद मुनघाटे, परीक्षा संचालक– प्रा. धनराज मेश्राम, प्रमुख सदस्य– सर्वश्री. प्रा. किरमोरे, पाटील, धाईत, चिचघरे.

मूल

दि. २७–७–८६ रोजी वि. सा. संघाचे पूर्वाध्यक्ष थोर साहित्यिक व संशोधक अध्यात्माचे गाढे अभ्यासक व स्वातंत्र्य सेनानी कै. पु. य. देशपांडे यांचे निधनाबद्दल शोक संवेदना व्यक्त करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

नरखेड

दि. २८–७–८६ ला शाखेची सर्वसाधारण वार्षिक सभा अध्यक्ष श्री. गुप्ता यांचे अध्यक्षतेखाली पार पडली. १९८६ ते १९८९ पर्यंतची कार्यकारिणी निवडण्यात आली. कार्याध्यक्ष– श्री. रमेश गुप्ता, उपाध्यक्ष– पां गो. कटारे, चिटणीस- प्रा. रमेश पोतदार, सरचिटणीस– आनंद गुरमुळे, खजीनदार– श्री. भाऊराव ठाकरे, कार्यक्रम प्रमुख– प्रा. वासुदेव डहाके, सदस्य– सर्वश्री तातोडे, मदनकर, ढोके.

चिखलदरा

दि. ३–८–८६ ला शाखासभेत एकथोर तत्वचिंतक, पत्रकार, साहित्यिक, कवी व स्वातंत्र सैनिक पु. य. देशपांडे यांच्या निधनाबद्दल विनम्र श्रद्धांजली वाहण्यात आली. येथील मेळघाट मित्रमंडळातर्फे भारत भारती बालपुस्तकमालेची २३ पुस्तके चिखलदरा भागात खेड्यातील गवळी, आदीवासी मुलांना वाचण्यासाठी देण्यास शाखेला सप्रेम भेट दिली. शाखा त्या मंडळाची आभारी आहे.

लाखनी

दि. ६–७–८६ रोजी दुपारी ३ वाजता कार्यकारिणीची तातडीची सभा घेवून त्यात कै. बाबू जगजीवनराम यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सचीव श्री. द. सा. बोरकर यांनी राष्ट्रीय हानी झाल्याचे विचार व्यक्त केले.

दि. १७–८–८६ ला दुपारी ४ वाजता शाखेची वार्षिक साधारण सभा शाखाध्यक्ष श्री. वि ग. कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. सभेच्या प्रारंभी दिवंगत मान्यवर कै. बाबू जगजीवनराम,

कै. पु. य. देशपांडे, कै. म. श्यं. देशपांडे, कै. आचार्य दादा धर्माधिकारी व कै. जनरल अरुणकुमार वैद्य यांना, सर्वांनी एक मिनिट उभे राहून श्रद्धांजली अर्पण केली.

चंद्रपूर

दि. ५–९–८६ रोजी शाखेची सर्वसाधारण सभा घेऊन ३ वर्षासाठी (८६ ते ८९) खालील कार्यकारिणी निवडून आली. अध्यक्ष– डॉ. श. वि. सालफळे, कार्याध्यक्ष– अॅड्. विजय मोजरे, उपाध्यक्ष– अ. वि. मुनगंटीवार, कोषाध्यक्ष– सौ. वनिता सरदेशपांडे, सचिव– मुकुंद उगे, सहसचिव रामनाथ गुरनुळे, सदस्य– सर्वश्री काटकर, सिडाम, अॅड्. सगदेव, प्रा. स्वान, राजकोंडावार, प्रा. सुरेश द्वादशीवार व प्रा. मदन धनकर.

धामणगांवरेल्वे

दि. २८–७–८६ रोजी शाखेच्यावतीने हिन्दी, मराठी, उर्दू असा संमिश्र कविसंमेलनाचा कार्यक्रम पार पडला. दि. ८–९–८६ रोजी रविंद्रनाथ टागोर यांचा १२५ वा जन्मवर्षोत्सव कार्यक्रम साजरा झाला. याप्रसंगी त्यांच्या साहित्य व जीवनाचा परिचय नाट्यनृत्य व संगीताच्या द्वारे करून देण्यात आला. सुरुवातीला कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बाबासाहेब महात्मे यांनी केले. गुरुदेव यांची गाजलेली कथा "काबुलीवाला" या कथेत प्रा. महात्मे ह्यांनी नाट्य रूपांतर करून ते प्रा. श्रीखंडे व प्रा. वाघमारे यांनी सादर केले. ह्या नाट्यात श्री. निस्ताने, श्री. लबडी, श्री. भैया गाडेकर, कु. गोरे, कु. स्वाती गाडेकर व कु सारिका गाडेकर ह्यांनी भूमिका केल्या. छोट्या मिनीची भूमिका पाच वर्षाच्या सारिकाने अतिशय सुरेख केली. गुरुदेव (टागोर) यांची दुसरी कथा "गुप्तधन" या कथेत प्रा. डॉ. आनंद सुभेदार ह्यांनी नाट्यरूपांतर करून त्यांनीच ते सादर केले. ह्या नाट्यात श्री. प्रमोद जोशी, श्री. गाडे, श्री. सच्चिदानंद काळे, कु. गोरे ह्यांनी भूमिका केल्या व सौ. संध्याताई लोहे यांनी सादर केली. नृत्यात कु. पल्लवी देशपांडे, कु. स्वाती कोरान्ने, कु. विशाखा लोहे, कु. प्रांजळी व्यवहारे, कु. कांचन भागवत, कु. अर्चना अडसड ह्यांनी भाग घेतला. संगीताची बाजू श्री. शरदचंद्र ठाकरे व श्री. बाकोडे गुरुजी ह्यांनी सुंदर रीतीने सांभाळली. गाण्याची साथ कु. शीला देशपांडे, कु. रंजनी व्यवहारे, कु. प्रांजली व्यवहारे, कु. विशाखा लोहे ह्यांनी केली. गीतवन नृत्याचे निवेदन प्रा. निर्मला महात्मे ह्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन शाखा कार्यक्रम प्रमुख प्रा. शिरीष पाटील ह्यांनी केले. शेवट शाखेचे सचिव प्रा. ढाणके ह्यांनी सर्वांचे आभार मानले.

दि. १२–९–८६ ला महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी उ. रा. गिरी यांचे निधनाबद्दल शाखेच्या सर्व सभासदांनी शोक प्रस्ताव पारित केला.

कन्हान

दि. २–८–८६ रोजी शाखेची वार्षिक साधारण सभा पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी श्री. उल्हास मनोहर हे होते. चालू वर्षासाठी खालील प्रमाणे कार्यकारिणी निवडण्यात आली.

कार्याध्यक्ष– श्री. धर्मदास भिवगडे, कार्याध्यक्ष– श्री. रामराव पाटील, सचिव– श्री. तेजराम गजभिये, सहसचिव– श्री. श्याम मेश्राम, कोषाध्यक्ष–श्री. आनंद गजभिये, कार्यक्रम प्रमुख– श्री. विनोद सोमदेवे, सदस्य– श्री. अब्दुल रज्जाक.

५-९-८६ रोजी शाखेच्या वतीने शिक्षक दिनाचा कार्यक्रम साजरा झाला. या निमित्ताने कन्हान क्षेत्रातील अग्रेसर शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. सत्कारमूर्ती श्री. वि. के. येटरे, श्री. आर. एम. कोल्हे, श्री. आहडवार, श्री. मस्के, श्रीमती चवडे, श्रीमती डहाके होते. अध्यक्षस्थानी श्री. ए. के. संगीतराव, प्रकल्प अधिकारी नागपूर जिल्हा परिषद व प्रमुख पाहुणे श्री. सीताराम रडके होते.

प्रास्ताविक श्री. विनोद सोमदेवे यांनी तर आभार प्रदर्शन श्री. धर्मदास भिवगडे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन श्री. तेजराव गजभिये यांनी केले.

दि. १५-९-८६ रोजी शाखेला दलित रंगभूमीचे प्रवर्तक आयुष्यमान गायकवाड यांनी भेट दिली. दलीत रंगभूमीबाबत चर्चात्मक कार्यक्रम झाला. शाखेच्या वतीने श्री. धर्मदास भिवगडे यांनी पुष्पमालेने सत्कार केला. या कार्यक्रमाचे संचालन श्री. विनोद सोमदेवे यांनी तर आभार प्रदर्शन श्री. श्याम मेश्राम यांनी केले.

मेहकर

दि. २९-९-८६ ला शाखेची वार्षिक सभा पार पडली. या सभेत चालू वर्षाकरिता सर्वानुमते कार्यकारिणीची निवड झाली.

(१) कार्याध्यक्ष- श्री. शिरीष गोविंदराव देशमुख, (२) कार्याध्यक्ष- श्री. वि. ब. कुलवंत, (३) सहचिटणीस- श्री. श्रीकुमार वुगदाणे, चिटणीस- श्री. ग. मुकुंद जोशी, (४) खजीनदार- श्री. मंगळमूर्ति जोशी, (५) कार्यक्रम प्रमुख- प्रा. मोहन केळकर (६) सदस्य- श्री. संजय जोशी.

कारंजा (लाड)

दि. १६-५-८६ रोजी कार्यकारिणीची सभा पार पडली. बैठकीमध्ये नवीन वर्षातील विविध उपक्रमांवर चर्चा करण्यात आली. शाखेजवळ असलेला पैसा शाखेच्या नावे भारतीय स्टेट बँकेत खाते काढून जमा करण्याचा ठराव पास झाला. शाखाध्यक्ष प्राचार्य डॉ. शरद असोलकर यांच्या सुविध पत्नी सौ. सुमतीबाई यांचे ११ एप्रिल रोजी निधन झाले त्याबद्दल शोकप्रस्ताव करण्यात आला व त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

दि. २७-७-८६ रोजी कार्यकारिणीची सभा प्राचार्य डॉ. आसोलकर यांचे अध्यक्षखाली पार पडली. शालांत परीक्षेत (१० व्या वर्गात) मराठी विषयात सर्वाधिक गुण मिळविणाऱ्या विद्यार्थीना पारितोषिके देण्याचा निर्णय घेण्यात आला. ख्यातनाम साहित्यक श्री. पु. य. देशपांडे यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यांत आली.

शाखेची सर्वसाधारण वार्षिक सभा दि. ३०-७-८६ रोजी झाली. वर्षभर करावयाच्या विविध उपक्रमांवर चर्चा करण्यात आली. स्थानिक कवी कथाकारांचे संमेलन, परीक्षा, व्याख्याने समस्यापूर्ती स्पर्धा इ. कार्यक्रम घेण्याचे ठरविले. नवीन उपध्यक्ष श्रीमती चारूमती डोरले तर सहसचिव श्री. नागेश कुळकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली. याशिवाय सल्लागार म्हणून श्री. सुरेश उमाळकर व सौ. विजयाताई पांडे यांचा समावेश करण्यात आला. सभेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. असोलकर होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन सचिव सुभाष गढीकर यांनी केले.

वर्धा

दि. ३१-८-८६ रोजी शाखेची वार्षिक सभा पार पडली. या सभेत खालील निर्णय घेण्यात आले. मागील वर्षीच्या जमा खर्चास मंजूरी दिली. गेल्या तीन वर्षातील विविध कार्यक्रमांचा आढावा प्रा. सानप यांनी घेतला. श्री. भगवान ढग यांचे १२-८-८६ चे तक्रारी विषयाचे पत्रावर केन्द्रीय कार्यालयाचे पत्रानुसार चर्चा करण्यात आली व श्री. ढग यांनी याबद्दल क्षमा मागितली. कार्यकारिणीची निवड खालील प्रमाणे करण्यात आली.

कार्याध्यक्ष- श्री. प्रभाकर पाटील, सचिव- श्री. राजेंद्र दुर्योधन मुंढे, कार्योपाध्यक्ष- प्रा. विजय चहाम, सहसचिव- श्री. प्रशांत पनवेलकर, कोषाध्यक्ष- प्रा. गजानन कोटेवार, कार्यक्रम प्रमुख-श्री. अरूण हणवंते, सदस्य— सर्वश्री लेले, कुहिटे, सौ. कुबडे, प्रा. मुलकर, राठी, सौ. सानप, भीमनवार, घोटे, दाते, कु. कुर्वे केन्द्रीय कार्यकारिणी प्रतिनिधी- प्रा. किशोर सानप. वर्धा येथे जिल्हा साहित्य संमेलन नोव्हें. ८६ च्या दरम्यान घेण्याचे ठरले. प्रा. देवीदास गं. सोटे, संमेलनाध्यक्ष म्हणून एकमताने निवड केली.

दिग्रस

दि. ३१-८-८६ रोजी शाखेतर्फे "श्रावणी काव्यकथा संमेलन" भवानी टेकडीच्या निसर्गरम्य परिसरात पार पडले. यात सर्वश्री पाटील, प्रा. वाघमारे, किर्तने, बोजेवार, प्रा. गोल्हर, जाधव या कवींनी भाग घेतला तर श्री. तुपसुंदरे यांनी कथा सांगितल्या; कार्यक्रमाचे संचालन जाधव तर आभार प्रदर्शन श्री. किर्तने यांनी केले.

येथील बालाजी मंदिरात प्राचार्य राम शेवाळकर यांचे व्याख्यान झाले. त्यानंतर त्यांनी राम गायगोडेंकडून शाखेचे कार्यवृत्त ऐकून समाधान व्यक्त केले,

शाखेचे सर्वसाधारण सभा दि. १४-९-८६ रोजी दुपारी ३ वाजता दिनाबाई विद्यालय दिग्रस येथे प्रा. काटेवाले यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या समेत शाखेच्या स्थायी कार्यकारिणीची ठराव क्र. ४ नुसार १९८६-८७ अविरोध निवड करण्यात आली. शाखेची कार्यकारिणी पुढील प्रमाणे आहे.

(१) अध्यक्ष- प्राचार्य श्री. म. वि. ढोले, (२) उपाध्यक्ष- सौ. मालतीबाई पाटील, (३) सचिव- प्रा. राम गायगोले, (४) सहसचिव- प्रा. म. शि. वाघमारे, (५) कोषाध्यक्ष- प्रा. गो. रा. केशरवाणी, (६) कार्यकारिणी सदस्य— सर्वश्री वसंतराव घोडके, विजय सरदार, प्रा. मा. शा. गोल्हर, प्रा. श. मा. पदमावार, र. ज. काळे, रा. ल. तुपसुंदरे व सुधाकर जाधव.

यवतमाळ

दि. ३०-८-८६ रोजी "युवासर्वस्व" या संस्थेच्या सहकार्याने कविसंमेलनाचे आयोजन केले होते. नगरवाचनालयाच्या सभागृहांत संपन्न झालेल्या कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी दै. मतदारचे संपादक अॅड्. दिलीप एडतकर होते. श्री. मंगेश मयूर बुटके यांनी पाहुण्याचे स्वागत केले प्रस्ताविक प्रा. अशोक राणा यांनी केले.

या संमेलनांत सर्वश्री अनंत कांत (मुंबई) विनय मिरासे (मेटीखेडा) डॉ. गिरी (पुसद) सौ. आशाताई दिवाण (दारव्हा) अशोक काळे (चंद्रपूर) व यवतमाळ बाहेरील शरद पिदडी,

धर्माधिकारी, अविनाश शिर्के, पद्माकर मलकापुरे, लहू खामनकर, मंगेश हातगांवकर, अशोक राणा, ऋषिकेश शिरपूरकर, कु. अनीता शिर्के, इकबाल साहिर इ. नवोदित कवींनी भाग घेतला होता.

सर्वश्री अरविंद गोरे, प्रदीप पांडे, राजेश खडक्ककार यांनी परिश्रम घेतले व श्री. सुरेश गांजरे यांनी संचालन केले.

दि. १-९-८६ रोजी शाखेतर्फे स्थानिक नगरवाचनसभागृहात युवासर्वस्व भारत-सोविएत सांस्कृतिक संघ व एम. एस. ई. बी. वर्कर्स फेडरेशनच्या सहकार्याने जागतिक शांतता दिन साजरा केला.

या समारंभाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष अॅड्. काकासाहेब चमेडीया होते. अमोलकचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व मा. पेशवे, व अमरावती येथील म. रा. वि. मंडळ वर्कर्स फेडरेशनचे सरचिटणीस श्री. पी. वी. उके हे प्रमुख वक्ते होते. याप्रसंगी अकोला येथील कामगार नेते श्री. डी के. कढाले यांनीही आपले विचार मांडले.

इस्कसन नगरवाचनालयाचे अध्यक्ष-अॅड्. म. ग. मानकर लोकविज्ञान संघटनेचे सचिव किरण देशपांडे, ऑल इंडिया युथ फेडरेशनचे गुलाबराव उमरतकर, अ. भा. शांतता व भ्रातृभाव संघटनेचे देविदास सायंकार, ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनचे अशोक जाधव व इस्कसचे श्री. एस. ए. जाधव यांनी अतिथींचे स्वागत केले.

प्रारंभी "थांबवा आक्रोश सारा थोपवा आवर्तने" हे स्फूर्तिगीत व अभिनव अशा ग्रुपमिररिंगने युवासर्वस्वच्या कलावंतांनी सर्वांचे स्वागत केले. अविनाश शिर्के यांनी प्रास्ताविक, अॅड्. म. ग. मानकर यांनी आभार प्रदर्शन तर कार्यक्रमाचे संचालन प्रा. अशोक राणा यांनी केले.

३. दि. ८-९-८६ रोजी विदर्भातील ख्यातनाम कवी कै. उ. रा. गिरी यांच्या दु:खद निधना-निमित्त शाखेतर्फे शोकसभा घेण्यात आली. या सभेच्या अध्यक्षस्थानी कविवर्य पां. श्री. गोरे होते. अॅड्. हरीश मानधना, रमेश पिंजरकर, अशोक राणा, काशिनाथ लाहोरे, सुनील दांडेकर, केशवराव खिलारे आदींनी आपल्या शोकसंवेदना प्रकट केल्या.

उमरखेड

२५-९-८६ रोजी शाखेची सभा पार पडली. या सभेत १९८६ ते ८९ या कालावधीकरिता नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

१. अध्यक्ष-प्राचार्य रा. रा. चितलांगे २. उपाध्यक्ष प्रा. बा. दा. जोशी ३. प्रा. भा. म. लुतडे ४. सचिव-श्री. दीपक देशमुख, सहसचिव प्रा. प्र. भा. काळे व भ. मा. गंधे आणि कोषाध्यक्ष-श्री. भारत कुळकर्णी, सदस्य-सर्वश्री व. गो. देशमुख, जोशी, पु. भा. देशमुख, देशपांडे, प्रा. बिडवई, शेजाळ, प्रा. कुळकर्णी, पांडे, सौ. छबुताई एकबोटे.

परीक्षा समिती-प्रा. डॉ. बा. दा. जोशी, सहाय्यक-प्रा. बिडवई प्रा. कुळकर्णी, प्रा. लुतडे, श्री. गंधे.

कुऱ्हा

या शाखेची ८६-८७ वर्षाची कार्यकारिणी खालीलप्रमाणे आहे.

१. अध्यक्ष-श्री. प्रा. जी. सी. ठाकरे, २. उपाध्यक्ष-बापुरावजी आखरे, ३. माणिकराव डहाके,

३. सचिव श्री. श्रीराम भगत, ४. सहसचिव–प्रा. विजय कडू, ५. कोषाध्यक्ष–श्री. सुरेश मस्करे, ६. सदस्य–सर्वश्री सुधाकरराव कडू, बबनराव बिंड, नाना मालधुरे, ओमप्रकाश भैया, गिरीधरराव रोडगे.

धनज (माणिकवाडा)

शाखेची सभा घेवून १९८६–८७ वर्षासाठी खालीलप्रमाणे कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

संघटक–डॉ. मिर्झा रफी अहमद बेग अध्यक्ष–श्री. आनंद हाते उपाध्यक्ष १. श्री. कृ. म. गोल्हर २. श्री. ना. पां. मस्के सचिव–श्री. बबन भांगे सहसचिव–श्री. प. रे भोलांडे कोषाध्यक्ष–श्री. देविदास हूड सदस्य–सर्वश्री चौधरी, राहूल, हाते, परोपटे, डॉ. फिरके.

आरमोरी

दि. ३०–९–८६ ला सायंकाळी ५ वाजता शाखेतर्फे आजीव सदस्य श्री. धनंजय नाकाडे यांचा अपघाती मृत्यु झाला त्याप्रीत्यर्थ श्रद्धांजली कार्यक्रम पार पडला.

आजीव सभासद १–७–८६ ते ३०–९–८६

१. प्रा. सौ. ज्योती लांजेवार, २. श्री. प्रशांत इंदूरकर, ३. श्री. श्यामकांत वि. कुळकर्णी, ४. श्री. अतुल प्र. टालाटुले, ५. अॅड. निलकंठ उर्फ नितांत गणपत हटणागर, ६. प्रा. प्रकाश भा. काळे, ७. श्रीमती सुगंधा हिरामण शेंडे, ८. श्रीमती वनमाला वि. कुळकर्णी, ९. श्री. शशिकुमार शं. भगत, १०. सौ. सुनंदा अशोक वसु, ११. श्री. अशोक वामन वसू, १२. श्री. पद्माकर नरहर वडनेरकर, (सर्व नागपूर), १३. श्री. दे. गं. सोटे, १४. प्रा. किशोर सानप, १५. प्रा. महावीर पाटणी, १६. श्री. विनय कृ. चव्हाण (सर्व वर्धा), १७. श्री. पुंडलीक धर्माजी तिरपुडे (लाखनी), १८. श्री. विनायक नानाजी घोटे, १९. धनजी विरजी शहा, २०, श्री. दत्तात्रय शशिकांत धर्माधिकारी, २१. श्री. तेजराम कवडूजी कापगते, २२. श्री. नाना नामदेव पाटील, २३. श्री. नरेश मुरलीधर पाटील, २४. श्री. श्रीराम नामदेवराव गोगिरवार, २५. श्री. अशोक जनार्दन गंधेवार, २६. श्री. रेशमचंद्र केशवलालजी सूचक (सर्व मूल), २७. श्री. महेश नागोराव पारखी, २८. श्री. प्रा. चंद्रकांत वालाजी सहारे, २९. डॉ. अशोक भवरीलाल वोथरा, ३०. श्री. भालचंद्र श्रीहरी चकनलवार, ३१. श्री. सुभापसिंह संभूसिंह गौर, ३२ श्री. प्रफुल्लता प्रभाकर वाघमारे, ३३. श्री. भालचंद्र सखाराम मोगरे, ३४. श्री. आनंदराव विठ्ठलराव मनगंटीवार, ३५. श्री. वासुदेव शिवाजी गरगेलवार, ३६. श्री. रावजी भगवान चवरे, ३७. श्री. मधुसूदन जागोबाजी दुधाने, ३८. श्री. राजेन्द्र श्रीराम जयस्वाल, ३९. श्री. राजू मधुकर तातावार, ४०. श्री. सोहनप्रभु बुधाजी मुंजनकर, ४१. श्री. संजय वालाजीपंत भृगुवार, ४२. श्री. किशोर के. नालनवार, ४३. श्री. वसंत धोंडूजी मेश्राम, ४४. श्री. प्रभाकर मारोतराव नाकतोडे, ४५ श्री. गोपाळ विठ्ठल गुंडावार, ४३. श्री. सुधीर केशव देवांग (सर्व चंद्रपूर), ४७. श्री. श्रीनिवास ग. खोत, ४८. सौ. रजनी श्रीनिवास खोत, ४९. श्री. राम गो. पाटील, ५०. श्री. श्रीकांत क. सुरेका (सर्व अकोला), ५१. सौ. शकुंतला राजाराम महाजन (परतवाडा) ■

सरचिटणीस

अनुक्रमणिका

चित्रकार- धनंजय नाकाडे यांची एक कलाकृती



अनुक्रमणिका

YUGAVANI / REGD. NO. NGP. 275 ▫ युगवाणी / जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९८६ / मूल्य ६ रु.

जाहिरातदारांनो !

प्रकाशक : मनोहर म्हैसाळकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ, नागपूर-४४००१२.
मुद्रक : मधुसूदन पांडुरंग बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर- ४४००१२.
मुखपृष्ठ मुद्रण : मधुकर वैद्य, मधुकर आर्टस, धंतोली, नागपूर- ४४००१२.

अनुक्रमणिका